# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १२-०४-१९९९ ते ०६-११-१९९९**

**रजिष्टर क्र. १०**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १२.०४.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १२ एप्रिल, १९९९ रोजी मा.सभापती, स्थायी समिती पदाची निवड करण्यासाठी दुपारी ४.०० वा. "मलिक अंबर स्थायी समिती सभागृहामध्ये" संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने झाली. सभेला अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. विकास रतनलाल जैन | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. नरसिंग मुरलीधर ढगे | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. राजकुमार बचाटे | - | स.सभासद |
| ५. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉन | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ११. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| १२. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| १३. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १४. | स.स.सौ. मुंडलिक विमल नंदकुमार | - | स.सभासद |
| १५. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| १६. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सभासद |

**विषय क्र.१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये सभापती पदासाठी निवड करणे.

<u>**संवाद :**</u>

**मा.आयुक्त :** स्थायी समितीची पहिली सभा असून या सभेच्या सभापती साठी सभागृहातील उपस्थित स.सभासदांकडून तात्पुरती निवड करावयाची असल्याने त्यांचे नाव सुचविण्यांत यावे अशी विनंती आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत स.सभासद श्री.कोकाटे यांचे नांव सुचविण्यांत येते.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** यास माझे अनुमोदन आहे.

**सौ.लता दलाल :** स.सभासद श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग यांनी तात्पुरते सभापती पदी स्थापन्न होण्यास त्यांचे नांव सुचविण्यांत येते.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** गुप्त मतदान पध्दतीने मतदान होऊन निवड करण्यांत यावी.

**श्री.जैन विकास :** स.सदस्या सौ.लता दलाल यांनी सुचविलेले नावास माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त** : सभागृहाने दोन स.सभासदांचे नाव सुचविलेले आहे. हात वर करुन एका स.सभासदांची सभापती पदासाठी निवड करण्यांत यावी.

याचवेळी सभागृहातील खालील स.सभासदांनी हात वर करुन आपले मत प्रदर्शित केले.

स.स.श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन यांच्या बाजुने

१. श्री. रविंद्र बाबुराव इंगळे
२. श्री. विकास रतनलाल जैन
३. श्री. नरसिंग ढगे
४. सौ. राधाबाई तळेकर
५. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
६. श्री. रमेश लाहोट
७. सौ. मुंडलिक विमल नंदकुमार
८. सौ. लता दलाल
९. श्रीमती गंगवाल पुष्पाताई
१०. श्री. देशमुख वसंत विनायकराव

व श्री.काशिनाथ कोकाटे यांच्या बाजूने

१. श्री. स.अ.इकबालोद्दीन
२. श्री. अजिज खाँ गणी खाँ
३. श्री. तुळशीबागवाले किशोर
४. श्री. काशिनाथ कोकाटे यांनी हात वर करुन मत दिले.

**मा.आयुक्त :** सभागृहात उपस्थित स.सभासदांपैकी बहुमताने म्हणजेच १० मते श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन यांच्या पक्षात असल्याने त्यांना या सभेपुरते सभापती म्हणून पदधारण करण्यास संम्मती देण्यांत येत आहे.

(याचवेळी स.सभासद श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन हे सभापती पदावर विराजमान झाले वेळ दुपारी ४.१० वा.) स.सदस्य श्री.स.अ.इकबालोद्दीन हे गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्याबाबतचे पत्र नगरसचिव व स.सभापती यांना देतात वेळ दुपारी ४.११ वा.

**मा.सभापती :** महापालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी दोन उमेदवार उभे असून त्यांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१) स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन

२) स.स.श्री. नरसिंग मुरलीधर ढगे

वरील दोन उमेदवारांना नामनिर्देशन पत्र उमेदवारी मागे घेण्यासाठी नियमाप्रमाणे ३० मिनिटांचा अवधी देण्यांत येत आहे. (वेळ अंदाजे ४.१५ वा. निवडणूक प्रक्रियेस सुरुवात दु.४.४५ वाजता.)

**मा.सभापती :** सभापती स्थायी समिती या पदासाठी मतदान प्रक्रिया सुरु होत आहे. वरील दोन्ही उमेदवारांपैकी एका ही उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतलेले नाही. त्यामुळे मा.सभापती पदासाठी १) स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन तसेच २) स.स.श्री.नरसिंग मुरलीधर ढगे हे दोन उमेदवार

सभापती पदासाठी उभे राहिलेले आहेत. गुप्त मतदान पध्दतीने मतदान होईल.

(मतदान पेटी सर्वासमोर रिकामी असल्याचे दाखविले व मा.सभापती व सर्व स.सभासदांच्या समक्ष मतपेटी बंद करुन चावी मा.सभापतीकडे देण्यांत आली व मा.सभापती यांच्या स्वाक्षरीने सिल करण्यांत आली.)

- एका स.सभासदाला फक्त एकच मत देण्याचा अधिकार आहे.
- ज्या उमेदवाराला मत द्यावयाचे असेल त्यांच्या नांवासमोर गुणाकाराची फुली ( x ) चे चिन्ह लावावे.
- मतदानासाठी देण्यांत येणाऱ्या पेन नेच मत नोंदवावे.
- मतदानासाठी ३० मिनीटाची वेळ देण्यांत येत आहे. ज्या स.सदस्यांचे नाव पुकारले जातील त्यांनी जाऊन मतदान करावे.

(याचवेळी मा.सभापती (स.स.श्री.तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग) यांनी सभागृहातील उपस्थित असलेल्या स.सभासदांचे नाव पुकारल्याप्रमाणे खालील स.सभासदांनी मतदान हक्क बजावला.)

१. स.स.श्री. रविंद्र बाबुराव इंगळे
२. स.स.श्री. विकास रतनलाल जैन
३. स.स.श्री. नरसिंग मुरलीधर ढगे
४. स.स.श्री. राजकुमार बचाटे
५. स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले
६. स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
७. स.स.सौ. राधाबाई तळेकर
८. स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन
९. स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉन
१०. स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
११. स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव

**मा.सभापती :** क्रमांक १२ नुसार माझे स्वतःचे मतदान असल्यामुळे सभापती पदावर स्थानापन्न होण्यासाठी स.सदस्या सौ.लता दलाल यांना विनंती करतो.

(याचवेळी सौ.लता दलाल स.सदस्या यांनी मा.सभापती यांचे पदावर स्थानापन्न होतात.)

**मा.सभापती :**

१२. स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद
यांना मतदान हक्क बजावण्यासाठी मुख्य लेखा परिक्षक यांनी मदत करावी

(त्यानुसार मुख्य लेखा परिक्षक श्री.सोनार यांनी स.सभासद श्री.लाहोट रमेश दिपचंद यांना मतदान करण्यासाठी मदत करतात.)

१४. स.स.सौ.विमलताई मुंडलिक

**मा.सभापती :** श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग यांनी त्यांच्या सभापती पदास स्थानापन्न व्हावे.

(याचवेळी स.स.श्री.तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग सभापती पदावर स्थानापन्न होतात व जातात.)

१५. स.स.सौ. लता श्रीनिवास दलाल
१६. स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र

**मा.सभापती :** सर्व १६ स.सभासदांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावलेला आहे. व मतदान प्रक्रिया संपलेली आहे.

(यानंतर वरील १६ स.सभासदांनी मतदानाचा हक्क बजावलेल्या मतपत्रिका टाकण्यांत आलेल्या मतपेटीचे सिल मा.सभापती यांनी सर्वासमक्ष काढून मतपेटीतील सर्व मतपत्रिका एका ट्रे मध्ये टाकुन मतमोजणी अधिकारी श्री.जरारे (सहाय्यक आयुक्त-१) यांनी मा.सभापती स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग यांच्या समक्ष छाननी करुन मतमोजणी केली व स.सदस्यांच्या मतमोजणी साठी एक एक प्रतिनिधींनी यावे असे सांगितले व मोजणी होऊन त्यापैकी निवडणूकीसाठी उभे असलेले दोन उमेदवारांना खालील प्रमाणे मत संख्या असल्याचे मा.सभापती यांनी उल्लेखित केले.)

| **अ.क्र.** | **उमेदवारांचे नांव** | **मिळालेली मते** |
|---|---|---|
| १. | स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबुद्दीन | ०५ |
| २. | स.स.श्री.नरसिंग मुरलीधर ढगे | १० |
| | **एकूण वैध मते** | **१५** |
| | **अवैध मते** | **०१** |
| | **एकूण मते** | **१६** |

**मा.सभापती :** वरील दोन उमेदवारांना मिळून एकूण १५ वैध मतांपैकी स.स.श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन यांना एकूण ०५ मते मिळालेली आहे. व स.स.श्री.नरसिंग मुरलीधर ढगे यांना एकूण १० मते पडलेली आहे. श्री.नरसिंग मुरलीधर ढगे यांना ०५ जास्त मते पडल्याने स्थायी समिती सभापती पदासाठी स.स.श्री.नरसिंग ढगे यांची निवड करण्यांत आलेली आहे. असे घोषित करण्यांत येते व त्यांनी सभापती पदावर विराजमान व्हावे अशी त्यांना विनंती आहे.

(यानंतर सभागृहात मा.सभापती पदासाठी निवडून आलेले स.स.श्री.नरसिंग मुरलीधर ढगे यांचा सभागृहात अधिकारी, पदाधिकारी तसेच इतर मान्य वरांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यांत आले.)

याबरोबरच निवडणूक प्रक्रिया कार्यक्रम संपल्याचे व सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १२.०५.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक १२ मे, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे संपन्न झाली. बैठकीला अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे स.सभासद सभेला उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. राजकुमार बचाटे | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. विकास रतनलाल जैन | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉन | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| ११. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १२. | स.स.सौ. मुंडलिक विमल नंदकुमार | - | स.सभासद |
| १३. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सभासद |
| १४. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |

<u>संवाद :</u>

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** परमपुज्य स्व.देवेंद्रजी मुनीजी महाराज यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहात ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.

**श्री.राजकुमार बचाटे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठिक आहे. ०२ मिनिटे सर्वांनी स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते.

(याचवेळी सभागृहात परमपुज्य स्व.देवेंद्र मुनीजी महाराज यांना ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण)

**श्री.स.भ.इकबालोदीन :** नेहरु भवन येथील मनपाचे दुकान केंद्राच्या संदर्भात दोन वेळेस लिलाव होऊन दुसऱ्यांदा ज्यांनी लिलाव घेतले त्यांनी पूर्ण पैसे न भरण्यास पुन्हा पहिल्यावेळी लिलाव केलेल्यांचा विचार करण्यांत येईल असे आयुक्त यांनी आश्वासन दिलेले होते. याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

**मा.सभापती :** मालमत्ता अधिकारी आजच्या सभेला उपस्थित नसल्यामुळे तसेच त्यांचे वरचे अधिकारी उपआयुक्त (म.) हे रजेवर असल्यामुळे त्यांचा अति.कार्यभार मुख्य

लेखा परिक्षक यांच्याकडे असून पुढच्या बैठकीत या बाबतची सविस्तर माहिती सभागृहात देण्यांत येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जे अधिकारी रजेवर जातात व त्यांच्या जागी ज्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त कार्यभार सोपवलेला असेल त्यांनी सभागृहात सर्व तयारी निशी यावयास पाहिजे.

**सौ.लता दलाल :** सभागृहात दोन मुद्दे उपस्थित करु इच्छिते. १) जवळ जवळ एक महिन्यापासून कोणत्याही विभागामध्ये गेले असता दु.३ ते ६ च्या दरम्यान अधिकारी जागेवर सापडत नाही. काही अधिकाऱ्यांकडे दोन-दोन विभागाचा कार्यभार दिलेला असून हे प्रशासनाचे धोरण योग्य आहे काय? उदा.लेखाधिकारी संजय पवार यांना मालमत्ता विभागाचा कार्यभार दिलेला असून दिलेला असून दोन विभागाचे जबाबदारी दिलेली असतांना अधिकारी आज सभागृहात उपस्थित नाही. किती अधिकारी रजेवर आहेत. अधिकारी पदाच्या किती जागा रिक्त आहेत. या बाबतचा खुलासा प्रशासनाने दिला पाहिजे. तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या वरचे अधिकारी उपआयुक्त (म.) हे आज सभागृहात उपस्थित नसून म्हणजेच तीन विभागाची माहिती चा खुलासा आज सभागृहात मिळणार नाही. असे वाटते.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** ज्यात्या विभागाचे अधिकारी सभागृहात उपस्थित नसल्यास मा.आयुक्त यांनी त्या त्या उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत आपले मत मांडावे अशी विनंती आहे.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.कोकाटे, सौ.दलाल, श्री.देशमुख यांनी उपस्थित केलेला मुद्दा असा की अधिकारी कार्यालयात दुपारी ३ ते ६ या दरम्यान उपस्थित रहात नाही. याबाबत मा.आयुक्त यांना विनंती की, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दुपारी ३ ते ६ च्या दरम्यान आपआपल्या चेंबरमध्ये उपस्थित राहण्याबाबत सुचना करव्यात जेणे करुन स.नगरसेवक यांच्या अडी अडचणी सुटतील.

**श्री.राजकुमार बचाटे :** सिडको पाणी पुरवठा विभागाकडून सन १९८४ ते १९९५ च्या दरम्यानची एकूण ७४ घरांना पाणीपुरवठा झालेला नाही. परंतू पाणी पट्टी भरण्यास प्रशासनाने आदेशित केलेले आहे. एवढ्या कालावधीची पाणीपट्टी ते नागरिक भरु शकत नाही. त्याबाबतचे पत्र तत्कालीन आयुक्त श्री.भोगे साहेब यांना देऊन विनंती केली होती. कार्यवाही झाली नाही. त्यानुसार मा.आयुक्त यांनी योग्य तो खुलासा करावा (पत्राची एक प्रत स.सदस्य मा.सभापती कडे देतात.)

**श्री.काशिनाथ कोकाटे :** स.सदस्य यांनी ७४ घरांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतू सिडको हडको मध्ये जवळपास ५५० ते ७०० घरांना पाणी पुरवठा केला नसतांना त्यांच्यावर पाणी पट्टी लादण्यांत येत आहे. एकूण ५४ लाख पाणीपट्टी या नळधारकांवर थकीत रक्कम म्हणून लावण्यांत आलेली असून मागील सर्व बाकी रक्कम वसुल न करण्याचा निर्णय मा.आयुक्त भोगे यांनी तोंडी दिलेला होता. २ ते २ १/२ वर्ष लावलेली जास्तीची पाणीपट्टी कमी करावी. परंतू मागील आकडेवारी पुढील आकडेवारीत समाविष्ट करुन या नळधारकांना पाणीपट्टी भरण्या बाबतच्या नोटीसा प्रशासनाच्या माध्यमातून देण्यांत येत असून याबाबत प्रशासनाने काही तरी ठोस निर्णय घ्यावा व ज्या नागरिकांकडून मागील बिले वसुल न करण्या बाबतचा निर्णय प्रशासनाने तात्काळ घ्यावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सन १९९५-९६ पासूनचा पाणीपट्टी वसुलीचा प्रश्न आहे. भरणा हा कार्यकारी अभियंता यांच्या अंतर्गत येत नाही. मा.आयुक्त यांनी प्रत्येक झोनला असे आदेश दिले आहेत की, सन ८५ ते ९० ची पाणीपट्टी थकबाकी नागरिकांकडून सध्या वसुल न करता त्यापुढील वसुली करण्या बाबतचे निर्देश दिलेले असून मागील थकबाकी रद्द करण्याबाबतचा कोणताही निर्णय अद्यापपर्यंत झालेला नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सन १९८५-९० या वर्षाची थकबाकी असल्यामुळेच त्यानुसार पाणीपट्टी लादण्यांत आलेली आहे. परंतू संबंधित नागरिकांना या कालावधीत नळ कनेक्शन असतांना महापालिकाने पाणी पुरवठा केलेला आहे किंवा काय? पाणीपुरवठा केलेला नसल्यास त्याच्यावर पाणीपट्टी कशी आकारण्यांत आली याबाबतचा खुलासा सभागृहात द्यावयास पाहिजे. १९९१ पासून त्या संदर्भातील संचिका कार्यालयात पडून राहतात. ज्यांनी तक्रारी केलेल्या आहेत त्या बाबतची सर्व कागदपत्रे माझ्याकडे पुरावा म्हणून आहेत. एन-११ के, सेक्टर, एन-११, जी-सेक्टर एन-७ मध्ये एकूण ३५० घरे एन-२ मध्ये एल-सेक्टर मध्ये काही घरांना पाणी पुरवठा नसतांना एकूण ५४ लाखाची वसुली करण्याबाबतची कार्यवाही होत आहे. पाणीपुरवठा केलेला नसेल तर पाणीपट्टी वसुल करण्याचा हक्क प्रशासनाचा नाही. याबाबत प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावा. त्या नागरिकांवर अन्याय होणार नाही. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** कार्यकारी अभियंता यांनी नळ मंजूर केल्यावर मागणी रजिष्टर वर झोनला नोंद होते दुय्यम अवेक्षक अहवाल देतात. प्रत्येक झोनला पाणी पट्टी आकारण्या बाबतची रजिष्टरला झालेल्या नोंदी नाहीत म्हणून पाणीपट्टी वसुली करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतलेला आहे. १९८५-९० या कालावधीत ज्यांना ज्यांना पाणी पुरवठा करण्यांत आलेला नाही. त्या बाबतच्या नोंदी कर्मचारी यांनी.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेत चर्चा झाली. याबाबत सर्वसाधारण सभेत विषय ठेवून निर्णय घेता येईल का ते मा.आयुक्त साहेबांनी त्यावेळी संचिका आणावी व परवडेल असा निर्णय घ्यावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** झोन-७ मध्ये एकूण ३०० घरे १९८५ ला स्टॅण्ड पोस्ट मध्ये पाणी दिल्या जात होते. सदर भागात पाणी पुरवठा होण्यासाठी ४० लक्ष रुपये खर्च करुन पाईपलाईन टाकलेली असून नागरिकांना नळ कनेक्शन दिलेले आहे. नळपट्टी वसुली करत आहे. याबातची सर्व माहिती कार्यकारी अभियंता यांना असावयास पाहिजे. प्रत्येक घरांना नंबर दिलेले असतांना ज्यांना पाणी पुरवठा झालेला नाही. त्यांनाही नळपट्टी वसुली बाबत नोटीस दिलेल्या आहेत. व ज्यांना पाणी पुरवठा केलेला आहे. त्यांच्याकडून नळपट्टी आवश्य वसुल करण्यांत यावी. परंतू ज्यांना पाणीच दिले नाही. ज्यांना कनेक्शन दिलेले नाही त्यांना कमी करण्याचा प्रश्न येत नाही. एका घरात दोन दोन नळ कनेक्शन काही नळांना पाणी आलेले असतांना टॅक्स लावलेले आहेत. या बाबतची संचिका झोन कार्यालयात ४ ते ५ वेळेस गेलेली आहेत. येत्या १५ दिवसांत याबाबत प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा व तशी कार्यवाही करण्यांत यावी. ज्यांना पाणी दिलेले नाही. त्यांना पाणी द्यावे. रु.५४ लक्ष आकडा बाजुला काढला तर वसुलीची थकबाकी १०% राहील.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी पाणीपट्टी बाबतचा मुद्दा उपस्थित केला त्याच प्रमाणे ज्यांना घरे दण्यांत येतात. त्यांच्या नावाची यादी मनपाकडे येते. माझ्या वार्डातील ही म्हाडा कॉलनीत एकूण ४४४ घरे असून नळ कनेक्शन दिलेले आहे. परंतू त्या नागरिकांना परंतू त्या नागरिकांना पाणी मिळते आहे किंवा काय या बाबतची चौकशी करण्यांत यावी. शहरातील रहिवाशी नळ कनेक्शनसाठी आपल्याकडे अर्ज करतात व ज्यांना नळ कनेक्शन देण्यांत येतात ते रहिवाशी त्या ठिकाणी राहतात किंवा काय या बाबतही प्रशासनाने विचार करावा व ज्यांना आवश्यकता नाही. त्यांना नळ कनेक्शन देण्यांत आलेले असून त्या ठिकाणी कुणीही राहत नसतांना त्या पाण्याचा वापर संबंधित मालक करत नसून दुसरेच वापर करतात. किंवा काय? नळ मालकाला नळपट्टी त्यांच्या नावाने आकारण्यांत येत अशीही परिस्थिती दिसून येते ज्या घरात स्वत: मालक राहत नाही असे नळ कनेक्शन बंद करावे जर संबंधित मालकाने विनंती अर्ज केल्यानंतर त्यांना नळ कनेक्शन द्यावे. याबाबत प्रशासनाने योग्य ती दखल घ्यावी. नळपट्टी रद्द करावयाची असेल तर तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरी साठी आणावा.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** १९९५ ला एका सर्वसाधारण सभेमध्ये शहरातील बेरोजगार नागरिकांना टपरी वाटपाबाबत एक टपरी समिती गठीत करण्यात आलेली असून त्याबाबत बऱ्याच वेळेस सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन अद्यापपर्यंत काहीही निर्णय घेण्यांत आलेला नाही. जवळ-जवळ एकूण ४ वर्षाच्या कालावधी निघुन गेलेला आहे. आजही प्रत्येक वार्डामध्ये अनाधिकृत टपऱ्या बसतात. शहराचा वाढता व्याप लक्षात घेता महापौर यांनी सर्वा समवेत एक बैठक घेऊन टपरी वाटपबाबतचा निर्णय घ्यावा. ज्यांनी टपरी मिळवण्या बाबत अर्ज दिलेले आहेत. दुसऱ्या प्रभागात टपऱ्या दिल्यावर इतर लेक आमच्या कडे येतात. त्या त्या प्रभागातील नागरिक त्या वार्डातील नगरसेवकांना त्या बाबत विचारणा करतात.

**श्री.विखारोद्दीन :** बऱ्याच ठिकाणी अनाधिकृत टपऱ्या बसतात. ४ वर्षापुर्वी टपरी समिती गठण करण्यांत आलेली असून अद्यापपर्यंत काहीही निर्णय घेतलेला नाही. शहरात ज्यांना टपऱ्या द्यायच्या आहेत. त्यांना टपऱ्या दिल्या जातात. पोलिस कर्मचाऱ्यांवर मासिक खर्च किती होतो. टपऱ्या बसविण्यामागे पोलिस आहेत. पोलिस डिपार्टमेंट पैसे घेतात. पोलिस कर्मचारी टपरी हटविण्यासाठी ५००/- रु देत असाल तर उचलत नाही. महानगरपालिकेने पोलिस कर्मचारी वर्ग ठेवून महानगरपलिकेला त्याचा फायदा काय याची माहिती प्रशासनाने द्यावी. एक तर टपऱ्या बेकारांना देऊन टाकाव्या नाही तर रद्द कराव्यात अशी बऱ्याचशा नगरसेवकांची इच्छा आहे. काही तरी ठोस निर्णय घेण्यांत यावा.

**सौ.लता दलाल :** सन १९८५-९० या कालावधीमध्ये प्रशासनातर्फे किती बेकार लोकांना टपऱ्या देण्यांत आलेल्या आहे व कुणाकुणाला देण्यांत आलेल्या आहे. टपरी कमिटीच्या माध्यमातून टपऱ्या देण्यांत याव्या असा निर्णय झालेला असतांना प्रशासनाने काही लोकांना टपऱ्या दिलेल्या आहेत. किती टपऱ्या दिल्या कोणास दिल्या त्या का देण्यांत आल्या आम्ही कमेटी केली कोणत्या नियमाने दिल्या याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

२) महानगरपालिकाकडे पोलिस पथक मागविलेले असून त्यांच्या संरक्षणाने अतिक्रमणातील सर्व बांधकाम तोडण्यांसाठी सर्व बांधकाम बांधकाम

तोडण्यासाठी कार्यवाही प्रशासनाने करावयास पाहिजे अतिक्रमण हटाव वेगळा विभाग, अनेक रस्ते, खडी रस्ते, फुटपाथ येथे रोड टाकून ग्रिल बसवून व्यवसाय करतात उदाहरण द्यावयाचे झाल्यास निराला बाजार जवळील रस्त्याच्या बाजुला काही दुकानदारांनी मनपाच्या जागेवर फुटपाथवर फरशी टाकून व शेड टाकून मनपाच्या जागेचा उपक्षोग करवून घेत अहे. रत्याचे खडीकरण केल्यानंतर पुन्हा बांधकामे झालेली आहेत. रस्ते अरुंद होतात व त्यामुळे छोटे मोठे अपघात होतात त्यांनंतर प्रशासनाला जाग येते. ती अतिक्रमणे तात्काळ का हटविण्यांत येत नाही. होणारी अतिक्रमणे कशी होतात व कुणाच्या आर्शिवादाने होतात. याची माहिती प्रशासनाने द्यावयास पाहिजे.

**श्री.देशमुख व्ही.ही. :** सभागृहात कोणताही प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्याचे उत्तर प्रशासनाकडे असावयास पाहिजे, वृत्तपत्रात, टी.व्ही. (सिटी चॅनल) शहरात बातमी प्रसारित करतात त्याचे आभार त्यानंतर अधिकारी जागरुक होतात. ५ वर्षात शहरात ज्या ज्या लोकांना टपऱ्या दिलेल्या आहेत. टपऱ्यांची संख्या किती आहे. त्या टपऱ्या अतिक्रमणात येतात काय? याची माहिती द्यावी. देण्यांत आलेल्या टपऱ्या कुणाच्या अधिकाराने देण्यांत आलेल्या आहेत. अधिकारी यांनी चुक केल्यानंतर त्यांना साथ देणारे भरपूर असतात. त्यामुळे पुन्हा ती चुक होणार नाही याचा दखल प्रशासनाने घेतली पाहिजे. शहरातील एका अनाधिकृत बसलेली टपरीला सिटीबसने धडक दिल्याची बातमी सिटी चॅनलने दिली. अशा अनाधिकृत टपऱ्या काढण्या बाबतची कार्यवाही मा.आयुक्त यांनी लवकरात लवकर करावी जेणे करुन शहराचा विकास होण्यास मदत होईल.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** वृत्तपत्रात ४-४ कॉलमच्या बातम्या लागतात. काहीतरी केले पाहिजे.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी टपरी संदर्भात जो मुद्दा उपस्थित केला त्यास मी सहमत आहे. टपरी वाटप संदर्भात ४ वर्षापासून कार्यवाही चालू असून सर्वसाधारण सभेत या बाबत चर्चा होऊन अद्याप पर्यंत निर्णय झालेला नाही. मा.महापौर व मा.आयुक्त यांना विनंती की, त्यांनी टपरी वाटपा बाबतचा निर्णय लवकरात लवकर घेण्यांत यावा. व टपरी बाबत स.सदस्यांनी केलेला मुद्दा यावर मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** १) नेहरु भवन येथे शॉपिंग सेंटर संदर्भात सभागृहात मुद्दा उपस्थित आला. महानगरपालिकेच्या माध्यमातून शॉपींग सेंटर होण्या बाबतचा प्रकल्प हाती घेण्यांत आलेला होता. त्याचे जाहिर निविदा व हराशी मध्ये ३० हजार, ३५ हजार पर्यंत हराशी झालेली होती ती मुद्दामहुन कमी आलेली आहे. अशा प्रकारच्या त्यानंतर काहींच्या तक्रारी आल्यानुसार या दुकानाची हराशी ही किंमत जास्त येईल म्हणून दुसऱ्यांदा हराशी करण्यांत आलेली होती. त्यात १.५, १.१० लाख पर्यंत हराशी मिळालेली होती. यानंतर स.नगरसेवक मोहसीन अहमद, तसेच स.अ.इकबालोद्दीन यांनी सांगितले की, ज्यांनी हराशी जास्त किंमतीनी केलेली आहे ते लोक पैसे भरणार नाही. विनाकारण दुकाने अडकवून ठेवलेली आहे. आणि त्यानुसार ज्यांनी हराशी घेतलेली होती त्या लोकांना प्रशासनाच्या माध्यमातून भरण्याबाबत नोटीस काढलेल्या आहे. जर त्यांनी बोगस हराशी भरलेली असेल तर त्या लोकांची

डीपॉजिट रक्कम जप्त करुन मुळ हराशीप्रमाणे प्रशासकीय दृष्टीने कार्यवाही करता येईल.

२) दुसरा मुद्दा असा की, दुपारी ३ ते ६ या दरम्या अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नाही. या संदर्भात दुपारी अधिकारी यांनी ३ ते ६ या वेळात स.नगरसेवक व इतर नागरिकांचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी व त्यानुसार त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपआपले कार्यालय सोडू नये अशा प्रकारची ताकीद देण्यांत आलेली आहे. परंतू बऱ्याच वेळा असे आढळून आले की, अधिकारी यांना मा.महापौर, तसेच इतर पदाधिकारी यांच्याकडे शहरातील नागरिक तसेच काही स.नगासेवकच प्रश्न मांडतात व त्यासाठी अधिकारी यांना बोलवणे होते व पदाधिकारी त्यांच्या समवेत चर्चा करतात व विकास कामाच्या समस्या सोडविण्याचे सांगतात. सभागृहात असा निर्णय घ्यावा की, आयुक्त तसेच पदाधिकारी यांनी दुपारी अर्ध्या तासाच्या जेवणाच्या सुट्टीनंतर अधिकारी यांना ३ ते ६ या दरम्यान कुणीही अधिकाऱ्यांस चर्चा करण्यासाठी त्यांच्या दालनात बोलवू नये. असा निर्णय घेतला तरच जे अधिकारी दुपारी ३ ते ६ या वेळात कार्यालयात उपस्थित राहत नाही असे आढळून आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करता येईल. त्यांची अंमलबजावणी उद्या पासूनच करता येईल.

३) तिसरा मुद्दा असा की, सिडको - हडको भागात ज्यांना पाणी पुरवठा करण्यांत आलेला नाही त्या नागरिकांवर ८५ ते ९० या कालावधीची नळपट्टी आकारण्यांत आलेली आहे. तत्कालीन आयुक्त यांनी तोंडी सुचनेनुसार ती नळपट्टी माफ केली असेल. परंतू ती माफ करावयाचे बाबतीत स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरी घेऊन निर्णय व्हावयास पाहिजे होता. या ठिकाणी सदर रक्कम कमी किंवा जास्त हा प्रश्न निर्माण होतो असे नसून दरवर्षी प्रशासनाला ऑडीट रिपोर्ट सादर करावा लागतो. त्यास अडचण निर्माण होते. तत्कालीन आयुक्त यांनी असे तोंडी आदेश केले होते की, ९० ते ९५ या कालावधीची पाणीपट्टी वसुल करण्यांत येऊ नये त्यापुढील पाणीपट्टी वसुल करण्यांत यावी. ९० ते ९५ या दरम्यानची नळपट्टी माफ करावयाची असेल तर ती रक्कम १० लाखाच्या वर असेल तर सर्वसाधारण सभेची १० लाखाच्या आत असेल तर स्थायी समिती सभेची मंजूरी घेऊन ती माफ करण्याच्या निर्णय घेण्यांत येईल व तशी कार्यवाही चालू आहे. मागील नळपट्टी पुढील वर्षाच्या नळपट्टीतील रकमेत समाविष्ट करण्यांची प्रक्रिया ही सातत्याने चालुच राहणार आहे. पण सभागृहाची मंजूरी घेतल्यानंतरच प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल व १९९५ पासून आता चालू वर्षाची पाणीपट्टी पर्यंत ज्यांच्याकडे थकबाकी असेल ती निश्चित वसुल करावी लागेल यात शंका नाही.

४) टपरी संदर्भात एक प्रशासकीय संमती तसेच एक पदाधिकारी याची समिती स्थापन करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. टपरीसाठी ज्याचे अर्ज आलेले आहेत. त्याची छाननी करुन पदाधिकारी समिती समोर ठेवण्याच्या मा.महापौर यांच्या दालनात अनेक बैठका झाल्या. उपआयुक्त (म.) यांचे कडेही बैठका झाल्या. छाननीमध्ये जे रस्ते १०० फुटी आहेत, असे असतांना शहरात बऱ्याच ठिकाणी अनाधिकृत टपऱ्या झालेल्या आढळून येतात त्यांनी संपूर्ण नोंद आपल्या अतिक्रमण विभागाकडे आहेत. तक्रारी

नुसार माहिती घेऊन मुकुंदवाडी, चिकलठाणा, सेंट्रल नाका, निराला बाजार येथील अतिक्रमणे साफ केली. स.सदस्य सौ.दलाल यांनी उपस्थित केलेला निराला बाजार येथील अतिक्रमणे ही फुट पाथवर झालेले असून ६ ते ७ महिन्यापुर्वी काढण्यांत आलेली होते. परंतू पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण केले आहे. ही सातत्याने चालूच राहणारी बाब असून अतिक्रमणे होत राहतील त्यास आळा कसा घालता येईल याची प्रशासन कार्यवाही करत असते. येत्या पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर निराला बाजार येथील अतिक्रमण निश्चितपणे काढण्यांत येईल यात शंका नाही.

५) शहरातील अतिक्रमणे होतात वगैरे या दृष्टीने महानगरपालिकेने पोलिस पथक मागविलेले असून पोलिस निरिक्षक म्हणून श्री.बुवा यांची नेमणूक पोलिस विभागाने केलेली असून त्यांनी उत्कृष्ट असे काम महानगरपालिकेमध्ये केलेले आहे. गेल्या ६ महिन्यांमध्ये बेकायदेशीर एकूण १२६९ टपऱ्या त्यांनी काढलेल्या आहेत. परंतू आणखी २०००/- टपऱ्या शहरामध्ये जास्तीच्या झालेल्या आहेत. स.सदस्य आबेदा बेगम यांच्या वार्डामध्ये अनाधिकृत टपऱ्या झालेल्या आहेत. तशी तक्रार त्यांनी केली आहे. तसेच शहागंज येथे व घाटी प्रभागातही अनाधिकृत टपऱ्या झालेल्या आहेत. अनाधिकृत असलेल्या टपऱ्या काढण्या बाबतची कार्यवाही करण्याचे अटोकाट प्रयत्न प्रशासकीय दृष्टीने होतात व पुन्हा ती मोहिम हाती घेण्याच्या प्रयत्नात प्रशासन आहे. परंतू कुणाला किती टपऱ्या दिल्या कोणकोणत्या ठिकाणी दिल्या याची संपूर्ण माहिती आपणांस पाहिजे असेल तर ती पुढच्या बैठकीत प्रशासनाच्या माध्यमातून सादर करण्यांत येईल.

**श्री.देशमुख व्ही.व्ही :** पुणे, मुंबई , येथील महापालिका प्रशासनाप्रमाणे याही महानगरपालिकेच्या प्रशासनाचा धाक पाहिजे. व त्यानुसार योग्य त्या वेळीस कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** निराला बाजार येथे पुन्हा अनाधिकृत बांधकाम होते, दुकानदार शेड टाकुन स्वत:ची मनमानी करतात. अशा दुकानधारकांवर कायदेशीर कार्यवाही करता येत नाही काय? प्रशासनाने कायदेशीर कार्यवाही केल्यास काही वावगे होणार नाही.

**मा.आयुक्त :** कायदेशीर कार्यवाही करण्या बाबतचा निर्णय घेता येईल. परंतू पुन्हा पुन्हा अतिक्रमणे होतात ही सातत्याने चालणारी क्रिया असून कार्यवाही करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे.

**श्री.अजिज खॉ गणी खॉ :** माझ्या वार्डातील नेहरु नगर ही २० ते २५ वर्षे जुनी वस्ती आहे. येथे ड्रेनेज लाईनचे काम करण्याबाबत संबंधित अधिकारी यांना अंदाजपत्रक तयार करण्यास आदेशित करणे त्या भागात पाणी पुरवठा होतो तसेच विद्युत व्यवस्थेची सोय केलेली असून डांबरी रस्ते आलेले आहे. तेथील नागरिकांकडून टॅक्स वसुली होते. इतर सुविधा देण्यांत येतात विकास खर्च भरलेला आहे. फक्त ड्रेनेज लाईन टाकण्यांत येऊन तेथील नागरिक २५% रक्कम भरण्यास तयार असून विकास कामे करण्यांत यावी.

**मा.सभापती :** मागील एका सर्वसाधारण सभेमध्ये ज्या अनाधिकृत वसाहती आहेत. त्या भागातील विकास कामे करण्यासाठी नागरिकांकडून २५% रक्कम वसुल करुन बाकीची ७५% टक्के रक्कम प्रशासनाच्या माध्यमातून खर्च करुन विकास कामे करण्यांत येईल असे ठरले होते. परंतू मध्यंतरी सर्वसाधारण

सभेत पुंडलिक नगर येथील वसाहती बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूर झालेला असून २५% रक्कम भरुन विकास कामे करण्यांत यावी असा निर्णय झालेला होता. श्री.अजिज खाँ गणी खाँ यांच्या वार्डात काम व्हावे अशी सूचना देण्यांत येते. त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही व्हावी.

**सौ.लता दलाल :** दरवर्षी पावसाळा सुरु झाल्यानंतर शहरातील मोठमोठे नाले साफ सफाई करण्याचे काम घाईघाईने होते. मागील वर्षात कोणकोणत्या प्रभागातील नाले साफ करण्यांत आलेले आहेत. त्यातील किती नाले आतापर्यंत साफ केलेले आहेत काय? नसल्यास प्रशासनाने पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर साफसफाई करण्याबाबतचे निविदा काढण्यांत येऊन त्यास मंजूरी घेऊन पावसाळ्यापुर्वी हे काम सुरु होईल. याची संबंधित अधिकारी यांनी दखल घ्यावी. मागील वर्षी जवळ-जवळ सगळेच नाले साफसफाई केल्याचे दाखविण्यांत आलेले होते. आता त्यांना कालमर्यादा टाकून सफाईचा प्रस्ताव घेण्यांत यावा.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता, तसेच मा.आयुक्त यांनी संबंधित अधिकारी यांना येत्या पावसाळ्यापुर्वी शहरातील नाले साफसफाई लवकर होण्याच्या दृष्टीने अल्प मुदतीची निविदा सूचना काढून कार्यवाही करण्यांत यावी. जेणेकरुन पावसाळ्यांत नाल्यातील केरकचरा अडकून पाणी थांबणार नाही. त्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना त्रास होणार नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** निविदा काढून स्थायी समितीमध्ये मंजूरीसाठी ठेवण्यांत येऊन नंतरच कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** दिनांक २२.०४.९९ ला महानगरपालिकेत वेगवेगळी जिल्हा दरसुची प्रमाणे कर आकारणी करण्यांत येतात. त्यामुळे महानगरपालिकेचा तोटा होतो या संदर्भात पत्र दिलेले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने तांत्रिक माहिती मागविण्यांत आलेली होती. एकाच कामासाठी दोन प्रकारचे डी.एस.आर.वापरण्यांत येतात. सार्वजनिक बांधकाम खात्याचे व परिसर अभियांत्रिकी खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार असे अंदाजपत्रक सादर करण्यांत येतात. त्यामुळे महानगरपालिकेचे यात आर्थिक नुकसान होत आहे. एकाच कामाच्या पध्दतीला दोन डी.एस.आर.वेगवेगळे लावण्यांत येऊन त्याची किंमतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची तफावत दिसून येते व त्या संदर्भाने अशी विकास कामे बरीच होऊन महानगरपालिकेचे एकूण एका कामामध्ये ३ कोटी रुपये आर्थिक नुकसान झालेले आहे. काय त्याची तांत्रिक माहिती मी मागविलेली होती. सादतनगर येथील काम १८.९९% कमी दराने केलेले आहे. नाला संरक्षित भिंत बांधणे कामात सारख्याच पध्दतीने केले असून ७२% दगडाचा वापर होतो. शहरातील झालेल्या विकास कामामध्ये एकूण महानगरपालिकेचे २ ते ३ कोटीचे नुकसान झालेले आहे. याचा विचार प्रशासनाने करावयास पाहिजे होता. ३९% कमी दराने कामे करुन घेतलेली आहे. होणारी कामे निकृष्ट झाले का? किंवा अंदाजपत्रकाच्या दराने झालेले काम चांगले हे तपासणी व्हावयास पाहिजे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** निविदा काढत असतांना वेगवेगळ्या डी.एस.आर.प्रमाणे दर टाकण्यांत येऊन त्यानुसार विकास कामे झालेली आहे व काही कामे चालू आहे. जी कामे झालेली आहे. वेगवेगळ्या डी.एस.आर.नुसार निविदा सादर करुन यात महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. शिवाय योग्य ती कामे

झालेली नाही यावर तफावत होत असतांना प्रशासनाने वेळीच कार्यवाही का केली नाही याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.देशमुख यांनी पत्र देऊन मागविलेली माहिती मा.आयुक्त देणार आहेत. सभागृहात आपण वैयक्तिक माहितीनुसार मुद्दा उपस्थित केलेला असून प्रशासनाच्या माध्यमातून खरोखरच दोन दरसुचीनुसार शहरातील विकास कामे होत आहेत काय? यात महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे काय या बाबत प्रशासन माहिती देईल. त्यानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मा.सभापती यांनी मा.आयुक्त यांना या संदर्भात खुलासा सभागृहात मागवू शकता दोन वेगवेगळ्या दरसुचीनुसार विकास कामे झालेली आहेत काय तशी माहिती प्रशासनाच्या माध्यमातून सभागृहात मिळावयास पाहिजे.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** प्रशासनाने दोन तर्फी भूमिका घेणे यास आमचा विरोध आहे. प्रशासकीय प्रस्ताव मंजूरीसाठी आल्यावेळस मा.आयुक्त यांनी तसा अभिप्राय संबंधित अधिकाऱ्यांकडून मागवावयास पाहिजे होता. संजयनगर येथे १८% कमी दराने विकास कामे करण्यांत आलेली हे प्रशासनाच्या दृष्टीने योग्य आहे काय?

**श्री.काशिनाथ कोकाटे :** दोन प्रकारच्या दरसुची वापरण्यांत आलेल्या आहेत काय खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** पाणी पुरवठा व जलनिःसारण यांचे प्रमुख महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आहे. त्यांनी स्वतंत्र दरसुची केलेली आहे. पाणी पुरवठा संदर्भात जी विकास कामे करावयाची असेल ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या नुसार ठरवून दिलेल्या दरसुचीनुसार वापर करण्यांत येत आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** कोणतेही विकास कामे करत असतांना महानगरपालिकेचे हित लक्षात घेऊन ती कामे करावी. कोणत्याही कामात आर्थिक नुकसान होणार नाही याचे जाण अधिकारी यांनी ठेवावे व संबंधित ठेकेदार काम करत असतांना योग्य ते काम होते की नाही याकडे लक्ष ठेवणे त्या त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या डी.एस.आर.प्रमाणे वापर करुन काही विकास कामे करण्यांत आली सदर दरसुची वापरण्याचे अटीवर संबंधित अधिकारी यांना कुणी दिले तसे अधिकार आहे काय याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** सभागृहात स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्ना संदर्भात महानगरपालिकेची विकास कामे करत असतांना दोन वेगवेगळ्या दरसुची नुसार म.न.पा.चे यात आर्थिक नुकसान झालेले आहे काय? या बाबत जे जे प्रश्न स.सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेले आहेत. त्या सर्व प्रश्नांच्या संदर्भाने ज्या त्या संबंधित अधिकारी यांनी येत्या बैठकीत सर्व मुद्दांवर झालेल्या चर्चेचा खुलासा करावा.

**श्री.विखारोद्दीन :** औरंगाबाद पैठण रोडवरील ओव्हर ब्रिजचे काम अद्याप थांबलेले आहे कधी सुरु करणार याची माहिती मा.आयुक्त यांनी सभागृहात द्यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** संबंधित रेल्वे विभागाचे अधिकारी यांचे प्रयत्न चालू असून तशी त्यांच्या समवेत चर्चा करुन एक पत्र ही त्यांना आपल्या विभागाकडून देण्यांत आलेले आहे. शहानूरवाडी येथील रेल्वेचे गेटच्या संदर्भात संबंधित

अधिकारी आलेले होते. त्यावेळसही त्यांच्याशी चर्चा झाली सदर ठेकेदार गावाला गेलेल आहे. आल्यावर सुरु करण्यांत येईल.

**विषय क्र.२/१ :-**

दिनांक २०.०२.९९, २१.०५.९९, १०.०२.९९ रोजी तहकूब झालेली व १५.०३.९९ रोजी संपन्न झालेल्या तसेच २६.०३.९९ व १२.०४.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**श्री.विखारोद्दीन :** दिनांक २६.०३.९९ च्या इतिवृत्तातील पान क्र.३८ वर विषय क्र.६२७/३० नुसार ढापे खरेदीचा प्रस्ताव आलेला होता किंवा काय? यास स्विकृतीही मिळालेली आहे. याबाबतची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**श्री.विकास जैन :** सदर ढापे खरेदी बाबतचा प्रस्ताव मागच्या बैठकीत मंजूरीसाठी आलेला नव्हता, असे माझे मत आहे. सभागृहात इतिवृत्ताची नोंद घेणारे तसेच त्या सभेच्या रेकॉडींग होणाऱ्या कॅसेटस मध्ये तशी मा.सभापती यांनी या प्रस्तावास मंजूरी दिल्याचे बोलले आहेत काय? याची माहिती देण्यांत यावी.

**मा.सभापती :** नगर सचिव यांनी या प्रस्तावाबाबत खुलासा करावा.

**नगरसचिव :** सभागृहात ऐनवेळेला बरेच प्रस्ताव मा.सभापती यांचेकडे आलेले होते. ते सर्व विषय मंजूर करुन याच सभेत स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. असे मा.सभापती यांनी सभागृहात सांगितले होते.

**मा.सभापती :** या बाबत शहानिशा करुन माहिती घेण्यांत येईल.

**सौ.लता दलाल :** तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सदर प्रस्तावाच्या कामा संदर्भात वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत असे समजते.

**मा.सभापती :** कार्यादेश देण्यांत आला असेल तर ८ दिवस साहित्य घेवू नये.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** इतिवृत्तातील पान क्र.४२ वर विषय क्र.६३५/३८ मध्ये श्री.ए.व्ही.धारुरकर यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. असे सवोनिवृत्त असलेले किती कर्मचारी म्हणून मनपामध्ये नेमणूक केलेले आहेत याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** या अगोदर श्री.वर्दे यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती केल्याप्रमाणे श्री.धारुरकर यांना पाणी पुरवठ्या संबंधी योग्य सल्ला व मार्गदर्शन आपल्या अधिकारी यांना देण्यासाठी नियुक्ती देण्यांत आली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सेवानिवृत्त अधिकारी महापालिकेच्या सेवेत सल्लागार पदी सामावून घेत असतील तर ते प्रशासकीय दृष्टीने योग्य आहे काय? तसेच आपल्या मनपामध्ये त्या त्या तांत्रिक विभागामध्ये अधिकारी नाहीत काय? मनपाच्या सेवेत असलेले अधिकाऱ्यांकडूनच मा.आयुक्त यांनी त्या त्या विभागातील अधिकाऱ्यांना ताकीद देऊन योग्य कामे होतील अशा सूचना द्याव्यात.

**मा.आयुक्त :** सेवानिृवत्त अधिकारी तसेच त्यांना पाणी पुरवठ्याबाबतीत अनुभवानुसार सर्व माहिती असल्यामुळे त्यांची निवड करण्यांत आलेली होती. परंतू ते रुजू होण्यास तयार नाहीत.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** माझ्या वार्डामध्ये एक काम ६ महिन्यांपासून तसेच राहून गेलेले आहे. आतापर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**मा.आयुक्त :** याच विषयाच्या संदर्भाने मागील स्थायी समितीमध्ये श्री.वर्दे यांची तांत्रिक सल्लागर म्हणून नियुक्ती केली त्यावेळी समग्र चर्चा झाली आहे. त्यावेळेस स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी असाच मुद्दा उपस्थित केला होता. शासनाकडून जे १० (दहा) कोटी रुपये अनुदान आलेले आहे ते ३१ मार्च अखेर वेगवेगळ्या विकास कामाकरिता खर्च करणे गरजेचे असून नंतर पुढील अनुदान देण्यांत येईल असे मुख्यमंत्री यांनी घोषित केले होते. त्यानुसार आपल्या अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन व्हावे व चुक होऊ नये व त्यानुसार मनपाचे नुकसान होऊ नये यासाठी निवृत्त अधिकारी श्री.धारुरकर यांची नियुक्ती केली. आताच स.सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, एकाच पध्दतीच्या कामासाठी दोन प्रकारचे डी.एस.आर.वापरण्यांत येतात यासाठी योग्य सल्ला आपल्या अधिकाऱ्यांना देण्यासाठी त्याची नियुक्ती ही मानधनावर केलेली आहे. आपले अधिकारी अकार्यक्षम आहेत. अशातला तो मुद्दा नसून योग्य त्यावेळी त्यांच्याकडून अधिकारी सल्ला घेऊन कामे करतील. कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये. यादृष्टीने त्यांची नेमणूक केलेली आहे. हे नेहमीच सभागृहात मी सांगत आलेलो आहे.

**मा.सभापती :** या महानगरपालिकेची संपूर्ण धुरा मा.आयुक्त यांच्यावर असून अधिकारी कुठे चुका करतात व त्यानुसार मनपाचे कुठे नुकसान होते काय यासाठी श्री.वर्दे व श्री.धारुरकर यांची नेमणूक केलेली आहे. प्रशासकीय दृष्टीकोनातून सर्व जबाबदारी ही मा.आयुक्त यांच्यावर असून फक्त अधिकारी यांना योग्य पध्दतीने सल्ला घेण्यासाठी त्यांची मानधनावर नियुक्ती केलेली आहे.

**मा.आयुक्त :** श्री.धारुरकर यांची नेमणूक केली होती. परंतू ते रुजू होण्यास तयार नाहीत, असे त्यांनी कळविलेले आहे.

**मा.सभापती :** विषय क्र.१ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :-**

दिनांक २०.०२.९९, २१.०२.९९, १०.०२.९९ रोजी तहकूब झालेली व १५.०३.९९ रोजी संपन्न झालेल्या तसेच २६.०३.९९ व १२.०४.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३/२ :-**

एन-५ जलकुंभापासून ते जळगांव रोड पर्यंत अे.सी.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.१,६१,७००/- चे तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन ९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून या कामासाठी प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. या कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती सन १९९८-९९ या लेखाशिर्षकातील तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.

तरी एन-५ जलकुंभापासून ते जळगांव रोडपर्यंत ए.सी.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,६१,७००/- चे मंजूरीबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजूरीसाठी सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-५ जलकुंभापासून जळगांव रोडपर्यंत ए.सी.जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,६१,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४/३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, उस्मानपुरा येथे फरशी व खांडकी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,१२,०००/ च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २० (वीस) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ४ (चार) निविदा दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.आनंद बिल्डर्स | - | ४२.५२% कमी दराने |
| २. | मे.आकाश कन्स्ट्रक्शन | - | ३३.००% कमी |
| ३. | श्री.एस.ए.देशमुख | - | २५.५०% कमी |
| ४. | मे.विपुल कन्स्ट्रक्शन | - | २५.८३% कमी |

वरील प्राप्त निविदापैकी मे.आनंद बिल्डर्स यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.५२% कमी दराची आहे. करिता प्रस्ताव निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथे फरशी व खांडकी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.५२% कमी दराची मे.आनंद बिल्डर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५/४ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील पाण्याच्या टाकीला जाणारी व येणारी १५० मी.मी.व्यासाच्या लाईन ऐवजी ३०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे. सदरील कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,६७,८४२/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे.

या कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती सन १९९८-९९ या लेखाशिर्षकातील तरतूदीमधून करण्यांत येणार असून या कामास मा.आयुक्तांनी दि.१२.०३.९९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील पाण्याच्या टाकीला जाणारी व येणारी १५० मी.मी.व्यासाच्या लाईन ऐवजी ३०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता

तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,३७,८४२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६/५ :-**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गणेश कॉलनी व आलमगरी कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलून २५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.५,७२,०६६/- चे तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समिती दि.०५.१२.९८ रोजी मंजूरी दिली होती. त्यानंतर सदरील कामाची बी-१ निविदा जा.क्र./मनपा/लेखा/नि/१०१/९८, दि.२२.१२.९८ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिली असता एकूण २२ निविदा विक्री झाल्या. व त्यापैकी ७ (सात) निविदा प्राप्त झाल्या.
त्याचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.राणा कन्स्ट्रक्शन | - | ४२.८२% कमी |
| २. | श्री.असलम पटेल | - | ४०.५% कमी |
| ३. | श्री.मन्नान खॉन | - | ३९.८६% कमी |
| ४. | मे.आकाश कंस्ट्रक्शन | - | ३३.३९% कमी |
| ५. | मे.अे.आर.कंन्स्ट्रक्शन | - | ३२.७८% कमी |
| ६. | श्री.अे.व्ही. पिसोळकर | - | ३१.००२% कमी |
| ७. | आकाश कंन्स्ट्रक्शन | - | २१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे ४२.८२% कमी दराची निविदा मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील निविदेस मा.आयुक्तांनी दि.२५.०२.९९ रोजी मंजूरी दिलेली आहे. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** विषय पत्रिकातील बऱ्याच विषयामध्ये ज्या ठेकेदारांनी निविदा कमी दराने काम करण्यांत मंजूरी दिली ते काम योग्य पध्दतीने होईल काय? यास जबाबदार कोण असणार?

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** चांगल्या प्रतीचे काम करुन देणार असल्या बाबत त्या गुत्तेदाराने लिहून दिलेले आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** प्रस्तावात दर्शविलेल्या अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या ४२.८२% कमी दराने काम करुन देण्यास तयार आहे. म्हणजेच १ रुपयाचे काम ते फक्त ५७ पैशामध्ये करुन देतात. हे काम योग्य होत असेल असे मला वाटत नाही. १००% काम चांगल्या प्रतीचे होणार नाही याची मला खात्री आहे.

**मा.सभापती :** कोणत्याही विकास कामामध्ये ठेकेदार कमी दराने काम करुन देण्यास तयार आहेत. परंतू काम चांगल्या प्रतीचे व्हावे यासाठी संबंधित अधिकारी यांच्यावर जबाबदारी राहील. चांगल्या प्रतीचे काम न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यांत येईल. संबंधित ठेकेदारांचे बील रोखण्यांत येईल. त्यादृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** काम चालु असतांना अधिकारी यांनी संबंधित स्थळी भेटी दिल्या पाहिजेत. जेणेकरुन त्या ठेकेदारावर वचक बसेल व चांगल्या प्रकारे काम करेल.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** ठेकेदारांनी जी कामे योग्य केली नाही त्यास अधिकारी जबाबदार राहात असेल तर काम करुन घेण्यास हरकत न झाल्यास अधिकारी व संबंधित ठेकेदार यांना जबाबदार धरुन कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.आयुक्त :** या अगोदरची अशा प्रकारचे प्रस्ताव मंजूर होऊन विकासाची कामे झालेली आहेत.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** याबाबतची सर्व जबाबदारी ही मा.आयुक्तांची असते. त्यांनी अधिकाऱ्यांना तशा प्रकारची ताकीद देऊन योग्य त्या पध्दतीने व चांगल्या प्रतीची कामे होतील याकडे अधिकारी यांचे लक्ष वेधावे.

**मा.सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी व आलमगीर कॉलनी येथील अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलून २५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.८२% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७/६ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर येथे म्हाडा कॉलनी समोरील गटार दुरुस्त करणे व रोड क्रॉसिंग स्लॅब टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.१,५३,४०७/- ला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकूण २८ (अठ्ठाविस) कोऱ्या निविदा विकल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण ११ (अकरा) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एम.के.तोनगिरे | - | ४२.९९% कमी |
| २. | श्री.राजु राठोड | - | ३८.८०% कमी |
| ३. | श्री.असलम पटेल | - | ३५.९०% कमी |
| ४. | श्री.मो.खिजरोद्दीन | - | ३०.८६% कमी |
| ५. | मे.जी.के.कंन्स्ट्रक्शन | - | २९.३०% कमी |
| ६. | श्री.जी.के.कंन्स्ट्रक्शन | - | २८.३०% कमी |
| ७. | मे.सुंदर कंन्स्ट्रक्शन | - | २८.३०% कमी |
| ८. | श्री.संजयकुमार सिंग | - | २६% कमी |
| ९. | श्री.शेख सलीम | - | २१.८६% कमी |
| १०. | मे.एस.एच.असोशिएटस | - | १९% कमी |
| ११. | श्री.एस.एम.मंडोरे | - | १८.१८% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.एम.के.तोनगिरे यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.९९% कमी दराची आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथे म्हाडा कॉलनी समोरील गटार दुरुस्त करणे व रोड क्रॉसिंग स्लॅब टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.९९% कमी दराची श्री.एम.के.तोनगिरे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८/७ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा गावाजवळ स.नं.५७ मधील मंजूर रेखांकनामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९६-९७ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,१८,३२५/- ला मान्यता मिळाली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण २५ (पंचवीस) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकुण ८ (आठ) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.एल.चव्हाण | - | ४२.९९% कमी |
| २. | श्री.ए.एम.फारुकी | - | ३८.९१% कमी |
| ३. | श्री.एस.ए.हक्क | - | ३७.५०% कमी |
| ४. | श्री.सचिन संचेती | - | ३५..३५% कमी |
| ५. | श्री.उपेंद्र कालेले | - | ३२.३२% कमी |
| ६. | श्री.जी.आर.घोडेले | - | २८.९९% कमी |
| ७. | मे.आनंद बिल्डर्स | - | २७.३०% कमी |
| ८. | श्री.काझी मो.सिराजउद्दीन | - | ११.००% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.डी.एल.चव्हाण यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.९९% कमी दराची आहे. करिता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा गावाजवळ स.नं.५७ मधील मंजूर रेखांकनामध्ये ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४२.९९% कमी दराची श्री.डी.एन.चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९/८ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, बी.एम.सी.बँकेच्या पाठीमागील नाल्यास मो.बारुदगरनाला येथील पुलापर्यंत संरक्षित भिंत बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु.३,२३,०००/- ला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण (१९) एकोणावीस कोऱ्या निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण ४ (चार) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.माजेद कंन्स्ट्रक्शन | - | ३६% कमी |
| २. | श्री.मो.सिराजउद्दीन सिद्दीकी | - | ३५.९९% कमी |
| ३. | श्री.एस.ए.देशमुख | - | २०.३१% कमी |
| ४. | सय्यद अथर अली | - | ०.४०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.माजेद कंन्स्ट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६% कमी दराची आहे. करिता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बी.एम.सी.बँकेच्या पाठीमागील नाल्यास मो.बारुदगरनाला येथील पुलापर्यंत संरक्षित भिंत बांधणेंच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६% कमी दराची मे.माजेद कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०/९ :-**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व ज.नि.यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.गौरीशंकर कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१,८०,२५०/- चे तयार करण्यांत आले असून सदरील काम "भांडवली तरतूदी" या लेखाशिर्षकातून प्रस्तावित केलेले आहे. सदरील कामास मा.आयुक्तांनी दि.२०.०९.९८ ला मंजूरी दिलेली होती. स्थायी समितीने सदरील कामास दि.१६.१०.९८ ठराव क्र.३०३/११ अन्वये मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार बी-१ निविदा जा.क्र./मनपा/लेखा/नि/७७/९८, दि.२८.१०.९८ अन्वये जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकूण १६ निविदा विक्री झाल्या व पैकी ९ (नऊ) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.राणा कंन्स्ट्रक्शन | - | ३२.९९% कमी |
| २. | मे.श्रीराम कंन्स्ट्रक्शन | - | ३०.००% कमी |
| ३. | श्री.सय्यद अथर अली | - | २९.००% कमी |
| ४. | श्री.राजु कोलते | - | २८.००% कमी |
| ५. | एन.बी.पाटील | - | २५.१२% कमी |
| ६. | बी.एम.काथार | - | २२.१०% कमी |
| ७. | श्री. राजासिंग | - | १८.००% कमी |
| ८. | जितेंद्र शिर्के | - | १५.०१% कमी |
| ९. | काबेरी कंन्स्ट्रक्शन | - | ११.५३% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% कमी दराची निविदा मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची आहे. मा.आयुक्तांनी दिनांक १५.०१.९९ ला

सदरील निविदेस मंजूरी दिलेली आहे. तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गौरीशंकर कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% कमी दराची मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.११/१ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, तोतला हॉस्पीटल ते व्यंकटेशनगर या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुची नुसार रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तोतला हॉस्पीटल ते व्यंकटेश नगर या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रकम रु.४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२/२ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० यावर्षाकरिता सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सां.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,९७,७५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च "विद्युत साहित्य खरेदी" या लेखा शिर्ष मधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.९,९७,७५०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वर्षाकरिता सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,९७,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३/३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, खिंवसरा पार्क ते सुतगिरणी या रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या

सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खिंवसरा पार्क ते सुतगिरणी या रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४/४ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, देवानगरी ते बीड बायपास या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.८,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.८,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी ते बीड बायपास या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५/५ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, संत एकनाथ रंगमंदिर ते गुरु तेजबहादूर हायस्कुल पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुची नुसार रक्कम रु.३,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.३,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर ते गुरु तेगबहादूर हायस्कुल पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६/६ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० या वर्षाकरिता मर्क्युरी दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या

सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,६८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च "विद्युत साहित्य खरेदी" या लेखाशिर्षाखाली करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.९,६८,५००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** या प्रस्तावाच्या अनुषंगाने मागील वर्षाचे साहित्या आतापर्यंत पूर्णतः वापरण्यांत आलेले आहे काय? कोणत्या कालावधीमध्ये कोणते साहित्य वापरण्यांत आले तसेच कोणकोणत्या प्रभागात त्या साहित्याचा वापर करण्यांत आलेला आहे. याची संबंधित अधिकारी यांना विचारणा करावी. सहा महिन्यांपासून अधिकारी यांना या संदर्भात विचारणा करीत आलेलो आहे. साहित्य शिल्लक नाही अशी उत्तरे नेहमी देण्यांत येतात.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सिडको येथील म्हाडा कॉलनीतील सर्व घरे महानगरपालिकेने हस्तांतर केलेली असून एकूण ५ व ६ वसाहती आहेत. त्या वसाहतीतील नागरिकांना अडीअडचणीच्या वेळी विद्युत साहित्य पुरवठा मनपाकडून केला जातो काय? याबाबत सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन कार्यवाही करण्यांत येईल असे सांगितले होते. किती वेळा व किती साहित्याचा पुरवठा संबंधित प्रभागातील नागरिकांच्या तक्रारीनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी केलेला आहे. याची माहिती द्यावी.

**उप अभियंता (वि.) :** अडीअडचणीच्या वेळी म्हाडा कॉलनीमध्ये विद्युत व्यवस्थेची कामे करण्यांत आलेली आहेत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सदर ठिकाणी आताच्या आता सभागृहाने संबंधित अधिकाऱ्यांसह पाहणी केल्यास सत्य परिस्थिती काय हे कळु शकेल. अधिकारी सभागृहाची दिशाभूल करतात. महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत असतांना याच भागातील रायगड नगर व इतर काही भागांमध्ये विद्युत व्यवस्था नेहमीच करण्यांत येत नाही. या भागात विद्युत व्यवस्थे बाबत कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**मा.सभापती :** सन्माननीय सदस्य यांनी विद्युत व्यवस्थे बाबत जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत संबंधित अधिकारी यांना सुचना करतो की, त्यांनी महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रभागात विद्युत व्यवस्थेची वेळीच कार्यवाही करावी व तात्काळ सिडको म्हाडा कॉलनी मध्ये ज्या ज्या विद्युत पुरवठ्या बाबतच्या समस्या निर्माण झालेल्या असतील त्यावर कार्यवाही करावी. प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वर्षाकरिता मर्क्युरी दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,६८,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्वीकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७/७ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० या वर्षासाठी ट्युब लाईट विद्युत साहित्य खरेदी करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या.सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,४४,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत

आले आहे. सदरील कामाचा खर्च "विद्युत साहित्य खरेदी" या लेखाशिर्ष खाली करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.९,४४,५००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वर्षासाठी ट्युब लाईट विद्युत साहित्य खरेदी करणेकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,४४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८/८ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, देवानगरी ते प्रतापनगर या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युती करण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता वापर करण्यांत आलेले रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी ते प्रतापनगर या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९/९ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महानुभाव आश्रम ते बीड बायपास या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानातून करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.५,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानुभाव आश्रम ते बीड बायपास या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०/१० :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टी.बी.हॉस्पीटल ते आसिफ बाग या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या

सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,८२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामांचा खर्च शासनांकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,८२,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टी.बी.हॉस्पीटल ते आसिफ बाग या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,८२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१/११ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिटी चौक ते किलेअर्क या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,३५,४७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.३,३५,४७५/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटीचौक ते किलेअर्क या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,३५,४७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२/१२ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, अहिंसानगर ते कैलासनगर स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.४,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अहिंसानगर ते कैलासनगर स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३/१३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टी.बी.हॉस्पीटल ते फोर्टवॉल पर्यंतच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या

सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.८,९६,८८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त शासकीय अनुदानामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.८,९६,८८०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टी.बी.हॉस्पीटल ते फोर्टवॉल पर्यंतच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,९६,८८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४/१४ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सादिया चित्रपट गृहाजवळील मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स जवळ पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "जी.आय.पोल." या लेखाशिर्षामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** देना बँक ते नेहरु भवन या रस्त्यावर विद्युत व्यवस्थे साठी बजेट ठेवण्यांत आले होते. त्या संदर्भात अद्याप अंदाजपत्रक सभागृहात मंजूरीसाठी आलेले नाही.

**मा.सभापती :** उप अभियंता (विद्युत) यांनी माहिती द्यावी.

**उप अभियंता (वि.) :** ज्या अंदाजपत्रकास शासकीय अनुदानातून काम करण्यांस मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार कार्यवाही आमच्या विभागाकडून करण्यांत येते. स.सदस्य यांनी दिलेल्या पत्रानुसार पुढच्या बैठकीत तसा प्रस्ताव मंजूरीसाठी घेण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** प्रस्ताव क्र.१४ हा पथदिव्या संदर्भात मंजूरीसाठी आलेला असून चर्चा होऊन मंजूरही होईल परंतू ज्या संचिका बऱ्याच दिवसांपासून पेंडींग आहेत. त्या मंजूरीसाठी पाठवाव्यात. सहा-सहा महिने पत्र देऊनही त्याचे अंदाजपत्रक तयार होत नाही. मागील पत्रानुसार काही स.सदस्यांच्या वार्डातील प्रस्ताव मंजूरीसाठी येतात. अधिकारी हे कुणाच्या दवाबाखाली तर प्रस्ताव सभागृहात मंजूरीसाठी आणत नाही ना?

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करतो की, त्यांनी स.सदस्य श्री.विखारोद्दीन यांनी मागे दिलेल्या पत्रानुसार अंदाजपत्रक तयार करुन प्रशासनाची मंजूरी घेऊन प्रस्ताव पुढच्या बैठकीत मंजूरीसाठी आणावा. प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. सर्वानुमते

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादिया चित्रपट गृहाजवळील मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स जवळ पथदिव्यांची व्यवस्था करण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५/१५ :-**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.३९१५ श्री.अब्दुल जब्बार पि.महमद इसाक ही मिळकत औरंगाबाद मंजूर विकास योजना नुसार ५० फुट रुंद रस्ता सिटीचौक ते भडकलगेट (जुना बाजार) या रस्त्याने बाधित आहे. मिळकतधारकांने बाधीत क्षेत्राचा मोबदला मागतिलेला आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ ८३.७० चौ.मी.असून पैकी १५.३६ चौ.मी.क्षेत्र रस्त्याने बाधीत आहे. खाजगी वाटाघाटीत बाधित क्षेत्राचा एकूण मोबदला रक्कम रु.१,३२,०१९/- (एक लाख बत्तीस हजार एकोणीस) निश्चित केला आहे. सदर मिळकत ही नोंदणीकृत खरेदी खत करुन घ्यावी लागेल. त्यासाठी सुमारे ११.८८२/- एवढा खर्च लागेल. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारक दोघांत निम्मा निम्मा करावयाचा आहे. करिता खर्चाची निम्मी रक्कम रु.५,९४२/- (पाच हजार नऊशे बेचाळीस) मोबदला रक्कमेतून वळती करुन घेणेस मिळकत धारकांने मान्यता दिलेली आहे. उर्वरित मोबदला रक्कम रु.१,२६,०७७/- (एक लाख सव्वीस हजार सत्त्याहत्तर) मिळकतधारकास अदा करण्यास व खरेदी खतास लागणारी रक्कम रु.११,८८२/- (अकरा हजार आठशे ब्याऐंशी) श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यास प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.३९१५ श्री.अ.जब्बार पि.महमद इसाक ही मिळकत औरंगाबाद मंजूर विकास योजना नुसार ५० फुट रुंद रस्ता सिटी चौक ते भडकल गेट (जुनाबाजार) या रस्त्याने बाधित क्षेत्र १५.३६ चौ.मी.बाधीत क्षेत्राचा एकूण मोबदला रक्कम रु.१,३२,०१९/- मधून खरेदी खतासाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रु.११,८८२/- पैकी निम्मी रक्कम रु.५,९४२/- वळीत करुन घेऊन उर्वरित मोबदला रक्कम रु.१,२६,०७७/- मिळकतधारकास अदा करण्यास तसेच खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.११,८८२/- श्री.डी.डी.कालेले, शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६/१६ :-**

मा.सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.१०३१६ ही मिळकत औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंजने भागश: बाधीत आहे. मिळकतधारक १) श्री.सुलतानोद्दीन, २) मो.हफीजोद्दीन, ३) मो.हबीबोद्दीन तिघांचे पिता महमद अहेमदोद्दीन यांनी रस्त्याने बाधीत जागेचा मोबदला मागितलेला आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र १५६.०० चौ.मी.असून पैकी २७.०० चौ.मी.क्षेत्र रस्त्याने बाधीत आहे. खाजगी वाटाघाटीत सदर बाधीत मिळकतीचा मोबदला रक्कम रु.२,४१,५४२/- (दोन लाख एकेचाळीस) हजार पाचशे बेचाळीस फक्त) निश्चित केला आहे.

तसेच सदर मिळकत ही नोंदणीकृत खरेदी खत करुन घ्यावी लागेल. त्यासाठी सुमारे रक्कम रु.२१,७४०/- (एकवीस हजार सातशे चाळीस) खर्च लागेल. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारक यांनी निम्मा-निम्मा करावयाचा आहे. करिता खर्चाची निम्मी रक्कम रु.१०,८७०/- (दहा हजार आठशे सत्तर) ही मोबदला रकमेतून वळती करुन घेण्यांस मिळकतधारकाने मान्यता दिली आहे. करिता उर्वरित मोबदला रक्कम रु.२,३०,६७२/- (दोन लाख तीस हजार सहाशे बहात्तर फक्त) मिळकत धारकास अदा करणेस आणि नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्यासाठी अग्रीम म्हणून रक्कम रु.२१,७४०/-

(एकवीस हजार सातशे चाळीस) श्री.डी.डी.कालेले, शाखा अभियंता यांना देणेसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज या रस्त्यात बाधीत न.भु.क्र.१०३१६ चे एकूण बाधीत क्षेत्र २७.०० चौ.मी. मे मिळकतधारक १) श्री.सुलतानोद्दीर, २) मो.हफीजोद्दीन, ३) मो.हबीबोद्दीन तिघांचे पिता महमद अहेमदोद्दीन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील मिळकतीचा एकूण मोबदला रक्कम रु.२,४१,५४२/- मधून खरेदी खताकरिता लागणाऱ्या एकूण रक्कम रु.२१,७४०/- ची निम्मी रक्कम रु.१०,८७०/- मोबदला रक्कमेतून वळती करुन उर्वरित रक्कम रु.२,३०,६७२/- मिळकतधारकास अदा करणेस तसेच खरेदी खत करुन घेण्याकरिता अग्रीम म्हणून रक्कम रु.२१,७४०/- श्री.डी.डी.कालेले, शाखा अभियंता यांना देण्यांस सर्वानुमते स्विकृतीस मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७/१७ :-**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.सुराणानगर न.भु.क्र.१२३६९ मधून महानगरपालिकेने सन १९८७ साली रस्ता तयार केलेला असून रस्त्याचा वापर चालू आहे. मिळकतधारक श्री.गणेश गोकुळ गवळी व दिनेश गोकुळ गवळी यांनी रस्त्यासाठी वापरलेल्या रस्त्याचा मोबदला मागितलेला असून रस्त्यासाठी १११७.३६ चौ.मी.जागा वापरण्यात आलेली आहे. खाजगी वाटाघाटीत सदर रस्त्याने रस्त्यासाठी १११७.३६ चौ.मी.जागा वापरण्यात आलेली आहे. खाजगी वाटाघाटीत सदर रस्त्याने वापरलेल्या क्षेत्राचा मोबदला रक्कम रु.८,०७,०७१/- (आठ लाख सात हजार अेकाहत्तर रु फक्त) निश्चित केलेला आहे. सदर जमीन ही खरेदीखत करुन घ्यावी लागेल. त्यासाठी सुमारे रक्कम रु.७२,६३६/- (बहात्तर हजार सहाशे छत्तीस फक्त) खर्च लागेल. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारकांनी निम्मा-निम्मा करावयाचा आहे. निम्मा खर्च रक्कम रु.३६,३२०/- हा मोबदला रकमेतून वळता करणेस मिळकतधारकाने मान्यता दिली आहे. करिता उर्वरित मोबदला रक्कम रु.७,७०,७५१/- (सात लाख सत्तर हजार सातशे अेक्कावन्न फक्त) मिळकतधारकास अदा करणेस व खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.७२,६३६/- (बहात्तर हजार सहाशे छत्तीस फक्त) श्री.डी.डी.कालेले (शाखा अभियंता) यांना अग्रीम म्हणून देण्यास्तव प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेने सन १९८७ साली तयार केलेल्या सुराणानगर येथील रस्त्यामध्ये बाधीत जमीन न.भु.क्र.१२३६९ बाधीत क्षेत्र १११७.३६ चौ.मी.चे मिळकतधारक श्री.गणेश गोकुळ गवळी व दिनेश गोकुळ गवळी यांनी मागणी केल्यानुसार बाधीत क्षेत्राचा निश्चित करण्यांत आलेला मोबदला रक्कम रु.८,०७,०७१/- मधून खरेदी खताकरिता लागणाऱ्या एकूण रक्कम रु.७२,६३६/- पैकी निम्मी रक्कम रु.३६,३२०/- मोबदला रक्कमेतून वळती करुन उर्वरित रक्कम रु.७,७०,७५१/- मिळकतधारकास अदा करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. त्याच प्रमाणे खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.७२,६३६/- (बहात्तर हजार सहाशे छत्तीस) श्री.डी.डी.कालेले, शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८/१८ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.किराडपुरा येथे श्री.हाजी लाल खाँ यांच्या घरामागे जुनी १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून त्याऐवजी २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.१,८६,०२१/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम लेखाशिर्ष "भांडवली कामे" १९९८-९९ यातून प्रस्तावित केले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किराडपुरा येथे श्री.हाजी लाल खाँ यांच्या घरामागे जुनी १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून त्याऐवजी २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८६,०२१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९/१९ :-**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्त यांच्या मंजूरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.सतिश कामेकर यांना मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र.९८/पुरवठा/सुभायो/कावि/दि.०१.१२.९८ अन्वये एस.एस.सी.बोर्डजवळ झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. एस.एस.सी.बोर्ड ते एकनाथ रंगमंदिराकडे जाणाऱ्या रत्याकडे एस.एस.सी.बोर्डाचे भिंती लगत ८x१५ ची जागा विनामूल्य देण्याबाबत प्रस्तावित करण्यांत येते. याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | खुली जागा व एकनाथनगरकडे जाणारा रस्ता |
| पश्चिमेस | : | खुली जागा व गेट |
| दक्षिणेस | : | एस.एस.सी.बोर्ड कार्यालयाची कुंपण भिंत |
| उत्तरेस | : | रस्ता स्टेशन रोड |

झुणका भाकर केंद्रासाठी खालील अटी -शर्तीनुसार देता येऊ शकेल.

१. झुणका भाकर केंद्रामुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडचण व अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. झुणका भाकर केंद्राचे बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करावयाचे झाल्यास मनपाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३. पोलिस विभागाचे अभिप्रायानुसार झुणका भाकर केंद्र तात्पुरत्या स्वरुपाची परवानगी देण्यांत येते.

४. ज्यावेळेस मनपास जागेची आवश्यकता भासेल किंवा उपरोक्त दोन मुद्दांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे किंवा रहदारीस बाधा निर्माण होणे या मुद्दांमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे मनपाकडून झुणका भाकर केंद्र हलवावे लागण्यास मनपाकडून केंव्हाही जागा रिकामी करुन घेण्यांत येईल व संबंधितांवर ही जागा

रिकामी करुन घेण्यांत येईल व संबंधितांवर ही जागा रिकामी करुन देणे बंधनकारक राहील.

५. शासनाचे नवीन नियम व अटीस अधीन राहून.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र क्र.९८/पुरवठा/झुभायो/कावि/दि.०१.१२.९८ अन्वये एस.एस.सी.बोर्डाजवळ झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी मंजूरी दिल्यानुसार खालील चतु:सिमेतील ८x५ ची जागा श्री.सतिश कामेकर यांना विनामूल्य देण्यांस प्रस्तावातील अ.क्र.१ ते ४ च्या अटी व शर्तीनुसार तसेच शासनाचे नवीन नियम व अटीस अधीन राहून देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | खुली जागा व एकनाथनगरकडे जाणारा रस्ता |
| पश्चिमेस | : | खुली जागा व गेट |
| दक्षिणेस | : | एस.एस.सी.बोर्ड |
| उत्तरेस | : | रस्ता स्टेशन रोड |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०/२० :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर स्लम येथे वार्ड क्र.२३ येथे विविध गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.९,९०,६५२/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दि.०७.०५.९९ रोजी प्रदान केली आहे. सदर काम १९९९-२००० मनपा गलिच्छ वस्ती सुधार लेखा शिर्ष "नवीन खांडकी रस्ते" मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.इंदिरानगर स्लम वॉर्ड क्र.२३ येथे विविध गल्ल्यांत शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,९०,६५२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१/२१ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर (स्लम) वार्ड क्र.२४ मधील गल्ली नं.१ चे डांबरीकरण करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.२,३४,७००/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९८-९९ नुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.०७.०५.९९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधार योजना अंतर्गत १९९९-२००० साली ठेवण्यांत आलेल्या लेखाशिर्ष "डांबरी रस्ते" मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.इंदिरानगर (स्लम) वार्ड क्र.२४ मधील गल्ली नं.१ चे डांबरीकरण करण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,३४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२/२२ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.नक्षत्रवाडी गांव येथे पैठण रोड लगत असलेल्या दगडी गटारवर आर.सी.सी.स्लॅब टाकणे करिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,९७,०००/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दि.०४.०५.९९ रोजी प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम व २० कोटी शासकीय अनुदान १९९९-२००० पैकी खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी गांव येथे पैठण रोड लगत असलेल्या दगडी गटारवर आर.सी.सी.स्लॅब टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३/१३ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मसनतपूर स्मशानभूमी लगतची नाला भिंत बांधणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.७,०४,७४३/- सां.बा.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम व २० कोटी शासकीय अनुदान १९९९-२००० पैकी खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपूर स्मशानभूमी लगतची नाल्याची भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,०४,७४३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४/२४ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा स्लम भागात गल्लीमध्ये शहाबादी फरशी बसविणे व कॉक्रीट रस्ते तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.७,७९,५६८/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांनी त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दि.०४.०५.९९ रोजी प्रदान केली आहे.

सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम व २० कोटी शासकीय अनुदानातून १९९९-२००० पैकी खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा स्लम भागात गल्लीमध्ये शहाबादी फरशी बसविणे व कॉंक्रीट रस्ते तयार करणे करिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,७९,५६८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५/२५ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठण गेटच्या कंपौंड वॉल कमी करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,२९,१००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभेची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २२ (बावीस) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत त्यापैकी फक्त ३ (तीन) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन | - | १% कमी |
| २. | सुजात हाश्मी | - | २% जास्त |
| ३. | राणा कंन्स्ट्रक्शन | - | ०.१% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे.कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेटच्या कंपौंड वॉल कमी करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे.कम्फर्ट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३६/२६ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बनेवाडी गांव ते स्मशानभूमी रस्त्यालगत दगडी गटार बांधणे करिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,६८,८६०/- सा.बां.खाते यांची दरसूची १९९७-९८ नुसार तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांनी दि.१६.०२.९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच स्थायी समिती दि.०६.०२.९९ च्या विषय क्र.५५७/११ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १८ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त दोन मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि.२२.०४.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | ३.३०% जास्त |
| २. | एस.पी.सरवदे | - | ४.९०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.३०% जास्त दराची निविदा श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. म्हणून मंजूरीसाठी सादर करण्यांत आली

असता मा.आयुक्तांनी सदर दिलेले दर (३.३०% जास्त) अमान्य करुन अंदाजपत्रकीय दरात मंजूरी दिली आहे.

सदर काम गलिच्छ वस्ती सुधार अर्थसंकल्प १९९०-२००० मध्ये ठेवण्यांत आलेली तरतूद "लेखा शिर्ष १८ खेडी विकास योजना " तून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता श्री.एस.ए.नवाब यांची निविदा ३.३०% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बनेवाडी गांव ते स्मशानभुमी रस्त्या लगत दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री.एस.ए.नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३७/२७ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर बायजीपुरा वार्ड क्र.३० मधील उर्वरित रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.७,२४,११३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आली असून त्यास मा.आयुक्तांनी दि.०२.०३.९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तसेच स्थायी समिती ठराव क्र.५७९/१९, दि.०६.०३.९९ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ७ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ५ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा उपस्थित ठेकेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ३९.२५% कमी |
| २. | डी.अजितसिंग | - | ३८% कमी |
| ३. | आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | - | ३७.८८% कमी |
| ४. | व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | - | ३७.७१% कमी |
| ५. | के.बी.पाथ्रीकर | - | २९.११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.२५% कमी दराची निविदा मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची आहे. त्यास मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर काम मनपा लेखाशिर्ष पुर्नडांबरीकरण १९९९-२००० मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संयजनगर बायजीपुरा वार्ड क्र.३० मधील उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.२५% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३८/२८ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे उर्वरित गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामाकरिता रक्कम रु.३,९३,५५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीत मंजूरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी १९ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ८ निविदा प्राप्त झाल्या त्या उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महमद इस्माईल | - | ३३.३५% कमी |
| २. | सरवदे एस.पी. | - | ३३.२५% कमी |
| ३. | प्रकाश जाधव | - | ३२.६७% कमी |
| ४. | बी.ए.काल्डा | - | ३०.८०% कमी |
| ५. | माजीद कंन्स्ट्रक्शन | - | २७.८६% कमी |
| ६. | परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | - | २७.२७% कमी |
| ७. | मन्नान खॉन | - | २०.७८६% कमी |
| ८. | एस.ए.देशमुख | - | १९.११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.२५% कमी दराची असलेली श्री.महमद इस्माईल यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे उर्वरित गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३५% कमी दराची श्री.महंमद इस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३९/२९ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे गारखेडा, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सि.स.नं.१५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणेसाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,९९,९०९/- चे तयार करण्यांत आले असून सदर कामासाठी मा.आ.श्री.जयवंतरावजी ठाकरे, वि.प.सदस्य यांचे आमदार निधीतून अनुदान उपलब्ध करुन देण्यांत आले आहे. त्यास मा.जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणेत आली आहे.

सबब मौजे गारखेडा औरंगाबाद मनपा क्षेत्रातील सि.स.नं.१५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणेचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,९९,९०९/- चे स्थायी समिती समोर विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा, औरंगाबाद महापालिका क्षेत्रातील सि.स.नं.१५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,९९,९०९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४०/३० :-**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या शाळेसाठी खालील इमारती भाड्याने घेण्यांत आलेल्या आहेत. या इमारतींची भाडे निश्चिती भाडे समितीद्वारा करण्यांत आली आहे. दि.०७.०५.९९ रोजी या समितीच्या बैठकीसाठी खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.उपआयुक्त (म.),
२. मा.शहर अभियंता,
३. मा.मुख्य लेखापरिक्षक,
४. सहा.संचालक नगर रचना,
५. मालमत्ता अधिकारी,
६. शिक्षणाधिकारी

समितीने एकमताने पुढील निर्णय दिलेला आहे. आणि भाडे निश्चित केले आहे. ते पुढीलप्रमाणे

| | | | **करसहीत** | **कर शिवाय** |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.भगत, यशोधरा कॉलनी शाळा | - | ३७६३/- | ३१३६/- प्र.महा. |
| २. | श्री.उत्तम नारायण, जयभवानी नगर शाळा | - | २२८८/- | १५१५/- प्र.महा. |
| ३. | म.मोहसीन अहमद, कैसर कॉलनी शाळा | - | ८२७२/- | ६८९४/- प्र.महा. |
| ४. | आर.टी.चव्हाण, राधास्वामी बालवाडी | - | ३३६/- | २२४/- प्र.महा. |

उपरोक्त भाडे निश्चितीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेने शाळेसाठी भाड्याने घेतलेल्या इमारतीचे बाबतीत भाडे समितीद्वारा निश्चित करण्यांत आलेले प्रतिमहा भाडे निश्चितीस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | | **करसहीत** | **कर शिवाय** |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.भगत, यशोधरा कॉलनी शाळा | - | ३७६३/- | ३१३६/- प्र.महा. |
| २. | श्री.उत्तम नारायण, जयभवानी नगर शाळा | - | २२८८/- | १५१५/- प्र.महा. |
| ३. | म.मोहसीन अहमद, कैसर कॉलनी शाळा | - | ८२७२/- | ६८९४/- प्र.महा. |
| ४. | आर.टी.चव्हाण, राधास्वामी बालवाडी | - | ३३६/- | २२४/- प्र.महा. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४१/३१ :-**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेला लागणाऱ्या विविध प्रकारची पुस्तके, फॉर्मस, छपाईसाठी सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता वर करार करणेस्तव वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा दरपत्रके मागविण्यांत आली. एकूण पाच निविदा कार्यालयास प्राप्त झाल्या.

प्राप्त निविदा दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आला व तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे अवलोकन केले असता दर हे स्पर्धात्मक दर आहेत. खालील प्रमाणे संबंधित एजन्सीजच्या नावांसमोर त्यांचे तुलनात्मकदृष्ट्या कमी दरांचे आयटम क्रमांक दर्शविण्यांत आलेले आहेत. मा.आयुक्त यांनी दि.२९.०४.९९ रोजी सदरील दरास मान्यता दिलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रत्नमाला ऑफसेट प्रिंटर्स | - | आयटम क्र. ४,५,१२,२३ ते २६,३९ ते ४२,५२,५३,५५ ते ५८,६०,६६,६९,७०,७१, ७७,८४,८६,१०२,१०३ व ११८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री.गणेश मुद्रणालय | - | आयटम क्र. ३,६,७,८,११,१८,६१,१००,१०३ ते १०७,१२१,१२२,१२६,१२७ व १२८ |
| ३. | मे.लिबर्टी प्रिंटर्स | - | आयटम क्र.९,१०,१३ ते १७,२०,२१,२२,२८, ३१,३२,३३,३६,३७,३८,४४,४५,४६,५४,६७,६८, ७२,७६,७८,७९,८८,८९,९१,९२,९४,९५ ते ९९, ११०,१११,११३,११४,११७ |
| ४. | मे.रविराज प्रिंटर्स | - | आयटम क्र.१,१९,२७,२९,३०,३४,३५,४३,४४,४७ ते ५०,१०७,११६,११९,१२३,१२४,१२५. |
| ५. | मे.सिमा प्रिंटर्स | - | आयटम क्र.२,५९,६२ ते ६५,७३,७४,७५,८० ते ८३,८५,८७,९०,९३,१०१,१०६ ते १०९,११२, ११३,११५,१२०. |

आयटम क्र.४४,१०६,१०७ व ११३ चे दर दोघांचे समान असलेले विभागून देण्यांत येतील. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेला लागणाऱ्या विविध प्रकारची पुस्तके, फॉर्म्स छपाईसाठी सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी दर करार करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदांमध्ये खालीलप्रमाणे एजन्सीच्या नावांसमोर दर्शविलेल्या कमी दराचे आयटम क्रमांकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.रत्नमाला ऑफसेट प्रिंटर्स | - | आयटम क्र. ४,५,१२,२३ ते २६,३९ ते ४२,५२,५३,५५ ते ५८,६०,६६,६९,७०,७१, ७७,८४,८६,१०२,१०३ व ११८ |
| २. | श्री.गणेश मुद्रणालय | - | आयटम क्र. ३,६,७,८,११,१८,६१,१००,१०३ ते १०७,१२१,१२२,१२६,१२७ व १२८ |
| ३. | मे.लिबर्टी प्रिंटर्स | - | आयटम क्र.९,१०,१३ ते १७,२०,२१,२२,२८, ३१,३२,३३,३६,३७,३८,४४,४५,४६,५४,६७,६८, ७२,७६,७८,७९,८८,८९,९१,९२,९४,९५ ते ९९, ११०,१११,११३,११४,११७ |
| ४. | मे.रविराज प्रिंटर्स | - | आयटम क्र.१,१९,२७,२९,३०,३४,३५,४३,४४,४७ ते ५०,१०७,११६,११९,१२३,१२४,१२५. |
| ५. | मे.सिमा प्रिंटर्स | - | आयटम क्र.२,५९,६२ ते ६५,७३,७४,७५,८० ते ८३,८५,८७,९०,९३,१०१,१०६ ते १०९,११२, ११३,११५,१२०. |

आयटम क्र.४४,१०६,१०७ व ११३ चे दर दोघांचे समान असलेले विभागून देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४२/३२ :-**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका कार्यालयास सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी लागणारी किटकनाशके खरेदी करिता वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन निविदा दरपत्रके मागविण्यांत आली. एकूण तीन निविदा

दरपत्रके या कार्यालयास प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रकानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर खालील प्रमाणे प्राप्त झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | काळे फिनेल ५% आर.डब्ल्यु.सी. | - | रु.१७.५० प्रति लिटर - मे.इन्शा ट्रेडींग कं. व मे.रोशन सेल्स कॉर्पो. यांचेत विभागून |
| २. | नोव्हॉन सिबाका | - | रु.४२५.०० प्रतिलिटर - मे.इन्शा ट्रेडींग कं. |
| ३. | बॅक्टीरीनो कार्बोलिक पावडर | - | रु.२०.५० प्रति किलो - मे.सेल्वा इंटरप्राईजेस |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी निविदा दराचे निविदाधारकास मा.आयुक्त यांनी दराचे वाटाघाटीस बोलावून दराबाबत वाटाघाटी केल्या. वाटाघाटी अंती खालीलप्रमाणे दर मान्य करण्यांत आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | काळे फिनेल ५% आर.डब्ल्यु.सी. | - | रु.१७.०० प्रति लिटर प्रमाणे - मे.इन्शा ट्रेडींग कं. व मे.रोशन सेल्स कॉर्पो. यांचेत विभागून (एकूण खरेदी अंदाजे रु.४,२५,०००/-) |
| २. | नोव्हॉन सिबाका | - | रु.४२१.०० प्रतिलिटर प्रमाणे - मे.इन्शा ट्रेडींग कं. (एकूण खरेदी अंदाजे रु.१,७०,०००/-) |
| ३. | बॅक्टीरीनो कार्बोलिक पावडर | - | रु.१९.५० प्रति किलो प्रमाणे - मे.सेल्वा इंटरप्राईजेस यांचे (एकूण अंदाजे खरेदी रु.३,९०,०००/-) |

वरीलप्रमाणे वाटाघाटी केलेले दर हे गत वर्षीचे मान्य दरानुसार आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकेस लागणारी सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता किटकनाशके खरेदी करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी त्यांच्या ॲटमकरिता कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार खालील दराने खरेदी करण्यास व प्रस्तावात दर्शविलेल्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | काळे फिनेल ५% आर.डब्ल्यु.सी. | - | रु.१७.०० प्रति लिटर प्रमाणे - मे.इन्शा ट्रेडींग कं. व मे.रोशन सेल्स कॉर्पो. यांचेत विभागून (एकूण खरेदी अंदाजे रु.४,२५,०००/-) |
| २. | नोव्हॉन सिबाका | - | रु.४२१.०० प्रतिलिटर प्रमाणे - मे.इन्शा ट्रेडींग कं. (अंदाजे खर्च रु.१,७०,०००/-) |
| ३. | बॅक्टीरीनो कार्बोलिक पावडर | - | रु.१९.५० प्रति किलो प्रमाणे - मे.सेल्वा इंटरप्राईजेस यांचे (एकूण अंदाजे खरेदी रु.३,९०,०००/-) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३/३३ :-**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी मनपा कार्यालयास लागणारी स्वच्छता साहित्य खरेदीसाठी व ज्यास्तव दर करार करणेसाठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यांत येऊन निविदा दरपत्रके मागविण्यांत आली कार्यालयास तीन निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त तीन निविदा दरपत्रकानुसार जे दर प्राप्त झाले ते जास्त असल्याचे आढळून आल्याने सन १९९८-९९ चे मान्य दर व बाजारातील दर यांची तुलना केली असता मा.आयुक्त यांनी संबंधित निविदा धारकांस दर वाटाघाटीसाठी बोलाविले असता, प्राप्त दर गत वर्षीचे दर व बाजारातील दर यांची तुलना करुन सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यातील शेरा या कॉलममध्ये जे दर नमूद करण्यांत आलेल आहेत ते दर मा.आयुक्तांनी अंतिम केलेले आहेत. (सोबत तक्ता जोडलेला आहे.)

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी महापालिकेस लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी दर करार करणे करिता मागविण्यांत आलेल्या निविदा दरपत्रका नुसार प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कमी दराचे ॲटमला सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.इन्शा ट्रेडींग कंपनी | - | आयटम क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १९, २०, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४,४५, ४६, ४७, ४८. |
| २. | न्यु भारत | - | आयटम क्र.१,१७,२१,२२,२३ |
| ३. | एम.जे.ट्रेडींग | - | आयटम क्र.१८ |

**विषय क्र.४४/३४ :-**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी मनपा कार्यालयात लागणारे लेखन साहित्य कॉम्प्युटर स्टेशनरी व ड्रॉईंग साहित्य खरेदीसाठी व त्यास्तव दर करार करणे साठी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा दरपत्रके मागविण्यांत आली. प्राप्त तीन निविदा दरपत्रकानुसार प्राप्त दर तसेच गतवर्षीचे दरानुसार मा.आयुक्त यांनी निविदाधारकां सोबत दर वाटाघाटी केल्या. मा.आयुक्त यांनी संबंधितास गतवर्षीचे मान्य दरात ५% वाढ करुन देण्याबाबत मान्यता दिली.

वरीलप्रमाणे मा.आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार संबंधितास पत्राद्वारे दर मान्य असले बाबत लेखी कळविणेस सांगितले असता, त्यांनी सदरील प्रस्ताव मान्य नसले बाबत कळविले, करिता म.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार साहित्यावरील छापील किंमत तसेच बाजारातील दरांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

मनपा वर्षभर मोठ्या प्रमाणात खरेदी करित असल्याने एम.आर.पी.गृहीत धरुन दर निश्चित करणे योग्य असल्याने प्राप्त निविदा दरात १०% दर कमी करुन निविदा मान्य

करण्यांत आली. याबाबत सदरील दर मान्य असल्याबाबत संबंधित एजन्सीकडून पत्र घेण्यांत आली.

सोबत तुलनात्मक दरांचा तक्ता जोडलेला आहे. सदरील तक्त्यात दर्शविल्यानुसार प्राप्त दरात तुलनात्मकदृष्ट्या कमी दराखाली अधोरेखित केलेले आहे. सदरील दरात १०% दर कमी करुन दर गृहीत धरावे. दर्शविलेले दर हे प्राप्त निविदा दर आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विजय जनरल स्टोअर्स | - | आयटम क्र.१,३,६,८,११,१२,१४,१६,२०, २२,२५,२९,३२,३५,३९,४३,४५,५० ते ५४, ५७,६१,६३,६७,७०,७१,७२,७३,७७,७८, ८७,९०,९१,९२,९५,९८,९९,१०२,१०४, १०८,११०,११६,११७,१२२,१२३,१२४,१२६, १३०,१३२ |
| २. | मे.मुरली स्टेशनर्स | - | आयटम क्र.७,१३,१५,१९,२१,२३,२६,२७, २८,३३,३४,३७,३८,४०,४१,४६,४५,५५, ५८,५९,६०,६८,६९,७४,७६,८२ ते ८५,८८, ८९,९४,९६,९९,१०१,१०५,१०७,१११,११२, ११३,१२०,१२१,१२९,१३१,१३२. |
| ३. | मे.एम.जे.ट्रेडींग कं. | - | आयटम क्र.२,४,५,६,९,१०,१३,१७,१८, २४,२७,३०,३१,३६,४२,४४,४७,४८,४९,५६, ६२,६४,६५,७५,७६,७८,८०,८१,८६,९३, ९७ ते १००,१०३,१०६,१०९,११३,११४, ११५,११८,११९,१२५,१२७ व १२८. |

वरील संबंधित एजन्सीच्या नांवसासमोर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे आयटम क्रमांक दर्शविलेले आहेत. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी मनपा कार्यालयात लागणारे लेखन साहित्य - कॉम्प्युटर स्टेशनरी व ड्रॉईंग साहित्य खरेदी साठी प्राप्त झालेल्या निविदा दरपत्रकातील दरामध्ये १०% कमी दर कमी करुन त्या त्या एजन्सीच्या नावांसमोर दर्शविलेल्या ॲटमच्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विजय जनरल स्टोअर्स | - | आयटम क्र.१,३,६,८,११,१२,१४,१६,२०, २२,२५,२९,३२,३५,३९,४३,४५,५० ते ५४, ५७,६१,६३,६७,७०,७१,७२,७३,७७,७८, ८७,९०,९१,९२,९५,९८,९९,१०२,१०४, १०८,११०,११६,११७,१२२,१२३,१२४,१२६, १३०,१३२ |
| २. | मे.मुरली स्टेशनर्स | - | आयटम क्र.७,१३,१५,१९,२१,२३,२६,२७, २८,३३,३४,३७,३८,४०,४१,४६,४५,५५, ५८,५९,६०,६८,६९,७४,७६,८२ ते ८५,८८, ८९,९४,९६,९९,१०१,१०५,१०७,१११,११२, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ११३,१२०,१२१,१२९,१३१,१३२. |
| ३. | मे.एम.जे.ट्रेडींग कं. | - | आयटम क्र.२,४,५,६,९,१०,१३,१७,१८, २४,२७,३०,३१,३६,४२,४४,४७,४८,४९,५६, ६२,६४,६५,७५,७६,७८,८०,८१,८६,९३, ९७ ते १००,१०३,१०६,१०९,११३,११४, ११५,११८,११९,१२५,१२७ व १२८. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५/३५ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९३ मध्ये शहरातील ड्रेनेज लाईन व सेप्टीक सफाई करिता एक व्हॅक्युम एन्टीअर खरेदी करण्यांत आले आहे. या मशिनचा व्हॅक्युम पंप खराब झाल्यामुळे सध्या दुरुस्त करुन बसविला आहे. नवीन व्हॅक्युम पंप खरेदी करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.४९४/९, दि.३०.०१.९९ नुसार रक्कम रु.३,२५,५०९/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रात निविदा सूचना देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण ३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली आहे.

मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांची निविदा प्राप्त झाली असून आलेले दर सर्व करांसहीत रु.३,५१,५५५/- आहेत. आलेले दर मान्य नसल्यामुळे मा.आयुक्त यांनी सदरील एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलावून दर कमी करण्याबाबत सुचविले त्यात सदरील एजन्सीने अंदाजपत्रकीय दर रक्कम रु.३,२५,५०९/- प्रमाणे पंपाचा पुरवठा करण्यास संमती दिली आहे. तरी निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ड्रेनेज लाईन व सेप्टीक सफाई करीता व्हॅक्युम एम्प्टीअरवर बसविणे करिता नवीन व्हॅक्युम पंप खरेदी करणे करिता प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु.३,२५,५०९/- मध्ये करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६/३६ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील ड्रेनेज लाईन चोकअप काढण्यासाठी सध्या एकच मशिन आहे. एकाच जेटींग मशिनीद्वारे शहरातील चोकअप काढण्याचे काम पूर्ण होत नाही. तसेच सध्याची जेटींग मशिन मोठी असल्यामुळे लहान गल्ल्यांमधील पाईप लाईनचे चोकअप काढता येत नाही. यासाठी एक नीवन जेटींग मशिन खरेदी करण्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३०/४ दिनांक ०५.११.९९ नुसार रक्कम रु.१३,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रात निविदा सूचना देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. आलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.कॅम ॲव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे | - | रु.१२,९९,५०६/- |
| २. | मे.मुग्धा इंटरप्राईज पुणे | - | रु.१७,१९,४७८/- |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या मे.कॅम ॲव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे यांचे दर सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४९४/- ने कमी आहेत. आलेले दर हे सर्व करांसह आहेत. तरी आलेल्या कमी दराच्या निविदेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील लहान गल्ल्यामधील ड्रेनेज पाईप लाईनचे चोकअप काढण्याकरिता नवीन जेटींग मशिन खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची म्हणजेच रक्कम रु.१२,९९,५०६/- या दराची मे.कॅम ॲव्हीदा एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४७/३७ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भारतमाता मंदिर येथे प्रकल्प इमारत येथे संरक्षित भिंत बांधणे व इतर उर्वरित कामे करणे करिताचे अंदाजपत्रक रक्कम रु.६,७०,०००/- ला (विद्युतीकरणाचे काम वगळून) दि.२४.१२.९८ च्या सभेत विषय क्र.४३०/१५ अन्वये चर्चा होऊन व दिनांक ०८.०१.९९ च्या सभेत पुनश्च चर्चा होऊन मान्यता प्राप्त झाली आहे.

सबब स्थायी समितीचे निर्णयान्वये व प्रशासकीय मान्यतेन्वये सदर काम हे या कामाचे मुळ गुत्तेदार श्री.पी.जी.पवार यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतमाता मंदिर येथे प्रकल्प इमारत येथे संरक्षित भिंत बांधणे व इतर उर्वरित कामे (विद्युतीकरणाचे काम वगळून) करण्याकरिता स्थायी समिती सभा दि.२४.१२.९८ व ०८.०१.९९ अन्वये मान्यता झाल्यानुसार सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री.पी.जी.पवार यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४८/३८ :-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत प्राणी संग्रहालय, पशुवधगृह, पशु चिकित्सालय, श्वान पथक, मोकाट जनावरे, मटन व बीफ यांचे विक्रीवर देखरेख करणे इ.दैनंदिन व कार्यालयीन कामे व कर्तव्ये पुर्ण करण्याचा दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेतील पशुधन विकास अधिकारी हे पद वेतनश्रेणी रु.२२००-३७०० मध्ये आहे. शहराचा वाढता व्याप, वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्राणी संग्रहालय पशुवधगृहे, मोकाट जनावरे व अन्य महत्वाच्या कामामध्ये प्रशासकीय दृष्टीने कामाचा व्याप वाढला आहे. पशुधन विकास अधिकारी हे पद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एकच पद असून हे पद विभाग प्रमुखाचे आहे. या विभागा अंतर्गत केंद्र व राज्यशासन स्तरावर वेळोवेळी महत्वाचा पत्रव्यवहार करुन प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यांत येतात. त्यामुळे पशुधन विकास अधिकारी या पदनामात प्रशासकीय दृष्टीने बदल करणे आवश्यक असल्याने

या पदास मुख्य पशुसंवर्धन अधिकारी" तथा "संचालक प्राणी संग्रहालय" असे पदनाम देण्याचा प्रस्तावित करण्यांत येते. तथापि या नवीन पदनामामुळे पशुधन विकास अधिकारी यांचे वेतनश्रेणी, दर्जा यात कुठल्याही प्रकारचा बदल होणार नाही. शिवाय वाढीव अधिकारी वर्ग/कर्मचारी देय राहणार नाही. डॉ.रझवी यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे विभागातील योजना कामा संबंधाने कार्यशाळा/परिसंवादास उपस्थित रहावे लागते त्या दृष्टीकोनातून पदनामात बदल करणे आवश्यक आहे. तरी डॉ.एस.व्ही.रझवी पशुधन विकास अधिकारी यांचे "मुख्य पशुसंवर्धन अधिकारी" तथा "संचालक प्राणी संग्रहालय" हे पदनाम देण्यासाठी मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) अन्वये स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत प्राणी संग्रहालय, पशुवधगृह, पशु चिकित्सालय, श्वान पथक, मोकाट जनावरे, मटन व बीफ यांचे विक्रीवर देखरेख करणे इ.दैनंदिन व कार्यालयीन कामे व कर्तव्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच शहराचा वाढता व्याप, वाढती लोकसंख्या लक्षात घेता व अन्य महत्वाच्या कामामध्ये प्रशासकीय दृष्टीने कामाचा व्याप वाढल्याने या विभागांतर्गत केंद्र व राज्य शासन स्तरावर वेळावेळी महत्वाचा पत्रव्यवहार करुन प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावे लागतात. तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ.श्री.एस.व्ही.रझवी यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे विभागातील योजना/ कामा संबंधाने कार्यशाळा/परिसंवादास उपस्थित रहावे लागते. त्या दृष्टीकोनातून पदनामास बदल करणे आवश्यक असल्याने डॉ.एस.व्ही.रझवी, पशुधन विकास अधिकारी यांचे "मुख्य पशुसंवर्धन अधिकारी" तथा "संचालक प्राणी संग्रहालय" हे पदनाम देण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) अन्वये सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९/३९ :-**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना मधील हॉटेल अमरप्रित ते बीड बायपास रोड ह्या २४ मी. रुंद रस्ता विकासाचे काम पूर्ण झाले असून या रस्त्यावर शहानूरमियाँ दर्गा येथे रेल्वेगेट बसविण्यासाठी रेल्वे खात्यास ४०.०० लक्ष रुपये देण्याच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळालेली आहे. परंतू प्रतिवर्ष ३.२० लक्ष देखभाल दुरुस्तीचा खर्च मान्य केल्याशिवाय रेल्वे खाते रेल्वेगेटची उर्वरित रक्कम स्विकारण्यास तयार नव्हते. दि.२४.०४.९९ रोजी रेल्वे खात्याचे डिव्हीजनल इंजिनिअर नॉर्थ हैद्राबाद डिव्हीजन यांचेसह मा.अतिरिक्त शहर अभियंता यांची औरंगाबाद रेल्वे स्थानक येथे बैठक झाली व उपरोक्त प्रकरणी नवीन रेल्वे लेव्हल क्रॉसिंग गेटसाठीचा वार्षिक देखभाल दुरुस्तीचा खर्च रक्कम रु.२९,१३९/- प्रति वर्ष मनपाने रेल्वेस द्यावा लागेल असे डिव्हीजनल इंजिनिअर यांनी स्पष्ट केले. व यापेक्षा अधिक काही करता येणे रेल्वे खात्यास शक्य नाही असेही स्पष्ट केले व त्याप्रमाणे लेखी पत्रही मनपास दिले.

तरी रेल्वे खात्यास सदर गेटची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता मनपातर्फे रक्कम रु.२९,१३९/- प्रतिवर्ष देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित ते बीड बायपास या विकास रस्त्यावर शहानूरमियाँ दर्गा येथील रेल्वे गेट ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता मनपा तर्फे

रेल्वे खात्यास प्रतिवर्षी रक्कम रु.२९,१३९/- देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०/४० :-**

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरात वराह पालन धारकांना वराह पालनाकरिता नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंड येथे नियमानुसार वराह पालनाकरिता जागा देणे योग्य राहील. जेणे करुन शहरातील वराहचे स्थलांतर होईल. प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील वराहांचे स्थलांतर करण्याचे दृष्टीने शहरातील वराह पालन धारकांना वराह पालनाकरिता नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे नियमानुसार जागा देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१/४१ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भारतमाता मंदिर प्रकल्प / इमारत येथे मार्बल स्टोनची भारत माता मुर्ती बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन मा.आयुक्त यांचे मान्यतेस्तव सादर करुन सदर कामासाठी दरपत्रके मागविली असता स्विकृतीच्या तारखेपर्यंत तीन दरपत्रके प्राप्त झाली.सदर दरपत्रकामध्ये प्राप्त दर हे तीन माध्यमामध्ये आहेत. त्यावर प्रथमतः मा.आयुक्तांचे दालनामध्ये बैठक होऊन ब्रॉंझ धातुची भारत मातेची मुर्ती श्री.मडीलगेकर आर्ट स्टुडिओ यांचेशी चर्चा करुन त्यांचे प्राप्त सर्वात कमी दर म्हणजेच रक्कम रु.२,८९,०००/- ऐवजी रु.२,८०,०००/- मध्ये ब्रॉंझ धातुमध्ये करुन घेणे बाबत मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता व गुत्तेदार यांची संमती प्राप्त आहे.

सबब सदर काम हे मडीलगेकर आर्ट-स्टुडिओ यांचे मार्फत ब्रॉंझ धातुमध्ये रक्कम रु.२,८०,०००/- चे पूर्ण करुन घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतमाता मंदिर प्रकल्प/इमारत येथे भारत मातेची मुर्ती बसविण्या संदर्भात मा.आयुक्तांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार ब्रॉंझ धातुची भारतमातेची मुर्ती बसविणेचे काम श्री.मडीलगेकर आर्ट स्टुडिओ यांचेकडून रक्कम रु.२,८०,०००/- मध्ये करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीस मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२/४२ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंग मंदिर येथे गळती बाबत वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या कारणाने तक्रार निवारण करणेस्तव वास्तु विशारदांची समिती नेमण्यांत आली. समितीच्या प्राप्त अहवालानुसार संत एकनाथ रंग मंदिराची संपूर्ण छत (पत्रे) बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी सा.बां.विभागाचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.३,९५,०००/- चे पत्रे बदलणेचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास मा.आयुक्त महोदयांनी दि.२१.०४.९९ ला मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा खर्च १९९९ ते २००० या आर्थिक वर्षाअंतर्गत इमारत दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षा अंतर्गत

करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,९५,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर येथील गळती बाबतच्या तक्रार निवारण करिता रंग मंदिराचे संपूर्ण छत (पत्रे) बदलणे आवश्यक असल्याने या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३/४३ :-**

शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उद्यान उभारण्यांत येणाऱ्या "विज्ञान उद्यान" प्रकल्पातील विविध प्रयोगांच्या कायमस्वरुपी उभारणीसाठी वृत्तपत्रातून जाहिरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. शेवटच्या दिनांकापर्यंत एकूण तीन निविदा पत्रकांची विक्री झाली व अंतिमतः पूर्णपणे भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या.

१. श्रीमती चित्र इनामदार ॲण्ड पार्टनर्स

२. पॉझिटीव्ह इंजिनिअर्स

प्राप्त दराबाबत मा.आयुक्तांनी प्रकल्प प्रयोग उभारणी व खर्च या संदर्भाने संबंधितांशी चर्चा केली. वाटाघाटी अंती पॉझिटीव्ह इंजिनिअर्स यांनी सोळा प्रयोगांच्या वैज्ञानिक उभारणीसाठी दिलेल्या दरापेक्षा २% कमी दराने काम करण्यास संमती दिली आहे. तुलनात्मकदृष्ट्या श्रीमती चित्रा इनामदार यांचे प्रयोग क्र.३ व ६ या प्रयोगांचे दर कमी आहेत. तर प्रयोग क्र.१,२,४,५,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५ व १६ यांचे पॉझिटीव्ह इंजिनिअर्स यांचे दर कमी आहेत.

निविदाधारक क्र.१ यांनी कमी दराने काम करण्यांस नकार दिलेला असून निविदाधारक क्र. २ हे २% कमी दराने तसेच निविदाधारक क्र.१ च्या प्रयोग क्र.३ व ६ चे तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेल्या दरात काम करणेस तयार आहेत.

| अ.क्र. | प्रयोगाचे नांव | प्राप्त दर | |
|---|---|---|---|
| | | चित्रा इनामदार | पॉझिटीव्ह इंजि. |
| १. | आश्चर्यकारक वनस्पती | १४,०००/- | १३,९८०/- |
| २. | पृथ्वीची परिवलन गती दर्शविणारा दोलक | ६४,०००/- | ६३,५००/- |
| ३. | कृत्रिम तारांगण | ७६,०००/- | ८४,४००/- |
| ४. | हसरी गॅलरी | --- | १७,०००/- |
| ५. | घनपदार्थाचे तरंगणे | २२,०००/- | १७,०००/- |
| ६. | पाच हजार वर्षाचे कॅलेंडर | १२,५००/- | २१,७००/- |
| ७. | सुर्य शक्तीवर पाणी तापविणारा बंप (सोलर हिटर) | ४९,०००/- | ४७,५००/- |
| ८. | सुर्य घड्याळ | ३५,०००/- | १८,०९०/- |
| ९. | संगणक खेळ व करमणूक | १,८०,०००/- | १,३०,०००/- |
| १०. | एअरो मॉडेलिंग | १,७०,०००/- | १,६५,०००/- |
| ११. | कारंजावर उडणारे चेंडू | ३५,२९०/- | २९,४५०/- |
| १२. | ब्लोकट मधून उडणारे फुगे | २०,०००/- | १८,९००/- |
| १३. | सुर्य व चंद्रग्रहण दाखविणारे स्वयंचलित यंत्र | २८,०००/- | २८,०००/- |
| १४. | गुरुत्वमध्ये तत्वावर आधारित खेळणी | १६,३४०/- | १४,८००/- |
| १५. | हवामान यंत्रणा | १६,०००/- | ७,९५०/- |
| १६. | वाऱ्याची दिशा दाखविणारा दर्शक | २२,०००/- | १५,०००/- |

तरी क्र.१ ते १६ चे विज्ञान प्रयोग उभारणीसाठी पॉझीटीव्ह इंजिनिअर्स यांची तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराची व वाटाघाटी अंती मान्य केल्यानुसार २% कमी दराने काम करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उद्यान येथे उभारण्यांत येणाऱ्या "विज्ञान उद्यान" येथे उभारण्यांत येणाऱ्या "विज्ञान उद्यान" प्रकल्पातील विविध प्रयोगांच्या कायम स्वरुपी उभारणीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी प्रयोग क्र.१,२,४,५,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५ व १६ च्या कमी दरापेक्षा वाटाघाटीत ठरल्यानुसार २% कमी दराने आणि प्रयोग क्र.३ व ६ च्या निविदाधारक क्र१ यांनी दिलेल्या कमी दरापेक्षा २% कमी दराने सदरील काम निविदाधारक क्र.२ म्हणजेच मे.पॉझिटीव्ह इंजिनिअर्स यांचेकडून काम करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४/४४ :-**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतर्फे कार्यान्वित करण्यांत येत असलेल्या बालभवन या सांस्कृतिक उपक्रमांतर्गत असलेल्या क्रिडा संकुलासाठी विविध क्रिडा साहित्यासाठी वर्तमानपत्रातून प्रसिध्दीस देऊन जाहिर निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यानुसार एकूण तीन निविदाधारकांनी निविदा भरल्या. त्यानुसार तुलनात्मकदृष्ट्या कमी असलेले महालक्ष्मी ट्रेडर्स यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | साहित्यांचे नांव | दर प्रति नग | | |
|---|---|---|---|---|
| | | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स | मे.स्कायलाईन ट्रेडर्स | मे.मराठवाडा ट्रेडर्स |
| १. | बॅडमिंटन नेटस् | ३७०/- | ३८०/- | ३७८/- |
| २. | बॅडमिंटन पोल्स् | १,२९०/- | १,४००/- | १,३४०/- |
| ३. | बॅडमिंटन रॅकेटस् (स्टँडर्ड साईज) | १,१६२/- | १,७५१/- | १,१७५/- |
| ४. | शटलस् | १०२/- | ११०/- | १०७/- |
| ५. | टेबल टेनिस टेबल | ११,८७५/- | १३,९००/- | १२,५००/- |
| ६. | टेबल टेनीस नेटस | १७२/- | १७५/- | १८०/- |
| ७. | टेबल टेनीस रॅकेटस | ४७५/- | ४८०/- | ४८५/- |
| ८. | टेबल टेनीस बॉल्स | ४४३/- (प्रति बॉक्स) | ४४४/- | ४४५/- |
| ९. | कॅरम बोर्ड - (ए)<br>(बी) | १,६७५/-<br>२,३५०/- | १,७५०/-<br>--- | १,८५०/-<br>२,७००/- |
| १०. | चेस बोर्डस | १४५/- | १७५/- | १७०/- |
| ११. | खो-खो पोल्स | १,२९०/- | १,३५०/- | १,३१०/- |
| १२. | लेझीम (स्टील) ए ग्रेड | १,४५०/- (प्रति बॉक्स) | १,४६०/- | १,५७०/- |
| १३. | बोरीक पावडर | १५ रु.५० पैसे | १९/- | १७/- |
| १४. | अंपायर स्टुल | १,६००/- | १,७००/- | १,८५०/- |
| १५. | स्टॉप वॉचेस | १,५९०/- | १,७५०/- | १,७५०/- |
| १६. | टेनिकॉईट रिंग्ज | १३०/- | १४५/- | १५०/- |

सदरील साहित्याच्या नमुन्याची तपासणी तांत्रिक समितीने केलेली असून समितीच्या शिफारशीनुसार उपरोक्त मे.महालक्ष्मी ट्रेडर्स यांचे दर मान्यतेस्तव स्थायी समितीकडे प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपातर्फे कार्यान्वित करण्यांत येत असलेल्या बालभवन या सांस्कृतिक उपक्रमांअंतर्गत असलेल्या क्रिडा संकुलासाठी विविध क्रिडा साहित्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे.महालक्ष्मी ट्रेडर्स यांची निविदा स्विकारणेस व प्रस्तावातील त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५/४५ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथे हरीत गृह (ग्रीन हाऊस) तयार करणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रु.५,००,०००/- चे तयार करण्यांत आले असून मा.आयुक्तांची मंजूरी दि.०४.०५.९९ ला मिळाली आहे. सदर काम शासकीय अनुदान सन १९९९-२००० या वर्षाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.

प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे हरीत सह (ग्रीन हाऊस) तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६/४६ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गार्डन आमखास (सेकंड फेज) येथे विद्युतीकरण करणे च्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,११,८७१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.०७.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.शाम इलेक्ट्रीकल्स स्टोअर्स | - | ५% कमी दर |
| २. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल | - | १% जास्त दर |
| ३. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | ०.१% कमी दर |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.शाम इलेक्ट्रीकल स्टोअर्स यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% कमी आहे. तरी मे.शाम इलेक्ट्रीकल स्टो. यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% टक्के कमी दराचे निविदापत्रक स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गार्डन, आमखास (सेकंड फेज) येथे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात

कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा पाच टक्के कमी दराची मे.शाम इलेक्ट्रीकल स्टोअर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७/४७ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गुरुकुंज हौ.सोसायटी येथील "भारत माता मंदिर" या बहुउद्देशीय इमारतीमध्ये विद्युतीकरण करणे बाबत कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,२०,०००/- च्या अंदाजपत्रकास सिव्हील वर्कच्या कामामध्ये तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,२०,०००/- च्या अंदाजपत्रकीय स.स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा पत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ०७.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.परवेज इलेक्ट्रीकल्स | - | ५% कमी दर |
| २. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल | - | ०.४% कमी दर |
| ३. | मे.लुना इलेक्ट्रीकल | - | ०.१% कमी दर |
| ४. | मे.शाम इलेक्ट्रीकल | - | ०.५% कमी दर |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.परवेज इलेक्ट्रीकल यांच्या निविदापत्रकाचे दर ५% कमी दर आहेत. म्हणजे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ५% कमी दर आहे. तरी मे.परवेज इलेक्ट्रीकल यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे निविदापत्रक स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरुकुंज हौसिंग सोसायटी येथील "भारतमाता मंदिर" या बहुउद्देशीय इमारतीमध्ये विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची मे.शाम इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५८/४८ :-**

शळर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मुख्य प्रवेशद्वार बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रकास दिनांक २८.०८.९८ चे स्थायी समितीचे इतिवृत्त अन्वये ठराव क्र.१९९/४४ नुसार मान्यता प्राप्त असून सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/१००/९८ दि.२२.१२.९८ अन्वये निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्री दि.२९.१२.९८ पर्यंत सहा निविदा विक्री झाल्या व स्विकृतीची अंतिम दि.०४.०१.९९ पर्यंत चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | - | रु.४,३०,०००/- |
| २. | मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन | - | रु.४,३८,०००/- |
| ३. | श्री.शेख मसुद | - | रु.४,९३,४७९/- |
| ४. | सासमकर पी.आर. | - | रु.५,४२,८२७/- |

सबब सर्वात कमी दराची निविदा मे.फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन यांची असल्याने मंजूरीस्तव सादर करतांना निविदा सूचनाप्रमाणे पुर्तता न केल्यामुळे कार्यालयाने त्यांना लेखी पत्राद्वारे पुर्तता करणेस कळवले असता फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन यांनी २५ वर्षांची हमी घेतलेली नाही. सबब द्वितीय क्रमांकाचे गुत्तेदार यांना लेखी पत्राद्वारे प्रथम क्रमांकाचे गुत्तेदार यांचे दरात काम करणेस तयार आहात काय (म्हणजेच रु.४,३८,६५१/- ऐवजी रु.४,३०,०००/-) अशी विचारणा करण्यांत आली होती व त्यांनी त्यास लेखी संमती दिली आहे व त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे.

सबब सदर काम हे द्वितीय क्रमाकांचे गुत्तेदार मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेमार्फत संपूर्ण काम २५ वर्षाचे हमीसह रक्कम रु.४,३०,०००/- रु. मध्ये करुन घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे मुख्य प्रवेशद्वार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन यांनी निविदा अटींची पूर्तता न केल्यामुळे द्वितीय क्रमांकाचे गुत्तेदार मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन यांनी लेखी संमती दिल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून रक्कम रु.४,३०,०००/- मध्ये करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५९/४९ :-**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी पाणी पुरवठा योजनेवर ३५० अश्व शक्ती पंपाकरिता एम.ई.आय.कंपनीचे स्टार्टर साठी सुट्या भागांची खरेदी करणे आहे.

जायकवाडी प्रकल्प पूर्णपणे पंपींग मशिनरीवर अवलंबून असून प्रकल्पात सहा एम.ई.आय.कंपनीचे स्टार्टर असून त्यांचे सुटे भाग संपलेले आहेत. योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे असतांना ६-७ वर्षापुर्वी सुटे भाग खरेदी करण्यांत आले होते ते संपलेले असल्यामुळे सुटे भाग खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.३,६२,७१७/- चे तयार करण्यांत आले आहे. व सुटे भाग एम.ई.आय.कंपनी कडून त्यांनी अधिकृत केलेल्या विक्रेत्यांकडून मे.सॅन इंजिनिअरींग कंपनी, औरंगाबाद यांचेकडून सुटे भाग खरेदी करणेसाठी मा.आयुक्तांनी दि.०७.०५.९९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी पाणीपुरवठा योजनेवर ३५० अश्वशक्ती पंपाकरिता एम.ई.आय.कंपनीचे स्टार्टरसाठी सुट्या भागांची खरेदी करण्यासाठी तयार केलेल्या रक्कम रु.३,६२,७१७/- च्या अंदाजपत्रकास तसेच हे सुटे भाग कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सॅन इंजिनिअरींग कंपनी औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०/५० :-**

मौजे गारखेडा येथील स.नं.६०/भाग आदित्यनगर रेखांकनातील १५% ऐवजी १०% खुली जागा निसर्ग मित्र मंडळास देणे बाबत स्थायी समिती ठराव क्र.३०४/३ दि.२८.१०.९७ मध्ये दुरुस्ती करणे याबाबत जमीन मालक श्री.सी.डी.देशमुख यांची विनंती.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.३०४/३, दि.२८.१०.९७ अन्वये निसर्ग मित्र मंडळास मौजे गारखेडा येथील स.नं.६०/भाग आदित्यनगर रेखांकनातील १५% खुली जागा विकसीत करण्याकरिता ३० वर्षासाठी रु.१००/- प्रतिवर्ष प्रमाणे देण्यांस मंजूरी देण्यांत आली होती. परंतू महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.१८५/९, दि.१९.१२.९८ अन्वये काही अटी शर्तीवर १०% खुली जागा ठेवण्यांस मंजूरी दिलेली असल्याने रेखांकन धारकास अटी व शर्तीची पुर्तता केल्यानंतर १०% खुली जागेवर रेखांकन सुधारित करुन द्यावे लागेल आणि निसर्ग मित्र मंडळाने अद्याप खुली जागा रितसर ताब्यात घेतली नसल्याने आता त्यांना पुर्वीच्याच अटी - शर्तीवर १०% खुली जागा देण्यांबाबत ठराव क्र.३०४/३ दि.२८.१०.९७ मध्ये दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २७.०५.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक २७ मे, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग ढगे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीला अधिकारी वर्ग व खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. रविंद्र बाबुराव इंगळे | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. राजकुमार बचाटे | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉन | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| ११. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १२. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सभासद |
| १३. | स.स.सौ. मुंडलिक विमल नंदकुमार | - | स.सभासद |
| १४. | सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |

<u>संवाद :-</u>

**श्री.देशमुख व्ही.व्ही :** स्व.वामनरावजी परब, जनसंघाचे तसेच भा.ज.पा.चे जेष्ठ समाजसेवक व स्व.गुरु हनुमानजी, भारतीय कुस्ती क्षेत्रातील म.पितामह यांचे दुःखद निधनानिमित्त सभागृहात ०२ मिनीटे श्रध्दांजली वाहण्यांत यावी.

**श्री.रविंद्र इंगळे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठीक आहे, ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते. (त्याचवेळी सभागृहात सर्वांनी ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन :** मागील बैठकीत लाईटवर चर्चा केली होती. त्या संदर्भात उत्तर मिळाले नाहीत. विद्युत साहित्य कोठे वापरण्यांत येते. किती साहित्य वापरण्यांत येते. तसेच कोणत्या ठेकेदारांकडे ते साहित्य लावावयास दिले होते. एक सोडीयम बल्ब किती दिवस चालतो व त्याची किंमत किती या संदर्भात सविस्तर खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित उप अभियंता श्री.बनसोडे यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता (विद्युत) :** एकूण ५५०/- रु. चा एक बल्ब असतो.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** संबंधित अधिकारी हे लाईनमनला ५-५/१०-१० बल्ब लावण्यासाठी देतात. संबंधित कर्मचारी कोठे बल्ब लावतात समजत नाही. रु.२४ लाखाचे साहित्य कोठे कोठे लावण्यांत आले. माझ्या वार्डात जे बल्ब लावले जातात

ते गुत्तेदारांकडून लेखी पत्र देऊन मागवले जाते. मागील ४ महिन्यांत किती साहित्य लावण्यांत आले आहे. त्याचे रेकॉर्ड आहे किंवा नाही? असतील तर सभागृहात माहिती द्यावी. तसेच ज्या लाईटसाठी चोक लावण्यांत येतात त्याची किंमत साधारणत: किती असते.

**श्री.उपअभियंता (विद्युत) :** सोडीयम व्हेपरचे बल्ब संपलेले असून त्या संदर्भात निविदा निघालेल्या असून मंजूरी घेऊन लवकरच कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** वर्षभरात निविदा काढून साहित्य मागविलेले होते. एकूण ९,८०,०००/- चे पाच वेगवेगळे भाग करुन साहित्य मागविले. सदरचे साहित्य कोठे लावण्यांत आले याबाबत चौकशी व्हावी.

**उप अभियंता (विद्युत) :** विद्युत व्यवस्थे बाबतच्या ट्युब, सोडीयम, मर्क्युरीचे इ. बाबत वेगवेगळे निविदा काढलेल्या होत्या.

**मा.सभापती :** मागील बैठकीत स.सदस्य यांनी माहिती मागविली होती. तोंडी सभागृहात माहिती देता येत नसेल तर संबंधित अधिकारी यांनी रेकॉर्ड बघुन लेखी माहिती द्यावी. तसेच सर्व अधिकारी यांना सुचना करतो की, स.सभासदांनी सभागृहात विचारलेली माहिती, त्याचे उत्तर सभागृहात मिळावयास पाहिजे व पुढच्या बैठकीत उत्तर देण्यांत येईल असे सांगण्यांत येते. तरी दुसऱ्या बैठकीपर्यंत तरी उत्तर संबंधित अधिकारी यांनी सभागृहात तयार ठेवले पाहिजे.

**सौ.लता दलाल :** तीन दिवसांपूर्वी सुरत पॅटर्न, स्वच्छ औरंगाबाद मोहिमे अंतर्गत बोगस मजूर घेऊन त्यांची नांवे टाकून पगार काढण्याच्या प्रकरणात विभागीय अधिकारी विभाग क्र.१ तसेच याच विभागातील दोन स्वच्छता निरिक्षक यांना निलंबित करण्यांत आले असून याचप्रमाणे ज्या त्या झोनला झोनल कमिशनर नेमून दिलेले असून ते या प्रकरणात जबाबदार नाहीत काय? त्यांच्या वर का कार्यवाही झाली नाही. तसे त्यांना अधिकार प्रशासनाने दिले नाही काय?

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** सुरत पॅटर्न अंतर्गत झोन क्र.१ मध्ये मुख्य लेखा परिक्षक यांनी कामाच्या संदर्भात चौकशी करुन विभागीय अधिकारी, झोन क्र.१ चे श्री.अभंग हे दोषी आढळून आल्याने तसेच त्यातील स्वच्छता निरिक्षक यांनीही मंजूर कामावर नसतांना त्यांची नांवे टाकण्यांत आली असल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाल्याने निलंबित करण्यात आलेले असून झोनल कमिशनरचा त्यात काही संबंध नसतो. झोनल कमिशनर हे फक्त विभागीय अधिकारी यांना योग्य ते मार्गदर्शन व सूचना देत असतात. त्यानुसार यात झोनल कमिशनर यांचेवर लॅक ऑफ सुपरविजनच्या अनुषंगाने खाते चौकशी सुरु केली आहे.

**उपआयुक्त (म.) :** विभागीय अधिकारी यांचा डायरेक्ट संबंध नसतो.

**सौ.लता दलाल :** झोनल कमिशनरचा डायरेक्ट इन्व्हालपमेंट नसतो असे उपआयुक्त सांगतात यांची नोंद इतिवृत्तात व्हावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जो झोन ज्या झोन अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे. हे अधिकारी कशासाठी नेमलेले आहेत. त्यांचे अधिकार काय आहेत सभागृहाला माहिती द्यावी.

**मा.सभापती :** सत्तेचे विकेंद्रीकरण आणि सुरत पॅटर्न अंतर्गत झोनल ऑफिसर यांची नेमणूक केली त्यांचे अधिकार काय आहेत. याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** सर्वसाधारण सभेने अधिकार दिलेले आहेत. प्राथमिक चौकशी केली असता काही मजूर कामावर नसतांना त्यांना पेमेंट केलेले आहे. असे चौकशी अंती दिसून आले. त्यानुसार संबंधितांवर कार्यवाही केलेली आहे.

**सौ.लता दलाल :** सर्वसाधारण सभेने ठरवल्यानुसार झोनल कमिशनरचे अधिकार काय याची माहिती द्यावी. झोन अधिकारी झोनल कमिशनरची परवानगी घेऊन कार्यभार पहात नाही काय?

**उपआयुक्त (प्र.) :** कर्मचाऱ्यांचे देखरेख तसेच त्यांचे रेकॉर्ड झोनमध्ये वार्डा अंतर्गत येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र अधिकार झोन अधिकारी यांना दिलेले असून झोनल कमिशनर यांना फक्त झोन अधिकारी यांना ज्या ज्या अडचणी येतील व त्यानुसार योग्य प्रशासकीय दृष्टीने योग्य सल्ल्यानुसार त्या अडचणी कशा दुर होतील या बाबतची माहिती देतात. त्याला आपण कंट्रोलिंग असे म्हणू शकतो. जास्त अधिकार हे झोन अधिकारी यांनाच दिलेले आहेत व त्यानुसार सर्व योजना हया झोन अधिकारी यांच्या मार्फत राबवल्या जातात. परवानगी घेऊनच झोन अधिकारी कार्यभार बघतात. परंतू काही अधिकार हे झोन अधिकारी यांना स्वतंत्र दिलेले आहेत. त्यानुसार ते या प्रकरणात दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्यावरच कार्यवाही झालेली आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** झोनल कमिशनरवर का कार्यवाही झाली नाही याचा सविस्तर खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** सविस्तर चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी नेमलेले आहेत. तीन महिन्यात शासकीय नियमाने कार्यवाही होईल.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** चौकशी करण्या संदर्भात कालावधी ठरवावा. नंतर आचारसंहिता लागेल. तातडीने संबंधित झोनल कमिशनरवर चौकशी होऊ शकते काय? तसा प्रस्ताव आणू शकतात काय?

**उपआयुक्त (प्र.) :** चौकशी करण्यासाठी ९० दिवसांचा कालावधी दिलेला असून ही प्रशासकीय बाब आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होत आहे. जर ते दोषी असेल तशी कार्यवाही त्यांच्यावर करता येईल.

**सौ.लता दलाल :** तीन महिन्याची सुट झोनल कमिशनरवर कार्यवाही करण्यासाठी दिली त्याचप्रमाणे जे निलंबित झाले त्यांना का तीन महिन्याची सुट देण्यांत आली नाही.

**प्र.उपआयुक्त (प्र.) (मु.ले.प.) :** या प्रकरणाची २ महिन्यांपासून चौकशी चालू आहे. चौकशी अंती झोनमध्ये ज्या मजूरांची हजेरीवर नांव नसतांना हजेरी भरुन संबंधित विभागात झोन अधिकारी यांच्या सहीनिशी देण्यांत येते. विभागीय अधिकारी व स्वच्छता निरिक्षक यांचा प्रत्यक्ष संबंध येतो. यात एकूण रु.२,४०,०००/- रक्कमेचा अपहार झालेला असून कार्यवाही झाली आहे. प्राथमिक चौकशी केली. झोनल कमिशनर सुपरवायझरी पद आहे. त्यांची हजेरीवर व मस्टरवर सही नसते. ते पूर्णवेळ अधिकारी नाहीत. स्वतःचे काम करुन ते काम करीत आहेत.

**सौ.लता दलाल :** झोनल कमिशनर या संदर्भात जबाबदार धरले जाणार नाहीत काय? झोनल अधिकारी यांना झोनल कमिशनरची पूर्व परवानगी घ्यायची आवश्यकता नाही का?

**प्र.उपआयुक्त (म.) (मु.ले.प.) :** आर्थिक व्यवहारामध्ये ३ कर्मचारी आढळून आल्याने त्याच्यांवर कार्यवाही केलेली आहे. लॅक ऑफ सुपरविजन म्हणून खाते चौकशी सुरु केलेली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अधिकारी यांचा खुलासा सभागृहाची दिशाभूल करणारा आहे. सर्वसाधारण सभेने ठरल्याप्रमाणे झोनल कमिशनर यांना विशेष असे अधिकार. त्यात गाडी-कर्मचारी वर्ग यांची देखरेख, ठेवणे इ.अधिकार दिलेले असतांना तसेच ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार होतो. त्यासाठी तसे अधिकार झोनल कमिशनरला न दाखविता संबंधित कर्मचाऱ्यांचे पगारा बाबतचे बिले झालेले आहेत काय? समजा कार्यकारी अधिकारी यांनी बिल सादर केले. त्यावर खालच्या अधिकाऱ्यांची सही असते. त्यानुसार नियमाने कार्यवाही होईल. तसेच या प्रकरणात झोनल कमिशनर सुध्दा दोषी आहेत. तशी योग्य प्रशासकीय चौकशी व्हावयास पाहिजे. कुणाच्या दबावाखाली खालच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झाली व वरच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही होत नाही. त्यांच्या चौकशीसाठी ३ महिन्यांची मुदत दिले जाते. हे प्रशासनाने धोरण योग्य वाटत नाही.

**मा.सभापती :** या प्रकरणा संदर्भात मी मा.आयुक्त यांचेशी चर्चा केली यात प्रत्यक्ष झोन अधिकारी व स्वच्छता निरिक्षक दोषी असल्याचे सांगण्यांत आले. मुख्य लेखा परिक्षक यांनी जे उत्तर दिले ते योग्य असून यानंतर झोनल कमिशनरने ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार होतात त्या ठिकाणी त्यांच्या सह्या यापुढे असावयास पाहिजे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** बऱ्याच वेळेस वरीष्ठांच्या सह्या नसतात. मग त्यांना दोषी धरणार नाही काय? जे अधिकार ज्या अधिकाऱ्यांना घालुन दिलेले आहेत व त्यासंबंधाने तो अधिकारी सही नव्हती म्हणनू दोषी नाही असे म्हणता येणार नाही. जेणे करुन त्या संबंधित अधिकारी यांनी ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार होतात, मग त्यांचे अधिकार का वापरत नाही. केवळ सहीमुळे अधिकारी दोषी नाही हे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही. अधिकारी हे अधिकाऱ्यांनाच पाठीशी घालतात असे दिसून येते.

**श्री.विखारोद्दीन :** झोनल कमिशनर हे फक्त झोन अधिकारी यांना सुपरविजन करणार काय? किती वेळा अधिकारी, कर्मचारी निलंबित होतात. कार्यवाही झाल्यानंतर पुन्हा स्थायी समितीमध्ये संबंधिताचे कामावर घेण्याबाबतचे अपील येतात. त्यानंतर त्यांना कामावर घेण्यांचे आदेश निघतात. हे काय आहे काय? झोनल कमिशनरला जबाबदार धरावे व तशी कार्यवाही करण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** उपआयुक्त (प्र.) सभागृहाची दिशाभूल करतात. झोनल कमिशनरला कोणतेही अधिकार नाही याचा पुनरुच्चार करावा व तशी इतिवृत्तांत नोंद घ्यावी. झोन कमिशनरला आर्थिक व्यवहार हाताळण्यासाठी २५ हजारांचे अधिकार दिलेले आहेत. दिलेले नसतील तर तसे जाहीर करावे. झोनल कमिशनर ला आर्थिक अधिकार दिलेवर झोनल कमिशनरला जबाबदार धरण्यांत यावे.

**मुख्य लेखापरिक्षक :** ज्या प्रमाणात झोनल कमिशनर यांना अधिकार दिलेले आहेत. एका महिन्यांत एकूण ३०००/- प्रमाणे असे एकूण २५ हजारापर्यंतचे अधिकार झ ोनल कमिशनरला दिलेले आहेत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** तीन हजारापर्यंतचे जे अधिकार दिलेले आहेत ते कोणत्या प्रकारचे याची माहिती द्यावी.

**सौ.लता दलाल :** आर्थिक अधिकार आहे किंवा नाही याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखापरिक्षक :** वेतन भत्याचे अधिकार कमिशनरला दिलेले नाहीत. गेल्या जानेवारीपासून तसे अधिकार दिलेले असून ते प्रकरण यापुर्वीचे असून त्यानुसार चौकशी अंती संबंधित दोषींना निलंबनाची कार्यवाही झालेली आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** निलंबन झालेल्यांना कामावर घ्यावे, नसता एक जबाबदार म्हणून झोनल कमिशनरलाही निलंबित करावे. निलंबन झालेल्या ची चौकशी करुनच कार्यवाही करावी.

**सौ.लता दलाल :** आर्थिक अधिकार आहे किंवा नाही? याचा खुलासा करावा.

**मुख्य लेखापरिक्षक :** कर्मचाऱ्यांचे वेतन भत्त्याचे अधिकार झोनल कमिशनरकडे नसून विभागीय अधिकारी यांचेकडे देण्यांत आलेले आहेत. जानेवारी पासून अधिकार दिले. हे प्रकरण जानेवारी पुर्वीचे आहे.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** सभागृहात चर्चे अंती विचारलेल्या प्रश्ना संदर्भात योग्य असा निर्णय घेता येईल काय. अशीच चर्चा करावी. चर्चेअंती काही तरी निर्णय झाला पाहिजे. झोनल कमिशनर यांना ३०००/- रु.प्रमाणे आर्थिक व्यवहार करण्यासाठी अधिकार खरोखरच दिलेले आहेत काय. तेवढा खर्च होतो काय? शहरातील नागरिकांचे प्रश्न योग्य त्या लवकर सुटावे, चांगल्या पध्दतीने बाजु मांडण्यांत याव्यात. म्हणून मिनी आयुक्तालय स्थापन करण्यांत आलेले आहेत. मिनी आयुक्तालयानुसार प्रशासनाचा कारभार पुर्णतः दिशाभूल करणारा आहे, असे वाटते. विकेंद्रीकरण करुन चांगले निर्णय घेता यावे. यासाठी सभागृहाने मंजूरी दिलेली आहे. अधिकारी भ्रष्टाचार करुन मनपाचे आर्थिक नुकसान करत आहेत. याचा अर्थ शहरातील नागरिकांच्या डोळ्यासमोर अधिकारी व प्रशासन तसेच सभागृह कमी पडते असा त्याचा अर्थ होतो. भ्रष्टाचार झालेला आहे काय याचीही चौकशी करुन सभागृहात माहिती द्यावी. भ्रष्टाचार कसा बंद होईल. याची दक्षता प्रशासनाने घ्यावयास पाहिजे.

**उपआयुक्त (प्र.) :** झोनल कमिशनरला आर्थिक व्यवहाराबाबतचे देण्यांत आलेले अधिकार परवा पासून परत घेण्यांत आलेले आहेत.

**मा.सभापती :** सुरत पॅटर्न संदर्भात मिनी आयुक्तालय स्थापन करण्यांत आले. झोनल कमिशनरला काही अधिकार देण्यांत आले काही नाही. मा.आयुक्त यांना सांगु इच्छितो की, झोनल कमिशनरची चौकशी करुन लवकरात लवकर अहवाल प्रशासनाने सभागृहात सादर करावा.

**श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन :** किती मजूर कामावर असतात. जे असतात त्यांचीच नांवे रजिष्टरमध्ये असतात काय? याची पाहणी स्वच्छता निरिक्षक करत नाही, जे घरी बसतात त्यांच्या नावाखाली दुसरेच काम करतात काय? याची चौकशी व्हावी. सर्वच झोनची चौकशी करण्यांत येऊन माहीती द्यावी.

**मा.सभापती :** तपासणीचे पथक पुढेही चालू ठेवावे. सर्व झोन कार्यालयात तपासणीचे काम व्हावे. कामावर बदली मजूर ठेवू नये. अन्यथा संबंधित झोन अधिकारी व स्वच्छता निरिक्षकावर कार्यवाही करावी.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** ज्यांना निलंबित केले त्यांना कामावर घेण्यांत यावे.

**मा.सभापती :** सभागृहासमोर त्यांचे अपील आलेले नाही. अपील आल्यानंतर प्रशासनाचे मत घेऊन सभागृहात निर्णय घेता येईल.

**सौ.लता दलाल :** निराला बाजार येथील अतिक्रमण तीन दिवसांत काढले जाईल असे मा.आयुक्त यांनी खुलासा केला होता. ज्याच्याकडे ते अधिकार आहेत त्यांनी का काढले नाही. संबंधितांवर आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केली. याबाबत कुणाचा दबाव आलेला आहे काय?

**श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन :** शहरातील कब्रस्थान, स्मशानभूमी मध्ये अतिक्रमणे होतात अधिकारी लक्ष देत नाही. याबाबत सभागृहातच चर्चा झाली पाहिजे. अतिक्रमण धारकाला प्रथमतः नोटीस दिली जाते. सदर व्यक्ती न्यायालयात जाऊन त्या नोटीसी आधारे स्थगिती आदेश प्राप्त करुन घेतो व जागा बळकावतो. हे प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही. अतिक्रमण असेल तर ताबडतोब कार्यवाही झाली पाहिजे. संबंधिताला न्यायालयात जाण्याची संधीच मिळावयास नको.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** अतिक्रमण काढण्याबाबतचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. सर्व्हे केला व जे अतिक्रमण अगोदर काढण्यांत येणार त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. निराला बाजार येथील २९ तारखेला काढण्यांत येणार आहे.

**सौ.लता दलाल :** सदर रस्ता किती फुट रुंदीचा आहे. बाजुला किती फुट जागा सोडण्यांत आली आहे. डांबरीकरण किती फुटापर्यंत होते याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** निराला बाजार येथील हया रस्त्यावरील अतिक्रमण मागे काढण्यांत आले होते. पुन्हा अतिक्रमण केलेले असून कोणीही अतिक्रमण करणाऱ्यांना न्यायालयात जाण्याची संधी देऊ नये. कॅव्हेट दाखल करावे. त्यांना अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस दिल्यानंतर ते लोक कोर्टात जातात व स्थगिती आदेश मिळवतात. हा विभाग स्वतंत्र होऊन चार वर्षे झालीत.

**सौ.लता दलाल :** १२ तारखेला बैठक झाली. आज २७ तारिख असून या कालावधीत सर्व्हे करुन कार्यवाही का करण्यांत आली नाही. प्रतिनिधी सभागृहात बोलतात. अधिकारी उडवा-उडवीची उत्तरे देतात. फुटपाथ सहीत सदर रस्ता किती फुटाचा आहे. डांबरीकरण केलेल्यांमध्ये किती फुट अतिक्रमण झाले याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** महानगरपालिकेची परवानगी नसतांना त्यांनी शेड कसे टाकले याची माहिती द्यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** ८० फुटाचा रस्त्यावर अतिक्रमणे होऊनही अधिकारी अतिक्रमण झाले नाही अशा प्रकारची उत्तरे देतात. रस्त्याच्या बाजुला १०-१० फुटाची जागा सोडून डांबरीकरण होते. त्यातील १५ फुटाच्या सामासिक अंतरात संबंधित दुकानदार अतिक्रमण करुन फुटपाथवर शेड टाकून वापर करतात. अधिकारी सभागृहात या बाबत चुकीची माहिती देतात. १५ फुटाच्या मार्जीन मध्ये नागरिकांना बांधकाम करता येत नाही. करिता पार्कींगसाठी जागा सोडली पाहिजे. या १५ फुटाच्या जागेचे विक्री करुन दिलेली आहे काय? पार्कींगसाठी काय व्यवस्था करण्यात येते. याबाबतची सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत अधिकारी यांनी द्यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जालना रोडवर अपना बाजार मार्केटजवळ दोन इमारतीतील सामाजिक जागेवर खाली जागा सोडून वस्ती दुकाने, ऑफिसेस थाटलेली

आहेत. आपल्या मनपाच्या संबंधित विभागाने परवानगी दिलेली आहेत. अशा सामाजिक अंतरात परवानपगी देता येते काय? एखाद्याने टपरी टाकली तर ती अतिक्रमणात आहे असे समजून तात्काळ काढण्यांत येते. त्याचप्रमाणे अशा अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**मा.सभापती :** मागच्या वेळी या संदर्भात स.सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. चुकीने अधिकारी यांनी परवानगी दिलेली असेल तर कशी कार्यवाही व्हावी व पुढच्या बैठकीत सभागृहात तशी माहिती द्यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** निराला बाजार येथे पार्कींग कुठे आहे. त्या संदर्भात नकाशा सहीत सभागृहात दाखवण्यांत यावा. इतर मार्केटला पार्कीगसाठी कुठे जागा दिलेल्या आहेत, याची माहिती द्यावी. प्रत्येक मार्केटसमोर पार्कीगची जागा कुठे आहे तसा बोर्ड लावण्यांत यावा.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** स.सदस्या सौ.लता दलाल यांनी अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भाने ज्यावेळेस आयुक्त श्री.त्रिपाठी होते त्यावेळेस जेव्हाचे काम तेव्हाच होत होते. शहरातील रस्त्याच्या कडेला नियमाने कोणते पोल रस्त्यात येतात ते बाजुला घेण्याची जबाबदारी ही प्रशासनाची असून ज्या ठिकाणी पोल असतात. दिवसेंदिवस रस्ता रुंदीकरण होते तरी पोल रस्त्यामध्ये असतात. ज्यावेळेस डांबरीकरण होते. त्यावेळेस पोल पर्यंत डांबरीकरण होते. काही पोल डांबरीकरण केलेल्या जागेवर रोवले जातात व दुकानधारकांना संधी मिळते. जो - तो पुढे-पुढे सरकवून त्या पोलपर्यंत जागा बळकावण्याचा प्रयत्न करतो. शहराचे स्वरुप हे रस्त्यावर अवलंबून असते. ठेकेदारावर अधिकाऱ्यांचा काही धाक निर्माण होत नाही. जालना रोडवर नागरीक टपऱ्या बसवतात व मनपाच्या जागेवर अतिक्रमण झाल्याचे दिसून येते. असे रस्त्यामधील पोल हटविण्यांची कार्यवाही प्रशासनाने करावी.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** सुराणा कॉम्प्लेक्सवर औरंगपुरा येथील पार्कींग कोठे आहे याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** शहरातील फुटपाथवर असलेले अतिक्रमण ताबडतोब काढण्यांत यावे. तसेच स.सदस्यांनी ज्या ज्या ठिकाणी मार्केट आहेत. त्या त्या ठिकाणी पार्कींगसाठी जागा ठेवलेल्या आहेत किंवा काय या बाबतची विचारलेली माहिती पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी दाखविली पाहिजे.

**श्री.विखारोद्दीन :** (स्मशानभूमी) कब्रस्तानच्या जागेवर अतिक्रमण होते. काढण्यांत येते. परंतू पुन्हा बांधकाम होते. असे पुन्हा पुन्हा याबाबत स.सदस्यांनी सभागृहात बोलणे योग्य वाटत नाही.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** मागील महिन्यांत अतिक्रमण काढण्यांत आले होते. पुन्हा झाले असेल तर माहिती घेऊन पुन्हा काढण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन :** मनपाने एम.एस.ई.बी.ला विद्युत पोलचे पैसे भरले. त्यानुसार एम.एस.ई.बी.पोल का लावण्यांत येत नाही याची विचारणा संबंधित अधिकारी यांनी करावी. महानगरपालिकेने विद्युत पोल लावण्या संबंधात लाखो रुपये एम.एस.ई.बी.ला भरलेले आहे.

**मा.सभापती :** पोल शिफ्टींग साठी ४ महिन्यापुर्वी मनपाने भरलेल्या पैशा बाबतचा हिशोब एम.एस.ई.बी.च्या अधिकारी यांना विचारण्यांत यावा. राष्ट्रीय पातळीवर याबाबतचे निविदा निघतात असे समजते. एम.एस.ई.बी.या बाबतीत

निष्काळजी करत असेल तर मा.महापौर यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**श्री.विखारोद्दीन :** मा.महापौर यांच्या समवेत चर्चा करुन निर्णय घ्यावयाचा असेल तर स.सभासदांना या बैठकीत बोलावण्यांत यावे.

**मा.सभापती :** एम.एस.ई.बी. कडे मनपाने भरलेले पैसे बाबतचा हिशोब आपल्या विभागाचे संबंधित अधिकारी हे विचारु शकतात. तशी विचारणा करुन पुढच्या बैठकीत माहिती द्यावी.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** नेहरु भवनचे बरेच काम राहिलेले आहे. दुकान केंद्र निविदाचे काय झाले. तसेच कुपण भिंतीची उंची वाढवावयाची कामाचे निविदा काढणार होते. त्याची कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे. शादीखाना संबंधित ३ वर्षापासून कोर्टात केस चालू असून मनपाच्या वकीलकडून साधा स्टे व्हॅकेट होऊ शकत नाही. काय निर्णय झाला याची माहिती द्यावी. माझ्या वार्डामध्ये एका जागेवर ड्रेनेजचे घाण पाणी निघते. त्या संदर्भात पत्र दिले. कार्यवाही करत असतांना रस्त्यामध्ये आणखी खोल खड्डे करावयास लावले. रस्ता तोडून खराब केला अधिकारी योग्य त्या पध्दतीने कार्यवाही न करता मनपाचे नुकसान होणार नाही हे बघावे. रस्ता नादुरुस्त करुन मनपाचे नुकसान केले ते संबंधित अधिकाऱ्यांचे पगारातून वसुल करण्यांत यावे. दुरुस्ती करण्यासाठी योग्य ती जागा मिळकत नसेल तर नवीन पाईप लाईन टाकण्यांत यावी. माझ्या वार्डात पाणी चांगले येते. परंतू इ.ठिकाणी घाण पाणी येते. दि.०५.०५.९९ ला मा.आयुक्तांना या संदर्भात पत्र दिलेले आहे.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** मनपा कार्यालयासमोर जे नागरिक उपोषणाला बसलेले आहेत. त्या संदर्भात निवेदन त्यांनी दिलेले आहे. नागरिकांना योग्य त्या सुविधा पुरवू शकतो किंवा नाही, त्यांच्याशी चर्चा करुन उपोषण सोडवू शकतो काय? याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** बसलेले उपोषणार्थी संदर्भात माझ्याकडे निवेदन आलेले नाही. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**प्र.उपआयुक्त (म.) :** या संदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाही होईल.

**श्री.रविंद्र इंगळे :** वसंतभुवन येथील मनपाच्या झोन कार्यालय असलेल्या इमारतीच्या वरील मजल्यावर कामावर कल्याण कार्यालय असून त्यांच्याकडून मनपा भाडे वसुल करते किंवा काय? त्या हॉलचे पत्रे उडून गेलेले असून मागील एक वर्ष पुर्वीपासून याबाबत कार्यवाही चालू त्या ठिकाणी जिवीतास धोका निर्माण होऊ शकतो. मागच्या वेळी १ मुलगा मरता मरता वाचला आहे.

**शहर अभियंता :** निविदा मंजूर झालेली असून या संबंधी वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत.

**श्री.अजिज खॉं गणी खॉं :** मागील बैठकीत २५% रक्कम भरण्याची अट रद्द करुन कामे करणे व माझ्या वार्डातील नागरिकांना सुविधा होण्याबाबत बोललो होतो. तशी इतिवृत्तात दुरुस्ती करावी व त्यानुसार वार्डातील कामांना मंजूरी द्यावी.

**मा.सभापती :** दुरुस्ती व्हावी.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** १९९६ ला २२ शिक्षकांचे वेतनवाढ रोखलेली असून त्यापैकी एकाला आदेश प्राप्त झाले. बाकी कर्मचाऱ्यांना कानाही या संबंधीची संचिका मा.उपआयुक्त (प्र.) यांच्याकडे आहे. खुलासा करावा.

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी पुढच्या बैठकीत याचा सविस्तर खुलासा करावा.

**श्री.विखारोद्दीन पि.खुदबोद्दीन :** स.सदस्य श्री.अजिज खॉ गणी खाँ यांच्या वार्डात ६०% ते ९०% विकास झाला. आता उर्वरित काम करणार किंवा नाही.

**मा.सभापती :** सिडको येथील नोटीफाईड भाग वगळता ज्या वस्त्या आहेत. त्या ठिकाणी मनपा जर ८० ते ९०% सुविधा देण्यांचे रद्द करु. त्यास माझी संमती आहे. ही सर्वसाधारण सभेची बाब होती. तेथून ही काढून घेवू.

**श्री.विखारोद्दीन :** पुंडलिक नगर येथे ६२ लाखाचे काम मंजूर झालेले आहे. वार्डातील संचिका मंजूरीसाठी जातात. मंजूरी मिळत नाही. २५% रक्कम भरलेली आहे. ६२ लाखांमध्ये नागरिकांकडून किती टक्के वसुली केली. सदर पुंडलिक नगर येथील ६२ लाखाचे काम मनपाच्या बजेटमधून की शासकीय अनुदानातून करणार. शासकीय अनुदानातून असेल तर धोरणात्मक निर्णयासाठी सर्वसाधारण सभेकडे पाठवावा.

**मुख्य लेखाधिकारी :** पुंडलिक नगर येथील ६२ लाखांचे काम शासकीय अनुदानातून करण्यांत येत असून जी शासकीय कमिटी मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली असून त्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार हे विकास काम करण्यांत येत आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शासकीय अनुदान मनपाला प्राप्त झाल्यानंतर ते सर्व शहरातील विकास कामासाठी असते. केवळ पालकमंत्र्यांनी सांगितल्यानुसार एकाच ठिकाणी काम करण्यांत येऊ नये. कोणते व कोठे काम करणे योग्य आहे हे अधिकाऱ्यांनी पहावे. कोणत्याही प्रकारचे राजकीय हेतू समोर न ठेवता पैशाचा दुरुपयोग होणार नाही व सर्व भागात शासकीय अनुदानातून विकासाची कामे व्हावी.

**मुख्य लेखाधिकारी :** शहरात एकाच ठिकाणी विकासाची कामे होत नाही. सभागृहाचा गैरसमज झाला आहे. सिडको मध्ये ९० लाखांचे जलवाहिनी शासकीय अनुदानातून करतो आहोत. जिन्सीमध्ये ड्रेनेजचे तसेच भावसिंगपुरा येथे ६० लाख जलवाहिनी, खोकडपुरा येथे ८० लक्ष रुपयांची विकास कामे हाती घेतलेली असून शासनाचे तसे निर्देश आहेत.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** शासकीय पातळीवर निधींचा वापर सर्व समावेशक असावा असा निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद.

**श्री.विखारोद्दीन :** पालकमंत्री संपूर्ण जिल्ह्याचे असून त्यांच्या संमतीने संपूर्ण शहरातील वार्डामध्ये विकास कामे होण्याबाबत विचार व्हावा.

**सौ.लता दलाल :** माझ्या वार्डात ही २० वर्षापासून अनाधिकृत वस्ती आहेत. परंतू पुरेशे तेवढे शासकीय अनुदानातून कामे झालेली नाहीत. ज्या भागात पाणी पुरवठा होण्याची नितांत आवश्यकता, त्या भागात अनुदानातून काम करण्याचा विचार झालेला आहे.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** स.सदस्य श्री.अजिज खाँ यांचा प्रस्ताव विचाराधीन ठेवल्याबद्दल धन्यवाद. विभाग क्र.८ साठी कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा घेतली. वाहतुकनगर साठी त्यांचेकडे पैसा भरला. या दोन्ही वेळी पैसे देतांना त्यांचेकडे कराची थकबाकी आहे किंवा मालमत्ता कर वसूल झालेला आहे का. हे पाहण्यांत आले नाही. वाहतुकनगर व जमिनीचा मोबदला देतांनाच मालमत्ता कराची थकबाकी वळती करुन घ्यावयास पाहिजे होते. आता त्यांना काही देणे असल्यास त्यातून वळती करुन घ्यावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी या संदर्भात नोंद घ्यावी.

**विषय क्र.६१/१ :-**

दिनांक १२.०५.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>**संवाद :-**</u>

**श्री.काशिनाथ कोकाटे :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२८ वर विषय क्र.२९/९ संदर्भाने मागच्या बैठकीत झुणका भाकर केंद्र उघडण्यासाठी जागा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर झालेला होता. शासनाची ही योजना चालू होती. परंतू यावर्षीच्या बजेटमध्ये अनुदान न ठेवल्यामुळे शासनाने सर्व झुणका भाकर केंद्राना अनुदान देण्यांचे बंद केले व तसे जाहिर केले. शासकीय नियमाने बसस्टँन्ड, रेल्वेस्टेशन, मोठमोठाली महत्वाची शासकीय कार्यालये, ज्या ठिकाणी ग्रामीण व शहरी भागातील जनतेचा जास्तीत जास्त संपर्क येतो. त्या ठिकाणी झ ुणका भाकर केंद्र असावे असे शासनाचे धोरण होते. तशी जागा या प्रस्तावातील नाही व जे झुणका भाकर केंद्र होती त्यात दुसरेच पदार्थ जास्त विक्रीसाठी असतात. असे असतांना देखील सदर प्रस्ताव मंजूरीसाठी कोणत्या उद्देशाने आलेला होता. घाईघाईमध्ये तो मागच्या बैठकीत मंजूर केला परंतू चुकीच्या मार्गाने आलेला हा प्रस्ताव रद्द करावा.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** ऐनवेळी प्रस्ताव आलेला होता. त्यावर काहीही वाचन झालेले नाही. तो स्थगित ठेवण्यांत यावा.

**मा.सभापती :** मा.जिल्हाधिकारी यांनी ज्या ज्या जागा दाखवल्या होत्या. त्यानुसार ही जागा देत आहोत. सदर याबाबतची संचिका बऱ्याच दिवसांपासून चालू होती. शासनाने ही योजना बंद केलेली नसून फक्त देण्यांत येणारे अनुदान बंद केले आहे. स्वत: झुणका भाकर केंद्र धारकांनी अनुदान न देता त्या केंद्राच्या जागा आमच्याकडेच राहु द्याव्या. व १/- रुपयाऐवजी २/- (दोन रुपये) मध्ये सध्या झुणका भाकर केंद्र धारक देत आहेत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शहरात जास्त गर्दीच्या जागेवर बसस्टॅण्ड, रेल्वेस्टेशन, न्यायालय अशा ठिकाणी ग्रामीण भागातून जास्त लोक येतात. त्या ठिकाणी जागा देण्याबाबतचा प्रस्ताव असता तर देण्यास समजू शकलो असतो, योग्य आहे. परंतू प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झुणका भाकर केंद्रासाठी जागा देणे योग्य वाटत नाही. याबाबत नागरिकांच्या तक्रारी येतील. याचा प्रशासनाने विचार करावा. व हा प्रस्ताव रद्द करावा.

**मा.सभापती :** ही जागा देण्या संदर्भाने संचिका २१.०२.९८ ला प्रस्तावित झाली होती. त्यानंतर शासनाने ही योजना बंद करण्या बाबत घोषणा केलेली. जिल्हाधिकारी यांची मान्यता तसेच पोलिस विभागाची परवानगी मिळालेली आहे काय हे तपासून पाहता येईल. परंतू प्रस्ताव रद्द करता येणार नाही.

**श्री.विखारोद्दीन :** प्रस्ताव रद्द करु नये. परंतू चौकशी करावी.

**मा.सभापती :** चौकशी करता येईल. मा.जिल्हाधिकारी यांनी जागा देण्यात येऊ नये किंवा दिलेली जागा पुन्हा परत घेण्यांत यावी असे पत्र प्राप्त झाले तर त्या पत्रानुसार कार्यवाही करता येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सदर रस्त्यावर झुणका भाकर केंद्रासाठी जागा देणे योग्य आहे काय? रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी संबंधित विभागाने घ्यावी.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** मागील बैठकीत पृष्ठ क्र.११ नुसार दरसुची वेगवेगळ्या वापरण्यांत आल्या. याबाबत चर्चा झाली होती. या बैठकीत खुलासा देणार होते.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष मी बोललो होतो ते सभागृहात उपस्थित नाहीत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :-** यापुढे पाणी पुरवठ्यासाठी वेगळा डी.एस.आर. वापरण्यात यावा व इतर विकास कामासाठी एकच डी.एस.आर.प्रमाणे दर आकारण्यांत यावे.

**मा.सभापती :** महानगरपालिकेसाठी जी दरसुची फायदेशीर असेल ती वापरण्यात यावी.

**सौ.विमलताई मुंडलिक :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.४ व ७ मधील मुद्दा क्र.३ वर सिडकोतील नागरिकांना जास्तीची लादलेली नळपट्टी रद्द करण्याबाबत चर्चा झालेली होती. आतापर्यंत काय कार्यवाही झाली. याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांनी मागच्या बैठकीत सांगितल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेसमोर तसा प्रस्ताव ठेवण्यांत येईल. कार्यवाही होईल.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.४३ वर विषय क्र.५०/४० नुसार वराह पालनाकरिता जागा देण्याबाबतचा प्रस्ताव आलेला होता. प्रशासनाकडे या संदर्भाने किती अर्ज प्राप्त झालेले आहेत याची माहिती व्हावयास पाहिजे. ट्रेचिंग ग्राऊंडला जाण्यास कुणी इच्छुक आहेत काय?

**पशुधन विकास अधिकारी :** यासाठी स.स.श्री.सलामी, मा.महापौर, मा.आयुक्त स्वतः माहिती घेण्यासाठी गेलेले होते. जागा बघुनच त्यानुसार निर्णय घेण्यांत आलेला आहे.

**मा.सभापती :** मा.महापौर, मा.आयुक्त यांनी पाहणी करुन त्यानुसार प्रस्ताव सादर केला. मंजूर करण्यांत येतो. तसेच विषय क्र.१ सर्वानुमते स्विकृतीसह मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :-**

दिनांक १२.०५.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६२/२ :-**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मुजीब कॉलनी रोशनगेट ते कटकट गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.६,४४,४००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात ठेवलेल्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुजीब कॉलनी रोशनगेट ते कटकट गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,४४,४५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६३/३ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, राणा नगर व मोमीन नगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,५१,५००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील

कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त (३) तीन निविदापत्रके दर भरुनस प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.अजितसिंग | - | ३४.५१% कमी |
| २. | श्री.आदीनाथ कंन्स्ट्रक्शन | - | २१.९९% कमी |
| ३. | श्री.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | १७.८६% कमी |

तरी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६४.५१% कमी दराचे श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे. तरी सदरील काम ३४.५१% कमी दराने श्री.डी.अजितसिंग यांच्याकडून करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** ३४.५१% कमी दराने संबंधित ठेकेदार काम करुन देण्यास तयार आहे. चांगले साहित्य, खात्रीशीर काम होईल काय? याची जबाबदारी कुणावर असणार, कुणाला जबाबदार धरावे. असे प्रस्ताव रद्द करण्यांत यावे.

**मा.सभापती :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कमी दराच्या निविदेचा ठेकेदार भरुन देत आहे व काम योग्य होईल किंवा काय. कामाची प्रत चांगली असावी. असा सभागृहाने मुद्दा उपस्थित केला त्यानुसार एक ४ सदस्यी समिती सभागृहात नेमण्यांत येतो. समितीतील सदस्यांची नांव नगर सचिव यांच्याकडे कळविण्यांत येतील. त्यांनी चौकशी करुन वेळोवेळी अहवाल सादर करणे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राणा नगर व मोमीननगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५१% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.सभापती स्थायी समिती यांचे खाली कमी दरांच्या मंजूर झालेल्या निविदांची कामे ठरवून दिलेल्या मापदंडानुसार होतात किंवा नाही हे तपासणीसाठी स.सदस्य श्री.काशिनाथ कोकाटे, स.सदस्य श्री.राजकुमार बचाटे व स.सदस्य, सौ.लता दलाल यांची समिती गठण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६४/४ :-**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर (स्लम) वार्ड क्र.२३ मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणे, रस्ता क्रॉसिंग जाळ्या टाकणे व ढापे टाकणेच्या कामाकरिता सा.बां.विभाग दरसुची यांच्या वर्षे १९९८-९९ नुसार रक्कम रु.७,६९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च स्लम भागात खुली गटार बांधणे या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यांत येईल. या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.११.०५.९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

करिता सदरील कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रक्कम रु.७,६९,०००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.इंदिरानगर (स्लम) वार्ड क्र.२३ मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणे, रस्ता क्रॉसिंग जाळ्या टाकणे व ढापे टाकणे या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,६९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६५/५ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मयुरबन कॉलनी येथे श्री.तळेले व श्री.पाटील यांचे घराजवळ १५० मी.मी.व्यासाचे चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे व १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे व १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन खोल करुन टाकणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,३३,०००/- ला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकूण एकोणावीस (१९) कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण तीन (३) निविदा दर भरुन सिलबंद प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.इफ्तार ॲण्ड कंपनी | - | ०.०१% कमी दराने |
| २. | श्री.आनंद बिल्डर्स | - | ५% जास्त दराने |
| ३. | श्री.उपेंद्र | - | १०% जास्त दराने |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.इफत्तीकार ॲण्ड कं. यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची आहे. संबंधित संचिका मा.आयुक्तांकडे मंजूरीसाठी गेली असता संबंधित काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करण्यास दि.३१.०३.९९ रोजी मान्यता दिली आहे.

सबब मे.इफ्तीकार ॲण्ड कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची निविदा मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मयुरबन कॉलनी येथे श्री.तळेले व श्री.पाटील यांचे घराजवळ १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे व १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन खोल करुन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या चर्चेनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने मे.इफ्तीकार ॲण्ड कं. यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६६/६ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, अमान कॉलनी, सादत नगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,३१,२००/- ला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण अठ्ठावीस (२८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. स्विकारणेच्या अंतिमतारखे पर्यंत एकूण चार (४) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.आर.बी.चव्हाण | - | ५% कमी दराने |
| २. | मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | - | ४.९९% जास्त दराने |
| ३. | श्री.एस.एच.असोसिएट | - | ७% जास्त दराने |
| ४. | मे.हयात कंन्स्ट्रक्शन | - | १२% जास्त दराने |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.आर.बी.चव्हाण यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची आहे. तरी प्रस्ताव स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अमान कॉलनी, सादतनगर येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची श्री.आर.बी.चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६७/७ :-**

सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.बायजीपुरा स.नं.२१ व १५ येथील इंदिरानगर या झोपडपट्टीमध्ये महापालिकेमार्फत गटारीचे, रस्त्याचे व ड्रे`नजचे काम करण्यांत आलेले आहे. हया जमीनीचे मालक श्री.राधाकिसन बाबुलाल बसैय्ये यांनी आक्षेप घेतल्याने काही काम अपूर्णावस्थेत आहे. या संदर्भाने संबंधिताने न्यायप्रविष्ट केलेल्या प्रकरणीही न्यायालयाने जमीन मालकाचे बाजूने निर्णय दिलेला आहे.

अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्ण करण्याचे दृष्टीने व न्याय प्रविष्ट प्रकरणातील न्यायालयाचा निर्णय विचारात घेता संबंधित जमीन मालकाची तेवढ्या क्षेत्रा पावेतोची मालकी गृहीत धरुन खाजगी वाटाघाटीने ड्रेनेज/गटारीचे काम पूर्ण करण्याकरिता आवश्यक असलेली जमीन संपादित करण्याचे कार्यवाही अंतर्गत जमीनीचे मुल्य रु.१,६४,८७४/- कायम करण्यांत आले आहे.

करिता मो.बायजीपुरा इंदिरानगर येथील ड्रेनेज/गटारीचे अपूर्णावस्थेतील कामे पूर्ण करण्यासाठी श्री.राधाकिसन बसैय्ये यांची जमीन मूल्य रु.१,६४,८७४/- देऊन संपादित करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर जमीनीचे मूल्य संबंधितास अदा करुन नोंदणीकृत खरेदी खाता आधारे जमीन हस्तांतरित करुन घेण्यांत येईल व अपूर्णावस्थेतील विकास कामे पूर्ण करुन घेण्यांत येतील. नोंदणीकृत दस्तऐवज/खरेदीखता करिता खर्च सुमारे ३०००/- इतका येईल व तेवढा खर्च मनपा व जमीन मालक निम्मा करणार आहेत. खर्चाची रक्कम श्री.डी.डी.कालेले, शा.अभियंता यांना अग्रीम म्हणून देण्यांत यावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बायजीपुरा स.नं.२१ व १५ येथील इंदिरानगर स्लम भागातील अपूर्णावस्थेतील विकास कामे पूर्ण करण्याचे दृष्टीने या जमीनीचे मालक श्री.राधाकिसन बाबुलाल बसैय्ये यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार जमीन संपादनाची कार्यवाही करुन सदरील जमीनीचा मोबदला रक्कम रु.१,६४,८७४/- मधून नोंदणीकृत

दस्तऐवज/खरेदी खताकरिता लागणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.३०००/- च्या निम्मा म्हणजे रक्कम रु.१५००/- मोबदला रकमेतून वळती करुन उर्वरित रक्कम रु.१,६३,३७४/- संबंधित जमीन मालकास अदा करणेस तसेच खरेदी खताकरिता लागणारी रक्कम रु.३०००/- श्री.डी.डी.कालेले, शा.अभियंता यांचे नांवे अग्रीम म्हणून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६८/८ :-**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयास सन १९९९-२००० या एका वित्तीय वर्षाकरिता पशुखाद्य आणि किराणा पदार्थ यांच्या निविदा मागविण्यांत आल्या आहेत. प्राप्त निविदापैकी निविदाधारकाचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

**१) पशुखाद्य :**

याकरिता ३ (तीन) कोरी निविदांची विक्री झाली. पैकी तीन निविदाधारकांकडून प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | दर | |
|---|---|---|---|
| | | पशुखाद्य (प्र.क्विंटल) | कोंबडी खाद्य (प्र.क्विंटल) रुपये |
| १. | श्री.एस.एम.सामग सन इंटरप्राईजेस, औरंगाबाद | १८५०/- | २३५०/- |
| २. | श्री.अ.ना.वाहुळ, औरंगाबाद. | १९५०/- | २४१०/- |
| ३. | श्री.पी.एन.वाडेकर, औरंगाबाद. | २०१०/- | २६००/- |

तुलनात्मकदृष्टीने श्री.एस.एम.सामग, औरंगाबाद यांचे दर कमी असून सदर दर मागील वर्षाच्या तुलनेत जास्तीचे असल्याने मा.आयुक्त यांनी सुचित केल्याप्रमाणे स्थानिक बाजारात दराची चौकशी केली असता नव महाराष्ट्र साबण ऑईल मील, सोलापूर यांचे दि.२३.०४.९९ चे पत्र प्राप्त झाले. असून त्यांचे अधिकृत विक्रेते मे.धिल्लन व ट्रेडर्स, औरंगाबाद हे असून त्यांचेकडून अमृत पशुखाद्याचे दर प्राप्त झाले आहेत. ते खालीलप्रमाणे-

अमृत डेअरी गोल्ड मॅश (पशुखाद्य) - रु.९००/- प्रति क्विंटल
अमृत प्लेअर मॅश (कोंबडी खाद्य) - रु.१२००/- प्रति क्विंटल

वरील दर्शविलेले दर हे निवेदित प्राप्त झालेल्या सर्वात कमी दरापेक्षा सुध्दा कमी आहेत. करिता वरील दर मान्य करण्यांस हरकत नाही. मान्य झाल्यास मे.धिल्लन ट्रेडर्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**२) किराणा पदार्थ :**

सन १९९९-२००० साला करिता किराणा पदार्थासाठी फेर निविदा मागविण्यांत आले. त्यानुसार (३) कोरे निविदांची विक्री झाली असून त्यापैकी (३) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | भाव प्रति किलो रुपये | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | हरबरे | गहु | तांदूळ | शेंगदाणे | गुळ |
| १ | श्री.म.अ.हमीद | १०.७५ | ६.७५ | १०.२० | २५.०० | १०.५० |
| २ | श्री.जनार्धन शेळके | १२.०० | ८.०० | ११.५० | २०.०० | १२.०० |
| ३ | श्री.व्यवस्थापक, मराठवाडा सेंट्रल को-ऑप.सोसायटी, औरंगाबाद. | १२.०० | ७.०० | ११.९० | २५.८० | ११.०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री.म.अ.हमीद यांचे दर सर्वात कमी असून वरील दर्शविलेल्या दरानुसार किराणा पदार्थ पुरवठा करण्यांस तयार असून वरील दर सन १९९९-२००० साला करिता मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयास सन १९९९-२००० या एका वित्तीय वर्षाकरिता पशुखाद्य (कोंबडी खाद्य) अनुक्रमे रु.९००/- प्रति क्विंटल व रु.१२००/- प्रति क्विंटल या दराने मे.धिल्लन ट्रेडर्स यांचेकडून खरेदी करण्यास तसेच किराणा पदार्थ पुरवठा करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या श्री.म.अ.हमीद यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६९/९ :-**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयतील सर्पोधानाची खाद्य खर्चासह सर्पाची देखभाल करणे करिता सन १९९९ ते २००० या एका वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्याबद्दलचे वर्तमान पत्राद्वारे निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यापैकी खालीलप्रमाणे (२) निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | दर (खाद्य खर्चासह) प्रतिमहा / प्रति खर्च |
|---|---|---|
| १. | श्री.किरण मांगीलाल शर्मा, कैलासनगर, औरंगाबाद. | रु.१५०.०० |
| २. | श्री.बबनराव उजीवाल | रु.१४०.०० |

मा.आयुक्त यांचे दालनात सर्वात कमी मंजूर निविदा धारक श्री.बबनराव उजीवाल यांचे सोबत झालेल्या वाटाघाटी नंतर प्रतिमाह / प्रतिवर्ष (खाद्य खर्चासह) रु.१२०/- (रुपये एकशे वीस मात्र) देण्यांचे मान्य केले आहे.

तरी संबंधितांचे दर दि.०१.०४.९९ ते ३१.०३.२००० पर्यंत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपा अंतर्गत प्राणी संग्रहालयातील सर्वेधानाची खाद्यपदार्थासह सर्पाची देखभाल करणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक श्री.बबनराव उजीवाल यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रतिमाह / प्रतिवर्ष (खाद्य खर्चासह) रु.१२०/- या दराच्या निविदेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७०/१० :-**

मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग यांनी गणवेश कापड व गणवेश साहित्य खरेदीचा प्रस्ताव मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार अग्निशमन दलासाठी असलेल्या ८ लाख रुपयांच्या तरतूदीमधून गणवेश कापड व गणवेश साहित्य खरेदी करणेसाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

१. श्री.विजय जनरल स्टोअर्स

२.	रोशन सेल्स कॉर्पोरेशन
३.	कामधेनू
४.	राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स (यांनी डिपॉझीट भरलेले नाही.)

वरीलपैकी क्रमांक १ व ३ यांचे दर कमी असून मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार दोनही निविदाधारकांनी ५% दर कमी करण्याचे मान्य केले आहे.

श्री.विजय जनरल स्टोअर्स - साहित्य क्र.१,२,३,५,६,७,८,९,१०,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२२ साठी ५% दर कमी करुन रुपये ५,०७४१८.७५ (अक्षरी रुपये पाच लाख सात हजार चारशे अठरा रुपये पंचाहत्तर पैसे फक्त) व रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांचे साहित्य क्र.४ व ११ साठी रक्कम रु.२३,६७७.८० (अक्षरी रुपये तेवीस हजार सहाशे सत्याहत्तर रुपये ऐंशी पैसे) असा एकूण खर्च रुपये (५,०७,४१८.७५+२३,६७७.८०) = ५,३१,०९६.५५ करिता (अक्षरी रुपये पाच लाख एकतीस हजार शहाण्णव रुपये पंचावन्न पैसे फक्त) च्या खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**श्री.विखारोद्दीन :** अग्निशमन विभाग महापालिकेत आहे किंवा वेगळे आहे. संबंधित अधिकारी (अग्निशमन) हे स.सदस्यांनी माहिती विचारल्यानंतर माहिती देत नाही. स.सदस्यांना योग्य वागणूक त्यांच्याकडून मिळत नाही.

**मा.सभापती :** सर्व अधिकारी वर्ग यांना स.सदस्यांनी माहिती विचारल्या नंतर तात्काळ द्यावयास पाहिजे. अपमानस्पद वागणूक स.सदस्यांना देऊ नये यांची नोंद अधिकारी यांनी घ्यावी.

**श्री.विखारोद्दीन :** सदर प्रस्ताव कापड खरेदी व गणवेश साहित्य खरेदीचा आहे. यात गणवेशा सोबत लागणारे हेल्मेट, शुज इतर साहित्य नावासहीत दर्शविलेले नाही. तसेच कर्मचारी संख्या किती, कपडा किती लागेचा याचा उल्लेख होत नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना अडीअडणींच्या वेळी काम करावे लागते. हा प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. परंतू यापुढे प्रस्ताव सादर करतांना ॲटम क्रमांक न देता साहित्यांचे पूर्ण नांव व नगासहीत तसा प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशामक दलासाठी गणवेश कापड व गणवेश साहित्य खरेदी करणे करिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांचे नावांसमोर दर्शविलेल्या ॲटम क्रमांकाचे साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

श्री.विजय जनरल स्टोअर्स	-	साहित्य क्र.१,२,३,५,६,७,८,९,१०,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१ साठी.

आणि मे.रोशन सेल्स कॉर्पोरेशन साहित्य क्रमांक ४ व ११ साठी अनुक्रमे रक्कम रु.५,०७,४१८.७५ + २३,६७७.८० असे एकूण रुपये ५,३१,०९६.५५ (अक्षरी रुपये पाच लाख एकतीस हजार शहाण्णव रुपये पंचावन्न पैसे फक्त) च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.७१/१ :-**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र.३१ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,२५,६०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "पुर्नडांबरीकरण" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.२६.०५.९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.६,२५,६०३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर, बायजीपुरा स्लम वार्ड क्र.३१ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,२५,६०३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७२/२ :-**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी परिसरातील गादीया विहार ते नाल्या पर्यंत रस्त्याच्या बाजूने गटार बांधणे बाबत सा.बां.विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु.९,५०,५००/- ला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता एकूण २७ (सत्तावीस) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेला एकूण ७ (सात) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोसिएटस | - | ३४.६०% कमी |
| २. | श्री.स.अथर अली | - | ३४.०१% कमी |
| ३. | मे.विपुल कंन्स्ट्रक्शन | - | ३३% कमी |
| ४. | मे.हयात कंन्स्ट्रक्शन | - | ३२.३६% कमी |
| ५. | मे.फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | - | ३०.१२% कमी |
| ६. | श्री.मन्नान खॉन | - | २९% कमी |
| ७. | श्री.सोहेल सिद्दीकी | - | २७.८६% कमी |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.एस.एच.असोशिएटस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.६०% कमी दराची आहे. तरी मे.एस.एच.असोशिएट्स यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी परिसरातील गादीया विहार ते नाल्यापर्यंत रस्त्याच्या बाजुने गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.६०% कमी दराची मे.एस.एच.असोशिएट्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७३/३ :-**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्तांच्या मंजूरीनुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.बाबुराव तुकाराम साळुंके यांना बेगमपुरा येथे १०X२० इतक्या आकाराची जागा मिरची कांडपसाठी भाडे तत्वावर देण्यांत आलेली होती. त्यांनी त्यांचे भाडे रु.१८००/- मनपास जमा केलेले आहेत. तसेच मुद्रांक पेपरही दिलेले आहेत. परंतू मिरची कांडपासाठी बांधकाम सुरु केले असतांना दि.२३.०७.९० रोजी अर्ज देऊन तेथील नागरिकांनी हरकत घेतली होती. त्यामुळे त्यांना जागा देण्यांत आली नाही. त्यामुळे अर्जदाराने पर्यायी जागा द्यावी. अशी विनंती अर्ज केला. त्या अनुषंगाने मौजे गारखेडा येथील स.नं.५३ मधील ५'X१०' ची आकाराची जागा देणे बाबत नगररचना विभाग आणि शहर अभियंता या विभागाचा अभिप्राय घेऊन प्रकरणात भाडे समितीने प्रति चौ.फुट प्रतिमाह रु.४/- प्रमाणे भाडे निश्चिती केली आहे.

तरी श्री.बाबुराव साळुंके यांना मौजे गारखेडा येथील सं.नं.५३ मधील मनपा मालकीच्या मिळकतीतून ८'X१०' ची जागा मिरची कांडपासाठी वरील दराप्रमाणे ३० वर्षाच्या भाडेपट्ट्यांवर देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मिरची कांडपासाठी जागा भाडे तत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव कशाच्या आधारे मंजूरीसाठी सादर केला खुलासा करावा.

**प्र.उपआयुक्त (म.) :** बेगमपुरा येथे मिरची कांडपासाठी संबंधितास भाडे तत्वार जागा देण्यांत आली होती. परंतू लोकांनी २३.०७.९० च्या पत्रानुसार हरकत केल्यामुळे पर्यायी जागा म्हणून संबंधित अधिकाऱ्यांचा अभिप्राय घेऊन ही ८'X१०' ची जागा देण्यांचा प्रस्ताव मंजूरीस्तव आलेला आहे. संबंधित व्यक्ती अंध आहेत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संबंधित व्यक्ती अंध आहे असा उल्लेख प्रस्ताव मध्ये यावयास पाहिजे होता. तशी दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.बाबुराव तुकाराम साळुंके यांना बेगमपुरा येथे देण्यांत आलेल्या मिरची कांडपसाठी च्या जागेबाबत हरकत दाखल झाल्याने व श्री.साळुंके हे अंध असल्यामुळे त्यांना पर्यायी जागा म्हणून मौजे गारखेडा येथे स.नं.५३ मधील मनपाच्या मालकीच्या मिळकतीतून ८'X१०' ची जागा प्रति चौ.फुट प्रतिमाह रुपये ४/- प्रमाणे ३० वर्षाच्या भाडेपट्ट्यांवर देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७४/४ :-**

सहा.संचालक नगररचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.मालजीपुरा समर्थनगर येथील न.भु.क्र.२०६४८ च्या उत्तर पश्चिम बाजूस व विद्यमान ३०' रस्ता यामध्ये ३०X१० या आकाराची मनपाची मालकीची उपलब्ध असलेली सहान जागा भारतीय साप्ताहिक वृत्तपत्र संपादक व पत्रकार संघटना (असोशिएशन), औरंगाबाद या संस्थेने पत्रकार प्रशिक्षण शिबीरे, विविध शैक्षणिक व सांस्कृतिक समाजोपयोगी कार्यक्रम व सामाजिक कार्याकरिता सदर जागेची मागणी केली आहे.

ही संस्था नोंदणीकृत (नोंदणी क्रमांक महा/१८६/१९९८, दि.२३.०३.९८ आहे. संस्थेचा या जागेवर संपादक भवन बांधण्याचा प्रस्ताव आहे. करिता सदर जागा नेहमीच्या अटी व शर्तीस अधीन राहून संस्थेस ३० वर्षाकरिता भाडेपट्ट्याने देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर करारनामा करुन घेऊन जागा हस्तांतर करण्यांत येईल. तसेच भाडे समितीने निश्चित केलेले भाडे सदर संस्थेस भरावे लागेल.) मागणी केल्यानुसार नेहमीच्या अटी व शर्तीस अधीन राहून या संस्थेस ३० वर्षाकरिता भाडे समितीने निश्चित केलेल्या भाड्याने भाडेपट्ट्यावर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मालजीपुरा समर्थनगर येथील न.भु.क्र.२०६४८ च्या उत्तर पश्चिम बाजूस व विद्यमान ३०' रस्ता यामध्ये ३०x१० या आकाराची मनपाच्या मालकीची उपलब्ध असलेली सहान जागा भारतीय साप्ताहिक वृत्तपत्र संपादक व पत्रकार संघटना, औरंगाबाद या संस्थेने मागणी केल्यानुसार नेहमीच्या अटी व शर्तीस अधीन राहून यासंस्थेस ३० वर्षाकरिता भाडे समितीने निश्चित केलेल्या भाड्याने भाडेपट्ट्यांवर देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५/५ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एमएच-२०/२०० व एमएच-२०/९९९१ या दोन जुन्या ॲम्बेसिडर कार २.५ लाख कि.मी.पेक्षा जास्त चालल्या असून १९९२ व १९९१ ची मॉडेल आहेत. त्या वारंवार रिपेअर करुन त्यावर जास्तीचा खर्च करण्यापेक्षा शासन नियम वित्त विभाग क्र.१०९१/प्र.क्र./१२/विनियम/दि.१ ऑक्टोंबर १९९१ प्रमाणे त्या निरुपयोगी ठरविणे योग्य राहील व हया दोन कार लिलाव करणे योग्य राहील. हया दोन कार निरुपयोगी ठरवून मा.महापौर यांचे वापरासाठी एक नवीन ॲम्बेसिडर (पेट्रोल) आय.एस.झेड-१८०० इंजिन, बकेट टाईप सिट, रेडीयल टायर, रिटेल ग्लास व ए.सी.सह खरेदी करण्यासाठी रक्कम रु.४,०९,०००/- चे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यास मंजूरी मिळावी. हिंदुस्थान मोटार्स चे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रक मागवून वाहन खरेदी करण्यास मंजूरी मिळावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाकडे वाहन क्र.एम.एच.-२०/२०० व एमएच-२०/९९९१ या दोन जुन्या वाहनांचा लिलाव करुन मा.महापौर यांचे वापराकरिता एक नवीन ॲम्बॅसिडर (पेट्रोल) आय.एस.झेड-१८०० इंजिन, बकेट टाईप सिट, रेडीयल टायर, रिटेल ग्लास व ए.सी.सह खरेदी करण्याकरिता तयार केलेल्या रक्कम रु.४,०९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच हिंदुस्थान मोटार्सचे अधिकृत विक्रेत्यांकडून कार खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७६/६ :-**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका विभागीय कार्यालयास स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून ३०० नग हातगाड्या खरेदी करणे आहे. यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र.७४/८, दि.०६.०६.९७ नुसार मान्य दर रु.२,६५०/- प्रति नग प्रमाणे २१० नग हातगाड्या नवीन नमुन्यानुसार खरेदी करण्यांत आल्या होत्या.

सध्याची मागणीनुसार ३०० नग हातगाड्या खरेदी करणे आहे. अगोदर घेतलेली हातगाडी व त्यामध्ये वापरण्यांत आलेल्या अडचणी लक्षात घेता मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, प्रकल्प संचालक व विभागीय अधिकारी यांच्या समितीने दिलेल्या अहवालानुसार हातगाडीचा नमुना मागविण्यांत आलेला नमुना तांत्रिक बाबींसाठी मा.अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडे देण्यांत आला.

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी दोन्ही हातगाडीची पाहणी केली व नवीन हातगाडीत ७५/- रुपये प्रति नग प्रमाणे कमी करुन घेणे बाबत मा.आयुक्तांची मान्यता असलेले एकूण ३०० नग हातगाड्या खरेदीसाठी प्रति नग रुपये २५७५/- प्रमाणे एकूण खर्च रक्कम रु.७,७२,५००/- इतका येईल.

सदरील खर्च "स्वच्छ औरंगाबाद" लेखाशिर्ष अंतर्गत करण्यांत येईल. सदरील दर मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे आहेत. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.विखारोद्दीन, श्री.स.अ.इकबालोद्दीन :** आमच्या वार्डामध्ये देण्यांत येणाऱ्या हातगाड्या हया जुन्या देण्यांत येतात. नवीन खरेदी करणाऱ्या हातगाड्या कोणत्या झोनला देणार आहेत. प्रस्तावानुसार टेंडर काढले किंवा त्यांनाच पुन्हा द्यायचे.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** मागील वर्षी ज्या हातगाड्या खरेदी केल्या त्या खराब झाल्या आहेत. चांगल्या व टिकाऊ हातगाड्या खरेदी कराव्या. एकदा खरेदी केलेल्या गाड्यावर पुन्हा दुरुस्तीसाठी खर्च येऊ नये.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या अगोदर या प्रस्तावा संदर्भात निविदा मागविल्या होत्या काय? संबंधित एजन्सीज कडूनच त्या गाड्या का घ्यावयाचा याचा खुलासा करावा.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** मागील खरेदी केलेल्या गाड्यांना ६ ते ८ महिन्यांत जुन्या गाड्यांची चाके वापरुन उपयोगात आणलेल्या होत्या. यास जबाबदार कुणाला धरणार. गाडीचा साचा एकाकडून व चाके एकाकडून बसवण्यांत येते. हे योग्य नाही.

**मा.सभापती :** पुढील बैठकीत नमुने दाखविले पाहिजे.

**मुख्य लेखापरिक्षक :** गाड्या खरेदी बाबत दि.०६.०६.९७ ला स्थायी समितीमध्ये प्रस्ताव झालेला आहे. स्वच्छतेच्या दृष्टीने गेल्या वेळेस २१० गाड्या नवीन नमुन्यानुसार खरेदी केलेल्या होत्या. परंतू तांत्रिक बाबत तपासून पाहिली असता कर्मचाऱ्यांना केरकचरा वाहून नेण्यासाठी सोपे जावे म्हणून वजनाने ४ किलो कमी करुन ३०० नग मागविण्यांत येऊन प्रत्येक गाडीमागे ७५/- रु कमी करण्यास मा.आयुक्तांची मंजूरी आहे.

**सौ.लता दलाल :** यात टेक्नीकल विंगचे अधिकारी यांचा समावेश होता काय? पुर्वीच्या गाड्या रद्द करुन नवीन नमुन्यानुसार गाड्या खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर केला. किती कचरा त्या गाड्या नेऊ शकतात. त्या गाड्याचे वजन किती. हँडल व्यवस्थीत आहे काय? मागील नवीन घेतलेल्या गाड्यांचे हँडल तुटलेल्या अवस्थेत दिसून आलेले आहे. याचा विचार संबंधित समितीने केला का?

**मा.सभापती :** येणाऱ्या बैठकीतपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** कर्मचाऱ्यांना गाड्या लोटतांना त्रास होणार नाही. तसेच तांत्रिक बाबी तपासून घेणे गरजेचे आहे. गाड्या लवकर खराब होणार नाही. टेक्नीकल बाबी तपासून घ्याव्यात.

**मा.सभापती :** केरकचरा वाहतुकीसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या गाड्यांचे नमुने चांगल्या दर्जाचे आहेत किंवा काय? योग्य तांत्रिक बाबी तपासून घ्याव्यात. यासाठी समिती स्थापन करण्यांत येत असून त्यात स.स.श्री.विखारोद्दीन, श्री.रविंद्र इंगळे व श्री.रमेश लाहोट यांचा समावेश राहील.

**ठराव :-**

सभागृहातील चर्चेनुसार स.सदस्य श्री.विखारोद्दीन, श्री.रविंद्र इंगळे व श्री.रमेश लाहोट यांची कचरा हातगाडीचा नमुना अंतिम करण्यासाठी समिती स्थापन करण्यास व पुढील बैठकीपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७७/७ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरुनगर हत्तेसिंगपुरा येथील २० खाटी रुग्णालयातील राहिलेले इमारतीचे उर्वरित बांधकाम करणेकरिता रक्कम रु.३,१९,१००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समिती विषय क्र. ५२०/३, दि.०९.०२.९९ अन्वये मान्यता घेऊन कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/३/९९, दि.१५.०४.९९ अन्वये मान्यता घेऊन कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/३/९९, दि.१५.०४.९९ अन्वये शहरातील दैनिकामध्ये प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागितले असता कोरे निविदा विक्री दि.२३.०४.९९ पर्यंत ९ (नऊ) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीचे अंतिम दि.०५.०५.९९ पर्यंत २ (दोन) निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि.०७.०५.९९ रोजी मा.मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयामध्ये उघडण्यांत आले असता प्राप्त निविदेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मो.सिराजउद्दीन सिद्दीकी | - | ०.१५% कमी |
| २. | राणा कंन्स्ट्रक्शन | - | ३% जास्त |

या अनुषंगाने प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच श्री.मो.सिराजउद्दीन सिद्दीकी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची निविदा आहे. सबब स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर, हत्तेसिंगपुरा येथील २० खाटी रुग्णालयातील राहिलेले इमारतीचे उर्वरित बांधकाम करणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री.मो.सिराजउद्दीन सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७८/८ :-**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रशीद मामु कॉलनी व गरमपाणी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सां.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,५५,९६३/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रशिद मामु कॉलनी व गरमपाणी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,५५,९६३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७९/९ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोहीनुर कॉलनी येथील बहुउद्देशीय हॉलवर पहिला मजला बांधावयाचा आहे. त्यासाठी सा.बां.विभागाचे सन १९९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.३,११,४९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.२२.०५.९९ अन्वये स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च १९९९-२००० या आर्थिक वर्षा अंतर्गत व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,११,४९०/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोहीनूर कॉलनी येथील बहुउद्देशीय हॉलवर पहिला मजला बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,११,४९०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८०/१० :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागेश्वरवाडी येथील प्रा.शाळेच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व मोकळ्या जागेवर अभ्यासिका बांधण्यासाठी सा.बां.विभागाचे सन १९९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.७,५३,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.२१.०७.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.स्थायी समितीने विषय क्र.१४५/१९, दि.३०.०७.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र./मनपा/लेखा/नि/५१/९८, दि.०३.०९.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १५ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.३१.१०.९८ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | - | १४.३३% कमी |
| २. | सुंदर कंस्ट्रक्शन | - | १६.९९% कमी |
| ३. | आनंद बिल्डर्स | - | १३.३% कमी |
| ४. | कुलवंतसिंग | - | १२.७०% कमी |
| ५. | श्रीराम कंन्स्ट्रक्शन | - | ७% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराचे निविदा दर सुंदर कंन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त झाले होते. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.१४.१२.९८ अन्वये मान्यता दिलेली होती. तसेच मा.स्थायी समिती ने विषय क्र.४४२/९, दि.०८.०१.९९ अन्वये मान्यता दिलेली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार गुत्तेदारास नियमानुसार २% अनामत रक्कमेचा भरणा करणेस्तव दोन वेळेस पत्र दिले असता गुत्तेदाराने प्रकृती ठीक नसल्याने काम करु शकत

नाही असे कार्यालयास लेखी पत्राद्वारे कळविले. करिता बी-१ निविदा नियमानुसार मे.सुंदर कंन्स्ट्रक्शन यांची इसारा रक्कम जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास म्हणजेच मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांना पहिल्या क्रमांकाच्या निविदा दराने काम करण्यास मा.आयुक्त महोदय यांचे दि.२८.०४.९९ च्या मान्यतेनुसार विचारणा केली असता मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराने काम करण्यांस तयार असल्याबाबत कार्यालयास लेखी कळविले आहे. त्यानुसार मान्यतेस्तव सादर केले असता उपरोक्त प्रस्ताव मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर ठेवणेस्तव. मा.आयुक्त महोदय यांनी दि.२२.०५.९९ अन्वये शिफारस केली आहे.

त्यानुसार दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी येथील प्राथमिक शाळेच्या संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व मोकळ्या जागेवर अभ्यासिका बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे.सुंदर कंन्स्ट्रक्शन यांनी काम करण्यांस नकार दिल्याने त्यांची इसारा रक्कम जप्त करुन दुसरे कमी दराचे निविदाधारकांनी संमती दिल्यानुसार सदरील काम मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांचेकडून पहिल्या कमी दराचे निविदाधारकांनी दिलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दर करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.सभापती (स्थायी समिती) |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०९.०६.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक ०९ जुन, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीला अधिकारी वर्ग व खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ३. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉन | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| ८. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| ९. | स.स.सौ. मुंडलिक विमल नंदकुमार | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सभासद |

<u>संवाद :-</u>

**मा.सभापती :** चर्चा करण्यासाठी १५ मिनीटाचा अवधी देण्यांत येत आहे नंतर विषयपत्रिकेवरील विषयावर चर्चा करण्यांत येईल.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिकेच्या सेवेत असलेले झोन क्र.१ चे विभागीय अधिकारी व त्यास झोन मधील स्वच्छता निरिक्षक यांना भ्रष्टाचार प्रकरणी निलंबित केले. यास जबाबदार म्हणून झोनल कमिशनर वर का कार्यवाही केली नाही. याबाबत मागील बैठकीत चर्चा केलेली होती. चौकशी चालू आहे. असे सांगण्यांत आले पूर्णतः झालेली आहे किंवा काय? या बाबतचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** या प्रकरणात संबंधित जे कर्मचारी / अधिकारी जबाबदार असतील त्यांची योग्य ती चौकशी करण्यासाठी सहा.संचालक नगररचना यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यांत आले असून चार्ज शिट्स (दोषारोप) संबंधितांना देण्यांत आलेले आहेत. त्यानुसार चौकशी करुन तसा अहवाल ते सभागृहात सादर करतील.

**सौ.लता दलाल :** पूर्ण चौकशी करण्याची मुदत किती ठेवलेली आहे याचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** ३ महिन्यांच्या अवधी चौकशी करण्यासाठी असतो.

**सौ.लता दलाल :** निराला बाजार येथील अतिक्रमण २९ तारखेला काढण्यांत येणार असे मागील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी आश्वासन दिलेले होते. अद्यापपर्यंत

काहीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही कार्यवाही का झाली नाही याचा खुलासा करावा.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** निराला बाजार येथील अतिक्रमण काढण्यासाठी गेलेलो होतो. परंतू संबंधित अतिक्रमण करणाऱ्या ४५ दुकानधारकांनी न्यायालयाचा स्थगिती आदेश आणलेला असल्यामुळे तेथील अतिक्रमण काढण्यांत आलेले नाही. १९९६ चे स्थगिती आदेश आहेत.

**सौ.लता दलाल :** १९९६ चे स्थगिती आदेश आहेत सदरील स्थगिती आदेश किती महिन्यांपर्यंत मर्यादित आहे. एक स्टे किती महिन्याचा असतो याची मुदत काय व किती कालावधी साठी असतो. स्थगिती आदेश ९६ पासून आहे. १९६६ ते १९९९ पर्यंत स्थगिती आदेश आहे का. हा स्थगिती आदेश का उठविण्यांत आले नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** निराला बाजार येथील जमीन अतिक्रमण आहे की, कायदेशीर बांधकाम आहे याबाबत सहाय्यक संचालक, नगररचना यांनी खुलासा करावा. स्थगिती आदेश काढण्यासाठी मर्यादित कालावधी नसतो.

**सहा.संचालक नगररचना :** पहिल्यांदा पाडण्यांत आलेले आहे. ज्या मिळकतीच्या संदर्भात स्थगिती आदेश होते. ते काढलेले नाही. परंतू न्यायालयाचा स्थगित आदेश प्राप्त केला असेल तर तो उठविण्याची जबबादारी संबंधित अधिकाऱ्यांची आहे.

**मा.सभापती :** मनपातील संबंधित अधिकाऱ्यांकडून अशा कामात कार्यवाही करण्यास दिरंगाई झालेली आहे. विनापरवाना शेड टाकता येत नाही. शहरात काही दुकानधारकांनी न्यायालयाची स्थगिती आदेश उठवू नये म्हणून स्थगिती आदेश आणलेले आहे. कशासाठी आहे ते पहावे नवीन कामे चालु असल्याचे दिसून येते. अशा प्रकरणात ज्या ज्या लोकांनी न्यायालयाची स्थगिती आदेश आलेला आहे तो उठविण्यासाठी संबंधित अधिकारी यांनी न्यायालयात केस चालवितांना सदरचे काम केलेले बेकायदेशीर आहे असे निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे जेणेकरुन त्या जागेवर अनाधिकृत बांधकाम केलेल्या लोकांना न्यायालय स्थगिती आदेश देणार नाही. यासाठी प्रशासकीय दृष्टीने कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिकामध्ये दोन दुय्यम आवेक्षक यांना पदोन्नती देण्यांत आली आहे का किंवा मुलाखतीद्वारे घेतलेले आहे काय? या जागा पदोन्नतीने भरलेले आहे किंवा नामनिर्देशनाने भरण्यांत आलेले आहे. खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** नामनिर्देशनाने सदरच्या जागा भरण्यांत आलेल्या आहेत. सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत देण्यांत येईल.

**सौ.लता दलाल :** पहिल्या बैठकीत विचारलेली माहिती दुसऱ्या बैठकीत देण्यांत येईल. परंतू दुसऱ्या बैठकीतही माहिती मिळत नाही. पुन्हा दुसऱ्या बैठकीत म्हणजे तीन-तीन बैठकीत स.सदस्यांनी माहिती विचारल्यावर मिळत नाही. ज्या त्या बैठकीत सभागृहात माहिती विचारल्या वर अधिकारी यांनी दिली पाहिजे. येत्या बैठकीत याचा खुलासा व्हावयास पाहिजे.

**मा.सभापती :** स्थायी समितीला देखील सभेच्या पुर्वीच लेखी कळवावे.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** नेहरुभवन येथील हॉल मध्ये पडदे तसेच महानगरपालिकेने केलेली दुकाने बाबत काय कार्यवाही केली. मा.आयुक्त यांनी मागील बैठकीत दुकान केंद्राच्या संदर्भात पाहिल्या लिलावातील जे लोक असतील त्यांचा विचार

करण्यांत येईल असे आश्वासन दिलेले होते काय कार्यवाही झाली माहिती द्यावी.

**मा.सभापती :** अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** या संदर्भात निविदा काढलेल्या होत्या तीन दिवसांची अल्प मुदतची निविदा काढलेली होती आता पुन्हा निविदा काढण्याची संचिका मंजूरीसाठी गेलेली आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** पहिल्यांदा लिलाव झाला त्यावेळी ३५ ते ४० हजारापर्यंत दर बरोबर होते. परंतू पुन्हा निविदा काढण्यांत आल्या त्यात १ ते १.५० लाखापर्यंत लोकांनी हराशी केली कुणी ही ठरवलेल्या मुदतीत पैसे भरले नाही. प्रशासनाने पुढील काय कार्यवाही केली माहिती द्यावी.

**मुख्य लेखापरिक्षक :** पहिल्यांदा जाहिर लिलाव झालेला होता तो रद्द करुन पुन्हा लिलाव करण्यांत आलेला होता. झालेल्या लिलावाप्रमाणे त्या लोकांनी पैसे भरले नाही. आता पुन्हा जाहिर लिलाव करण्यांत येईल पहिला लिलाव रद्द केलेला होता म्हणून त्या लिलावाधारकांचा विचार करता येणार नाही. असे केले तर बेकायदेशीर होईल.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** संत एकनाथ मंदिर येथे निविदा होताच पडदे लावले नेहरु भवन येथील हॉलमध्ये पडदे का लावण्यांत येत नाही.

**उपअभियंता (इ.) :** हॉलमध्ये पडदे लावण्याकरिता निविदा मागविलेल्या होत्या. सर्व तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आला यात कापडाचा वापर जास्त असल्याने भांडार विभागाकडून याबाबत कार्यवाही व्हावी असे ठरल्यामुळे सदर संचिका भांडार विभागाकडे वर्ग करण्यांत आलेली आहे.

**मा.सभापती :** नेहरु भवन येथील हॉलमध्ये पडदे लावण्याच्या संचिकेत मंजूरी देऊन योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन :** माझ्या वार्डातील महानगरपालिकेतर्फे बांधण्यांत आलेले दवाखान्याचे काम पूर्ण होऊन त्या दवाखान्यात दररोज २०० ते २५० रुग्ण उपचारासाठी येतात. दवाखान्याच्या बाजुला सर्व बाजुंनी कुंपनभिंत होणे जरुरीचे आहे. यासाठी दोन वर्षापासून जी मागणी करत आहे. विचारणा केली असता अधिकारी सांगतात बजेट नाही अशी उत्तरे अधिकारी यांनी देणे योग्य वाटत नाही. दवाखान्याला कुंपनभिंत होणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता :** दवाखान्याला कुंपन भिंत होण्यासाठी एकूण ६ लाखाचा खर्च असून मुळ अंदाजपत्रकात कुंपन भिंत खर्चाची तरतूद नव्हती त्यामुळे या कामाला उशीर लागलेला आहे.

**श्री.विखारोद्दीन :** याच पध्दतीच्या बांधकाम ठरावात व याच बरोबर कुंपन भिंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यांत प्रस्ताव मंजूरीसाठी येतात. माझ्याच वार्डातील कामात या कामाचा समावेश का केला नाही याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** दवाखान्यास संरक्षित भिंत होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी यांनी रिवाईज्ड बजेटमध्ये या कामाबाबत विचार होत असल्यास त्वरीत काम होण्याबाबतची कार्यवाही करावी.

**श्री.विखारोद्दीन :** या संदर्भात दोन वर्षापासून कार्यवाही चालू असून ज्या आवश्यक बाबीनुसार जी विकास कामे करावयाची आहे. त्यात बजेटचा प्रश्न उद्‌भवत नाही. याच बरोबरचे दुसरे प्रस्ताव मंजूरीसाठी येतात. अंदाजपत्रक ज्या

विभागात तयार होते. संचिका लेखा विभागात पाठवितानांच कोणते काम आवश्यक आहे त्याची क्रमवारी लावावी व खात्री करुन त्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** इतर प्रस्ताव कसे येतात हे पाहण्याचे काम त्या त्या विभागाचे आहे.

**श्री.विखारोद्दीन :** वार्डातील साफसफाईचे काम व्यवस्थीत होत नाही. झोन मधील कामगार यांना दुसऱ्या झोनमध्ये कामासाठी नेमण्यात येते. ज्या झोनमधील कामगार इतर झोनमध्ये साफसफाईसाठी गेल्यावर त्या झोनमध्ये योग्य साफसफाई होत नाही. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांचा कुणावरच कुणाचा अंकुश नाही. कर्मचारी कमी पडत असेल तर वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची नवीन भरती करण्यांत यावी तसेच एक जवान ८ झोनची देखरेख करणार नाही. करिता जवानाची ही भरती करण्यांत यावी.

**मा.सभापती :** शुन्य कचरा अभियानाची ही योजना आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** कर्मचाऱ्यांना झाडु व इतर साहित्य पुरविल्या गेले तरी योग्य ती वार्डातील साफसफाई होत नाही. बाहेरुन येणाऱ्या सफाई कामगार काहीही करत नाही. शुन्य कचरा अभियानांवर अंकुश नाही.

**श्री.विखारोद्दीन :** वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची भरती का करीत नाही. प्रत्येक वार्डाला १ जवान आवश्यक आहे.

**मा.सभापती :** मागील सर्वसाधारण सभेत मा.महापौर यांनी जेथे जेथे गरज भासेल तेथे तेथे कर्मचारी भरती करावे असे सूचित केलेले आहे.

**मा.आयुक्त :** शहरात शून्य कचरा अभियान राबविण्याचे काम करण्याचे प्रशासनाने ठरवलेले आहे. पावसाळ्यापुर्वी शहरातील संपूर्ण कचरा उचलून शहराबाहेर नेऊन टाकण्याची ही योजना २२ जून पर्यंत चालणार आहे. १ ते ८ झोनमधील जे काही विखुरलेले कामगार आहेत या सर्वांना एकत्र करून शहरातील कचरा, बिल्डींग मटेरियल, इतर केर कचरा उचलण्याचा हा उपक्रम आहे. हा कार्यक्रम गेल्या ५ तारखेला जागृतिक पर्यावरणाच्या दिवशी झोन क्र.१ मध्ये राबविण्यांत आला व त्याचा परिणाम म्हणून शहरातील असंख्य नागरिकांचे पत्रकार यांचे फोनस आलेले आहे. हे अभियान राबवितांना चांगल्या प्रतिसाद मिळत आहे. ही कार्यवाही करत असतांना झोन क्र.१ मध्ये एकूण एक दिवसांत २७६ टन कचरा उचलण्यात आला आहे. ७३ खेपा नारेगांवला टाकण्यांत आले व ८०० मंजूर काम करित होते. आज सुध्दा झोन क्र.२ मध्ये ७०० मजूर कचरा उचलण्याचे काम करत आहे. स.सदस्या सौ.दलाल यांनी तक्रार केली की, नागेश्वरवाडी येथे या अभियानांचा फारसा परिणाम झालेला नाही. त्याची दखल घेऊन त्याअनुषंगाने उपआयुक्त (म.) यांना सूचना दिलेल्या आहेत. हा नवीन प्रयोग प्रशासनाच्या माध्यमातून राबविल्या जात आहे. जेणे करुन पावसाळा सुरु होण्यापुर्वी शहरातील सर्व कचरा बाहेर टाकण्याची कार्यवाही होईल. २ स.सदस्य श्री.विखारोद्दीन यांनी सुचना मांडल्यानुसार एका झोनमध्ये ही अभियान राबवत असतांना इतर झोनमधील सर्व मजूर बोलविण्यांत येत नाही तशी जाण प्रशासनाला आहे. सलग सात दिवस झोनमधील कचरा या मोहिमेत उचलण्यांत येणार नाही. दिवसा आड करुन हे काम होत आहे. प्रत्येक झोन मधील ७० टक्के चे मजूर या अभियानांसाठी बोलवण्यांत येतात. ३०% मंजूर ज्या त्या झोनमध्ये काम करतात. झोन क्र.२ मध्ये ही मोहीम

सुरु आहे. ही मोहिम राबवित असतांना एक दिवसाआड प्रत्येक झोनमधील ७०% मजूर कर्मचाऱ्यांना कामासाठी बोलविण्यांत येणार आहे. कुणाचा सहभाग होणार नाही. असे नाही. या उपक्रमांमुळे पावसाळ्यापुर्वी शहरातील १००० ते १२०० ट्रक कचरा शहराबाहेर काढण्यांत येईल असे प्रशासनाचे मत आहे. झोन क्र.१ मध्ये कचरा उचलत असतांना काहीत त्रुट्या आढळून आलेल्या आहेत. उदा.जेटींग मशिन या झोनला वापरण्यांत आली नव्हती. ती आता झोनमध्ये साफसफाईसाठी घेण्यांत आलेले आहे. तसेच मलेरिया विभागातील मजूर झोन क्र.१ मध्ये बोलविण्यांत आलेले नव्हते. त्यांना झोन क्र.२ मध्ये साफसफाईसाठी घेण्यांत आलेले आहे. ज्या त्रुट्या आढळून आल्या त्यानुसार काही बदल करुन ही मोहिम राबविण्यांत येत आहे.

**श्री.विखारोद्दीन :** सकाळी ५ ते ९ दररोजची साफसफाई व्हावी. तसेच १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत अभियान राबविण्यांत यावा. अशी कार्यवाही केल्यास योग्य होईल. परंतू ही योजना राबवितांना एका झोन साफसफाई होईल. व दुसऱ्या झोनमध्ये कचरा तसाच पडुन राहील अशी परिस्थिती होऊ नये.

**मा.आयुक्त :** स.सदस्यांच्या सुचनेचा विचार करण्यांत येईल.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** माझ्या वार्डात १/२ ट्रक माती उचलली मी आताही दाखवतो जेथील माती तेथेच आहे. मा.आयुक्तांची दिशाभूल करण्यांत येते. मी.दाखवलेली माती उचलण्यांत आलेली नाही.

**मा.आयुक्त :** पोट विभागात गेल्या ५ तारखेला झोन क्र.१ मध्ये १०५६ मजूरांनी विविध आठ (८) कामे केलेले असून यात लोटाकारंजा, हर्षनगर, बुढ्ढीलाईन, जयभिमनगर, पहाडसिंगपुरा, भडकलगेट, तसेच भावसिंगपुरा मिटमिटा, पडेगांव असे सबडिव्हीजन केलेले होते. लोटाकारंजा मध्ये २०७, हर्षनगर मध्ये १८८, बुढ्ढीलाईन मध्ये ९१ मजूरांनी तर जयभिमनगर मध्ये १७७ मजूरांनी तर पहाडसिंगपुरा येथे १४४ मजूर, भडकलगेट येथे ९९ तर भावसिंगपुरा मिटमिटा पडेगांव येथे १५० मजूरांनी काम केलेले आहे. वरील सबडिव्हीजन नुसार अनुक्रमे ४८,५८,३२,५०,१५,२८,४२ असे एकूण २७३ टन कचरा गेल्या ५ तारखेला उचलण्यांत आला.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** लोधेश्वर मंदिराजवळ २-३ ट्रक मातीपैकी १/२ ट्रक उचलण्यांत आली.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** शहरातील जे लोक हातगाडीवर माल विक्री करतात त्यांना २५०/- फिस आकारण्यांत यावी जे हातगाडीवर माल वाहतुक करतात. त्यांना फिस आकारण्यांत येऊ नये ते मेहनत करतात मजूरी करतात.

**सौ.लता दलाल :** स.सदस्य श्री.तुळशीबागवाले यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे तो प्रशासनाने विचारात घेऊन तपासणी करुन कार्यवाही करावी व योग्य निर्णय घ्यावा.

**सौ.राधाबाई तळेकर :** माझ्या वार्डातील महानगरपालिकेच्या शाळा संरक्षणासाठी म्हणून एक वॉचमन राहण्यास सोयीस्कर अशी एक खोली बांधण्यासाठी तसेच २३ ते २४ हजार रुपये खर्च करुन एक हौद बांधण्यासाठी बऱ्याच दिवसापासून कार्यवाही करत आहे. काहीही कार्यवाही होत नाही. तसेच गारखेडा येथील शाळेला संरक्षित भिंत तीन बाजुने बांधण्यासाठी बजेट नाही या बाबतची कार्यवाही मी ९७ पासून करत आहे. परंतू अधिकारी बजेट नाही म्हणून सांगतात या ठिकाणी वॉचमन दिवस पाळी करतात रात्रीच्या वेळी ही

मालमत्ता सांभाळण्यासाठी कुणीही नसते. कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत. महानगरपालिकेची शाळा उद्यानाला लागून असल्याने एक भिंत नशिबाने मिळालेली आहे.

**शहर अभियंता :** सदर कामा संदर्भात अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. लवकरच कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** महानगरपालिकेची मालमत्ता असून त्या ठिकाणी वॉचमन साठी रुम करण्याबाबतची कार्यवाही व्हावी. तसेच इतरही उपस्थित केलेल्या प्रश्नावर योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

**सौ.राधाबाई तळेकर :** शहरात (झिरो) शुन्य कचरा अभियान मोहिम राबवितांना साफसफाईवर जास्त भर देण्यांत यावा. काही प्रभागात ४-४ ते ५-५ दिवस सफाई कामगार स्वच्छता करण्यासाठी येत नाही. आले तरी अरुंद गल्ल्यांमध्ये जात नाही तसेच काही रहिवाशी आंब्यांची साल कचरा कुंड्यामध्ये आणून टाकतात. त्यामुळे दुर्गंधी सुटते. अशा कुंड्यांतील कचरा उलचण्यासाठी वेळेवर सफाई कामगार येत नाही. आठवड्यातून १ ते २ वेळा सफाई करणारे येतात. त्यामुळे दुर्गंधी सुटते व लगतच्या रहिवाशांना माशांचा त्रास होतो. नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता टाळता येत नाही. कचरा वाहून नेण्यासाठी देण्यांत आलेल्या हातगाड्या व्यवस्थीत नाही. त्यामुळे पुरेपूर कचरा वाहून नेता येत नाही. नवीन हातगाड्या देण्यांत याव्या. तसेच साफसफाईसाठी आवश्यक लागणारा मजूर भरती करण्यांत यावा. जेणे करुन शहरात चांगल्याप्रकारे स्वच्छता राहील.

**मा.सभापती :** काही झोनमध्ये ट्रक कमी आहे व सफाई कामागारही कमी आहे. तरी ट्रक खरेदी बाबतचा प्रस्ताव प्रशासनामार्फत मंजूरीसाठी आणावा.

**श्री.विखारोद्दीन :** ज्या कुंड्या मागविण्यांत आलेल्या आहेत त्यांचा दर्जा तपासणी करावा. झोन क्र.६ मध्ये काही नग पडलेले आहेत. ते तपासून घेण्यांत यावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** नवीन आणलेल्या कुंड्या ह्युम पाईपचे असून पुढच्या बैठकीत पाहणी करुन माहिती देण्यांत येईल.

**मा.सभापती :** कब्रस्तानाबाबत काय कार्यवाही केली याची माहिती संबंधित अधिकारी यांनी द्यावी.

**शहर अभियंता :** अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून ना हरकत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पत्रत्र्यवहार केलेला आहे. त्यानंतर कार्यवाही होईल.

**विषय क्र.८१/१ :-**

दिनांक २७ मे, १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.विखारोद्दीन :** इतिवृत्तातील पान क्र.९ वर मागील बैठकीत चर्चा केली होती. कब्रस्तानच्या जागेवर अतिक्रमण होते. काढण्यांत आल्यानंतर पुन्हा अतिक्रमण होते याची ठोस अशी एकदाच का कार्यवाही करण्यांत येत नाही. स.सदस्यांनी पुन्हा पुनः सभागृहात बोलणे योग्य वाटत नाही.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** या संदर्भात नोटीस दिलेली आहे. कार्यवाही लवकरच करण्यांत येईल.

**मा.सभापती :** अधिकारी यांना सुचना करु इच्छितो की, कब्रस्तान किंवा स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमणे झालेली असतील तर ती तात्काळ काढण्यांत यावी. तसेच संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन :** इतिवृत्तावरील पान क्र.२१ वर विषय क्र.७०/१० नुसार मागील बैठकीत चर्चा होऊन प्रस्तावामध्ये क्रमांक वाईज ॲटम दाखविण्यांत आलेले होते. या प्रस्तावानुसार किती हेल्मेट, किती बुट, किती ड्रेस खरेदी करणार, कोणत्या साहित्याला कोणता क्रमांक याची पुर्णत: माहिती दिलेली नाही. या बैठकीत माहिती देणार होते. खुलासा करावा.

**अग्निशमन अधिकारी :** आपल्याकडे एकूण ५९ कर्मचारी असून त्यांना गणवेश वाटप करावा लागतो. तसेच हेल्मेट दर अडीच वर्षाला देण्यांत येतात. इतर सविस्तर माहिती मी सभागृहात आणलेली नाही. पुढच्या बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**मा.सभापती :** प्रस्तावात आयटम क्रमांक दिले आहे. त्याचा तपशिल देण्यांत यावा. १६ प्रती करुन द्यावे.

**श्री.विखारोद्दीन :** कोणत्या झोनला किती हातगाड्या देण्यांत येणार आहे. मागील बैठकीत जी समिती या संदर्भात गठीत केली होती. त्याच माझा समावेश होता. मी बाहेरगांवी गेलेला असल्यामुळे याबाबत मला निश्चित काहीही माहिती नाही. याबाबत खुलासा करावा.

**सौ.लता दलाल :** चौकशी समितीचा अहवाल मागवून घेऊन पावसाळा सुरु होण्यापुर्वी हातगाड्याचे वाटप प्रत्येक झोनला करण्यांत यावे.

**मा.सभापती :** समितीचा अहवाल आल्यानंतर तशी कार्यवाही करण्यांत येईल. ठराव क्रमांक ७६/६ मंजूर करण्यांत येतो. तसेच विषय क्रमांक १ ला मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :-**

दिनांक २७.०५.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.७६/६ कचरा वाहू हातगाड्या खरेदी बाबत स्थगित करण्यांत आलेल्या ठरावास खालील प्रमाणे मंजूर देण्यांत येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी, प्रकल्प संचालक व विभागीय अधिकारी यांच्या समितीने दिलेल्या अहवालानुसार मागविण्यांत आलेल्या व अतिरिक्त शहर अभियंता यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेप्रमाणे एकूण ३०० नग हातगाड्या खरेदी करण्यांस तसेच या कामाकरिता मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे प्रति नग रक्कम रु.२५७५/- च्यादरास आणि यासाठी येणाऱ्या एकूण रक्कम रु.७,७२,५००/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या व इतर दुरुस्त्यांसह दिनांक १७ मे १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८२/२ :-**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केलेले आहे की, सन १९९९-२००० सालासाठी शहरातून स्वच्छतेसाठी म्हणून वार्डामधून कचरा उचलण्याकरिता खाजगी वाहन चालकांकडून ट्रॅक्टरने कचरा उलचण्याबाबत दरपत्रके जाहिर निविदा वृत्तपत्रातून

मागविण्यांत आल्या होत्या. त्याप्रमाणे खालील वाहन धारकांकडून दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.दिपक अर्जून उबाळे | - | ९५०/- रुपये प्रतिदिन |
| २. | श्री.मधुकर चिंधा राजपुत | - | ८९०/- रुपये प्रतिदिन |
| ३. | श्री.भिकन दादाराव कणसे | - | ७७०/- रुपये प्रतिदिन |
| ४. | श्री.भागाजी उमाजी गुंजाळे | - | ७५०/- रुपये प्रतिदिन |

मा.आयुक्तांचे बरोबर सर्वांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यांत आले होते. रेट ॲनालिसिस करुन दर रुपये ७००/- (रुपये सातशे) प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर प्रमाणे दिवसातून सहा पेट्रोल पंप, डिझेल व मजूरांसह समक्ष वाटाघाटीत सर्वांनी मान्य केले आहे. त्यानुसार रक्कम रु.७००/- प्रति दिन प्रति ट्रॅक्टर ६ ट्रिप साठी मान्य करणे योग्य व ज्या विभागास ट्रॅक्टरची गरज पडेल त्या विभागाच्या मागणीनुसार वरील दरानुसार लावण्यास मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** संबंधित अधिकारी यांनी या प्रस्तावानुसार माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** मागील काही वेळा झोनमध्ये कचरा वाहून नेण्यासाठी खाजगी वाहन (ट्रॅक्टर) लावून कचरा नेण्यांत आला होता. परंतू यापुढे भाड्याने वाहन लावण्याची आवश्यकता भासल्यास रेट फिक्स करण्यासाठी वृत्तपत्रात निविदा देऊन मागणी केलेली असून प्रस्तावात दर्शविल्यानुसार सर्वात कमी दराने रु.७००/- मध्ये प्रतिदिन प्रति ट्रॅक्टर ६ ट्रिप प्रमाणे कचरा नारेगांवला वाहुन नेतील. त्यात डिझेल, मजूर ड्रायव्हरचा सर्व खर्च त्यांच्याकडे राहील.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** खाजगी ट्रॅक्टर कचरा भरण्यासाठी लावण्यांत येतात. परंतू त्यांची बिले अदा करण्यांत येत नाही. मागील अशाच काही लोकांचे पैसे महानगरपालिकेकडे बाकी आहे. त्याची अगोदर कार्यवाही करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** निविदा काढण्यांत आलेल्या होत्या. ज्याची निविदा स्विकारली त्यांनी कचरा टाकला नाही. परंतू दुसराच व्यक्ती कचरा उचलण्यास तयार असेल तर नियमाने त्याची बिले निघु शकत नाही. ज्यांनी कचरा उचलला व मला खात्री झाली तर बिले देण्यांत येतील. कचरा न उचलता ट्रिप्स दाखवले तर बिल देता येणार नाही.

**श्री.विखारोद्दीन :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार ६ ट्रिप्सचे एकूण ७००/- रु देण्यांत येणार ज ६ ट्रिप्स कचराच नसेल तरी ७००/- देण्यांत येणार आहे काय?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** आवश्यकतेनुसार ज्या त्या झोनला कचरा उपलब्ध आहे किंवा काय माहिती घेऊनच पूर्ण ट्रिपा झाल्यावरच दर्शविलेली रक्कम अदा करण्यांत येईल.

**मा.सभापती :** मागील ज्यांचे पैसे बाकी असतील त्या ट्रॅक्टर धारकांचे पैसे देण्याबाबतची कार्यवाही प्रशासनाने तपासणी करुनच करावी. तसा अर्ज संबंधितांनी पुन्हा मा.आयुक्तांकडे द्यावा. गरजेनुसार ट्रॅक्टरचा वापर करुन कचरा उचलण्याची कार्यवाही व्हावी. प्रस्ताव मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० सालासाठी शहरातून स्वच्छतेसाठी कचरा उचलण्याकरिता खाजगी वाहन धारकांकडून मागविण्यांत आलेल्या दरपत्रकानुसार

प्राप्त झालेल्या दरपत्रकाधारकांशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे प्रतिदिन प्रति ट्रॅक्ट्रर दिवसातून सहा ट्रिपसाठी (पेट्रोल, डिझेल, मजूरांसह) रक्कम रु.७००/- च्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच आवश्यकता असेल तरच ट्रॅक्टरद्वारे कचरा उचलण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

**विषय क्र.८३/३ :-**

सहाय्यक संचालक, नगररचना प्रस्ताव सादर करतात की, मौजे गारखेडा येथील सारंगगृह निर्माण संस्थामधील जागा एकंदर चार ठिकाणी आहे. त्यापैकी गजानन महाराज मंदिरासमोरील (१०० फुट रुंद विकास योजनेवरील) खुली जागा क्षेत्र १४८०० चौ.फुट जागा ही सारंग गृह निर्माण संस्थेने जिमखाना हॉल बांधण्यासाठी मागणी केलेली आहे. वरील खुली जागा सोसायटीस खालील अटी व शर्तीवर देण्यास्तव सादर.

१. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१६०/१ दिनांक २०.११.९६ नुसार भाडे रु.१००/- प्रतिवर्ष राहील.

२. विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% अथवा २०० चौ.मी.दोघांपैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजूर करुन घ्यावा लागेल.

३. भाडेपट्ट्यांची मुदत ३० वर्ष राहील. परंतू प्रत्येक ५ वर्षानुसार भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करावे लागेल.

४. जागा प्रदान करावयाचे धोरणानुसार इतर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेऊन जागा ताब्यात देण्यांची कार्यवाही मालमत्ता विभागातर्फे करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.विखारोद्दीन :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार जागा ही त्याच सोसायटीला देता येत नाही. ही मालमत्ता महानगरपालिकेची असते.

**मा.सभापती :** रेखाकंनातील खुली जागा महानगरपालिकेची असते. त्याच गृह निर्माण संस्थेच्या लोकांनी ही जागा भाडे तत्वावर १०% प्रमाणे जिमखाना बांधण्यासाठी विकसीत करण्यांस जागा मागविलेली आहे.

**मा.आयुक्त :** खुल्या जागेचे संरक्षण करणे हे महानगरपालिकेला अवघड आलेले असून याबाबतचा शासनाच असा निर्णय घेतलेला आहे की, रेखांकनधारक आहेत. त्याच्यावरुन खुल्या जागेच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवावी खुली जागा महानगरपालिकेस आवश्यक असेल तर अशा जागा देऊ नये. सारंग सोसायटी या जागेचा विकास करणार आहे. व इतर जागेवर त्यांनी गार्डन, मुलांची खेळणी ठेवावी. मैदान विकसीत करावे. त्यांना जागा देण्याच्या अटी शर्तीनुसार प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री.विखारोद्दीन :** या प्रस्तावात १०% जागा विकसीत करण्याची परवानगी मागणी केली दुसऱ्या वेळेस पुन्हा १०% विकसीत करण्या संदर्भाने बांधकाम परवानगी देण्यांत येऊ नये. सन ७८ ला गुलमंडी रस्त्यावरील एका जागे संदर्भात झ ाालेले आहेत. दुसऱ्यांदा बांधकाम परवानगी देऊ नये.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील सारंग गृहनिर्माण संस्था मधील खुल्या जागेपैकी गजानन महाराज मंदिरा समोरील (१०० फुट रुंद विकास योजनावरील) खुली जागा जिचे क्षेत्र १४८०० चौ.फुट आहे. ही जागा सारंग गृहनिर्माण संस्थेस जिमखाना हॉल बांधण्याकरिता प्रस्तावातील अ.क्र. १ ते ४ च्या अटी शर्तीवर देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८४/४ :-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गजानननगर ते श्रेयनगर या प्रस्तावित १५.०० मी. विकास योजना रस्त्यावर कल्व्हर्ट बांधणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१,९२,९१०/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या "नवीन खडी रस्ते" मध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन नगर ते श्रेयनगर या प्रस्तावित १५.०० मी.विकास योजना रस्त्यावर कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,९२,९१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. सदरील काम तातडीने हाती घेण्याचे दृष्टीने तीन दिवसांची अल्पनिविदा (नोटीस बोर्डवर) काढून काम करण्यांत यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८५/५ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सरस्वतीभुवन कॉलनी येथील सुपर मार्केटच्या दक्षिणेकडील खुल्या जागेस संरक्षित भिंत व तार कुंपण करणेसाठीच्या कामाचे अंदाजपत्रक सन १९९५-९६ च्या सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.२,२२,६००/- चे तयार करण्यांत येऊन सदर कामावर होणारा खर्च हा विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब सरस्वती भुवन कॉलनी येथील सुपर मार्केटच्या दक्षिणेकडील जागेस संरक्षित भिंत व तार कुंपण करणे साठीचे रक्कम रु.२,२२,६००/- चे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

<u>**संवाद :-**</u>

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** ही जागा सरस्वती भुवन संस्थेची आहे.

**सौ.लता दलाल :** संस्थेची जागा नसून कॉलनीतील खुल्या जागेवर संस्थेने शाळा बांधली. त्यानंतर तेथील नागरिकांनी मा.मुख्यमंत्री यांना अनेक वेळा भेटून सदरील जागा ले.आऊट मंजूर होऊन या कॉलनीतील लोकांच्या उपयोगासाठी यावीत म्हणून विकसीत करण्यांत येईल असे महानगरपालिकेने आश्वासन दिले.

**मा.सभापती :** मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सरस्वती भुवन कॉलनी येथील सुपर मार्केटच्या दक्षिणेकडील खुल्या जागेस संरक्षित भिंत व तार कुंपण करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,२२,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८६/६ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेसाठीच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार सन १९९८-९९ नुसार रक्कम रु.१,७४,५००/- चे तयार करण्यांत आले असून सदर कामावर होणारा खर्च हा विकास योजना अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली आहे.

सबब स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे रक्कम रु.१,७४,५००/- चे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून काम करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,७४,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करुन घेण्याकरिता नोटीस बोर्डवर तीन दिवसांची अल्प निविदा काढून करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८७/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योतीनगर येथील खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु.३,८८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर कामावर होणारा खर्च विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे.

सबब ज्योतीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे रक्कम रु.३,८८,५००/- चे विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदीतून करण्याचे कामाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर येथील खुल्या जागेत संरक्षित भित बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,८८,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८८/८ :-**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रविवार (आठवडी बाजार) जाफरगेट येथे ओट्यावर शेड टाकावयाचे आहे. त्यासाठी सां.बां. विभागाचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु. ९,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास

मा.आयुक्त महोदय यांनी दि.३१.०५.९९ अन्वये मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च १९९९-२००० या आर्थिक वर्षा अंतर्गत आठवडी बाजार विकसीत करणे व इतर सोयी सवलती पुरवणे या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.९,८०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रविवार आठवडी बाजार जाफरगेट येथे ओट्यावर शेड टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.८९/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटाकारंजा येथील शिया कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन १९९८-९९ च्या सा.बां.दरसुचीनुसार रक्कम रु.४,३३,२००/- एवढ्याचे तयार करण्यांत आले असून सदर कामाचा खर्च स्मशानभूमी विकास कार्यक्रम १९९९-२००० या तरतूदी अंतर्गत करण्यासाठी प्रस्तावित केले असता दर्शनी भाग हा (दर्शनी संरक्षित भिंत) विकास योजना नकाशाप्रमाणे १२ मीटर रुंद रस्त्यास बांधित होत आहे. तसेच विकास योजना नकाशा नुसार बांधित जागा सोडून दर्शनी संरक्षित भिंतीचे काम सहा.संचालक, नगररचना यांचे सल्ल्यानुसार करण्याचे अटीवर प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब सदर कामासाठी विकास योजने अंतर्गत १२ मीटर रुंद रस्त्यास बाधित जागा सोडून दर्शनी भिंतीचे काम करुन घेणे तसेच रक्कम रु.४,३३,२००/- चे सदर कामासाठी खर्चाचे अंदाजपत्रक स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा येथील शिया कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी विकास योजने अंतर्गत १२ मीटर रुंद रस्त्यात बाधित जागा सोडून दर्शनी भिंतीचे काम करुन घेण्यासाठीचे रक्कम रु.४,३३,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९०/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, देवानगरी येथे सांस्कृतिक सभागृह बांधावयाचे आहे. करिता सा.बां.विभागाचे सन १९९७-९८ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु.५,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.१६.१०.९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.स्थायी समितीने विषय क्र.३४१/२, दि.०५.१२.९८ च्या इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/नि/१०३/९८, दि.३०.१२.९८ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ (दोन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.२८.०१.९९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राजासिंग | - | ८% जास्त दराने |
| २. | परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | - | ४.९९% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराने मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झालेली होती. दिनांक १५.०५.९९ रोजी मा.आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती मा.आयुक्त महोदय यांनी ४.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव स्थायी समिती समोर प्रस्ताव देण्यांत यावा अशी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांची ४.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी येथे सांस्कृतिक सभागृह बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांचेकडून ४.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९१/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्षनगर ते बी.एम.सी.बँकेपर्यंत नाला साफ करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२,४७,०००/- चे बांधकाम परिसर अभियांत्रिकी विभाग यांच्या १९९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील काम लेखाशिर्षक १९९९-२००० मधून प्रस्तावित केलेले आहे.

सदरील कामास मा.आयुक्तांनी दि.२८.०५.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** या प्रस्तावानुसार स्थायी समितीने मंजूरी दिलेली नसतांना वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द झालेली आहे.

**कार्य.अभियंता (पा.पु.व ज.नि.) :** एकच काम राहिलेले होते. निविदा प्रसिध्द करण्यांत आली आहे.

**मा.सभापती :** निविदा निघालेल्या आहेत. प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्षनगर ते बी.एम.सी.बँकेपर्यंत नाला साफ करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,४७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी पाणी पुरवठा योजनेतील जायकवाडी नवीन येथील नादुरुस्त झालेल्या ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती करुन त्याला बी.एल.टी.सी. बसविण्या बाबतचे तुलनात्मक विवरण तयार केले. ते खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.ट्रान्स डेल्टा इले.औरंगाबाद | - | रु.४,९०,५१५/- |
| २. | मे.प्रशांत इले.औरंगाबाद | - | रु.५,१५,०००/- |
| ३. | मे.शक्ती इले.वर्क्स, औरंगाबाद | - | रु.५,१६,०००/- |

याची अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,९०,५१५/- एवढी आहे. यावरुन सर्वात कमी दर हे मे.ट्रान्स डेल्टा इले.औरंगाबाद यांची असून ती रुपये ४,९०,५१५/- एवढी आहे. मे.ट्रान्स डेल्टा इले.औरंगाबाद यांच्याकडून दुरुस्त करुन घेण्याबाबत मा.आयुक्तांनी ५% दर कमी करुन दि.२२.०५.९९ अन्वये रु.४,६५,९८९/- एवढ्या रकमेला मंजूरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी पाणी पुरवठा योजनेतील जायकवाडी नवीन येथील नादुरुस्त झालेल्या ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती करुन त्याला बी.एल.टी.सी.बसविण्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.ट्रान्स डेल्टा इले.औरंगाबाद यांचेकडून रक्कम रु.४,६५,९८९/- मध्ये करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/१३ :**

कार्यकारी अभियंता (स्लम प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.आंबेडकरनगर येथे मुख्य रस्त्यासाठी दगडी गटार बांधणे व अर्धगोलाकार गटार दुरुस्त करणे करिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,६२,७५९/- सा.बां.विभाग, औरंगाबाद चे दरसुची १९९८-९९ नुसार तयार करण्यांत आले असून मा.आयुक्त यांनी त्यास दि.०२.०६.९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम मनपा अर्थसंकल्प १९९९-२००० मध्ये ठेवण्यांत आलेली तरतूद लेखाशिर्ष देखभाल व दुरुस्ती मध्ये खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकर येथे मुख्य रस्त्यासाठी दगडी गटार बांधणे व अर्धगोलाकार गटार दुरुस्त करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,६२,७५९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९४/१४ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.चिकलठाणा कामगार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु.३,०७,८३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.०३.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.३,०७,८३८/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा कामगार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,०७,८३८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५/१५ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.किराडपुरा स्लम वार्ड क्र.२६ मध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे व शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९,८४,३९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.०३.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.९,८४,३९५/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किराडपुरा स्लम वार्ड क्र.२६ मध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे व शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,८४,३९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९६/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सरस्वती भुवन कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,७३,६००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सरस्वती भुवन कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,७३,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९७/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.५६ मधील उदय कॉलनी, नेहरु पॅलेस, भोईवाडा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.४,७९,३९६/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षा "पुर्नडांबरीकरण" या लेखाशिर्ष अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल, करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव** **:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५६ मधील उदय कॉलनी नेहरु पॅलेस, भोईवाडा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,७९,३९६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, पेठेनगर, भावसिंगपुरा येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु.७,५५,५६०/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च "नवीन डांबरीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव** **:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पेठेनगर, भावसिंगपुरा येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,५५,५६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९९/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नागेश्वरवाडी व स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.७,०३,७३६/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी व स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,०३,७३६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.१००/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील धनगर स्मशानभूमी मध्ये बर्नींग शेड, संरक्षित भित बांधणेच्या कामाकरिता सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुची सन १९९८-९९ चे नुसार रक्कम रु.३,१०,०६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यावर होणारा खर्च "स्मशानभूमी विकास कार्यक्रम" या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत आला असून त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे.

सबब हर्सुल येथील धनगर स्मशानभूमी मध्ये बर्नीग शेड व संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,१०,०६०/- चे अंदाजपत्रक मान्यतेचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील धनगर स्मशानभूमी मध्ये बर्नींग शेड व संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,१०,०६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रामकृपा हौसिंग सोसायटी गारखेडा येथे सांस्कृतिक सभागृह बांधण्याकरिता सा.बां.विभागाचे सन १९९७-९८ चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.१,५९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक ०४.०६.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च हा १९९९-२००० या आर्थिक वर्षा अंतर्गत नगरसेवक स्वेच्छानिधी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,५९,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रामकृपा हौसिंग सोसायटी गारखेडा येथे सांस्कृतिक सभागृह बांधण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,५९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.जयभिमनगर घाटी येथील समाज मंदिराच्या परिसरात बालवाडी बांधण्याकरिता सा.बां.विभागाचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.१,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.२५.०५.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षा अंतर्गत विकास इमारती शाळा, दवाखाने या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,८०,०००/- च्या प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.जयभिमनगर घाटी येथील समाज मंदिराच्या परिसरात बालवाडी बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पन्नालाल नगर येथील सांस्कृतिक सभागृह येथे उर्वरित संरक्षित भिंत, पाण्याचा हौद, जिना, संडास व मुताऱ्या बांधण्याबाबतचे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन १९९८-९९ अन्वये रक्कम रु.१,७३,९००/- चे तयार करण्यांत आले असून सदर काम विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास शासकीय मान्यता घेणेत आली आहे.

सबब पन्नालालनगर येथील सांस्कृतिक सभागृहाच्या येथे उर्वरित संरक्षित भिंत, पाण्याचा हौद, जिना, संडास व मुताऱ्या बांधणेसाठीचे रक्कम रु.१,७३,९००/- चे

वि.यो.अं.भूखंडाचे संरक्षणे या तरतूदीतून काम करण्या बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पन्नालालनगर येथील सांस्कृतिक सभागृह येथे उर्वरित संरक्षित भिंत, पाण्याचा हौद, जिना, संडास व मुताऱ्या बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,७३,९००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामे तीन दिवसांची अल्पनिविदा नोटीस बोर्डवर काढून तातडीने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, लेखा परिक्षक सहकारी गृह निर्माण संस्था, हर्सुल येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.०६.०३.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.५४८/२ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.५,६७,२००/- ला मंजूरी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/०१/९९, दि.०३.०४.९९ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (०७) सात निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (५) पाच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३९.२५% कमी दराने |
| २. | श्री.डी.अजितसिंग | - | ३८.११% कमी |
| ३. | मे.व्यंकटेशन कंन्स्ट्रक्शन | - | ३७.७१% कमी |
| ४. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | - | ३५.०१% कमी |
| ५. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ३१.११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३९.२५% कमी दराने मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेखा परिक्षक सहकारी गृह निर्माण संस्था हर्सुल येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.२५% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/६ :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.शाहशोक्ता कॉलनी स्लम येथे डांबरीरस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,६८,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "डांबरीरस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.०३.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु.६,६८,७००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शाहशोक्ता कॉलनी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,६८,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, कांचनवाडी स्लम भागात हनुमान मंदिरापासून श्री.देवकाते यांच्या घरापर्यंत २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,५०,०००/- ला स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण २४ (चोवीस) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. स्विकारणेच्या तारखेपर्यंत एकूण ९ (नऊ) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.राणा कंन्स्ट्रक्शन | - | ३५.३५% कमी |
| २. | श्री.परम दिपासिंग | - | ३५% कमी |
| ३. | श्री.शेख सलीम | - | ३२.८६% कमी |
| ४. | श्री.राजासिंग | - | ३२.८५% कमी |
| ५. | श्री.प्रकाश जाधव | - | २९.७८६% कमी |
| ६. | मे.हयात कंन्स्ट्रक्शन | - | २२.२६% कमी |
| ७. | श्री.गजेंद्र खोतकर | - | २१.८४% कमी |
| ८. | श्री.राजु कोलते | - | २०.२०% कमी |
| ९. | श्री.सतीश कामेकर | - | १५.७८६% कमी |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.राणा कंन्स्ट्रक्शन यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.३५% कमी दराची आहे. तरी मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.३५% कमी दराची निविदा प्रस्ताव स्विकृतीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी स्लम भागात हनुमान मंदिरापासून श्री.देवकाते यांचया घरापर्यंत २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.३५% कमी दराची मे.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७/८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, उत्तमनगर येथे त्रिमुर्ती हॉस्पीटलमागील गल्ल्यात १५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.ड्रेनेज लाईन काढून साफ करुन टाकणे व काही भागात २५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दरसुची दराने रक्कम रु.३,३५,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.२८.०५.९९ ला मान्यता दिलेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,३५,६००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उत्तमनगर येथे त्रिमुर्ती हॉस्पीटल मागील गल्ल्यात १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन काढून साफ करुन टाकणे व काही भागात २५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,३५,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०८/९ :**

कार्यकारी अभियंता (स्लम यांनी) प्रस्ताव सादर केला आहे की, मो.घाटी जयभिमनगर स्लम येथे खांडकी पेव्हींगवर कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां.खाते यांच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,६९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते आणि कॉंक्रीट" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.०२.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.९,६९,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी, जयभिमनगर स्लम येथे खांडकी पेव्हींगवर कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,६९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०९/१० :**

कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.शहाबाजार (स्लम) येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,२०,३०६/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "पुर्नडांबरीकरण" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.०३.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,२०,३०६/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहाबाजार (स्लम) येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,२०,३०६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११०/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.आसिफ बाग, दिलरस सोसायटी जवळ असलेल्या रेखांकनात १५० व २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम

रु.२,२१,८२५/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील काम लेखा शिर्ष "भांडवली कामे" १९९९-२००० यातून प्रस्तावित केलेले आहे. मा.आयुक्तांनी दि.०३.०६.९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आसिफ बाग, दिलरस कॉलनी सोसायटी जवळ असलेल्या रेखांकनात १५० व २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,२१,८२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१११/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.युनूस कॉलनी व त्रिवेणीनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.१६,०८,८००/- चे सा.बां.खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले असून लेखाशिर्षक "नाला ट्रेडींग" यातून प्रस्तावित केलेले आहे. सदरील कामाचा समावेश २० कोटी कृती आराखडा या सदरात असून सदरील विकासात्मक कामाकरिता अपेक्षित अनुदान प्राप्त झाल्यानंतर सदरील काम सुरु करण्यांत येईल. सदरील प्रस्तावास मा.आयुक्तांनी दि.१८.११.९८ ला प्रशासकीय मंजूरी देऊन सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर केले असता सर्वसाधारण सभेने विषय क्र.१७८/२ दि.१८.०१.९९ अन्वये वरील ठराव संमत केलेला आहे. त्या अनुषंगाने जा.क्र./मनपा/लेखा/नि/१३/९९, दि.११.०५.९९ ला बी-१ नमुन्यात कोरी निविदापत्रके वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकूण १४ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी चार (४) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.पटेल कंन्स्ट्रक्शन | - | २% कमी दराने |
| २. | मे.ए.आर.कंन्स्ट्रक्शन | - | ५% कमी दराने |
| ३. | श्री.अब्दुल सलाम | - | १०% कमी दराने |
| ४. | मे.मन्नान खान | - | १२% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा मे.पटेल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील निविदा दरास मा.आयुक्तांनी दि.०४.०६.९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.युनूस कॉलनी व त्रिवेणी नगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची मे.पटेल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेट ते क्रांतीचौक रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम

रु.२६,५६,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत १६ (सोळा) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त (तीन) ३ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.अजितसिंग | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ४.५% जास्त दराने |
| ३. | श्री.ए.सी.कोठारी | - | ५% जास्त दराने |

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे.

तरी सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांच्याकडून करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट ते क्रांतीचौक रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११३/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुतगिरणी चौक ते शहानूरवाडी दर्गा या ८०' डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३७,००,६८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १५ (पंधरा) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ४ (चार) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.अजितसिंग | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ४.५०% जास्त दराने |
| ३. | श्री.ए.सी.कोठारी | - | ५% जास्त दराने |
| ४. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ५% जास्त दराने |

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे. तरी सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांच्याकडून करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी चौक ते शहानूरमियाँ दर्गा या ८०' डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११४/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पुंडलिकनगर अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६५,४०,०८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २४ (चोवीस) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ३ (तीन) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून प्राप्त निविदापत्रक उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.डी.अजितसिंग | - | ०.०१% कमी दराने |
| २. | श्री.जी.आर.घोडेले | - | ७% जास्त दराने |
| ३. | श्री.एस.एम.मंडोरे | - | ६% जास्त दराने |

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे. तरी सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांच्या कडून ०.०१% कमी दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११५/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरमियाँ दर्गा ते सुतगिरणी या रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरी सरफेस ड्रेसिंग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४२,९७,८०६/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण अकरा (११) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ३ (तीन) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.शेख शरीफ | - | ११.००% जास्त दराने |
| ३. | श्री.डी.अजितसिंग | - | १२.५०% जास्त दराने |

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन यांच्याकडून करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरमियाँ दर्गा ते सुतगिरणी या रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरी सरफेस ड्रेसिंग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११६/१७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, उस्मानपुरा येथे गुरुद्वारा-यामागे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढून २२५ मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे व गुरु तेग बहादुर शेजारील गल्लीत २२५ मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दरसुची दराने रक्कम रु.१,४२,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.२८.०५.९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४२,९००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा येथे गुरुद्वाऱ्यामागे १५० मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढून २२५ मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे व गुरु तेग बहादूर शेजारील गल्लीत २२५ मी.मी.व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४२,९००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तीन दिवसांची अल्प निविदा (नोटीस बोर्ड) काढून काम करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११७/१८ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्वेच्छा निधीतून १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी बेरोजगार युवक/युवतींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातून जाहिर निविदा प्रकाशित करण्यांत आली होती. एकुण १९ निविदा प्राप्त झाल्या आहे. पैकी १२ निविदा संगणक प्रशिक्षणासाठी प्राप्त झाल्या असून ७ निविदा तीन चाकी व चार चाकी वाहन चालक प्रशिक्षणासाठी प्राप्त झाल्या आहेत. प्रस्तावा सोबत नियम व अटी तसेच तुलनात्मक तक्ता जोडण्यांत येत आहे.

१) **<u>वाहन चालक प्रशिक्षण :</u>** नियम व अटी प्रमाणे वाहन चालक प्रशिक्षणासाठी संस्थेकडे कमीत कमी चार चाकी वाहन ४ व २ रिक्षा असणे आवश्यक आहे. प्राप्त झालेल्या निविदापैकी डिसेंट मोटार ड्रायव्हींग व नोबल मोटार ड्रायव्हींग स्कुल या संस्थेकडेच नियम व अटी प्रमाणे वाहन आहेत. इतर संस्थेकडे नाही. परंतू महानगरपालिकेच्या आर्थिक फायद्याच्या दृष्टीने परफेक्ट फायद्याच्या दृष्टीने परफेक्ट मोटार ड्रायव्हींग यांचे ४ चाकी करिता रु.१२५०/- व रिक्षा करिता रु.८५०/- हया दरांना मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. तसेच सदर दरामध्ये निविदा भरलेल्या एजन्सी मार्फत प्रशिक्षणाचे काम करुन घेता येईल. त्यासाठी वरील नमूद नियम रद्द करुन निविदा भरलेल्या सर्व एजन्सीज मार्फत प्रशिक्षण देण्यांत यावे.

२) **<u>संगणक विभाग :</u>** संगणक प्रशिक्षणा करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दर संगणक प्रशिक्षणा करिता रु.२२५०/- व डी.टी.पी.साठी रु.२५००/- प्राप्त झालेले आहे.

प्राप्त झालेल्या निविदेसाठी मॉन्टेसरी बालक मंदिर व फिनेक्स कॉम्प्युटर या संस्थेचे अनुक्रमे कागदपत्रांची पुर्तता, अनामत रक्कम न भरल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यांत यावी आणि निविदा भरलेल्या इतर संस्थांना वरील दराप्रमाणे प्रशिक्षणार्थी पाठविण्यांत यावेत. तरी वाहन चालक प्रशिक्षणासाठी ४ चाकी वाहनांसाठी प्रशिक्षण

रु.१२५० व रिक्षा चालक प्रशिक्षण करिता रु.८५०/- संगणक प्रशिक्षणासाठी रु.२२५०/- डी.टी.पी. प्रशिक्षणासाठी रु.२५००/- दर वरील प्रमाणे मंजूरीस्तव प्रस्तावित करण्यांत येत आहे.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** मॉन्टेसरी बालक मंदिर व फिनेक्स कॉम्प्युटर यांना न देण्यांचे कारण काय खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** मॉन्टेसरी बालक मंदिर व फिनेक्स कॉम्प्युटर या संस्थेने अनामत रक्कम न भरल्यामुळे रद्द करण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरसेवक स्वेच्छा निधीतून १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी बेरोजगार युवक/युवतींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असलेले खालील दर्शविलेल्या दरांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १) | वाहन चालक प्रशिक्षणासाठी : | अ) चारचाकी वाहन रु.१२५०/- प्रशिक्षण |
| | | ब) रिक्षा चालक प्रशिक्षण रु.८५०/- प्रशिक्षण |
| २) | संगणक प्रशिक्षणासाठी : | अ) संगणक प्रशिक्षण रु.२२५०/- |
| | | ब) डी.टी.पी.प्रशिक्षण रु.२५००/- |

उपरोक्त दराने निविदा भरलेल्या एजन्सी मार्फत प्रशिक्षणाचे काम करुन घेण्यांत यावे. तसेच संगणक प्रशिक्षणाचे संदर्भात मॉन्टेसरी बालक मंदिर व फिनेक्स कॉम्प्युटर या संस्थेने अनुक्रमे कागदपत्रांची पुर्तता व अनामत रक्कम न भरल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यांत येते. या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता सुधारित प्रस्ताव सादर करीत आहे की, हर्सुल येथील गाडी रस्त्याला खडीकरण करणेच्या कामासाठी दि.२६.०३.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.६२३/२६ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.१,५३,२००/- ला मान्यता मिळालेली आहे.

नजरचुकीने अंदाजपत्रक रक्कम रु.१,६८,०००/- च्या ऐवजी रु.१,५३,२००/- ला मान्यता घेण्यांत आलेली आहे. ती दुरुस्ती करुन अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील गाडी रस्त्याला खडीकरण करणेच्या कामाकरिता दि.२६.०३.९९ च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्रमांक ६२३/२६ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.१,५३,२००/- ऐवजी वरील कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, कृषि उत्पन्न बाजार समिती समोर श्रीकृष्ण मंदिर ते भवानी नगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,०९,८००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात खांडकी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती समोर श्रीकृष्ण मंदिर ते भवानी नगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,०९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र.३ मधील रस्त्याचे पॅचवर्क साठी पॅचवर्क मटेरीअलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सां.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,९४,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालातील "रस्ते दुरुस्ती" पॅचवर्क या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** ४ महिन्यापुर्वीच पॅचवर्कसाठी साहित्याचा पुरवठा करणेच्या कामाची मंजूरी दिलेली होती. प्रत्येकी ८ झोनला ३-३ लाखाची मंजूरी दिलेली आहे.

**अति.शहर अभियंता :** दर ६ महिन्याला पॅचवर्क मटेरियलचा पुरवठा करुन रस्त्याची कामे करावी लागतात.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** माझ्या वार्डातील नवीन रस्ता तयार केला तो खोदण्यांत आला असून आता रस्ता खराब झालेला आहे.

**सौ.लता दलाल :** विषय क्र.२१ व २२ प्रस्तावाच्या अनुषंगाने पावसाळा सुरु होत आहे. ठराव मंजूर करुन उपलब्ध ठेकेदारांकडून काम करुन घेण्यांत यावे.

**मा.सभापती :** पावसाळ्याचे दिवस असल्याचे काम त्वरीत हाती घेण्यांचे दृष्टीने मागील वर्षी ज्या ठेकेदारांकडून पॅचवर्क मटेरियल पुरवठ्याचे काम करुन घेतले त्यांचेकडूनच सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घ्यावे. प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र.३ मधील रस्त्यांचे पॅचवर्क साठी पॅचवर्क मटेरिअलचा पुरवठा करण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास त्याचप्रमाणे कामाची तातडी लक्षात घेता व पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे मागील वर्षी ज्या ठेकेदारांकडून पॅचवर्क मटेरिअल पुरवठ्याचे काम करुन घेतले त्यांचेकडूनच सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घ्यावे. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, झोन क्र.८ च्या रस्ते दुरुस्तीसाठी पॅचवर्क मटेरियल खरेदी करणेसाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,९४,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च "रस्ते दुरुस्ती" (पॅचवर्क) या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.८ च्या रस्ते दुरुस्तीसाठी पॅचवर्क मटेरिअल खरेदी करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास त्याचप्रमाणे सदरील काम पावसाळ्यामुळे त्वरीत हाती घेण्याचे दृष्टीने मागील वर्षी ज्या ठेकेदारांकडून पॅचवर्क पुरवठ्याचे काम करुन घेतले त्यांचेकडूनच सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जालान नगर भागातील रस्त्यांचे मजबुतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१३,९८,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २४ (चोवीस) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ३ (तीन) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.बसरा कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.एस.एम.मंडोरे | - | ५% जास्त दराने |
| ३. | श्री.शेख शरीफ | - | ५.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची मे.बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदरील काम मे.बसरा कंन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालान नगर भागातील रस्त्यांचे मजबुतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.बसरा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१२३/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योतीनगर येथील अनंत अपार्टमेंट समोरील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित तार कुंपण व भिंत बांधणे बाबतचे कामासाठी सा.बां.विभागाच्या सन १९९८-९९ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.१,३८,७००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन सदर कामावर होणारा खर्च विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षणे या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे.

सबब ज्योतीनगर येथील अनंत अपार्टमेंट समोरील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित तार कुंपण करणे व भिंत बांधणेच्या रक्कम रु.१,३८,७००/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर येथील अनंत अपार्टमेंट समोरील म.न.पा.च्या खुल्या जागेस संरक्षित तार कुंपण व भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,३८,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** याच सभेत वरील सर्व प्रस्तावांस स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच कर्मचाऱ्यांनी दिलेल्या अपिलांवर एक विशेष बैठक घेऊन प्रशासकीय माहिती घेऊन २ ते ३ दिवसांत बैठक घेऊन निर्णय घेण्यांत येईल.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती (स्थायी समिती)
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २२.०६.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक २२ जुन, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. बचाटे राजकुमार | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ४. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ५. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १०. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| ११. | स.स.सौ. मुंडलिक विमल नंदकुमार | - | स.सभासद |
| १२. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद्र | - | स.सभासद |

<u>संवाद :-</u>

**सौ.लता दलाल :** सभागृहात उपआयुक्त (प्र.) (म.) तसेच इतर ही अधिकार उपस्थित नाही त्यांना सभेचे आयोजन केलेल माहिती नाही काय? नेहमीच प्रमुख अधिकारी सभेच्या वेळेवर उपस्थित रहात नाही असे नेहमीचेच होत असून संबंधित अनुपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे अशी माझी व सभागृहाची मागणी आहे. त्याचप्रमाणे नव्याने रुजू झालेले आयुक्त पण उपस्थित नाही. खुलासा करावा.

**श्री.विखारोद्दीन :** मा.आयुक्त, उपआयुक्त (प्र.) व उपआयुक्त (म.) देखील सभेला हजर नाही. कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.सभापती :** संबंधित उपआयुक्त (म.) (प्र.) या बरोबर इतर अधिकारी हे सभागृहात वेळेवर उपस्थित राहत नाही. या संदर्भाने मा.आयुक्त यांनी तशी कार्यवाही करावी. सभेच्या सुरुवातीस अधिकारी उपस्थित न राहणे हा सभागृहाचा अवमान आहे. यापुढे असे होता काम नये.

(याचवेळी उपआयुक्त (प्र.), उपआयुक्त (म.) सभागृहात प्रवेश करतात. वेळ ४.३० वा.)

सभागृहात अधिकारी यांनी वेळेवर यावे यापुढे उशिरा येणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही होईल याची नोंद घेण्यांत यावी.

(याच वेळी सभा चालू असतांना झोन क्र.४ चे वर्ग-३,४ चे काही कर्मचारी त्यांनी सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला त्वरीत मिळण्याबाबत सभागृहाबाहेर मोठमोठ्याने घोषणा देत होते.)

**श्री.काशिनाथ कोकाटे, सौ.लता दलाल :** बाहेर कुण्यातरी कमर्चाऱ्याचा आवाज येतो आहे. सदर कर्मचाऱ्यांच्या काय मागण्या आहेत खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित कर्मचारी कोण आहे या बाबत मला कल्पना नाही त्याच्या काय मागण्या होत्या तसे त्यांनी प्रशासनाला व मला लेखी पत्र देऊन कळवावयास पाहिजे होते. सभागृहासमोर असे गैरवर्तन करुन निदर्शने करणे हे खपवून घेतले जाणार नाही. संबंधित सुरक्षा विभागाचे कर्मचारी यांनी त्यांना इथपर्यंत येऊ न देण्याबाबतची कार्यवाही करावयास पाहिजे होती. तशी कार्यवाही झ ालेली दिसत नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संबंधित कर्मचारी कोणत्या मागणी साठी घोषणा देत आहेत. संबंधित अधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा. त्याचप्रमाणे सदर कर्मचारी सभागृहापर्यंत येऊन मोठमोठ्याने घोषणाबाजी करत असून सभागृहापर्यंत संबंधित विभागाच्या (सुरक्षा रंक्षक) कर्मचाऱ्यांनी त्यांना कसे येऊ दिले त्याच्यांवर ही कार्यवाही झाली पाहिजे व त्यांच्या मागण्या संबंधाने खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** झोन क्र.४ चे कर्मचाऱ्यांना जादा कामाच्या दिवसाचे वेतन वेळेवर मिळाले नसल्यामुळे त्यांनी सभागृहाबाहेर निदर्शने केली आहे. काल पण हे कर्मचारी आलेले होते. संबंधित झोन अधिकारी यांचेशी चर्चा केली असता वेतन वाटप करण्यास क्लार्क (लिपिक) नाही. त्यामुळे वेतन वाटप करता आले नाही. मागील वेळी ज्याप्रमाणे वेतन अदा केले त्याच प्रमाणे याही वेळी तात्काळ अदा करावे अशी सूचना झोन मध्ये दुपारी १.३० वा. देण्यांत आली. आता बिल आले असेल तर चेक निघु शकतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** ज्या कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली आहे. सदर कर्मचारी ठराविक / दैनिक वेतनावरील किंवा कायमस्वरुपी कर्मचारी आहेत काय?

**मा.सभापती :** कर्मचारी दैनिक वेतनावरील आहे का कायम स्वरुपी आहेत याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** संपूर्ण वर्ष भरातील २ रा व ४ था शनिवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी केलेला कामाचा मोबदला या कर्मचाऱ्यांना त्याच्या मुलाच्या शाळा उघडण्याच्या वेळेला त्यांना वह्या पुस्तके घेण्याच्या दृष्टीकोनातून दर वर्षाच्या एप्रिल मे महिन्यांत अदा करण्यांत येतो. परंतू यावेळेस उशीर झालेला आहे. सदर कर्मचारी हे कायमस्वरुपी सेवेत आहेत.

**सौ.लता दलाल :** यात काही कर्मचारी रोजंदारीवर काम करणारे आहे काय?

**उपआयुक्त (प्र.) :** मागील वर्षाप्रमाणे महिन्याचा २ रा व ४ था शनिवार रोजी सदर कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक सुट्टी उदा.१५ ऑगस्ट, २६ जानेवारी व इतर सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये केलेला कामाचा मोबदला दिला जात होता परंतू दर महिन्याला हे वेतन न देता त्यांच्या आवश्यक वेळी म्हणजे त्यांच्या मुलांना शाळा उघडण्याच्या सुमारास म्हणजे मे महिन्यांत मुलांना वह्या पुस्तके वगैरे खरेदी करण्यासाठी संपूर्ण वर्षातील जादा कामाचे वेतन अदा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार वेतन देण्यांस उशीर झालेला आहेत. म्हणून त्यांनी निदर्शने केली आहे.

**सौ.लता दलाल :** या कर्मचाऱ्यांचे वेतन महिन्याचे थकीत का वर्षाचे याचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** कर्मचारी हे कायम स्वरुपी असून २ च्या व ४ थ्या शनिवारी सार्वजनिक सुट्टीच्या (सनाच्या) दिवशी केलेल्या कामाचा मोबदला त्यांना देण्यांत येतो. सुट्टीच्या कामाचा मोबदला शाळा सुरु होण्यापुर्वी मुलांना शैक्षणिक साहित्य खरेदी करता यावे म्हणून करण्यांत येतो. १३-१४ तारखेच्या दरम्यान वेतन वाटप झालेले आहे. परंतू झोन क्र.४ ला लिपिक नसल्याने वेतन वाटप झ ाालेले नाही. येत्या २ दिवसांत वेतन वाटप करण्यांत येईल.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** अधिकारी यांच्या खुलाशावरुन असे दिसून येते की या संदर्भात अधिकारी यांनी योग्य ती काळजी घेतलेली नाही. ही चुक कोणाचीही असो यापुढे काळजी घ्यावी.

**मा.सभापती :** यापुर्वीही कर्मचाऱ्यांनी सभागृहासमोर निदर्शने केली होती. कामगारांनी ही तशा त्याच्या मागणी संदर्भात निवेदन माझ्याकडे दिलेले नाही या अगोदर निवेदन द्यावयास पाहिजे ही पध्दत चुकीची आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** संपूर्ण वर्षाचे वेतन एकत्रित देणे हा कोणता नियम मनाप्रमाणेच प्रशासनाने अंमलात आणला कोणत्याही कंपनी, संस्था, कारखाने याठिकाणी दर महिन्यांला पगाराची ॲडजेसमेंट करुन वेतन महिन्यालाच दिले जाते. आपल्याच महानगरपालिकेने हा नवीन प्रयोग सुरु केलेला दिसतोय? त्याचप्रमाणे अतिरिक्त कामाचा भत्ता देता येतो का? तशी मंजूरी घेतली काय?

**मा.सभापती :** उपआयुक्त (म.) यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतना संबंधात कार्यवाही करावी. (यावेळी उपआयुक्त (म.) सभागृहाबाहेर जातात.)

**श्री.कोकाटे काशिनाथ :** सभागृहापर्यंत सदर कर्मचारी आले याचा अर्थ प्रशासनावर व सभागृहावर दबाव आणण्याचा हा प्रकार आहे. संबंधित कामगारांनी मा.सभापती, प्रशासनास निवेदन देऊन अगोदर कळवावयास पाहिजे होते. नियमाने त्यांच्यावर कार्यवाही व्हावयास पाहिजे. संपूर्ण वर्षाचे एकत्रित वेतन देणे ही प्रशासनाची पध्दत योग्य वाटत नाही.

**सौ.लता दलाल :** कायमस्वरुपी कर्मचारी असतांना गैरवर्तन करतात. एकतर यांनी मा.सभापती यांना अगोदर याबाबत निवेदन देऊन कळवावयास पाहिजे होते.

२) सदर कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाबाबतचे वेतन मे महिन्यांत देण्यांत येते. वर्षभरात एका कर्मचाऱ्यांना त्याचप्रमाणे प्रत्येक झोनमध्ये महिन्याला या पध्दतीने किती वेतन देण्यांत येते. मे महिन्यांत वेतन अदा करण्यांत येते असे संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. वर्षाला न देता सहा महिन्याला दिल्यास योग्य होईल.

**मुख्य लेखाधिकारी :** सन १९९५ पासून प्रत्येक झोनच्या कर्मचाऱ्यांना दर महिन्याला जास्तीच्या कामा बाबतचा मोबदला देण्यांत येत होता. परंतू काही कर्मचारी संघटनेच्या लोकांचे मत घेतले असता दर महिन्याला न देता संपूर्ण वर्षाचा पगार आर्थिक वर्ष संपल्यावर एकदम एप्रिल ते मे महिन्याच्या दरम्यान अदा करण्यांत यावा असा निर्णय घेतलेला आहे. परंतू प्रत्येक झोनमधून कोणत्या कर्मचाऱ्यांनी दर महिन्याला किती दिवस काम केले या बाबतची हजेरी पट भरुन संबंधित लेखा विभागात पावसाळ्यांत अशा सुचना दिलेल्या आहेत असे असतांना देखील दर महिन्याच्या हजेरी भरुन येत नसल्यामुळे कोणत्या कर्मचाऱ्यांनी किती दिवस काम केले एकदम हजेरी भरुन पाठवल्यास त्याची पडताळणी करण्यास वेळ लागतो त्यामुळे चेक पास होण्यास उशीर होतो.

जर महिन्याला वेतन अदा करावयाचे असेल तर असे प्रशासनाने आदेश निर्गमित करावे अतिरिक्त कामाचा मोबदला देण्याबाबतची सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार वेतन अदा करण्यात येते. मिनी आयुक्तालय सुरु झाल्यापासून झोन मध्येच बिल करावयाचे आहे. झोन क्रमांक ४ चे देयक आले नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** संबंधित कर्मचारी संघटनेच्या नेत्याशी चर्चा करुन कोणत्या पध्दतीने जादा काम केल्याचे मोबदला देण्याबाबत कार्यवाही करता येईल.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** महाराष्ट्रात कोणत्या ही सरकारी खात्यामध्ये अतिरिक्त कामाचा मोबदला दर वर्षाला देत नाही. प्रत्येक महिन्याला अदा करण्यांत येतो. जे कर्मचारी झोनमध्ये अतिरिक्त काम करतात त्या संबंधी संपूर्ण रेकॉर्ड झोनमध्ये असतो काय? दर महिन्याचे तपशिल ठेऊन योग्य यादी तयार करुन संबंधित लेखा विभागात दिली जाते काय? ज्या याद्या वेतनासाठी दाखल करण्यांत येतात यात काही कर्मचाऱ्यांचे वय २२ वर्ष असून त्याची सेवा ७ वर्षाची आहे. अशा कर्मचाऱ्यांना अतिरिक्त भत्ता देण्यांत येतो त्या संबंधीचे माहिती माझ्याकडे असून ती सभागृहात निदर्शनास आणून देणार आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यांचे अतिरिक्त कामाचे वेतन दर महिन्याला दिले तर योग्य होईल. प्रशासनाला अडचण निर्माण होणार नाही. स्वच्छ प्रशासन आहे असे जनतेला कळेल.

**मा.सभापती :** सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाबाबतचा मोबदला वर्षाला न देता दर महिन्याला देण्याबाबतची कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी करावी. व तशा सूचना झोन अधिकाऱ्यांना देण्यांत याव्यात. तसेच झोन अधिकारी यांनी ज्या कर्मचाऱ्यांनी महिना भरात कोणत्या दिवशी काम केले याबाबतचा योग्य तपशिल संबंधित विभागाला पाठवावा. त्यानुसार त्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला प्रत्येक महिन्याला देण्यांत यावा. त्याचप्रमाणे मागील बैठकीत विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यांत आलेला नव्हता त्याचा खुलासा संबंधित अधिकारी या बैठकीत देणार होते. १) इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२ वर दुय्यम अवेक्षकाची दोन पदे कोणत्या नियमाने भरण्यांत आली.

**उपआयुक्त (प्र.) :** दुय्यम आवेक्षकाची पदे भरण्या संदर्भात लेखी पत्र देऊन मा.सभापती स्थायी समिती यांना कळविण्यांत आलेले आहे.

**मा.सभापती :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.६ वर जे लोक हातगाडीवर माल वाहतुक करतात त्यांना फिस आकारण्यांत येऊ नये याबाबत चर्चा केली होती. संबंधित अधिकारी यांनी काय निर्णय घेतला माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** हातगाडीवर माल वाहतूक करणाऱ्या लोकांपैकी श्री.शेख बशीर यांनी या संदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत कार्यवाही करता येणार नाही.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** संबंधित हातगाडीवर माल वाहतूक करणाऱ्यांना फिस आकारु नये. फक्त जे माल हातगाडीवर विक्री करतात त्यांनाच २५० रु. फिस आकारण्यांत यावी त्यांना सुट दिली तर न्यायालयात गेलेला व्यक्तीला त्यासंबंधीची केस मागे घ्यावयास लावू.

**श्री.विखारोद्दीन :** सदर व्यक्ती मजबुरीने न्यायालयात गेलेला आहे असे दिसते अनेक वेळा हे लोक महानगरपालिकेकडे आले कोणीही त्यांचे ऐकले नाही. म्हणून ते न्यायालयात गेले.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी न्यायालयात गेलेल्या व्यक्तींशी तसेच त्याच्या संघटनेतील लोकांशी चर्चा करुन प्रशासकीय दृष्टीने योग्य तो निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** पृष्ठ क्र.७ वर कब्रस्तान मध्ये झालेल्या अतिक्रमणाबाबत मागच्या बैठकीत चर्चा होऊन कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले त्यानुसार कार्यवाही केली काय? खुलासा करावा.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** कब्रस्तान मधील जागेवर अतिक्रमण संदर्भात संबंधितांना नोटीसा दिलेल्या असून मुदत संपल्यानंतर काढून टाकण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** संबंधितांना नोटीस देण्याची आवश्यकता नव्हती नोटीस दिल्यानंतर लोक न्यायालयात केसेस दाखल करतात. न्यायालयाची त्यानुसार स्थगिती मिळते व त्यामुळे पुढील काहीही कार्यवाही होत नाही. यासाठी जे अतिक्रमणात आहे ते नोटीसा न देता अतिक्रमण काढण्यांत आले पाहिजे. अधिकारी यांच्या नेहमी बदल्या झाल्याचे दिसत आहे प्रत्येक वेळी नवीन अधिकारी सभागृहात खुलासा करतात नेमकी योग्य कोणती ही कार्यवाही होत नाही.

**मा.सभापती :** १) स.सदस्य श्री.विखारोद्दीन यांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

२) पृष्ठ क्र.८ वर अग्निशामन विभागात साहित्य खरेदी बाबत नावासहीत ॲटमची माहिती या बैठकीत देणार होते खुलासा करावा.

**श्री.विखारोद्दीन :** सभा असतांना अधिकारी गैरहजर असतात त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी उपस्थित नाही पुढच्या बैठकीत माहिती विचारण्यांत येईल.

**सौ.लता दलाल :** छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयासाठी श्री.ऋणवाल हे नाणी देवू इच्छितात. त्यांनी अशी मागणी केली आहे की श्री.लामतुरे यांना ज्याप्रमाणे फॅसिलीटीज देण्यांत आल्या आहेत. त्या फॅसिलीटी मला ही देण्यांत यावे. या संदर्भात माजी सभापती यांनी मागील दि.०८.०१.९९ च्या बैठकीत तसा निर्णय घेतलेला असून त्यानुसार कार्यवाही होते काय? खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** श्री.लामतुरे यांच्यासह केलेल्या करारनाम्याप्रमाणेच श्री.ऋणवाल यांचे बरोबर करारनामा करण्याची संचिका तयार करुन मंजूरीसाठी पाठवण्यांत आली होती. दरवर्षी रु.२५,०००/- देण्यांत येईल. परंतू साहेबांनी अटी मान्य केले नाही. त्यांच्या आई वडीलांचे त्रास लेटरमध्ये नांव लिहिण्यास मान्य करण्यांत आले आहे.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांनी नावे देणे बाबत मंजूरी दिली आहे. त्यानुसार श्री.ऋणवाल यांचे नाणे देण्याबाबत प्रस्तावाचा विचार करुन सदर संचिका मागवून पुढील कार्यवाही व्हावी.

**सौ.लता दलाल :** साईनगर सिडको एन-६ येथे दुकान केंद्र बांधण्यांत येणार आहे. सदर दुकाने देतांना घेण्यांत येणाऱ्या रक्कमेचा हप्ता २४ हप्ते करुन वसुल करण्यांत यावे अशी मागणी होत आहे. ही सवलत देण्यांत यावी आपल्याकडे कर आकारणी विभाग असून जे कर्मचारी वसुली मोहिम साठी नेमण्यांत येतात ते योग्य त्या पध्दतीने कामगिरी पार पाडत नाही.

चिकलठाणा येथील पुनम बिस्कीट कंपनी मालकांनी काही जागा गरवारे कंपनीला भाड्याने दिल्यानंतर काही वर्षानंतर ती जागा गरवारे कंपनीचे मालक यांनी रिकामी करुन दिली. मधल्या काळात जो नियमाने टॅक्स वसुल करावयास पाहिजे. तो केलेला नाही पुनम बिस्कीट कंपनीचे मालक यांनी तक्रार केलेली आहे. की सदर जागा ही भाड्याने गरवारे कंपनीला दिली होती त्या कालावधीतील जो टॅक्स लावण्यांत आला तो जास्तीचा लावण्यांत आला असून कमी करण्यांत यावा. किती टॅक्स वसुल केला खुलासा करावा.

**करमूल्य निर्धारण अधिकारी :** संचिका बघून पुढच्या बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** औद्योगिक वसाहतीमधील किती कंपन्याना वेगवेगळे पध्दतीने टॅक्स (कर) आकारण्यांत येतात किती शेड भाड्याने दिले आहे. एम.आय.डी.सी.मधील परिस्थितीची माहिती आहे का?

**मा.सभापती :** औद्योगिक वसाहतीतील कंपण्यासाठी किती व कशा पध्दतीने कर आकारण्यांत येतात याची माहिती द्यावी.

**सौ.लता दलाल :** एकादी कंपनी दुसऱ्याला भाड्याने दिल्यावर वेगळा कर लागतो.

**करमूल्य निर्धारण अधिकारी :** अपेक्षित भाडे किंवा प्रत्यक्ष भाडे विचारात घेऊन कर आकारणी होते.

**करमूल्य निर्धारण अधिकारी-२ :** जेव्हा प्रत्यक्ष भाडे उपलब्ध होते. त्यावेळी अपेक्षित भाड्याच्या आधारावर लावलेला कर रद्द होतो व प्रत्यक्ष भाड्याप्रमाणे आकारणी करण्यांत येते.

**सौ.लता दलाल :** संबंधित पुनम बिस्कीटस मालक यांचा अर्ज आलेला आहे का? आला असेल तर केव्हा आला आहे? मागच्या तीन बैठकीत सातत्याने माहिती विचारण्यांत येते. उत्तर मिळत नाही.

**मा.सभापती :** पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी योग्य खुलासा करावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यास त्याच बैठकीत खुलासा मिळावयास पाहिजे.

**सौ.लता दलाल :** निराला बाजार येथील २ ते ३ बैठकीपासून खुलासा विचारण्यांत येतो. परंतू अद्यापपर्यंत योग्य कार्यवाही झालेली दिसत नसून व अधिकारी योग्य खुलासा करत नसल्याचे दिसून येते ज्या बैठकीत उत्तर मागविल्यास त्याच बैठकीत माहिती द्यावयास पाहिजे नाहीतर पुढील बैठकीपासून स.सभासद बैठकीस येणार नाही. याची नोंद घ्यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** न्यायालयाचे स्थगिती आदेश असून न्यायालयात प्रकरण जाण्या अगोदर व आता सध्याची स्थिती काय आहे. याबाबत योग्य तो पंचनामा व चौकशी करण्या संदर्भात संबंधित विधी सल्लागार मार्फत प्रशासकीय अधिकारी यांना दि.१०.०६.९९ ला पत्र दिले परंतू अद्यापपर्यंत त्यांनी माहिती विधी विभागास पाठवलेली नाही.

**सौ.लता दलाल :** संबंधित उपआयुक्त (म.) याच्यावर कार्यवाही करावी. सभागृहात प्रत्येक वेळेस नवनवीन अधिकारी खुलासा करतांना दिसतात. सभागृहात अधिकार दिशाभूल करतात व चुकीची माहिती सांगतात अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. न्यायालयाची स्थगिती आहे.

**मा.सभापती :** अधिकारी यांना सुचना करु इच्छितो की, ज्या बैठकीसाठी माहिती मागविण्यांत आली असेत ती यापुढे उपलब्ध ठेवावी. पुढच्या बैठकीतही

माहिती मिळत नाही. त्यामुळे कामात दिरंगाई होते. व स.सभासदांचे समाधान होत नाही. सदर प्रकरणी विधी विभागाने १०.०६.९९ ला पत्र दिले. माहिती का पाठविली नाही. याचे उत्तर पुढच्या बैठकीत मिळावयास पाहिजे.

**सौ.लता दलाल :** विकास कामा संदर्भाचे कमी दराच्या निविदाद्वारे कामे करुन देण्याबाबचा संचिका मंजूरीसाठी येतात यांच्या चौकशीसाठी समिती नेमलेली असून खुद्द मा.सभापती हे या समितीचे अध्यक्ष असून कोणकोणत्या संचिका कमी दराच्या आहे. त्याबाबत अद्याप संबंधित अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

**मा.सभापती :** ज्या त्या विभागातील प्रत्येक कार्यकारी अभियंता यांनी ज्या संचिका कमी दराने काम करुन देण्याच्या आहेत त्या संदर्भात २-३ दिवसात कमी दराचे माहिती नावासह पुरविण्यांत यावी.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** मी सभागृहात दरसुची बाबत विचारणा केली खुलासा समाधानकारक मिळाला नाही. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार समिती नेमून योग्य चौकशी होण्यासाठी व त्यानुसार मागविलेला खुलासा सभागृहात रितसर मिळाला पाहिजे यासाठी पत्र दिलेले आहे. दरसुची नुसार किती रुपयाचे काम झाले. त्या संबंधीच्या निविदा कधी काढण्यांत आल्या तसेच या नवीन दरसुची प्रमाणे परवानगी घेऊन निविदा काढण्याचे कारण काय? याचा खुलासा झ ााला पाहिजे. तसेच स.सदस्य श्री.मोहसीन अहेमद यांनी पत्र देऊन कळवले आहे की, खोतकर ॲण्ड असोशिएटस यांनी काम केले परंतू त्याचे बिल अदा करण्यांत आले नाही. याबाबत पेपर मध्ये बातमी आलेली असून हे योग्य नाही. कुणावर अन्याय होणार नाही. याची प्रशासनाने काळजी घेतली पाहिजे.

**मा.सभापती :** संबंधित अर्कीटेक्टच्या नावाने काही लेखी अपील माझ्याकडे आलेले नाही. त्यांनी रितसर अर्जाद्वारे अपील द्यावे. त्यानुसार त्यांना बील अदा करण्या संदर्भाची कार्यवाही करता येईल.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** वार्डामध्ये कचरा साठलेला असून ३-३ व ४-४ दिवस कचरा उचलला जात नाही. कर्मचाऱ्यांना हातगाड्या कचरा उचलण्यासाठी नाही, टोपल्याने हे कर्मचारी कचरा उचलू शकत नाही. झोनल कमिशनर यांना ज्या त्या वाडी संदर्भात हातगाड्या वाटप करण्यास कार्यवाही व्हावी तसे आदेश द्यावेत.

**मा.सभापती :** सर्व झोनल अधिकारी यांना सुचना करण्यांत येते की, शहरातील ज्या त्या झोनमधील कचरा उचलण्याबाबत कार्यवाही करावी. शहरात रोगराई होणार नाही याची काळजी घ्यावी.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** काही झोनमध्ये मजूर कमी केल्यामुळे झोन मध्ये कचरा उचलण्यासाठी मजूर नाहीत टॅक्ट्रर लावले तर मजूर नाही माझ्या वार्डात बऱ्याच ठिकाणी कचरा साठलेला दिसतो. हातगाड्या नाहीत. टोपल्याने कचरा उचलने शक्य होत नाही.

**सौ.लता दलाल :** आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदाच्या दोन जागा भरण्यांत आल्या नवीन नियमाच्या अवलंब करुन जागा भरल्या आत आहे. याबाबत चौकशी व्हावी.

**मा.सभापती :** प्रशासनाने केलेला खुलासा सचिव यांनी वाचून दाखववावा.

**मा.नगरसचिव :** पत्र वाचून दाखवतात.

**उपआयुक्त (प्र.) :** चौकशी करण्यासाठी १ महिन्याचा कालावधी लागेल.

**श्री.देशमुख व्ही.व्ही.** : दरसुचीच्या संदर्भात लेखी माहिती देण्यांत येणार होती. ती मिळाली नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** : सभेमध्ये संपूर्ण खुलासा करण्यांत आलेला आहे.

**मा.सभापती** : या संदर्भात स.नगरसेवकांना लेखी माहिती देण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन** : पैठणगेट ते क्रांतीचौक पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्या संदर्भाने ५६ लाख खर्चाची मंजूरी दिलेली आहे. आतापर्यंत कुठपर्यंत कार्यवाही झाली खुलासा करावा किती दिवसांत कार्यवाही पूर्ण होईल.

**सहा.संचालक, नगररचना** : काही मिळकत धारक न्यायालयात गेलेले असून सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत होणार आहे. मोबदल्याची रक्कम आपण त्यांचेकडे पाठवणार व ते बाधित मिळकतीचा ताबा घेवून आपणांस देतील.

**श्री.विखारोद्दीन** : महानगरपालिका कधी चेक पाठवणार आहे व केव्हा ताबा घेण्यांत येईल.

**सहा.संचालक, नगररचना** : किमान एक महिन्याचा कालावधी लागेल.

**सौ.लता दलाल** : सिटी चौक ते गुलमंडी ते पैठणगेट पर्यंत रस्ता रुंदीकरण होऊ शकत नाही काय हा रस्ता विकास योजनेमध्ये समाविष्ट केलेला नाही का? ९०% लोक वाटाघाटीने जागा देण्यांस तयार आहे. पुढील कार्यवाही झाली नाही.

**सहा.संचालक, नगररचना** : यासाठी जास्त खर्च येईल. भूसंपादनाची कार्यवाही सुरु केलेली नाही.

**मा.सभापती** : सर्व लोकांसह चर्चा करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन** : नेहरुभवन येथील हॉल मध्ये पडद्याच्या संदर्भात ४-५ महिन्यापुर्वी पत्र दिले कार्यवाही नाही तसेच शॉपींग सेंटर बाबत कार्यवाही होण्यासाठी पत्र दिले. सभागृहात दुकाना संदर्भात चर्चा होऊन मागील हराशी करणाऱ्यांना विचार करण्यांत येईल. असे आयुक्तांनी सांगितले होते पुन्हा वृत्तपत्रात नेहरुभवन येथील दुकान लिलावाबाबत जाहिर निवेदन देण्यांत येऊन ही कार्यवाही अशीच चालू राहणार आहे काय?

**मालमत्ता अधिकारी** : आज जाहिर लिलाव होता. कोणीही उपस्थित झाले नाही.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन** : पहिल्यांदा लिलाव करण्यात आला होता. त्यावेळी ३५.४० हजारापर्यंत ज्या लोकांनी लिलाव केला होता तो योग्य होता. १ ते १.५० लाखापर्यंत ८'x१०' जागेचा भाडे म्हणून कुणीही देण्यास तयार नाही व देणार सुध्दा नाही लिलाव करणे, परत रद्द करणे पुन्हा लिलाव करणे ही कार्यवाही किती दिवस चालू राहणार माहिती द्यावी. पहिल्या लिलावात बोलीधारकांना देण्याबाबतचे आश्वासन मा.आयुक्त यांनी दिले होते.

**मालमत्ता अधिकारी** : पहिल्यांदा लिलाव झाला होता. दुसऱ्यावेळी होत असल्याने पहिल्या वेळची बोली रद्द झाली आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन** : पहिल्या लिलावातील लोकांना देण्याबाबत कार्यवाही व्हावी त्याचप्रमाणे नेहरुभवन येथील हॉल मध्ये पडदे बाबत खुलासा करावा.

**उप अभियंता (इमारत)** : लेखा विभागाकडे पाठविण्यांत आले आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन** : संरक्षित भिंत बाबतचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (स्लम)** : बजेट नाही म्हणून मागील बैठकीत खुलासा करण्यांत आला होता.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** बजेट नाही म्हणता संरक्षित भिंत बांधण्या बाबतचे ठराव कसे येतात. यात हिंदु नगरसेवक यांच्या वार्डातील प्रस्ताव मंजूरीसाठी आलेले दिसतात. मुसलमानाच्या वार्डातील प्रस्ताव मंजूरीसाठी दिसत नाही असा माझा आरोप आहे.

**मा.सभापती :** सदर संरक्षित भिंत बांधण्यासाठी बजेट नव्हते. रिवॉईजड् बजेटमधून संरक्षित भिंत बांधण्याबाबत संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** महानगरपालिका आस्थापनेवर तीन दिवसांत म्हणजे दि.१७.०६.९९ ते २१.०६.९९ या कालावधीत अनुरेखक ६, शिपाई १०, शिक्षक ८ अशा एकूण २४ कर्मचाऱ्यांची भरती करण्यांत आली. सदर कर्मचाऱ्यांची भरती कोणत्या नियमाने केली तीनच दिवसांत एवढ्या कर्मचाऱ्यांना होण्याची प्रशासनाला काय आवश्यकता पडली खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** डिसेंबर १९९८ मध्ये शिक्षक भरती केलेली होती. जी पदे रिक्त झालीत काही सेवानिवृत्त झाले. त्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर त्याच प्रतिक्षा यादीतील उमेदवारातून ८ शिक्षकांच्या जागा भरण्यांत आल्या. ज्यावेळी रिक्त जागा होतील त्या याच यादीतील होण्यात याव्या असा निर्णय निवड समितीने घेतलेला होता.

**मा.सभापती :** हे निवड मंडळ नाही या ठिकाणी प्रतिक्षा यादी चालत नाही.

**मुख्य लेखापरिक्षक :** निवड मंडळाची व निवड समितीची कार्यपध्दती एकच आहे मागे जी जी भरती करण्यांत आली त्याची प्रतिक्षा यादी ११ महिन्यांपर्यंत ठेवता येते. त्यानुसार सदर ८ शिक्षकांची प्रतिक्षा यादीतून नेमणूक करण्यांत आली.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** शिक्षकांची भरती करतांना जाहिरात अर्ज सेवायोजन, समाजकल्याण, तसेच आदिवासी ज्या ज्या कार्यालयाकडून पात्र उमेदवारांची यादी मागवली होती व परिक्षा घेऊन शिक्षकाची भरती केली होती. त्या प्रतिक्षा यादीत ज्या उमेदवारांची नावे आहेत. त्यातीलच ८ शिक्षकांना आदेश दिलेले आहेत काय? किंवा वरील कार्यालयाकडून मागणी केलेल्या यादीतील नावा व्यतिरिक्त हया शिक्षकांमध्ये कुणाला आदेश दिलेले आहेत काय? सदर प्रतिक्षा यादी, पहिल्या शिक्षकाची भरती केली. त्यावेळेस नोटीस बोर्डवर लावलेली होती काय?

**उपआयुक्त (प्र.) :** ज्या त्या कार्यालयाकडून पात्र उमेदवारांची यादी मागवून त्यानुसार डिसें.९८ मध्ये निवड झालेल्या प्रतिक्षा यादीतील शिक्षकांच्या यादीतीलच ८ शिक्षकांची नेमणूक केलेली आहे. त्या व्यतिरिक्त बाहेरील कुण्याही उमेदवारांची शिक्षक पदावर नेमणूक केलेली नाही राखीव प्रवर्गासाठी असलेला कोठा पूर्ण भरण्यांत आला आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** सदर भरती ही शाळा उघडण्याच्या अगोदर मे.महिन्यांत करावयास पाहिजे होती. परंतू तातडीने आयुक्तांची बदली झाली आणि २-३ दिवसातच रविवारी सुध्दा कामकाज चालू ठेऊन संबंधित शिक्षक, अनुरेखक व शिपाई यांना आदेश पारीत केले यात अधिकारी यांनी फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा वास येतो.

**उपआयुक्त (प्र.) :** असे वाटत असेल तर सभागृहाने चौकशी समिती नेमावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** आयुक्तांची बदली झालेली होती. मा.महापौरांनी आयुक्तांना पत्र दिले होते. भरती करण्यात येऊ नये. असे असतांना ३ दिवसातच २४ कर्मचाऱ्यांची भरती करणे हा महानगरपालिकेच्या महापौरांचा अवमान आहे.

याच बरोबर ६ अनुरेखक यांनाही आदेश देण्यांत आले सदर पदे तात्काळ भरण्यास प्रशासनाला काय गरज पडली होती.

**उपआयुक्त (प्र.) :** निवड समिती मार्फत ही यादी १५ दिवसापुर्वीच प्रशासनाकडे आलेली होती. त्यामुळे १९ तारखेच्या अगोदर आदेश काढून मा.महापौर यांना याबाबतची एक प्रत सादर केलेली आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** श्री.गारे आयुक्त असतांना अशाच प्रकारे २००० हजार नोकर भरती करण्यांत आली होती. त्याचप्रमाणे यावेळी झाली काय?

**मा.सभापती :** दि.१७.०६.९९ ते २१.०६.९९ या कालावधीत जी शिक्षक भरती तसेच इतर विविध पदाची भरती करण्यांत आलेली आहे. त्या संदर्भात संबंधित माहिती पुढच्या बैठकीत दाखवण्यांत यावी.

**सौ.विमलताई मुंडलिक :** मागील बैठकीत सिडकोतील अनाधिकृपणे काही रहिवाश्यांना नळपट्टी लादण्यांत आली ती नळपट्टी रद्द करण्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. आतापर्यंत काय कार्यवाही झाली माहिती द्यावी.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मा.आयुक्त यांच्याशी २ वेळा चर्चा केली आज ही बाब प्रमाणित करुन देण्यांस कोणीही तयार नाही. या संदर्भात एक प्रकरण न्यायालयात गेलेले होते.

**सौ.मुंडलिक विमलताई :** शहरातील मोबाईल्स वर जकात लावण्यांत येते काय?

**जकात अधिक्षक :** मोबाईल्स फोनवर ४% दराने जकात लावण्यात येते.

**श्री.राजकुमार बचाटे :** सिमकार्ड ५ हजार रुपयांपर्यंत खरेदी केला जातो त्यावर टॅक्स आकारतात काय आतापर्यंत शहरात किती मोबाईल्स फोन आले आहेत माहिती द्यावी.

**सौ.लता दलाल :** मोबाईल्स व सिमकार्ड यांच्यापासून आतापर्यंत किती जकात वसूल केली आहे.

**जकात अधिक्षक :** मोबाईल्स व सिमकार्ड यांच्या पासून येणारी जकात वसूल केलेली आहे. किती वसूली झाली हे निश्चित सांगता येणार नाही.

**सौ.लता दलाल :** ज्या एजन्सीज कडून ग्राहक खरेदी करतात त्या त्या एजन्सीकडून माहिती घेऊन ज्याच्याकडून वसूल केली नाही ती वसूल करण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्य सौ.दलाल यांनी सांगितल्यानुसार ज्या ज्या एजन्सीज कडून मोबाईल्स व सिमकार्ड खरेदी केले आहे. त्याची माहिती घेऊन जकात वसूल करण्या बाबतची कार्यवाही करावी. बी.पी.एल.व ए.टी.एन.टी. कंपनी कडून याद्या मागवाव्या.

**श्री.बचाटे राजकुमार :** शहराती मोकाट कुत्रे फिरतात त्यांना पकडण्याची मोहिम कधी राबवल्या जाते माहिती द्यावी सरासरी महिन्याला किती कुत्रे पकडण्यांत येतात.

**पशुधन विकास अधिकारी :** दररोज मोहीम राबविली जाते. शक्यतो मुख्य रस्त्या जसे जालना रोड व इतर रस्त्यावरही मोहीम राबविली जाते. कुणाच्या तक्रारी वरुन ही त्या भागातील मोकाट कुत्रे पकडण्याची कार्यवाही होते.

**सौ.लता दलाल :** मोकाट कुत्रे पकडण्यासाठी किती गाड्या आहेत.

**पशुधन विकास अधिकारी :** शासनाची योजना आहे. त्यामध्ये जालन्याचाही भाग येतो. एकच गाडी असून रात्री दिवसा ही मोहीम राबविली जाते. एक गाडी २ ड्रायव्हर दोन महिन्यापासून एकच ड्रायव्हर आहे. एकाच गाडीमध्ये काम भागते.

**सौ.लता दलाल :** एकाच गाडीमध्ये काम भागते तर नागरिकांच्या तक्रारी कशा येतात.

**पशुधन विकास अधिकारी :** गाडी संपूर्ण शहरात फिरतीवर असते. ज्यावेळेस मोकाट कुत्रे आहे असे दिसून आल्यास त्या त्या कुत्र्यांना पकडण्यांत येते. कुत्रे पुन्हा पुन्हा जन्माला येतात. पकडण्याची कार्यवाही चालूच राहणार ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. एकदम शहरात मोकाट कुत्रे दिसणार नाही असे होऊ शकणार नाही. मे महिन्यांत एकूण २२७ कुत्रे पकडले.

**मा.सभापती :** संबंधित विभागात एक ड्रायव्हर देण्याबाबत संबंधित उपआयुक्त (प्र.) यांनी कार्यवाही करावी. जेणेकरुन दोन पाळीमध्ये कुत्रे पकडण्यांसाठी दिल्यास नागरिकांच्या तक्रारी येणार नाही दिवसा व रात्री कुत्रे पकडण्यासाठी दोन शिफ्टमध्ये काम करण्यांत यावे. रात्री गाडी चालवण्यात यावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** दोन महिन्यापासून वाढीव पाणीपट्टी लावण्यावरुन सभागृहात चालू असतांना स्टॅण्ड पोस्ट नळाला बिले आकारणे हा त्यातलाच हा एक भाग आहे. त्यानंतर ७-८ वर्षानंतर पाण्याची लाईन टाकण्यांत आली येथे टाईप एक ची ३०० घरे सार्वजनिक नळखांब (स्टॅण्ड पोस्ट) पासून पाणी घेत होते. पाणीपट्टी म्हणनू ५-५ ते ७-७ हजार रु.बिले आकारण्यांत येऊन भरणा करण्या बाबत नोटीस देऊन कार्यवाही सुरु केली आहे. स्टॅण्ड पोस्ट नळांना बिले आकारणे योग्य वाटत नाही. असे माझे मत आहे. अशा आशयाचे पत्र सिडको प्रशासना संबंधी अधिकाऱ्यांना दिलेले आहे. त्या लोकांना नळ कनेक्शन दिले नव्हते. चुकीने बिलाची आकारणी करण्यांत आली ते परत घेण्यांत यावे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी चौकशी करावी.

**श्री.राजकुमार बचाटे :** विकास कामा संदर्भात १५ दिवसापासून जेटींग मशीनची मागणी करत आहे. सदर मशीन नेहमी नादुरुस्त असते. दोन वेळा माझ्याकडे आली. नादुरुस्त असल्याचे दिसते.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** झोन क्र.३ मध्ये चोकअप काढण्याच्या कामासाठी काल पाठवण्यांत आले होते. पाईप अडकला होता. चोकअप काढण्यांत आले आहे.

**श्री.विखारोद्दीन :** प्रत्येक झोनला जेटींग मशिन दिवस ठरविण्यांत आले आहे. आम्ही मागणी करतो त्यावेळी आमच्या झोनच्या कामासाठी देत नाही. आमच्या झोनला कामाचा दिवस असतांना दुसऱ्या झोनला पाठवण्यांत येते.

**सौ.राधाबाई तळेकर :** दिनांक १७.१२.९८ ला माझ्या वार्डात चौधरी नावाच्या व्यक्तीने महानगरपालिकेच्या त्रिकोनी खुल्या जागेवर अतिक्रमण करुन टपऱ्या टाकलेल्या आहेत. मनपाने भाजी मार्केटसाठी गार्डन जवळ गाळे बांधले व ही त्रिकोणी जागा खुली ठेवण्यांत आली या खुल्या जागेकडे दुर्लक्ष झाले. चौधरी यांनी ही जागा रु.५००, रु.१०००/- ने भाड्याने दिले असून स्वतः दुध विक्री करत आहे. या संदर्भात प्रशासकीय अधिकारी व त्या संबंधात येणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना तक्रार अर्जाच्या प्रत दि.१७.१२.९८ ला पत्र देऊन कळविले. संबंधित अधिकारी सदर व्यक्तीला भेटतात चर्चा करतात. परंतू कार्यवाही करत नाही. संबंधिताला नोटीसा न देता अतिक्रमण हटवावे.

**शहर अभियंता :** सदरची जागा महानगरपालिकेच्या रेखांकनामध्ये येते काय प्रत्यक्ष बघून चौकशी करुन कार्यवाही करता येईल.

**सौ.तळेकर राधाबाई :** संबंधित व्यक्तींने खुलेआम मनपाच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. त्यास नोटीस न देता तात्काळ तोडण्यांत येऊन संबंधित व्यक्तीवर कार्यवाही झाली पाहिजे दोन दिवसांत निर्णय घ्यावा.

**मा.सभापती :** खुल्या जागेवरील अतिक्रमण काढावे अभिलेख तपासणी करुन घ्यावी. खुली जागा असेल तर त्याबद्दल काळजी घेण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन :** इतिवृत्ताबरोबर ८ ते १० विषय असतात ऐनवेळी जवळजवळ ४५ विषय देण्यांत आलेले असून त्याबद्दल स.सदस्यांना अभ्यास करण्यासाठी वेळ मिळत नाही. तरी ऐनवेळी देण्यात येणारे विषय इतिवृत्ताबरोबर ३ दिवस अगोदर देण्यांची कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** यापुढे दर आठ दिवसाला बैठक घेऊ.

**विषय क्र.१२४/१ :**

दिनांक ९ जुन १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास कायम करणे.

<u>**संवाद :-**</u>

**श्री.विखारोद्दीन :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.४ वर वर्ग-४ मधील प्रत्येक झोनला जवान देण्याबाबत चर्चा केली होती. कार्यवाही झालेली नाही.

**मा.सभापती :** मा.महापौर यांनी मागील सर्वसाधारण सभेमध्ये मा.आयुक्तांना आदेशित केलेले आहे. ज्या ज्या झोनची मागणी येईल. त्यानुसार नोकर भरती करावी.

**श्री.विखारोद्दीन :** हातगाड्या कधी येणार आहेत.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** कचरा दोन पाळीत उचलू शकत नाही. शहरात गेल्या पावसाळ्याप्रमाणे काम होत नाही. यामुळे स.सदस्यांची बदनामी होईल.

**मा.सभापती :** मा.आयुक्त भोगे साहेब असतांना कचरा दाखवा व १०/- रु.मिळवा अशा पध्दतीने यादी प्रशासनाने कार्यवाही करावी. जेणेकरुन शहरात कोठेही कचरा साठलेला दिसणार नाही. विषय क्र.१ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दि.९ जून १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जाफरगेट कब्रस्तान रेस्टींग शेड बांधणे, संरक्षित भिंत बांधणेसाठी सा.बां.विभागाचे सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,२०,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर काम हे स्मशानभूमी विकास या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे.

सबब जाफरगेट कब्रस्तान रेस्टींग शेड बांधणेसाठीचे रक्कम रु.४,२०,२००/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट कब्रस्तान रेस्टींग शेड बांधणे, संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,२०,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.अशोकनगर लक्ष्मी कॉलीन येथे श्री.विजय सोनार ते तायडे यांचे घरापर्यंत नवीन मीनी व्यास.एस.डब्ल्यु.जी.लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,००,५२५/- चे परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाच्यया सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक "भांडवली कामे" १९९९-२००० यातून प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. मा.आयुक्तांनी दि.११.०६.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.अशोक नगर लक्ष्मी कॉलनी येथे श्री.विजय सोनार ते तायडे यांचे घरापर्यंत नवीन - १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी. लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,००,५२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२७/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलनी येथे नाल्यास भिंत बांधणे बाबत सा.बां.विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१९,७८,४००/- ला सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता एकूण (२४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मेराज अली | - | ३२.५५% कमी |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | २४.८६% कमी |
| ३. | मे.हयात कॅन्स्ट्रक्शन | - | २२.१६% कमी |
| ४. | मे.एस.एच.असोशिएटस | - | २०.२१% कमी |
| ५. | श्री.अब्दुल सलाम | - | १७.८६% कमी |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.मेराज अली यांची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.५५% कमी दराची आहे.

तरी श्री.मेराज अली यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.५५% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** निविदा ३२.५५% कमी दराची आहे. संबंधित एजन्सीकडून दर पृथःकरण (रेट ॲनालिसीस) घेण्यांत यावे व कार्यकारी अभियंता यांनी संपूर्ण माहितीसह सादर करावे.

**मा.सभापती :** सदर विषय स्थगित ठेऊन पुढच्या बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवण्यांत यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१२८/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.रहीम कॉलनी, हबीब कॉलनी, हत्तेसिंगपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.५,६४,०००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक "भांडवली कामे" १९९९-२००० यातून प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. मा.आयुक्तांनी दिनांक ११.०६.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.रहीम कॉलनी, हबीब कॉलनी, हत्तेसिंगपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,६४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२९/६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.शताब्दीनगर येथे १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.३,९९,५१३/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक "भांडवली कामे" १९९९-२००० या आर्थिक वर्षातून प्रस्तावित केलेले आहे. मा.आयुक्तांनी दि.११.०६.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शताब्दीनगर येथे १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९९,५१३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३०/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भावसिंगपुरा येथे श्री.सुर्यभान लोखंडे यांचे घरापासून नाल्यापर्यंत १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.१,१८,३०१/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक "भांडवली कामे" १९९९-२००० यातून प्रस्तावित केलेले आहे. मा.आयुक्तांनी दि.११.०६.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.भावसिंगपुरा येथे श्री.सुर्यभान लोखंडे यांचे घरापासून नाल्यापर्यंत १५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,१८,३०१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१/८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, चुनाभट्टी येथे खदानित साचलेले सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी ६०० मी.मी. व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईपलाईन टाकणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दरसुची दराने रक्कम रु.२,३४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,३४,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चुनाभट्टी येथे खदानित साचलेले सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी ६०० मी.मी. व ३०० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,३४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३२/९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.शहागंज येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे, २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे व गटार बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.१,२५,१००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे.

सदरील काम लेखाशिर्षे "देखभाल व दुरुस्ती" १९९९-२००० यातून प्रस्तावित केले आहे. मा.आयुक्तांनी दि.११.०६.९९ ला सदरील कामास मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहागंज येथे २५० मी.मी.व्यासाची लाइर्न अपरुटींग करणे व गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,२५,१००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३३/१० :**

मुख्य लेखापरिक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मा.स्थायी समिती ठराव क्र.५९७/१०, दि.२६.०३.९९ नुसार लेखा परिक्षण विभाग

प्रशासनापासून स्वतंत्र करण्यांत आला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये मुख्य लेखापरिक्षक परिक्षक यांच्या विभागाचे कामकाजाविषयी तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या विषयी वेगवेगळ्या कामांमध्ये तरतूदी आहेत. उपरोक्त अधिनियमातील कलम ५१ (१) मध्ये लेखा परिक्षक विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या,पदनाम, वेतन, भत्ते इ.स्थायी समितीस वेळोवेळी ठरविण्याबाबत तरतूद आहे. याच कलमाच्या आधारे खालील प्रमाणे लेखा परिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे पदनाम निश्चित करण्यांचे प्रस्तावित करण्यांत येते.

| अ.क्र. | सद्य: स्थितीत अस्तित्वात असलेले पदनाम/वेतनश्रेणी | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|
| १. | वरील लेखा परिक्षक (रु.१६४०-२९००) | लेखा परिक्षक अधिक्षक |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक (रु.१४००-२३००) | वरीष्ठ लेखा परिक्षक |
| ३. | क/लेखा लिपिक (रु.९५०-१५००) | कनिष्ठ लेखा परिक्षक |

वरीलप्रमाणे पदनाम बदलल्यास महानगरपालिकेस कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत बदल होणार नाही. करिता उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित पदनाम मा.स्थायी समितीचे विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

<u>**संवाद :-**</u>

**श्री.विखारोदीन :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) प्रमाणे मंजूरी द्यायचे अधिकार नाही. कलम ५१ (१) प्रमाणे आणता येते.

**मुख्य लेखापरिक्षक :** प्रस्ताव नवीन पद निर्मितीचा नाही. फक्त पदनाम बदलण्यात येते. दि.२६.०३.९९ ला मंजूर झालेल्या ठरावाप्रमाणे विभाग स्वतंत्र करण्यांत येत असून ऑडीटर शब्द असावा म्हणून पदनामात बदल करण्यांत येत आहे. कोणाची ही वेतनश्रेणीत वाढ करावयाची नाही. ५१ (४) कलम नवीन पदासाठी आहे. आपण नवीन पद निर्माण करत नाही.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** कायमस्वरुपी कर्मचारी कसे घेणार, माहिती द्यावी.

**मुख्य लेखापरिक्षक :** या संदर्भात कार्यालयीन परिपत्रक काढण्यांत आले होते. त्यापैकी २१ कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले. कर्मचारी कामाचे स्वरुप बघून सदर पदाचे पदानाममध्ये बदल करण्यांत येत आहे. बदली वगैरे करावयाची झाल्यास त्यांना त्याच विभागामध्ये देण्यांत येईल. बढती द्यावयाची झाल्यास या विभागात पदोन्नती मिळेल.

**मा.सभापती :** ५१ (१) नुसार स्थायी समितीस अधिकार आहे. त्यानुसार मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील लेखा परिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे पदनाम खालीलप्रमाणे निश्चित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | सद्य: स्थितीत अस्तित्वात असलेले पदनाम/वेतनश्रेणी | मंजूर पदनाम |
|---|---|---|
| १. | वरीष्ठ लेखा परिक्षक (रु.१६४०-२९००) | लेखा परिक्षक अधिक्षक |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक (रु.१४००-२३००) | वरीष्ठ लेखा परिक्षक |
| ३. | क/लेखा लिपिक (रु.९५०-१५००) | कनिष्ठ लेखा परिक्षक |

या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.१३४/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जहाँगिरदार कॉलनी व मगरबी ले-आऊट मधील रस्त्यांना पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.४,६२,५५५/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण मध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर..

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जहाँगिरदार कॉलनी व मगरबी ले-आऊटमधील रस्त्यांना पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,६२,५५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३५/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिल्पनगर, आदर्शनगर मुख्य रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,५१,६५५/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षकातून करण्यांत येईल.करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिल्पनगर, आदर्शनगर मुख्य रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,५१,६५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३६/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क कोट पॅचवर्क झोन क्र.४ मध्ये विविध मॅकॅडम पॅचवर्क करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.४,३८,४०५/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पॅचवर्क (रस्ते दुरुस्ती) या लेखा शिर्षकातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** पॅचवर्क कोठे केले ते दाखवावे. ४ महिन्यापुर्वी झालेले पॅचवर्कही दाखवावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** दर्गा ते गारखेडा रोडवर पॅचवर्क करण्यांत आले. या रस्त्यावर दोन वेळेस पॅचवर्क केले. पावसाळ्यामध्ये पॅचवर्क केल्यास ते टिकणार काय? अशा प्रकारचे प्रस्ताव मार्च/एप्रिल मध्ये सभागृहात मंजूरीसाठी द्यावयास पाहिजे. प्रस्तावात दर्शविल्यानुसार किती लांब रस्ता आहे किती ठिकाणी पॅचवर्क करावे लागणार याची संपूर्णतः माहिती प्रस्तावात द्यावयास पाहिजे.

**अति.शहर अभियंता :** कोठे कोठे पॅचवर्क झाले त्याचा तपशिल आहे.
**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** माझ्या वार्डामध्ये पॅचवर्कसाठी ३ महिन्यापासून मागणी करत आहे.
**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी पॅचवर्क बाबतच्या संचिकांना मंजूरी घेऊन तात्काळ कार्यवाही करावी. विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क कोट पॅचवर्क झोन क्र.४ मध्ये विविध मॅकॅडम पॅचवर्क करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,३८,४०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला, सर्व्हे नं.७२ सातारा बिड हायवे येथील मांगीलाल मानकचंद फुलपगार मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे, तार कुंपण करणेसाठी सा.बां.विभागाचे जिल्हा दरसुची सन १९९७-९८ नुसार रक्कम रु.१,०३,८८२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन सदर कामावर होणारा खर्च वि.यो.अंतर्गत भूखंडाचे संरक्षणे या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे. करिता वरीलप्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.नं.७२ सातारा बीड हायवे येथील मांगीलाल मानकचंद फुलपगार मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे, तार कुंपण करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,०३,८८२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३८/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहाबाजार काळी मस्जीद कब्रस्तान येथे मुतारी व एक खोली बांधणेचे कामासाठी सा.बां.विभागाचे जिल्हा दरसुची सन १९९६-९७ नुसार रक्कम रु.२,३८,१५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदर कामावर होणारा खर्च "स्मशानभुमी विकास" या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे.

सबब शहाबाजार काळी मस्जीद कब्रस्तान येथे मुतारी व एक खोली बांधणेचे कामासाठी खर्च स्मशानभूमी विकास या लेखा शिर्षातून रक्कम रु.२,३८,१५०/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजर काळी मस्जीद कब्रस्तान येथे मुतारी व एक खोली बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,३८,१५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३९/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इटखेडा स्मशानभूमी येथे नाल्या लगत भिंत बांधणे बाबतचे कामासाठी सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुची सन १९९७-९८ नुसार रक्कम रु.१,५५,२००/- चे तयार करण्यांत येऊन सदर कामावर होणारा खर्च

"स्मशानभूमी विकास" लेखा शिर्षा अंतर्गत प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सबब इटखेडा स्मशानभूमी येथे नाल्या लगत संरक्षिंत भिंत बांधणेचे कामासाठीचे रक्कम रु.१,५५,२००/- चे अंदाजपत्रक व त्यावर होणारा खर्च "स्मशानभूमी विकास" या लेखा शिर्षातून करण्यास्तव मान्यतेचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इटखेडा स्मशानभूमी येथे नाल्या लगत भिंत बांधणे बाबतचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,५५,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४०/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, २०.०० लाख लिटर्स संप/पंप गृहासाठी ईनलेट/आऊटलेट पाईप व्यवस्था करणे (एन-७) च्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७,७७,०००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन १९९८-९९ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले आहे. एन-७ येथील संप/पंपगृहाचे ७०% काम पूर्ण होत आले आहे. करिता ईनलेट/आऊटलेट पाईपची व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदरील खर्च शासकीय अनुदान ४ कोटी मधून प्रस्तावित केलेले असून सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१७.०६.९९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे २०.०० लाख लिटर्स क्षमतेच्या संप/पंप गृहासाठी ईनलेट/आऊटलेट पाईप व्यवस्था करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,७७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४१/८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला बेगमपुरा येथे खाम नदीजवळील घरांच्या जवळ संरक्षित भिंत बांधण्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार व परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामास मा.आयुक्तांनी दि.१९.०६.९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बेगमपुरा येथे खाम नदीजवळील घरांच्या जवळ संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.,१३,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४२/९ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर स्लम वार्ड क्र.३१ येथे गटार दुरुस्त करणे, रस्ता क्रॉसिंग जाळ्या टाकणे व इतर कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.१,५७,०००/- चे सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९८-९९

अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१९.०६.९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर काम महानगरपालिका अर्थसंकल्प १९९९-२००० लेखाशिर्ष देखभाल दुरुस्तीमध्ये ठेवण्यांत आलेली तरतूद मधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संयजनगर स्लम वार्ड क्र.३१ येथे गटार दरुस्त करणे, रस्ता क्रॉसिंग जाळ्या टाकणे व इतर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,५७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४३/१० :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.गांधीनगर स्लम येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबत सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९,९२,१०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते आणि कॉंक्रीट" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि.१९.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९,९२,१०३/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गांधीनगर स्लम येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबतच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,९२,१०३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४४/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हमालवाडा स्लम भागात कॉंक्रीट रस्ते तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.१,९०,२००/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आली असून त्यास मा.आयुक्तांनी दि.१९.०६.९९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. सदर काम मनपा अर्थसंकल्प १९९९-२००० लेखाशिर्ष देखभाल व दुरुस्तीमध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतूदीमधून खर्च करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हमालवाडा स्लम भागात कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,९०,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४५/१२ :**

सहाय्यक संचालक, नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर ते भवानी नगर जाण्यासाठी सलग रस्ता नाही. सदर रस्ता

जोडण्यासाठी श्री.बन्सीलाल कन्हैयालाल शर्मा यांची १५'X३०' = ४५० चौ.फुट जागा घ्यावी लागेल.

खाजगी वाटाघाटीत जागा देणे बाबत संबंधिताने मान्यता दिलेली आहे. करिता जागेचा मोबदला रक्कम रु.१,०२,८००/- (एक लाख दोन हजार आठशे फक्त) निश्चित केला आहे.

सदर जागेचे नोंदणीकृत खरेदी खत करुन घ्यावे लागेल. त्यासाठी सुमारे ९,३००/- एवढा खर्च लागेल. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारक निम्मा निम्मा करणार आहेत. करिता खर्चाची निम्मी रक्कम रु.४,७५०/- (चार हजार सातशे पन्नास) ही मोबदला रक्कमेतून वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रु.९८,०५०/- (अठ्ठ्याण्णव हजार पन्नास फक्त) मिळकतधारकास अदा करणेस व खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.९,३००/- अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना देणेसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर ते भवानी नगर जाण्यासाठी सलग रस्ता नाही. सदर रस्ता जोडण्याकरिता श्री.बन्सीलाल कन्हैयालाल शर्मा यांची १५'X३०' = ४५० चौ.फुट जागा संपादित करुन सदर जागेचा मोबदला खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार रक्कम रु.१,०२,८००/- मधून नोंदणीकृत खरेदी खताची रक्कम रु.४,७५०/- मोबदला रक्कमेतून वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रु.९८,०५०/- मिळकतधारकास अदा करण्यांस तसेच खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.९,३००/- अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना देणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४६/१३ :**

सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबादयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.३१२४/७, ३१२४/११ व ३१२४/१२ चे मिळकतधारक श्री.१) स.अहेमद मोहीयोद्दीन महेबुब अली, २) नासेरोद्दीन गुलाम मोहीयोद्दीन यांनी रस्त्याने बाधित जागेचा मोबदला मागतिलेला असून या मिळकती जुनाबाजार रस्त्यावर आहेत. सदर मिळकतीचे रस्त्याने बाधित क्षेत्र ८९.५३ चौ.मी. असून खाजगी वाटाघाटीत मोबदला रक्कम रु.७,६९,५१०/- (सात लाख एकोणसत्तर हजार पाचशे दहा फक्त) निश्चित केला आहे.

तसेच सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदी खत करुन घ्यावे लागेल. त्यासाठी सुमारे ६९,२५६/- (एकोणसत्तर हजार दोनशे छप्पन्न रु.फक्त) एवढा खर्च लागेल. सदर खर्च मनपाने व मिळकतधारकाने निम्मा निम्मा करावयाचा आहे. करिता खर्चाची निम्मी रक्कम रु.३४,६२८/- ही मोबदला रक्कमेतून वळती करुन घेऊन उर्वरित मोबदला रक्कम रु.७,३४,८८२/- (सात लाख चौतीस हजार आठशे ब्याऐंशी फक्त) मिळकत धारकास अदा करणेस आणि नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्यासाठी अग्रीम म्हणून रक्कम रु.६९,२५६/- (एकोणसत्तर हजार दोनशे छपन्न) श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**सौ. लता दलाल :** नागेश्वरवाडी येथील ४ मिळकतींचे खाजगी तडजोडीने भूसंपादन करण्याचा प्रस्ताव या सभेत आलेला नाही. मुल्यांकन करून पाठवले. औरंगपुरा रस्त्याचीही तिच परिस्थिती आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. स. सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.३१२४/७, ३१२४/११ व ३१२४/१२ चे मिळकतधारक श्री.स.अहेमद मोहीयोद्दीन महेबुब अली व नासेरोद्दीन गुलाम मोहीयोद्दीन यांनी रस्त्याने बाधीत जागेचा मोबदला मागतिल्यावरुन जुनाबाजार येथील रस्त्याने बाधित मिळकतीचे एकूण क्षेत्र ८९.५३ चौरस मीटर चा खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार एकूण मोबदला रक्कम रु.७,६९,५१०/- (सात लाख एकोणसत्तर हजार पाचशे दहा) मधून नोंदणीकृत खरेदीखतासाठी लागणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.६९,२५६/- च्या निम्मी रक्कम रु.३४,६२८/- वळती करून उर्वरित र. रु. ७,३४,८८२/- (सात लाख चौतीस हजार आठशे ब्याऐंशी फक्त) मिळकतधारकास अदा करणेस तसेच नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्याकरिता अग्रीम रक्कम रु.६९,२५६/- (एकोणसत्तर हजार दोनशे छप्पन्न) श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४७/१४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.३८१५ सि.स.नं.२३ पंचकुआ या मिळकतीतून वहीवाटीचा प्रश्न आहे. मिळकतधारक श्री.अहेमद खॉन पिता मोहम्मद खाँन यांनी जागेचा मोबदला मागितला आहे. सदर जागेचे क्षेत्र १२५.०० चौ.मी. आहे. खाजगी वाटाघाटीत सदर मिळकतीचा एकूण मोबदला रक्कम रु.१,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार फक्त) निश्चित केला आहे.

सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घ्यावे लागेल. त्यासाठी सुमारे १६,५००/- एवढा खर्च लागेल. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारक निम्मा निम्मा करणार आहे. करिता निम्मा रक्कम रु.८,२५०/- ही मोबदला रक्कमेतून वळती करुन घेण्यांस मिळकतधारकाने मान्यता दिली आहे.

करिता उर्वरित मोबदला र.रु.१,७१,७५०/- (एक लाख एकाहत्तर हजार सातशे पन्नास फक्त) मिळकतधारकास अदा करणेस आणि नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्यासाठी अग्रीम म्हणून रु.१६,५००/- श्री.डी.डी.कालेले शा.अ. यांना देणे साठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.३८१५ सि.स.नं.२३ पंचकुआ या मिळकतीचे मिळकतधारक श्री.अहेमद खाँन पिता मोहम्मद खाँन झालेल्या खाजगी वाटाघाटीनुसार मोबदला रक्कम रु.१,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार फक्त) मधून नोंदणीकृत खरेदी खतासाठी लागणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.१६,५००/- च्या निम्मी रक्कम रु.८,२५०/- वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रु.१,७१,७५०/- मिळकतधारकास अदा करण्यास तसेच नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्यासाठी अग्रीम म्हणून रक्कम रु.१६,५००/- (सोळा हजार पाचशे) श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना देणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४८/१५ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना प्रस्ताव सादर करतात की, मौजे गारखेडा येथील चैतन्य सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्थामधील खुली जागा दोन ठिकाणी आहे. त्यापैकी प्लॉट क्र.४० व २५ मधील खुली जागा क्षेत्र अंदाजे २१३८ चौ.मीटर जागा ही

ब्राम्हण सभा (महासंघ) औरंगाबाद यांना जिम्नॅस्टिक हॉल व समाजाच्या सार्वजनिक उपक्रमासाठी वापरण्यासाठी व बांधकाम करण्यासाठी मागणी केलेली आहे.

वरील खुली जागा ब्राम्हण सभेस खालील अटी व शर्तीवर देण्यास्तव सादर.

१. सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१६०/१ दि.२०.११.९६ नुसार भाडे रु.१००/- प्रतिवर्ष राहील.

२. विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय वापरासाठी व खुल्या जागेच्या क्षेत्राचे १०% अथवा २०० चौ.मी. दोघांपैकी जे कमी असेल त्यासाठी रितसर बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजूरी करुन घ्यावा लागेल.

३. भाडेपट्ट्यांची मुदत ३० वर्ष राहील. परंतू प्रत्येक ५ वर्षांनी भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करावे लागेल.

४. जागा प्रदान करावयाचे धोरणानुसार इतर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेऊन जागा ताब्यात देण्याची कार्यवाही मालमत्ता विभागातर्फे करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा येथील चैतन्य सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था मधील खुली जागा पैकी प्लॉट क्रमांक ४० व २५ मधील खुली जागा क्षेत्र अंदाजे २१३८ चौ.मी.जागा ही ब्राम्हण सभा (महासंघ) औरंगाबाद यांना जिम्नॅस्टीक हॉल व समाजाच्या सार्वजनिक उपक्रमासाठी वापरण्यासाठी व बांधकाम करण्या करिता प्रस्तावातील अ.क्र.१ ते ४ च्या अटी व शर्तीनुसार देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४९/१६ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.मालजीपुरा, समर्थनगर येथील मंजूर रेखांकनातील भूखंड क्र.२५३ व २५४ लगतची खुली जागा अध्यक्ष, दिनदयाळ शोध संस्थान औरंगाबाद या नोंदणीकृत संस्थेने "बालभवन" या उपक्रमाकरिता मिळावी म्हणून मागणी केलेली आहे.

"बालभवन" या उपक्रमांतर्गत मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने स्पर्धा, शिबीरे, वाचनालय आदींचे आयोजन करण्यांत येणार आहे.

विकास नियंत्रण नियमावलीनुसार रेखांकनातील खुल्या जागेचा वापर जिम्नॅशियम, खुल्या जागेस पुरक अशा तत्सम वापराकरिता करता येतो. संस्थेने प्रस्तावित केलेला वापर, संस्थेचे कार्य व उद्दीष्टे व रेखांकनातील खुल्या जागा विकासाचे महापालिकेचे प्रचलित धोरण विचारात घेता नेहमीच्या अटी व शर्तीस अधीन राहून वर नमूद खुली जागा दिनदयाळ शोध संस्थान, औरंगाबाद या संस्थेस विकसीत करण्यासाठी दीर्घ मुदतीवर भाडेपट्ट्याने देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर अटी व शर्तीची पुर्तता करुन घेवून नोंदणीकृत करारनाम्याआधारे जागा देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अध्यक्ष, दीनदयाळ शोध संस्थान, औरंगाबाद या नोंदणीकृत संस्थेने "बालभवन" या उपक्रमांतर्गत मुलांच्या सर्वागीण विकासाच्या दृष्टीने स्पर्धा, शिबीरे, वाचनालय इ.आयोजनार्थ मालजीपुरा, समर्थनगर येथील मंजूर रेखांकनातील

भूखंड क्रमांक २५३ व २५४ लगतची खुली जागा मागणी केल्यानुसार सदरील जागा या संस्थेस विकसीत करण्यासाठी नेहमीच्या अटी व शर्तीस अधिन राहून दीनदयाळ शोध संस्थान औरंगाबाद या संस्थेस दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५०/१७ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा.आयुक्तांच्या मंजूरीनुसार प्रस्ताव सादर केला आहे की, भोलेश्वर मार्केट सुपारी हनुमान रोड, औरंगाबाद येथील महानगरपालिका शॉपिंग सेंटर मधील जिन्या लगतची ६x१५ आकाराची जागेची ३० वर्षासाठी लिजवर श्री.राधाकिशन मानसिंग बनीया यांनी मागणी केली आहे. प्रकरणात भाडे समितीने रु.१२००/- प्रति चौ.मी.प्रति वर्ष भाडे निश्चित केले आहे. त्यानुसार ६x१५ (८.३६ चौ.मी.) जागेसाठी रक्कम रु.१०,०३७/- प्रति वर्ष भाडे आकारणी होते. तसेच महानगरपालिका गाळे धारकांकडून रु.४०००/- प्रति चौ.मी. या दराने अनामत रक्कम घेऊन वार्षिक भाडे नियमित होते. सबब या प्रकरणात सुध्दा संबंधितांकडून रु.४०००/- प्रति चौ.मी.दराने वरील जागेसाठी अनामत रक्कम रु.३३,४४०/- (रुपये तेहतीस हजार चारशे चाळीस) घेऊन आणि एक वर्षाचे आगाऊ भाडे रु.१०,०३७/- (रुपये दहा हजार सदोतीस) वसुल करुन उक्त जागा महानगरपालिकेच्या अटी शर्तीनुसार करारनामा करुन देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भोलेश्वर मार्केट, सुपारी हनुमान रोड, औरंगाबाद येथील महानगरपालिका शॉपिंग सेंटरमधील जिन्या लगतची ६'x१५' (८.३६ चौ.मी.) जागेसाठी प्रति वर्ष रु.१०,०००/- भाडे आकारणी करुन तसेच गाळे धारकांकडून घेण्यांत अनामत प्रमाणे प्रति चौ.मी.रु.४०००/- प्रमाणे वरील जागेसाठी अनामत रक्कम रु.३३,४४०/- (रुपये तेहतीस हजार चारशे चाळीस) आणि एक वर्षाचे आगाऊ भाडे रु.१०,०३७/- (दहा हजार सदोतीस) वसुल करुन उक्त जागा महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार तीस वर्षासाठी लिजवर श्री.राधाकिसन मानसिंग बनीया यांना करारनामा करुन देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५१/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपूर/१२९९/सुधारणा-२५१/सेवा-१०, दि.१५.०१.९९ च्या शासन निर्णयानुसार "अनुरेखक" कर्मचाऱ्यांना (०७) सात वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर ९७५ ते १५४० ऐवजी १२०० ते २०४० ही वेतनश्रेणी दि.०१.०१.१९८६ पासून लागू करण्यांत आलेली असून शासनाच्या ३१ ऑक्टोंबर १९९८ च्या निर्णयातील तरतूदीनुसार ०१.०१.८६ ते ३१.१२.९३ या कालावधीतील कोणतीही थकबाकी देय राहणार नाही. तसेच शासन निर्णय क्रमांक एमआरव्ही/१०९५/प्र.क्र.-१ बारा दि.०८.०६.९५ नुसार शासनाचे गट "क" व "ड" (वर्ग-३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्यासाठी योजलेल्या योजने अंतर्गत कालबध्द पदोन्नती देण्याचे निश्चित केलेले असल्याने अनुरेखक पदोन्नती साखळीतील पुढील पद "सहाय्यक आरेखक" याची वेतनश्रेणी रु.१४०० ते २३०० असल्याने बारा वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर त्यांना रु.१४०० ते २३०० वेतनश्रेणी देय होईल. सेवा भरती नियमातील सात वर्षाच्या समयश्रेणीचा कालावधी या प्रकरणात लागू होणार नाही. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपूर/१२९९/सुधारणा-२५१/सेवा-१०, दि.१५.०१.९९ च्या शासन निर्णयानुसार "अनुरेखक" कर्मचाऱ्यांना सात (०७) वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर ९७५ ते १५४० ऐवजी १२०० ते २०४० ही वेतनश्रेणी दि.०१.०१.८६ पासून लागू करण्यांत आलेली असून शासन निर्णय क्र.एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.-१/बारा दि.०८.०६.९५ नुसार शासनाचे गट "क" व "ड" (वर्ग-३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठतिता घालविण्यासाठी योजलेल्या योजने अंतर्गत कालबध्द पदोन्नती देण्याचे निश्चीत केलेले असल्याने अनुरेखक पदोन्नती साखळीतील पुढील पद "सहाय्यक आरेखक" या पदाची वेतनश्रेणी रु.१४०० ते २३०० असल्यामुळे अनुरेखकांना बारा वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५२/१९ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, भांडार विभागाची वार्षिक उलाढाल लक्षात घेता तेथील लेखे हे अद्ययावत व व्यवस्थीत ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मनपा कर्मचाऱ्यांना/कामगारांना महानगरपालिकेतर्फे देण्यांत येणाऱ्या सोयी सवलती व त्याचे महत्व लक्षात घेता त्यावर प्रभावी नियंत्रण असणे आवश्यक आहे. भांडार विभाग हे मुख्य लेखाधिकारी यांचे अधिपत्याखाली आहे. व भांडार विभागाचे काम हे संपूर्णपणे लेखे पध्दतीवर चालते, त्यामुळे सध्या भांडार अधिक्षक यांचे नियंत्रण असलेले "भांडार अधिक्षक" हे पदनाम बदलणेत येवून "भांडार लेखापाल" असे संबोधण्यांत यावे.

भांडार लेखापाल हे अधिक्षक संवर्गातीलच पद असलेने, त्यामुळे महानगरपालिकेवर आर्थिक ताण पडणार नाही. करिता भांडार लेखापाल हे पद लेखा विभागातील प्रमुख लेखापाल/वरीष्ठ लेखा परिक्षक पदा बरोबरचे राहील. ज्याची शैक्षणिक पात्रता महानगरपालिका सेवा भरती नियमानुसार पुढीलप्रमाणे राहील. कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक, मनपा निम्नश्रेणी परिक्षा उत्तीर्ण तसेच औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आधीपासून सेवेत असल्यास ते खेरीज करुन ३० वर्षाहून अधिक वय नसेल. त्यामुळे भांडार अधिक्षक या पदाऐवजी त्यास भांडार लेखापाल असे संबोधण्यांत येईल. करिता पदनाम बदलणेस्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) अनुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भांडार विभागाची वार्षिक उलाढाल लक्षात घेता तसेच या विभागाचे महत्व लक्षात घेऊन तेथील लेखे हे अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्यामुळे या विभागावर प्रभावी नियंत्रण राहण्याचे दृष्टीने सद्य:स्थितीत असलेले "भांडार अधिक्षक" हे पदनाम बदलून मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५१ (२) अन्वये "भांडार लेखापाल" असे संबोधण्यांत येऊन या पदाकरिता सेवाभरती नियमानुसार शैक्षणिक पात्रता ही कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक, मनपा निम्नश्रेणी परिक्षा उत्तीर्ण तसेच औरंगाबाद मनपामध्ये आधीपासून सेवेत असल्यास ते खेरीज करुन ३० वर्षाहून अधिक वय नसावे. अशी असेल. या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५३/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हमीद कॉलनी व लगतच्या वसाहतीमध्ये खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,९०,४१०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.३८२/४, दि.०५.१२.९८ अन्वये

स्थायी समिती ची मंजूरी प्राप्त झालेली आहे. परंतू प्रत्यक्ष काम करते वेळी सदरील रस्ता अंदाजपत्रकात घेतलेल्या रुंदीपेक्षा २.०० मीटर जास्त रुंद करण्याचे प्रस्तावित केल्याने अंदाजपत्रकात रक्कम रु.१,८०,०००/- ची वाढ झालेली आहे. त्यामुळे एकूण रक्कम रु.६,९०,४१०+१,८०,०००/- = ८,७०,४१०/- चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. तसेच सदरील वाढीव काम या कामाचे कंत्राटदार मे.हयात कंन्स्ट्रक्शन यांच्याकडून मंजूर दरानुसार म्हणजे अंदाजपत्रकीय दरानुसार करुन घेण्यांत येईल.

तरी सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.८,७०,४१०/- तसेच सदरील वाढीव काम मे.हयात कंन्स्ट्रक्शन यांच्याकडून मंजूर दरानुसार म्हणजे अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांचे मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमीद कॉलनी व लगतच्या वसाहतीमध्ये खडी रस्ता तयार करण्याचे काम करतेवेळी सदरील रस्ता अंदाजपत्रकातील रुंदीपेक्षा २.०० मीटर जास्त रुंद करण्याचे प्रस्तावित केल्याने या कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.६,९०,४१०/- + वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,८०,०००/- असे एकूण रक्कम रु.८,७०,४१०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार मे.हयात कंन्स्ट्रक्शन यांचेकडून पुर्वीच्या मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यानी प्रस्ताव सादर केला की, सुतगिरणी ते शिवाजीनगर सिडको हद्द या ८० फुट डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३२,३६,००५/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत (१५) पंधरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ४ (चार) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.ए.सी.कोठारी | - | ५.१०% जास्त दराने |
| ३. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ७% जास्त दराने |
| ४. | श्री.डी.अजितसिंग | - | १०.१०% जास्त दराने |

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे.

तरी सदरील काम मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी ते शिवाजीनगर सिडको हद्द या ८० फुट डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५५/२२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, विष्णुनगर व अरिहंत नगर येथे कमी व्यासाच्या ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.लाईन्स टाकणे या कामासाठी सन १९९७-९८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दरसुची दराने रक्कम रु.५,४४,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,४४,१००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विष्णुनगर व अरिहंतनगर येथे कमी व्यासाच्या ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाच्या आर.सी.सी.लाईन्स टाकणे च्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,४४,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५६/२३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, देखभाल दुरुस्ती औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील पंपींग स्टेशनचे पावर फॅक्टर वाढविण्यासाठी ११० के.बी.ए.आर.-३३ केव्हीचे कॅपॅसिटर पुरवठा करण्याबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,१०,२००/- आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीतून करण्यांत येणार आहे. प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देखभाल दुरुस्ती औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवरील पंपींग स्टेशनचे पावर फॅक्टर वाढविण्यासाठी ११० के.पी.ए.आर.३३ केव्हीचे कॅपॅसिटर पुरवठा करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,१०,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५७/२४ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जुना फारोळा येथील पंपगृहातील पॅनल बोर्डवर एअर सर्कीट ब्रेकर पुरविणे, बसविणे व चाचणी घेणे हे काम केले आहे.

यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या यांत्रिकी दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.२,३६,८१४/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीतून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु.२,३६,८१४/- मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जुना फारोळा येथील पंपगृहातील पॅनल बोर्डवर एअर सर्कीट ब्रेकर पुरविणे, बसविणे व चाचणी घेणे या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,३६,८१४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५८/२५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, खोकडपुरा येथे २० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधणेच्या अंदाजपत्रक रक्कम रु.८६,३७,०००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९९ अन्वये मान्यता दिली आहे. तसेच विषय क्र.२०/१८ दिनांक २०.०५.९९ नुसार मा.सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने जा.क्र./मनपा/काअ/पा.पु./नि/३८६, दि.३०.०५.९९ नुसार निविदा सूचना दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन निविदा मागविण्यांत आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (१०) दहा निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेस दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.अशोक कंन्स्ट्रक्शन | - | १२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |
| २. | मे.खर्डीकर कंन्स्ट्रक्शन | - | १६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |

वरील तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त दराने मे.अशोक कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. मा.आयुक्त यांनी वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने दि.१७.०६.९९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तरी मे.अशोक कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा येथे २० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी आलेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदरील काम मे.अशोक कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५९/२६ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी दुरुस्ती प्रस्ताव सादर केला की, मो.संसारनगर येथे शहाबाद फरशी व कॉंक्रीट रस्ता तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.३,७०,६५८/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असता मा.आयुक्तांनी दि.०७.०९.९८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून स्थायी समितीच्या विषय क्र.२८९/४३, दि.०९.१०.९८ रोजी मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १९ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त ३ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि.२७.११.९८ रोजी उपस्थित ठेकेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुरेश पाथरुड | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त |
| २. | श्री.एस.एम.मंडोरे | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त |
| ३. | श्री.अजितसिंग शिलेदार | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.सुरेश पाथरुड यांची ४.९९% जास्त दराची निविदा आहे. करिता मंजूरीसाठी सादर करण्यांत आली असता ठेकेदारांनी दिलेले दर जास्त वाटल्यामुळे त्यांचेकडून दर पृथःकरण मागविण्यांत आले

असता दिलेले दर अयोग्य वाटल्यामुळे मा.आयुक्तांनी ४.९९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराची मान्यता प्रदान केली आहे.

सदर कामाची मंजूरी दि.३०.०१.९९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या विषय क्र.५०५/२० अन्वये मिळाल्यानंतर श्री.सुरेश पाथरुड यांना कार्यालयीन कार्यादेश क्र.मनपा/का/अ/स्लम/१०७/९९, दि.११.०२.९९ देण्यांत आला व संबंधितांनी काम पूर्ण करीत असतांना असे आढळले की, त्या ठिकाणी राहिवाशी अतिक्रमण मोठ्या प्रमाणात करीत होते. व आजी व माजी नगरसेवकांनी विनंती केल्यानुसार खुली जागा यास डब्ल्यु.बी.एम.करण्याचे वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,६०,५९२/- सा.बां.विभाग, औरंगाबाद चे दरसुची १९९८-९९ अनुसार तयार करण्यांत आले. तरी एकूण रक्कम रु.३,७०,६५८+ १,६०,५९२/- = ५,३१,२५०/- रक्कमेला सुधारित व प्रशासकीय मान्यता मा.आयुक्तांनी दि.१७.०६.९९ रोजी प्रदान केली आहे. करिता वाढीव अंदाजपत्रकीय १,६०,५९२ + (पुर्वीच्या अंदाजपत्रकासह) एकूण रक्कम रु.३,७०,६५८/- + १,६०,५९२ = ५,३१,२५०/- पुर्वीचेच ठेकेदार श्री.सुरेश पाथरुड यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबत मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संसारनगर येथे शहाबाद फरशी व कॉंक्रीट रस्ता तयार करण्याचे काम करीत असतांना मोठ्या प्रमाणात होणारे अतिक्रमण लक्षात घेता व तेथील नगरसेवकांच्या मागणीनुसार खुल्या जागेस डब्ल्यु.बी.एम.करण्याचे वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,६०,५९२/- + पुर्वीचे अंदाजपत्रक रक्कम रु.३,७०,६५८/- अशा एकुण रु.५,३१,२५०/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम या कामाचे पुर्वीचेच गुत्तेदार श्री.सुरेश पाथरुड यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६०/२७ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मसनतपूर स्मशानभूमी लगतची नाला भिंत बांधणेकरीता अंदाजपत्रक रक्कम रु.७,०४,७४३/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९९ ला प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली. तसेच दि.१२.०५.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या विषय क्र.३३/२३ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.१२.०५.९९ पर्यंत एकूण २६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या. व स्विकारण्याच्या तारखेस फक्त दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि.२८.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१. श्री.बबन हिवाळे - ०.१% कमी
२. मे.गायत्री कंन्स्ट्रक्शन - ३% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.बबन हिवाळे यांची निविदा आहे. मंजूरीस्तव सादर केली असता मा.आयुक्तांनी दि.११.०६.९९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम १० कोटी शासकीय अनुदान १९९९-२००० पैकी खर्च करण्यांत येईल. करिता मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपूर स्मशानभूमी लगतची नाला भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.बबन हिवाळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६१/२८ :**

प्र.कार्यकारी अभियंता अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. प्रज्ञानगर स्लम येथे संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१८,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत मंजूरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १९ निविदा विकल्या गेल्या. व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन | - | ४.५०% जास्त |
| २. | कुलवंतसिंग | - | ७.५५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराची निविदा मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांची आहे. परंतू मा.आयुक्त यांच्या तजविजनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दराने मान्य करणे बाबत स्थायी समितीकडे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या अगोदर जे संरक्षित भिंतीचे कामे झालेली आहेत ती कोणत्या दराने केलेले आहे. याचा विचार करता या प्रस्तावात मंजूर दराची ४.५०% जास्त दराने काम करण्याबाबत निविदा आहे. या अगोदरही याच दराने संरक्षित भिंतीची कामे केली काय?

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** मागील दराप्रमाणे या प्रकारच्या कामासाठी मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली असेल तर या प्रस्तावास मंजूरी द्यावी.

**श्री.विखारोद्दीन :** जी विकास कामे कमी दराने होतात ते योग्य होते किंवा काय यासाठी ठेकेदारावर देखरेखीसाठी कुणाची तरी नेमणूक केली पाहिजे.

**मा.सभापती :** जे ठेकेदार कमी जास्त दराने काम करुन देण्यांस तयार असतात ते जर मनपाच्या नियमाप्रमाणे तसेच चांगल्या प्रतीचे काम करुन देण्यांस तयार असेल तर हरकत नाही. त्याचेशी संबंधित अधिकारी वर्गांनी अशा कामावर देखरेख ठेवावी. याबाबतचे संपूर्ण रेकॉर्ड अधिकाऱ्यांनी ठेवावे. हा प्रस्ताव अंदाजपत्रकीय दराने करण्यांस शिफारस केलेली आहे. प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.प्रज्ञानगर स्लम येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.परफेक्ट कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६२/२९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिन्सी येथे ५ लक्ष लिटर्स क्षमतेचा संप बांधणे व पंपींग मशिनरी व्यवस्था करणेचे ४५,००,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी दि.०४.०५.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२०/१८, दि.२०.०५.९९ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/३८६/९९, दि.३०.०५.९९ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सोळा (१६) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात (७) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.नंदकुमार आर.घोडेले | - | १५.१% कमी दराने |
| २. | श्री.मन्नान खॉन | - | ९% कमी |
| ३. | श्री.ए.एम.फारुकी | - | १४.०१% कमी |
| ४. | श्री.म.सलीम म.रफीक | - | १३.०१% कमी |
| ५. | मे.सत्यम कंन्स्ट्रक्शन | - | १२.७८६% कमी |
| ६. | मे.राणा कंन्स्ट्रक्शन | - | ९.०९% कमी |
| ७. | श्री.व्ही.आर.महाजन | - | ७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०१% कमी दराचे निविदा दर श्री.नंदकुमार आर.घोडेले यांचे प्राप्त झालेले आहेत. त्यास मा.आयुक्तांनी दि.१५.०६.९९ ला मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी येथे ५ लक्ष लिटर्स क्षमतेचा संप बांधणे व पंपींग मशिनरी व्यवस्था करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.१ टक्के कमी दराची श्री. नंदकुमार घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६३/३० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यांत येणाऱ्या जलवाहिनीच्या कामाकरिता विविध व्यासाचे जे.फी.जॉईंटस खरेदी करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,९६,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.०२.०२.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.स्थायी समितीने विषय क्र.५५३/७, दि.०६.०३.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/९९ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.ओरीएंट रबर प्रॉडक्टस | - | ४.१६% जास्त दराने |
| २. | मे.अपेक्स इंजिनिअरींग वर्क्स | - | ४.४६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.१६% जास्त दराने मे.ओरीएंट रबर प्रॉडक्टस यांची निविदा प्राप्त झालेली होती. दिनांक १२.०६.९९ रोजी मा.आयुक्त यांना ४.१६% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर प्रस्ताव देण्यांत यावा अशी शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने मे.ओरीएंट रंबर प्रॉडक्टस यांची ४.१६% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यांत येणाऱ्या जलवाहिन्याच्या कामाकरिता विविध व्यासाचे जे.फी.जॉइंटस् खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. ओरीएंट रबर प्रॉडक्टस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६४/३१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा पाईपलाईन दुरुस्ती करिता आवश्यक असणारे जॉइंटस् आणि जिफी जॉइंटस खरेदी करिता अंदाजपत्रक रक्कम रु.६,४६,५००/- चे तयार करण्यांत आले आहे. त्या मा.आयुक्त महोदय यांनी दि.०२.०३.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.स्थायी समितीने विषय क्र.५९४/७, दि.२६.०३.९९ अन्व्ये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना क्र.३८८/९९, दि.१२.०४.९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ (दोन) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ओरीएंट रबर प्रॉडक्टस | - | ३.८०% जास्त दराने |
| २. | ऑक्टल रिफेनेड प्रा.लि. | - | ४.६२% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.८०% जास्त दराने ओरीएंट रबर प्रॉडक्टस यांची निविदा प्राप्त झालेली होती. दिनांक १२.०६.९९ रोजी मा.आयुक्त यांनी ३.८० जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने मान्यतेस्तव स्थायी समितीसमोर प्रस्ताव देण्यांत यावा अशी शिफारस केलेली आहे.

त्या अनुषंगाने ओरीएंट रबर प्रॉडक्टस यांची ३.८०% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा पाईपलाईन दुरुस्तीकरिता आवश्यक असणारे जॉइंटस आणि जिफी जॉइंटस खरेदी करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम मे.आरीएंट रबर प्रॉडक्टस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६५/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.बारापुल्ला परिसरातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,९५,१७०/- चे तयार करण्यांत आले असून

सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बारापुल्ला परिसरातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९५,१७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६६/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, राममंदिर ते आझाद चौक रस्त्यावर कॉक्रीटचे दुभाजक तयार करुन त्यावर लोखंडी ग्रील बसविण्याचे कामासाठी सन १९९७-९८ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.५,८१,६००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात ठेवण्यांत आलेल्या शहर सौंदर्यीकरण लेखा शिर्षाखाली करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राममंदिर ते आझाद चौक रस्त्यावर कॉंक्रीटचे दुभाजक तयार करुन त्यावर लोखंडी ग्रील बसविण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,८१,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६७/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नवयुग कॉलनी भावसिंगपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी सन १९९७-९८ चे सां.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१,८८,४०७/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० वर्षातील आर्थिक तरतूद नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत असलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नवयुग कॉलनी भावसिंगपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८८,४०७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६८/३५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भारत माता मंदिर प्रकल्प इमारत येथे डिस्प्ले बोर्ड बनवणे बाबतचे कामासाठी मा.आयुक्त यांचे आदेशानुसार दरपत्रके मागितले असता (फेरनिविदा/दरपत्रके) स्विकृतीच्या तारखेपर्यंत म्हणजेच दि.१७.०५.९९ पर्यंत दोन प्राप्त झाले. ते त्याच दिवशी उपस्थित एजन्सीसमोर मा.मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयात उघडण्यांत आले असता प्राप्त दरपत्रकाची तुलना खालील प्रकारे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | स्टुडिओ दर्पण | २१ गेज एम.एस.शीटमध्ये सोबतच्या मॉडेलनुसार सोबत लाईट फिटींग दोन ट्युबसह अॅक्रॉलिक ग्लास तसेच मागील बाजुस साधा ग्लास समोरील बाजुस सनमायका डेकोरेटिव्ह पट्ट्यासहीत फोटो फिल्म व ज्यात खालील बाजुस फोटोचा मजकूर ही फोटो फिल्मवर असलेला संपूर्ण कामासह जागेवर लावण्यासह दर रु.७,७७५/-, १ जाडीचा लोखंडी स्टँडचा दर ९१५/- |
| २. | वर्षा मेटल वर्क्स | डिस्प्ले बोर्ड पदपत्रक सुचनेमध्ये दिलेल्या साईज व फोटो फिल्मसहीत भिंतीवर लावणेसह ८,२००/- स्टँडसह ८९००/- मात्र.<br>एजन्सीचे माध्यम दिलेला नाही. |

या अनुषंगाने प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर मे.दर्पण स्टुडिओ यांचे आहे.

भिंतीवर लावणेसाठी - ७,७७५/- (सात हजार सातशे पंचाहत्तर मात्र)
लोखंडी स्टँड - ९१५/- (नऊशे पंधरा मात्र)

याप्रमाणे दर प्राप्त असून प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केले असता मा.आयुक्त महोदय यांनी सदर काम प्राप्त निविदे अंतर्गत कमी दर निविदेमध्ये ५% कमी दर करुन मान्यता देणेत आली आहे. व त्यास गुत्तेदाराने लेखी संमती दिली आहे.

सबब प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच मे.दर्पण स्टुडिओ यांचे मार्फत सदर काम प्राप्त दरापेक्षा ५% कमी करुन घेणेचा प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतमाता मंदिर प्रकल्प इमारत येथे डिस्पले बोर्ड बनवणे बाबतचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.दर्पण स्टुडिओ यांचेकडून त्यांनी दिलेल्या दरापेक्षा ५% दर कमी करुन सदरील काम करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६९/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, बारी कॉलनी अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.२१.०३.९९ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.२५२/७ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.१४,८१,६००/- ला मंजूरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/०३/९९, दि.१५.०४.९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण १३ (तेरा) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण ४ (चार) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | - | ५% जास्त दराने |
| २. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | - | ७% जास्त दराने |
| ३. | मो.अहमद सिद्दीकी | - | १०% जास्त दराने |
| ४. | मे.पाटील कंन्स्ट्रक्शन कं. | - | ११% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०५% जास्त दराची मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा आहे. ठेकेदाराने निविदेत दर जास्त दिल्यामुळे त्यांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी ५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिलेली आहे.

करिता मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं.यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारी कॉलनी अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७०/३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हर्सुल ते वेदविद्या प्रतिष्ठान पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.२६.०३.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.६२२/२५ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.४,१६,९००/- ला मंजूरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/०३/९९, दि.१५.०४.९९ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१२) बारा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस त्यापैकी पाच (५) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त दराने |
| ३. | मे.पाटील कंन्स्ट्रक्शन | - | १२% जास्त दराने |
| ४. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | - | १५% जास्त दराने |
| ५. | श्री.एम.ए.सिद्दीकी | - | १८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराने मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा असून मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते वेदविद्या प्रतिष्ठान पर्यत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७१/३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, टी.बी.हॉस्पीटल ते फोर्टवॉल पर्यंतच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.१२.०५.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.२३/१३ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.८,९६,८८०/- ला मंजूरी मिळालेली आहे. सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/०१/९९, दि.०३.०४.९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण १६ (सोळा) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकुण ४ (चार) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.ए.सी.कोठारी | - | ५% जास्त दराने |
| ३. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ७% जास्त दराने |
| ४. | श्री.डी.अजितसिंग | - | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दराने श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा असून प्रस्ताव स्थायी समितीच्या सभेमध्ये मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टी.बी.हॉस्पीटल ते फोर्टवॉल पर्यंतच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७२/३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, जिनिंग मील ते मध्यवर्ती नाक्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.२१.०३.९९ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.२५१/६ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.२३,४०,०००/-ला मंजूरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/०३/९९, दि.१५.०४.९९ च्या निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१३) तेरा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे.पाटील कंन्स्ट्रक्शन कं. | - | १०% जास्त दराने |
| ३. | श्री.मो.अहमद सिद्दीकी | - | १७% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराने मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिनींग मील ते मध्यवर्ती नाक्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७३/४० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रोशनगेट वार्डातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.९,८४,३१८/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील "नविन डांबरीकरण" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट वार्डातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,८४,३१८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७४/४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नवाबपुरा चौरस्ता ते शहाबाजार रस्ता बनेमियाँ दर्गा समोरुन पहेलवान यांचे घरापर्यंत डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१८,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नवाबपुरा चौरस्ता ते शहाबाजार रस्ता बनेमियाँ दर्गा समोरुन पहेलवान यांचे घरापर्यंत डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,१८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७५/४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, महेशनगर कॉर्नर ते गादीया पार्क या मुख्य रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.३,९१,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील "शहर सौंदर्यीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महेशनगर कॉर्नर ते गादिया पार्क या मुख्य रस्ता दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७६/४३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, बुढ्ढीलेन, मुर्गीनाला व लोटाकारंजा भागातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९८-९० च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.३,८७,३१५/- चे तयार करण्यांत

आलेले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० वर्षातील "नवीन खांडकी रस्ते" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुढ्ढीलेन, मुर्गीनाला व लोटाकारंजा भागातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,८७,३१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७७/४४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नवाबपुरा चौरस्ता, ते खासगेट पर्यंत मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.३,०३,६००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील "पुर्नडांबरीकरण" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नवाबपुरा चौरस्ता ते खासगेट पर्यंत मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,०३,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७८/४५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र.२ अंतर्गत मिलकॉर्नर, नारळीबाग, नागेश्वरवाडी, पैठणगेट व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी दि.२६.०६.९८ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.६८/२६ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.९,९३,२५५/- ला मंजूरी मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/४१/९८, दि.०७.०८.९८ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकांचे दरापेक्षा ३६.०९% कमी दराने श्री.व्ही.जी.स्वामी यांची निविदा असून त्यास दि.३०.०१.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.४०४/४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरच्या ठेकेदारास अनामत रक्कम व करारनामा करणेसाठी पत्र दिले असता ठेकेदाराने (श्री.व्ही.जी.स्वामी) उलटटपाली त्यांचे दि.०४.०२.९९ चे पत्राद्वारे निविदा भरुन चार ते साडेचार महिन्याचा कालावधी झाला व या कालावधीत मटेरिअलचे भाव वाढल्यामुळे त्यांनी निविदेत दिलेल्या दरात काम करण्यासाठी असमर्थता दर्शविल्यामुळे सदरील कामासाठी आलेले दुसऱ्या कमी दराचे ठेकेदार श्री.आर.बी.चव्हाण यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/बांध-१/९६६/९९, दि.१०.०३.९९ चे पत्राद्वारे पहिल्या कमी दराचे ठेकेदाराच्या दरात म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३६.०९% कमी दरात काम करण्यासाठी विचारणा केली असता त्यांनी उलट टपाली त्यांनी निविदेत दिलेल्या दराने म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८.१% कमी दराने काम करण्यासाठी संमतीपत्र दिलेले आहे.

तरी दि.३०.०१.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये घेण्यांत आलेला श्री.व्ही.जी.स्वामी यांच्या निविदेचा प्रस्ताव रद्द करुन दुसऱ्या कमी दराचे ठेकेदार

श्री.आर.बी.चव्हाण यांची १८.१% कमी दराची निविदा मंजूर करणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र.२ अंतर्गत मिलकॉर्नर, नारळीबाग, नागेश्वरवाडी, पैठणगेट व इतर मोहल्ल्यातील गल्ल्यात शहाबादी फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.व्ही.जी.स्वामी यांनी करारनामा करणेसाठी कळविल्यानंतर निविदा भरुन चार ते साडेचार महिन्यांच्या कालावधी झाला व या कालावधीत मटेरिअलचे भाव वाढल्याने काम करण्यांस असमर्थता दर्शविल्यामुळे या कामासाठी आलेले दुसऱ्या कमी दराचे निविदाधारक श्री.आर.बी.चव्हाण यांनी संमती दिल्यानुसार सदरील कामासाठी मंजूर करण्यांत आलेला दि.३०.०१.९९ च्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.४०४/४ हा रद्द करुन त्याऐवजी सदरील काम श्री.आर.बी.चव्हाण यांचेकडून १८.१% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७९/४६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुतगिरणी चौक ते शिवाजीनगर सिडको हद्द या ८० फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण करणे व रस्ता दुभाजक टाकणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२०,५५,०५२/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजूरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत (२३) तेवीस कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त ४ (चार) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली असून प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.जी.पवार | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | ५% जास्त दराने |
| ३. | श्री.बी.आर.चव्हाण | - | २८% जास्त दराने |
| ४. | श्री.जी.आर.घोडेले | - | ८.९% जास्त दराने |

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराची श्री.पी.जी.पवार यांची निविदा आहे. परंतू सदरील कामाच्या गुत्तेदारास काळ्या यादीत नांव समाविष्ट केले आहे. तरी दुसऱ्या क्रमांकाचे गुत्तेदार श्री.कुलवंतसिंग हे पहिल्या क्रमांकाच्या दरामध्ये म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांस तयार आहे. तशी मा.आयुक्तांची दि.१९.०६.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

तरी सदरील काम श्री.कुलवंतसिंग यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी चौक ते शिवाजीनगर सिडको हद्द या ८० फुट डी.पी.रस्त्याचे रुंदीकरण दुभाजक टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.पी.जी.पवार यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ट झाल्याने दुसऱ्या कमी दराचे निविदाधारक श्री.कुलवंतसिंग यांनी संमती दिल्यानुसार सदरील काम श्री.कुलवंतसिंग यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८०/४७ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अस्थापनेवरील सर्व प्रकारचे निरिक्षक, सुरक्षा कर्मचारी, वाहनचालक, सुपरवायझर, एम.पी.डब्ल्यु., एस.एफ.डब्ल्यु. पी.एच.एन., नर्स, ए.एन.एम., मिश्रक, फोरमन, मॅकॅनिक, लाईनमन, शिपाई, कामगार, जवान इ.कर्मचाऱ्यांना रेनकोट/छत्री वाटप करण्याच्या अनुषंगाने सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता दर करार करणेस्तव वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यांत आली असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| | **पुरुषासाठी रेनकोट** | **विजय जनरल स्टोअर्स** | **इन्शा ट्रेडींग कं.** | **एम.जे.ट्रेडींग** |
|---|---|---|---|---|
| १. | डकबॅक (कॅपसह) प्रति नग | ३२५/- | ३३०/- | ३२५/- |
| २. | हिमालया प्रति नग | २४८/- | २५०/- | -- |
| ३. | डायमंड प्रति नग | २२०/- | २२२/- | २२०/- |
| ४. | ट्राफिकल प्रति नग | -- | -- | ३१०/- |
| | **महिलांसाठी रेनकोट** | | | |
| १. | चित्रलेखा रेनकोट प्रतिनग | २२९.९९ | २२५/- | २२८/- |
| २. | मेनका रेनकोट प्रतिनग | २३०/- | २४५/- | -- |
| ३. | पाकीजा रेनकोट प्रतिनग | --- | -- | २३०/- |
| | **पुरुष/स्त्रियांसाठी छत्री** | | | |
| १. | फोल्डींग छत्री प्रति नग | ९०/- | -- | -- |
| २. | लॉग हॅन्डल छत्री प्रति नग | ९५/- | ९०/- | -- |

वरीलप्रमाणे मे.विजय जनरल स्टोअर्स व एम.जे.ट्रेडींग यांचे पुरुषांसाठी डायमंड कं.चे तसेच महिलांसाठी मे.इन्शा ट्रेडींग कं.चे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी असून फोल्डींग छत्रीसाठी मे.विजय व इन्शा ट्रेडींग कं.यांचे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आहे.

मा.आयुक्त यांचे अवलोकनास्तव प्राप्त सर्व नमुने ठेवण्यांत आले. मा.आयुक्तांनी नमुन्यांचे निरिक्षण करुन खालीलप्रमाणे नमुने पसंद केले असून प्राप्त दरात वाटाघाटी केल्या त्यानुसार सदरील साहित्यासमोर दर्शविलेले दर हे अंतिम करण्यांत आले.

पुरुषांसाठी रेनकोट - हिमालया कं. - रु.२४८/- ऐवजी रु.२२८/- प्रमाणे
महिलांसाठी रेनकोट - मेनका कं. - रु.२३०/- ऐवजी रु.२२५/- प्रमाणे
फोल्डींग छत्री - लक्ष्मी कं. - रु.९०/- ऐवजी रु.८५/- प्रमाणे

वरीलप्रमाणे मा.आयुक्तांनी दिलेल्या दराचे मान्यतेनुसार खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पुरुषांसाठी रेनकोट | - १३०० नग x २२८ प्रमाणे रु. - | २,९६,४००/- |
| २. | महिलांसाठी रेनकोट | - ७०० नग x २२५ प्रमाणे रु. - | १,५७,५००/- |
| ३. | फोल्डींग छत्री | - १५० नग x ८५ प्रमाणे रु. - | १२,७५०/- |
| | | रुपये - | ४,६६,६५०/- |

वरीलप्रमाणे एकूण खर्च रु.४,६६,६५०/- येणार आहे. सदरील खर्च गणवेश या शिर्षकाखाली करण्यांत येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा अस्थापनेवरील सर्व प्रकारचे निरिक्षक, सुरक्षा कर्मचारी, वाहनचालक, सुपरवायझर, एम.पी.डब्ल्यु. एफ.एफ.डब्ल्यु, पी.एच.एम., नर्स, ए.एन.एम., मिश्रक, फोरमन, मेकॅनिक, लाईनमन, शिपाई, कामगार, जवान इ. कर्मचाऱ्यांना रेनकोट/छत्री वाटप करण्याच्या अनुषंगाने मागविण्यांत आलेल्या निविदापैकी पुरुषांसाठी रेनकोटचे मे.विजय जनरल स्टोअर्स व एम.जे.ट्रेडिंग यांचे तसेच महिलांसाठी इन्शा ट्रेडिंग कं. आणि छत्रीसाठी मे.विजय जनरल स्टोअर्स व इन्शा ट्रेडींग कं यांचे दर कमी असल्याने त्यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार खालील दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पुरुषांसाठी रेनकोट | - | हिमालया कंपनी | - | प्रति नग रु.२२८/- |
| महिलांसाठी रेनकोट | - | मेनका कंपनी | - | प्रति नग रु.२२५/- |
| फोल्डींग छत्री | - | लक्ष्मी कं. | - | प्रति नग रु.८५/- |

वरील दराने साहित्य खरेदीसाठी येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.४,६६,६५०/- ला सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८१/४८ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.१२४८७ ही मिळकत ८० फुट रुंद रस्ता लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम.रोड (स्मशान मारोतीजवळ) ने बाधित आहे. मिळकतधारक १) मिराबाई सांडु कायस्थ, २) नामदेव, जगन्नाथ, भानुदास, सिताराम चौघांचे पिता दशरथ ढगे यांनी रस्त्याने बाधित जागेचा मोबदला मागीतलेला आहे. करिता खाजगी वाटाघाटीत बाधित जागेचा मोबदला पुढीलप्रमाणे निश्चित केला आहे. १) मिराबाई सांडु कायस्थ, न.भु.क्र.१२४८७/पैकी बाधित क्षेत्रपूर्ण ५४.३६ चौ.मी.साठी मोबदला रु.५२,१९१/- (बावन्न हजार एकशे एक्याण्णव फक्त) यावर खरेदी खतासाठी सुमारे ४,७००/- (चार हजार सातशे फक्त) एवढा खर्च लागेल.

खरेदी खताचा खर्च महानगरपालिका व मिळकतधारक निम्मा निम्मा करावयाचा आहे. करिता निम्मा खर्च रु.२,३५०/- हा मोबदला रक्कमेतून वळता करुन रु.४९,८४१/- मोबदला मिळकतधारकास देय होतो. २) श्री.नामदेव, श्री.जगन्नाथ, श्री.भानुदास व श्री.सिताराम चौघांचे पिता दशरथ ढगे, न.भु.क्र.१२४८७/पैकी ६७९.०० चौ.मी.जागा रस्त्याने बाधित आहे. खाजगी वाटाघाटीत मोबदला रु.७,२४,५०६/- (सात लाख चोवीस हजार पाचशे सहा) निश्चित केला असून यावर खरेदी खतासाठी सुमारे ५९,०००/- एवढा खर्च लागेल. खरेदीखताचा खर्च महानगरपालिका व मिळकतधारक निम्मा निम्मा करते. करिता निम्मा खर्च मोबदला रक्कमेतून रु.२९,५००/- वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रु.६,९५,००६.०० (सहा लाख पंचाण्णव हजार सहा) मिळकतधारकास देय होतो.

करिता मोबदला रक्कम मिळकतधारकांना अदा करण्यास व दोन्ही खरेदीखतासाठी लागणारी एकूण रक्कम रु.६३,७००/- (त्र्येसष्ठ हजार सातशे) श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना अग्रीम म्हणून देण्यांस प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.१२४८७ ही मिळकत ८० फुट रुंद रस्ता लक्ष्मणचावडी ते एम.जी.एम.रोड (स्मशान मारोती जवळ) ने बाधित मिळकतीचे मिळकतधारक १) मिराबाई सांडु कायस्थ यांना बाधित क्षेत्र ५४,३६ चौ.मी.साठी एकूण मोबदला रक्कम रु.५२,१९१/- मधून खरेदीखतासाठी लागणारी निम्मी रक्कम रु.२३५०/-

वळीत करुन उर्वरित रक्कम रु.४९,८४१/- तसेच २) नामदेव, जगन्नाथ, भानुदास सिताराम चौघांचे पिता दशरथ ढगे यांना न.भु.क्र.१२४८७/पैकी बाधित क्षेत्र ६७९.०० चौ.मी.जागेचा मोबदला रक्कम रु.७,२४,५०६/- मधून खरेदी खतासाठी लागणाऱ्या एकूण खर्च रु.५९,०००/- च्या निम्मी रक्कम रु.२९,५००/- वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रुपये ६,९५,००६.०० अदा करण्यास तसेच दोन्ही खरेदीखतासाठी लागणारी एकूण रक्कम रु.६३,७००/- श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना अग्रीम म्हणून देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८२/४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन भाजीमंडी ते अजिज गुत्तेदार (बन्सीलालनगर) यांच्या घरापर्यंत ४० फुट रस्ता रुंदीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दर सुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.४,०४,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च भांडवली रस्ते (नवीन खांडकी रस्ते) मध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन भाजीमंडी ते अजिज गुत्तेदार (बन्सीलालनगर) यांच्या घरापर्यंत ४० फुट रस्ता रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,०४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८३/५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वेदांतनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.६,०६,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण मध्ये ठेवण्यांत आलेल्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,०६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८४/५१:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र.२ अंतर्गत पॅचवर्कसाठी पॅचवर्क मटेरिअलचा पुरवठा करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,९९,६६०/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात "रस्ते दुरुस्ती" पॅचवर्क या लेखाशिर्षाखाली ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.२ च्या रस्ते दुरुस्तीसाठी पॅचवर्क मटेरियल खरेदी करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास त्याचप्रमाणे

सदरील काम पावसाळ्यामुळे त्वरीत हाती घेण्याच्या दृष्टीने मागील वर्षी पुरवठा केलेले श्री.एम.ए.सिद्दीकी या ठेकेदारांकडून पॅचवर्क मटेरियल पुरवठ्याचे काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८५/५२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, विभाग क्र.१ मधील रस्ते दुरुस्तीसाठी पॅचवर्क मटेरियल खरेदी करणेसाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,९९,६६०/-चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या वर्षासाठी "रस्ते दुरुस्ती" (पॅचवर्क) या लेखा शिर्षाखाली ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र.१ च्या रस्ते दुरुस्तीसाठी पॅचवर्क मटेरियल खरेदी करणेसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास त्याचप्रमाणे सदरील काम पावसाळ्यामुळे त्वरीत हाती घेण्याचे दृष्टीने मागील वर्षी काम केलेले श्री.जी.एम.कटारिया या ठेकेदारांकडून पॅचवर्क मटेरियल पुरवठ्याचे काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा.सभापती :** सर्व प्रस्तावास स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच मागील बैठकीत ज्या प्रस्तावांना स्विकृतीसह मंजूरी दिलेली आहे ते प्रस्तावित कामाबाबत निविदा मागवून कार्यवाही करावी. तसेच झोनमधील निलंबित कर्मचारी यांचे अपिल आलेले आहेत. त्यावर निर्णय व्हावा.

**सौ.लता दलाल :** निलंबित कर्मचाऱ्यांचे अपिल मंजूर करतांना असा निर्णय घ्यावा की, न्यायालयीन अंतिम निर्णय हा विरोधात असेल तसेच प्रशासकीय चौकशी झाल्यास सभागृहाने त्यांना कामावर घेण्याबाबतच्या निर्णयाच्या विरोधात असेल तर त्यांना घेण्यांत येणाऱ्या आदेशा या सभागृहाच्या निर्णयाच्या अधिन राहणार नाही. या दृष्टीने कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याबाबत निर्णय व्हावा.

**मा.सभापती :** १) श्री.आर.एस.राचतवार, (इमारत निरिक्षक), प्रशासकीय अधिकारी विभाग, ,२) श्री.वाय.आर.अभंग, (विभागीय अधिकारी) विभाग क्र.१, ३) श्री.एम.डी.सितापुरे, वरीष्ठ स्वच्छता निरिक्षक, विभाग क्र.१ व ४) श्री.सय्यद कय्युम, स्वच्छता निरिक्षक विभाग क्र.१ या चार कर्मचारी/अधिकारी यांचे अपिल आलेले असून न्यायालयाच्या अंतिम निकाल व प्रशासकीय चौकशी होऊन त्यांचा अंतिम निर्णय याच्या अधिन राहून त्यांना कामावर घेण्यांस मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१८६/५३ :**

श्री.आर.एस.राचतवार, इमारत निरिक्षक, प्रशासकीय अधिकारी विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांचे निलंबन आदेश क्रमांक मनपा/अस्था-१/९९/२४९६, दि.०७.०६.९९ विरुध्दच्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**संवाद :-**

**मा.सभापती :** सदरील अपिल सर्वानुमते मान्य करण्यांत येतो.

**ठराव :**

सदर प्रकरणी प्रशासनाकडून क्रमांक मनपा/अस्था-१/९९/२७३०, दि.२२.०६.९९ अन्वये सादर केलेली प्राप्त माहिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यांत येतो.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ४ खालील तरतूदीनुसार अपिलकर्त्यास ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी पोलिस किंवा न्यायालयीन कोठडीत ठेवण्यांत आले नव्हते.

२. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांकडून जमा झालेल्या करातून देण्यांत येतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांकडून कामे न घेता ५० टक्के, ७५ टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही. तसेच सेवेत असतांना देखील खाते चौकशी करता येऊ शकते.

३. अपिलकर्त्याचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यांत यावा. त्यांच्यावर ठेवण्यांत आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.

४. उपरोक्त बाबींचा विचार करता श्री.आर.एस.राचतवार, इमारत निरिक्षक यांचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्यांत येते. संबंधितास कामावर रुजू करुन घ्यावे. प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८७/५४ :**

श्री.वाय.आर.अभंग, विभागीय अधिकारी, विभाग क्र.१ यांचे निलंबन आदेश जा.क्र./मनपा/अस्था-१/९९/२२०१, दि.२४.०५.८९९ विरुध्दच्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**संवाद :-**

**मा.सभापती :** सदरील अपिल सर्वानुमते मान्य करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.वाय.आर.अभंग, विभागीय अधिकारी, विभाग क्र.१ महानगरपालिका, औरंगाबाद यांना मजूरांचे हजेरीपत्रकात नांवे नाहीत व त्यांचे नांवे हजेरी दर्शवून रक्कम उचलण्यात आली या कारणास्तव निलंबन करण्यांत आले असून सदर प्रकरणी अपिल कर्त्याच्या अर्जावर प्रशासनाचे मत घेण्यांत आले. प्रशासनाने त्यांचेकडील क्र.मनपा/अस्था-१/९९/२५५६, दि.१४.०६.९९ अन्वये अभिप्राय दिलेला आहे. सदर अहवालात मजूरांना रक्कम रु.१,५३,७००/- अदा केली आहे. ती संशयास्पद आहे असे नमूद केलेले असून त्यांची खाते चौकशी चालू आहे. त्यांचेवरील आरोप अद्याप सिध्द व्हायचे आहे.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून अधिकारी यांना वेतन व भत्ते नागरिकांकडून जमा झालेल्या करातून देण्यांत येतात. त्यामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित ठेवून कामे करुन न घेता ५० टक्के, ७५ टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही.

करिता त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांना कामावर रुजू करुन घेणे बाबतचे अपिल खाते चौकशीच्या अधिन राहून मान्य करण्यांत येते. संबंधितांस कामावर रुजू करुन घ्यावे, या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८८/५५ :**

श्री.एम.डी.सितापुरे, वरीष्ठ स्वच्छता निरिक्षक, विभाग क्रमांक १ यांचे निलंबन आदेश जा.क्र./मनपा/अस्था-१/९९/२२०१, दि.२४.०५.९९ विरुध्दच्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**संवाद :-**

**मा.सभापती :** सदरील अपिल सर्वानुमते मान्य करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.एम.डी.सितापुरे, वरीष्ठ स्वच्छता निरिक्षक, विभाग क्र.१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना मजूरांचे हजेरी पत्रकात नांवे नाहीत व त्यांचे नांवे हजेरी दर्शवून रक्कम उचलण्यांत आली या कारणास्तव निलंबन करण्यांत आले असून सदर प्रकरणी अपिल कर्त्याच्या अर्जावर प्रशासनाचे मत घेण्यांत आले. प्रशासनाने त्यांचेकडील पत्र क्रमांक मनपा/अस्था-१/९९/२५५६, दि.१४.०६.९९ अन्वये अभिप्राय दिलेला आहे. सदर अहवालात मजूरांना रक्कम रु.१,५३,७००/- अदा केली आहे, ती संशयास्पद आहे असे नमूद केलेले असून त्यांची खाते चौकशी चालू आहे. त्यांचे वरील आरोप अद्याप सिध्द व्हायचे आहेत.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून अधिकारी/कर्मचारी यांना वेतन व भत्ते नागरिकांकडून जमा झालेल्या करातून देण्यांत येतात. त्यामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित ठेवून कामे करुन न घेता ५० टक्के, ७५ टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही. करिता त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांना कामावर रुजू करुन घेणे बाबतचे अपिल खाते चौकशीच्या अधिन राहून मान्य करण्यांत येते. संबंधितास कामावर रुजू करुन घ्यावे. या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१८९/५६ :**

श्री.सय्यद कय्युम, स्वच्छता निरिक्षक, विभाग क्र.१ यांचे निलंबन आदेश जा.क्र./मनपा/अस्था-१/९९/२२०१, दि.२४.०५.९९ विरुध्दच्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**संवाद :-**

**मा.सभापती :** सदरील अपिल सर्वानुमते मान्य करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.सय्यद कय्युम, स्वच्छता निरिक्षक, विभाग क्र.१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना मजूरांचे हजेरी पत्रकात नांवे नाहीत व त्यांचे नांवे हजेरी दर्शवून रक्कम उचलण्यांत आली या कारणास्तव निलंबन करण्यांत आले असून सदर प्रकरणी अपिल कर्त्याच्या अर्जावर प्रशासनाचे मत घेण्यांत आले. प्रशासनाने त्यांचेकडील पत्रक्रमांक मनपा/अस्था-१/९९/२५५६, दि.१४.०६.९९ अन्वये अभिप्राय दिलेला आहे. सदर अहवालात मजूरांना रक्कम रु.१,५३,७००/- अदा केली आहे, ती संशयास्पद आहे असे नमूद

केलेले असून त्यांची खाते चौकशी चालू आहे. त्यांचे वरील आरोप अद्याप सिध्द व्हायचे आहेत.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून अधिकारी /कर्मचारी यांना वेतन व भत्ते नागरिकांकडून जमा झालेल्या करातून देण्यांत येतात. त्यामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित ठेवून कामे करुन न घेता ५० टक्के, ७५ टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही. करिता त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांना कामावर रुजू करुन घेणे बाबतचे अपिल खाते चौकशीच्या अधिन राहून मान्य करण्यांत येते. संबंधितास कामावर रुजू करुन घ्यावे. या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.सभापती (स्थायी समिती) |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०६.०७.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक ०६ जुलै, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची बैठक संपन्न झाली तिचे इतिवृत्त. बैठकीची सुरुवात "वंदेमातरम्" या गीताने दुपारी ५.०० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे झाली. बैठकीस अधिकारी वर्ग व खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. बचाटे राजकुमार | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. अजिज खाँ गणी खाँ | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| ११. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| १२. | स.स.सौ. मुंडलिक विमल नंदकुमार | - | स.सभासद |

**संवाद :**

**श्री.विखारोद्दीन :** काश्मिरमधील कारगील येथील युध्दात शहीद झालेल्या भारतीय जवानांना सभागृहात ०१.०० मिनीट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** कारगीलमध्ये लढाईत शहीद झालेल्या भारतीय जवानांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यांत यावी. (०१.०० मिनीट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यांत आली.)

**श्री.विखारोद्दीन :** आजच्या बैठकीत नवीन मा.आयुक्त या ठिकाणी उपस्थित आहेत. माजी आयुक्त यांनी ज्याप्रकारे कामे केलीत त्यापेक्षाही चांगले काम सध्याचे आयुक्त करतील अशी विनंती करतो त्याचप्रमाणे ज्या काही मागील वेळेसच्या प्रलंबित संचिका असतील त्या तातडीने काढून कार्यवाही करावी. कारण निवडणूका येत असून आचार संहिता लागणार आहे. त्यामुळे जुन्या फाईली लवकर निकाली काढावे.

**सौ.राधाबाई तळेकर :** ०१.०९.९७ पासून आजपर्यंतच्या कालावधीत मी माझ्या वार्डातील शाळेच्या वॉचमनसाठी एक रुम बांधकामासाठी सतत मागणी करीत आहे. परंतू संबंधित विभागानी अद्यापही कार्यवाही केलेली नाही. अनेकवेळा विचारणा करुनही संचिका सापडत नाही. किंवा अर्थसंकल्पात तरतूद शिल्लक नाही असे उत्तर मिळते. रु.७५/- हजाराचे अंदाजपत्रक असलेल्या

या रुमसाठी एवढा विलंब लागतो याचे कारण स्पष्ट होणे आवश्यक आहे. नाही तर मी सभेच्या मध्यभागी खाली बसून राहील व

**मा.सभापती :** मागील बैठकीत या संदर्भात सूचना दिलेल्या होत्या काय कार्यवाही झाली याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावी.

**शहर अभियंता :** अर्थसंकल्पीय तरतूद नाही. असे स.स.नस. कळविले आहे. स.स.ची मागणी वॉचमनसाठी रुम बांधून देणेची आहे. अंदाजपत्रक तयार करुन पाठविलेली आहे.

**श्री.अजिजखॉन गणी खॉं :** किराणचावडी पानदरीबा, गुलमंडी वरील मुत्री तसेच चिश्तिया कॉलनी येथील सार्वजनिक मुत्री या मस्जीदला लागून असून त्या मुत्रीमुळे दुर्गंधी पसरलेली आहे. शिवाय मुत्रीतील पाणी मस्जीदकडे शिरत आहे. तेव्हा त्यासर्व दुर्गंधीमुक्त मुताऱ्या तातडीने पाडण्यांत याव्यात.

**मा.सभापती :** ठिक आहे. पाहणी करण्यांत येईल. आपण सोबत जाऊ मी आपल्या भावना समजतो.

**सौ.लता दलाल :** माझ्या वार्डातील एकनाथ मंदिरच्या बाजुला औरंगपुरा येथे जी मुतारी आहे. त्यामुळे संपूर्ण रस्त्यावर दुर्गंधी वास सुटतो. व वाटेतील जाणे येणाऱ्यांनाही त्रास होतो. तेव्हा सदरील मुतारी तोडण्यांत यावी याच संदर्भात मी सन १९९५ पासून सारखी विचारणा करीत आहे. अद्यापही मुतारी तोडण्यांत आली नाही.

**मा.सभापती :** या संदर्भात मा.आयुक्त यांचे समवेत प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** १) राहुलनगर रेल्वेस्टेशन येथील एका अपंग महिलेची जागा ड्रेनेज लाईन टाकणेसाठी घेतलेली आहे. ही बाब जवळपास १९९४-९५ पासूनची असून त्या मोबदल्यात संबंधित व्यक्तीला टपरीसाठी जागा मागणी केली असता ती दिल्या जात नाही. याचे कारण काय? २) मिलकॉर्नर येथील तिबेटी लोकांनी स्वेटर विक्रेते म्हणून जो व्यवसाय करित आहेत ते बदमाशी असून त्यांना कायमचे टपऱ्या साठी परवानगी दिलेली आहे काय? पुर्वी जसे तात्पुरते दिले होते तसे द्यावी. औरंगाबादच्या नागरिकांना देत नाही.

**सौ.लता दलाल :** असे निर्देष आहेत की, जवळपास ८० ते १०० फुटी रुंद कोणत्याही रोडवर टपऱ्यांसाठी परवानगी देण्यांत येऊ नये असे असतांनाही बऱ्याच अशा ८० फुट १०० फुट रस्त्यावर टपऱ्या बसविण्यांत आलेल्या आहेत. याशिवाय प्रिट्रॅव्हल ते भडकल गेट या रोडवर एकंदर किती टपऱ्या मंजूरीने बसलेल्या आहेत व किती टपऱ्या मंजूरी विना बसलेल्या आहेत याचा खुलासा व्हावा.

**श्री.अजिज खॉन गणी खॉं :** शहरात अशा विविध ठिकाणी अनधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत. याबाबत प्रशासकीय अधिकारी यांना योग्य त्या सुचना व्हाव्यात.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** मिलकॉर्नर येथील नेपाळी लोकांच्या टपऱ्या आहेत. त्या डिपी रोडवर येत असल्याने त्यांना मनपातर्फे परवानगी देण्यांत येऊ नये. आणि त्या लोकांना जर परवानगी देण्यांत येत असेल तर शहरातील विविध भागातील रस्त्यावर लोकांची टपऱ्या बसविण्यासाठी मागण्या होतील व त्यांनाही परवानगी देणे भाग पडेल या बाबतची नोंद घ्यावी.

**मा.सभापती :** मध्यवर्ती बस स्थानक रोड हा अति महत्वाचा रोड असून या रोडवर नेपाळी लोकांनी स्वेटर विक्रेत्याचा धंदा म्हणून टपऱ्या टाकून बसलेले आहेत. त्यांना

परवानगी दिलेली आहे काय? किती कालावधीसाठी परवानगी दिलेली आहे या बाबतची सविस्तर माहिती द्यावी. पुर्वी ४ महिन्याची परवानगी देण्यांत येत असे १९९५ पासून किती टपऱ्या दिल्या याची माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** बस स्थानकारोड वरील जागेत ज्या नेपाळी लोकांना स्वेटर विक्रेते म्हणून परवानगी दिलेली आहे. ती त्यांना निर्वासित रहिवाशी म्हणून मानवतेच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून परवानगी दिलेली आहे. या ठिकाणी एकूण ८९ लोकांना सहा महिन्यासाठी भाडे आकारुन मनपाने परवानगी दिलेली आहे. या संदर्भात सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय झालेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यांत आली.

**सौ.लता दलाल :** मानवतेचा दृष्टीकोन भारतीय लोकांसाठी ठेवावा येथील लोकांना परवानगी द्यावी. निर्वासित लोकांना टपरी परवानगी देऊ नये. नगररचना विभागाने रस्त्याच्या संदर्भात नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे का?

**मालमत्ता अधिकारी :** जेवढ्या या निर्वासित लोकांच्या टपऱ्या बसलेल्या आहेत. त्यांनी पोलिस कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र आणलेले आहेत.

**श्री.विखारोद्दीन :** शहरात जेवढ्या काही टपऱ्या बसलेल्या आहेत. त्यापैकी बऱ्याच टपऱ्या अनाधिकृत आहेत तर काही टपऱ्यांना पोलिस कार्यालयाची नाहरकत प्रमाणपत्र आणल्यास त्यांना आपण टपरी परवानगी देणार काय? जर निर्वासित लोकांसाठी सहानुभूती आहे तर भारतीय लोकांच्यासाठी का नाही.

**मा.सभापती :** सहाय्यक संचालक, नगररचना यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे का?

**नगररचना अधिकारी :** पाहून सांगतो.

**श्री.वसंत देशमुख :** या संदर्भात सर्वसाधारण सभेत अनेक वेळेस चर्चा झालेली आहे. शहराचा वाढता व्याप लक्षात घेता शहर अतिशय झपाट्याने वाढत आहे. व सुशिक्षीत बेरोजगारांचीही संख्या वाढत आहे. त्यांना रोजगार उपलब्ध होत नाही. म्हणून व्हीआयपी रोडवर टपऱ्या टाकून व्यवसाय चालवितात यासाठी प्रशासनाने योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे. व स्थायी समितीमध्ये चर्चा करुनच निर्णय घ्यावा असे वाटते.

**मा.सभापती :** सन १९९५ ला टपरी कमिटी स्थापन होऊन कमिटीने आपला अहवाल सर्वसाधारण सभेला दाखल केला व त्यानुसार चर्चा होऊन सभेमध्ये मंजूरही झालेला आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** बसस्थानक रोडवर ज्या निर्वासित लोकांना स्वेटर विक्रेते म्हणून परवानगी दिलेली आहे. तेव्हा ज्या जागेबाबत सहासंचालक नगररचना विभागाची नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे काय? संबंधित संचिका मागवून घ्यावी नसता आजची बैठक सुरु करु देणार नाही व बैठा सत्याग्रह करीन.

**सौ.लता दलाल :** सहा.संचालक नगररचना विभागाची नाहरकत प्रमाणपत्र अगोदर आहे काय? संबंधित अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात ते योग्य नाही?

**श्री.वसंत देशमुख :** प्रशासनाने कोणत्याही बाबतीत जे सभेमध्ये ठराव पारित होतात त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे ती केल्या जात नाही. परंतू या ठिकाणी स.स.मात्र विकासाच्या कामासाठी पोट तिडकीने बोलतो तेव्हा याबाबत गंभीरतेने विचार व्हावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सभागृहामध्ये स.स.ज्या सूचना मांडून प्रस्ताव पारित करतात त्यानुसार अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. गेल्या मार्च-१९९९ मध्ये सिडको हडको येथील रहिवाशी यांची पाणीपट्टी व्यवस्थीत होत असतांनाही

भर उन्हाळ्यांत मात्र या भागात पाण्याची टंचाई भासत होती व आताही गेल्या आठवड्यांत या भागासाठी पाणी पुरवठा व्यवस्थीत झालेला नाही. त्यामुळे नागरीक त्रस्त होतात. उन्हाळ्यात प्रत्येक ठिकाणी दोन हापसे करण्याचे ठरलेले असतांनाही प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. एकूण ८२ वार्डापैकी एकाही वार्डात हापसे झालेले नाही. सभागृहात निर्णय होऊनही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा संबंधित अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. स.स.श्री.विखारोद्दीन यांनी सूचना केल्यानुसार एका अपंग महिलेला टपरीसाठी जागा मोबदल्यात देण्यांत आलेली नाही. अतिमहत्वाचा रोडवर (व्ही.आय.पी.) रोडवर टपऱ्या टाकण्यांस परवानगी देय असतांनाही व त्याप्रमाणे ठरलेले असुनही काही ठिकाणी टपऱ्या का बसविल्या जातात काही भागात अगोदरच अनाधिकृत टपऱ्या बसविल्या जातात ही बाब योग्य नाही. या बाबत अशा संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही होणे आवश्यक आहे. बरेचशे प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर होतात परंतू प्रत्यक्षात त्याचे अंमलबजावणी व्हावयास बरीच कालावधी लागतो व दोन दोन महिने टेंडर काढण्यासाठी लागतात. याची चौकशी होणे आवश्यक आहे. अशा काही तक्रारी आहेत की कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी रजा मंजूरी वेळेवर होत नाही. दि.०५.१२.९७ मध्ये स्थायी समितीमध्ये जवळपास सहा अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी वाढ देण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा झाली असतांना मा.आयुक्त यांनी पुढील बैठकीत प्रस्ताव मांडण्यांत येईल असे आश्वासन दिलेले होते. उच्चश्रेणी लघुलेखक-२ पदे कामगार अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी व जनसंपर्क, सांस्कृतिक, क्रिडा अधिकारी या अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत चर्चा झालेली होती. पैकी किती अधिकाऱ्यांना आपण वेतनश्रेणी देऊ केलेली आहे. व किती अधिकाऱ्यांना अदा केलेली नाही काहींना देणे व काहींना न देणे हे कोणत्या नियमान्वये आहे. याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे टपऱ्याबाबत भावनिक होऊन सभागृहात खुलासा केला तो बरोबर नाही. या ठिकाणी बेरोजगार व्यक्ती आहेत. त्यांना अशाच प्रकारे सहानुभूती दाखवून त्यांची अंमलबजावणी करावी. परंतू तसे होत नाही. नगररचना विभागाचे नाहरकत पत्र नसेल तर काय कार्यवाही करणार.

**सौ.तळेकर राधाबाई :** मागील इतिवृत्तात सूचना केल्यानुसार जवाहर कॉलनी येथील त्रिमुर्ती चौक रस्त्यावर एका व्यक्तीला झुणका भाकर केंद्रासाठी जागा दिलेली असतांना त्यांनी त्या जागेच्या व्यतिरिक्त जादा जागा घेऊन दुसऱ्या व्यक्तीस रु. एक हजार (१०००/-) ला भाडे पट्टी आकारुन जागा दिलेली आहे. व सदरील जागा मनपाची असूनही तिचा दुरुपयोग या ठिकाणी होत आहे. मात्र येथील अधिकारी गप बसतात. अशाच प्रकारे हंगामी रसवंती असतात त्या कित्येक भागात विना परवानगी बसलेल्या असतात माझ्या वार्डात जवळपास १० रसवंत्या आहेत. त्या विना परवानगी असून त्यांचे विरुध्द पत्र देऊनही कार्यवाही होत नाही. या बाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांना सांगुनही कार्यवाही होत नाही. म.रा.वि.म.कडून मिटर नाही. सर्व्हीस लाईनवर वायर टाकून विद्युत पुरवठा उपलब्ध करुन घेतात.

**सौ.लता दलाल, श्री.रविंद्र इंगळे :** अशाच प्रकारे शहरातील अनेक भागामध्ये जागा मंजूरी दिल्या नंतरही जास्तीची जागा घेऊन त्यावर अनधिकृत बांधकामे करुन काही व्यक्ती पैसे कमविण्याचा व्यवसाय करीत आहेत यावर आळा घालावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नेपाळ राजस्थान येथील लोकांचा प्रश्न सुटतो. परंतू शहरातील लोकांचा प्रश्न सुटत नाही.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** मा.सभापती यांनी रुलींग द्यावी.

**श्री.विखारोद्दीन :** याबाबत आणि मी एका अपंगाच्या टपरीसंबंधी प्रश्न उपस्थित केला त्यावर निर्णय द्यावा.

**सौ.लता दलाल :** मी टपऱ्या, अतिक्रमण संबंधी सातत्याने विचारणा करीत आहे. अगोदर खुलासा व्हावा. नगररचना विभागाने मालमत्ता विभागाला ना हरकत (एनओसी) असल्याचे कळविले आहे का? १०० फुट रुंद रस्त्यावर टपऱ्या बसत आहेत. अतिक्रमण विभाग काय काम करते. नाहरकत प्रमाणपत्राबाबतची संचिका मागविण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्या सौ.तळेकर यांच्या वार्डातील शाळेच्या वॉचमनसाठी रु.७५,०००/- (पंच्याहत्तर हजार) ची खोली बांधणेच्या कामासाठी "विशेष बाब" म्हणून मान्य करण्यांत यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मागणी केल्यानुसार स.सदस्यांनी त्याच वेळेपासून पत्र देऊनही त्यांच्या वार्डातील बांधकाम बाबत ९७ मध्ये अंदाजपत्रक केले. नंतर अर्थसंकल्पात अंमलबजावणी का केली नाही किती प्रकरण आहेत.

**श्री.वसंत देशमुख :** सभागृहात चर्चेतून झालेल्या ठरावानुसार प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**श्री.अजिज खॉ गणी खाँ :** माझे प्रभागातील रु.८६,०००/- चे ड्रेनेज लाईन शाबिस्तान हौसिंग सोसायटीत टाकायची संचिका आहे. याचे काम त्वरीत सुरु करावे असे आदेश देण्यांत यावे.

**मा.सभापती :** शबिस्तान सोसायटीमध्ये रु.८६,०००/- चे खर्चाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता स.सदस्यांचे मागणीनुसार "विशेष बाब" म्हणून मान्यता देण्यांत येते.

**श्री.राजकुमार बचाटे :** स.सदस्या सौ.तळेकर यांनी विचारणा केलेली संचिका आज आणली. अशा लहान किती संचिका पडून आहेत.

**श्री.देशमुख वसंत :** कामे मंजूर करतांना अग्रक्रम डावलल्या जातो. बजेटची माहिती देण्यांत यावी. किती खर्च झाला. किती स्पीलओव्हर हे माहिती झाले तर त्याचा पाठपुरावा करता येईल. काही स.सदस्यांच्या संचिका एकाच दिवसांत मंजूर होतात.

**मा.सभापती :** मागच्या वर्षी २० कोटीचे स्पील ओव्हरचे काम होते. यावर्षी तरतूद करण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन :** स्पील ओव्हरमध्ये आमचे काम का होत नाहीत?

**श्री.वसंत देशमुख :** माझे वॉर्डात आरोग्य केंद्रासाठी पहिल्याच वर्षी पहिल्याच दिवशी तरतूद उपलब्ध होत नाही. गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे.

**मा.सभापती :** सर्वच वार्डातील सर्व कामे होतील असे म्हणता येणार नाही. मागच्या वर्षी २० कोटी स्पील ओव्हर होते. आताही करण्यांत यावे. नेपाळी लोकांना दिलेल्या टपऱ्या परवानगीशिवाय प्रथमत: सहा.संचालक नगररचना विभागाची "ना-हरकत प्रमाणपत्र" आहे काय याची माहिती पुढील बैठकीत द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** जे तिबेटी लोक आहेत. ते सर्व ८९ असून ते निर्वासित आहेत. याबाबत सर्वसाधारण सभेसमोर चर्चा होऊन निर्णय झालेला आहे. बसस्टँड रोडवरील

फुटपाथवर ६'X४' च्या आकाराच्या टपरीस एकूण ८९ लोकांना गेल्या ८ वर्षापासून मनपाने ठरवून दिलेल्या ११ महिन्याच्या करारनाम्यानुसार योग्य ते भाडे आकारणी करुन देऊ केलेली आहे. याबाबत टपरी कमिटीने सुध्दा चर्चा केलेली आहे. व सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार कार्यवाही झालेली आहे.

**सौ.लता दलाल, श्री.विखारोद्दीन :** सभागृहात खोटे कारण सांगून दिशाभूल करु नये. सुचना केल्यानुसार नगररचना विभागाचे "नाहरकत प्रमाणपत्र" आहे काय?

**श्री.तुळशीबागवाले, श्री.स.अ.इकबालोद्दीन :** जर या विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र नसल्यास व बसस्टँड समोरील जागा प्रशासनाने नेपाळी लोकांना तशीच दिलेली असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. कारण शहरातील जेवढ्या अनधिकृतरित्या ज्या टपऱ्या आहेत. त्या तातडीने काढाव्यात नाही. तर सर्वसाधारण सभेचा पारित झालेल्या प्रस्ताव मागवावा. नंरतच कार्यवाही करावी.

**उपआयुक्त (म.) :** मागच्या टपऱ्या अर्धवट होते. आता स्टॉल केले आहेत. पुर्वी पुर्ण पादचारी रस्ता व्यापला जात असे. आता अंतर कमी केलेले आहे.

**सौ.लता दलाल :** १०० फुट रुंद रस्त्यावरील अनेक टपऱ्या अधिकाऱ्यांना दिसत नाही असे असेल तर सर्व रोड द्या. चौकशी करण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन :** रद्द करा किंवा सर्वांना द्या. माझ्या वार्डातील अपंग स्त्रिला टपरी कधी देणार. जमिनीचे पैसे दिले नाही.

**मा.सभापती :** १) स.सदस्यांनी सूचना केल्यानुसार नेपाळी लोकांना दिलेल्या टपरीबाबतची संचिका सभागृहात दाखवावी व नंतरच चर्चा करुन निर्णय घेता येईल. २) स.सदस्य श्री.विखारोद्दीन यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे त्यांच्या वार्डातील एका महिलेने ड्रेनेज लाईनसाठी जी जागा देऊ केली त्या मोबदल्यात त्यांना टपरीसाठी जागा मनपाने देण्याबाबत प्रथमतः पाहणी करुनच निर्णय घेण्यांत येईल. पैशाच्या स्वरुपात मोबदला दिला नसेल तर तडजोड करुन मार्ग काढण्यांत यावा.

**श्री.विखारोद्दीन :** सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडून एन.ओ.सी.दिली आहे.

**सौ.राधाबाई तळेकर :** जवाहर कॉलनीचे बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. मालमत्ता कर भरण्यांत येतो. एक डी.पी.ला व्होल्टेज कमी आहे म्हणून म.रा.वि.मंडळाची डी.पी.टाकणेसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" पाहिजे होते. परंतू बऱ्याच कालावधीपासून डी.पी.साठी "ना हरकत प्रमाणपत्र" दिले गेले नाही. ज्यामुळे नागरिकांना विद्युत लाईन घेणे कठीण झाले होते. व पावर सप्लाय मिळणे आवश्यक होते. एन.ओ.सी.मिळत नसेल तर जबाबदार कोण?

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** मागील बैठकीत नेहरुभवन बाबत चर्चा झालेली होती. त्याबाबत अद्यापही पूर्णपणे कार्यवाही झालेली नाही. त्याचप्रमाणे सिव्हील हॉस्पीटल समोरील आयलँड आहे. त्याची योग्य प्रकारे निगरानी होत नसल्याने व काही मुले त्या ठिकाणी खेळत असल्याने त्या भागातील हिरवळ नाहीशी होत आहे. त्याबाबत संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.कोकाटे यांनी विचारलेल्या सुचनाबाबत ज्या ६ अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी देण्यांबाबत मागील वर्षीच्या स्थायी समितीमध्ये निर्णय झालेला आहे. त्याबाबत माहिती द्यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** याबाबत दि.०५.१२.९७ च्या स्थायी समितीच्या बैठकीत मा.आयुक्त यांनी पुढील बैठकीत वरील ६ अधिकाऱ्यांचा प्रस्ताव ठेवण्यांत येईल. असे सूचित केले होते. त्यानुसार आतापर्यंत किती अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी देण्यांत आली व किती अधिकाऱ्यांना देण्यांत आली नाही याची माहिती द्यावी व उर्वरित अधिकाऱ्यांना न देण्यांचे कारण काय? स्पष्ट व्हावे.

**मा.सभापती :** कामगार अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी व इतर अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी देण्यांत आली काय? याची माहिती द्यावी व इतर अधिकाऱ्यांना का देण्यांत आली नाही याचे कारण स्पष्ट करावे. व उर्वरित सर्व अधिकाऱ्यांचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

**उपआयुक्त (प्र.) :** कामगार अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी यांना ठरावाप्रमाणे वेतनश्रेणी दिली आहे. प्रशासनातर्फे सांस्कृतिक अधिकारी, क्रिडा अधिकारी व जनसंपर्क अधिकाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. व तसे प्रकरण चालू आहे. याबाबत प्रस्ताव पुढील बैठकीत तपासून ठेवण्यांत येईल.

**मा.सभापती :** पुर्वी ज्या अधिकाऱ्यांना वेतनश्रेणीतील केली त्याच वेळी सांस्कृतिक अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व क्रिडा अधिकारी यांना देखील वाढीव वेतनश्रेणी देण्यांत यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** स्थायी समितीतील जे प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर झालेले त्यापैकी कोणकोणत्या प्रस्तावांच्या निविदा काढण्यांत आलेल्या आहेत. याची माहिती द्यावी. कार्यकारी अभियंता (पा.पु.) या विभागातील बऱ्याचशा निविदा काढण्यासाठी जवळपास १२/१५ दिवसांचा कालावधी का लागतो, याचे कारण काय? ज्यामुळे एवढ्या तातडीने प्रस्ताव मंजूर करुनही निविदा तातडीने न निघाल्यास कामे होण्यास विलंब होतो यास जबाबदार कोण?

**मा.सभापती :** मागील स्थायी समितीची बैठक होऊन १४ दिवस झाले. निविदा काढायला १४ दिवस लागले.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** नेहमीच्या पध्दतीप्रमाणे लेखा विभागाकडे पाठवून लेखा विभागाकडून निविदा काढण्यांत येतात.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शासनाकडील सार्वजनिक बांधकाम व लघुपाटबंधारे तसेच इतर विभागात संबंधित कार्यकारी अभियंता यांना त्या-त्या कामाचे निविदा काढून काम करवून घेण्याचे अधिकार असतात. परंतू आपल्याकडे लेखा विभागाकडे संचिका पाठविल्या जाते. लेखा विभागाकडून निविदा मागविण्यांत येते. शासकीय विभागात लेखा विभागातून निविदा काढण्यांत येत नाही. वेळेवर व तत्परतेने कार्यवाही होणेसाठी येथील कार्यकारी अभियंता यांनीच निविदा काढावी.

**श्री.रविंद्र इंगळे :** स.सदस्य श्री.कोकाटे यांचे म्हणणे बरोबर आहे. प्रत्येक वेळी लेखा विभागाला पाठविणे बरोबर नाही.

**श्री.अजिज खाँ गणी खाँ :** अल्प मुदतीची निविदा काढावी.

**सौ.लता दलाल :** त्या-त्या विभागाकडून निविदा काढावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** कामाच्या पध्दतीत बदल करावा. प्रथम तांत्रिक छाननी व्हावी. नंतर मा.आयुक्तांकडे पाठवावे.

**मा.सभापती :** नवीन आयुक्तांनी पदभार स्विकारल्यानंतर टेंडरची जी नवीन पध्दत अवलंबिली आहे, जसे की, उप अभियंता यांनी अंदाजपत्रक तयार

केल्यानंतर ती संचिका तांत्रिक कक्षाकडे जाईल. आणि त्यानंतर कार्यकारी अभियंता यांचेकडे परत येऊन ती संचिका लेखा विभागाकडे पाठविली जाईल. व त्यानंतरच मा.आयुक्त यांचेकडे अंतिम मंजूरीसाठी जाईल. या पध्दतीबाबत नवीन पायंडा पाडल्याबद्दल सभागृहात नवीन आयुक्तांचे अभिनंदन करण्यांत येते. जेणे करुन आपल्याकडील संबंधित विषयाची जी चर्चा आहे की, एखाद्या कामाचे टेंडर कमी होणे, जास्त होणे व प्रलंबित राहणे या संदर्भात मा.आयुक्त यांना विनंती की, जेव्हा रक्कम ५० कोटीचे मनपाचे अर्थसंकल्प होते. त्यावेळेसची पध्दत ठिक होती. परंतू केंद्रीकरण करुन टेंडर काढण्याची पध्दत मा.आयुक्तांनी मोडीत काढून प्रत्येक कार्यकारी अभियंता यांनी आपआपल्या अधिकाराखाली व मा.आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आपआपले कामाचे टेंडर काढावे असा मी स्थायी समितीमध्ये निर्णय देतो.

**श्री.वसंत देशमुख, श्री.स.अ.इकबालोदीन :** या संदर्भात प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त यांचे मत घ्यावे. प्रशासकीय विभागात जे पोलिस कर्मचारी आहेत. ते सध्या मनपाकडे कार्यरत नाहीत काय? जर मनपाकडे कार्यरत नसतील तर त्यांना पगार देण्यांत येऊ नये. आणि काही पोलिस कर्मचारी बाहेर बसून राहतात. त्यांना कोणत्याही प्रकारचे काम नाही काय?

**श्री.अजिज खाँ गणी खाँ :** पोलिस कर्मचारी बाहेर बंदोबस्ताला जातात. त्या दिवशीचा पगार थांबवावा.

**श्री.राजकुमार बचाटे :** मागील वेळेस मा.मंत्री महोदय श्री.हरीभाऊजी बागडे यांचे समक्ष नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंड परिसरात टाकण्यांत येणाऱ्या कचऱ्याच्या संदर्भात आठ-दहा दिवसांत सर्व उचलण्यांत येईल असे आश्वासन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले होते. परंतू अद्यापही त्या ठिकाणची कार्यवाही झालेली नाही. जर येत्या आठ-दहा दिवसांत कचरा उचलल्या गेला नाही तर शेतकरी उचलून घेऊन जातील.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** संबंधित ठिकाणी पावडरची फवारणी केलेली आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची दुर्गंधी येत नाही. त्याचप्रमाणे या भागातील सर्व केरकचरा उचलण्यासाठी अद्याप १०-१५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. जर या कालावधीत कचरा उचलण्यांत आला नाही तर मात्र शेतकऱ्यांनी तो घेऊन जावे. कचरा हटविणे महाग पडते. त्या कचऱ्यावर प्रक्रिया केली. हा कचरा रस्त्यावर नाही व वासही येत नाही. हा कचरा ठराविक काळात हलविला पाहिजे. ती प्रक्रिया संपलेली आहे.

**श्री.राजकुमार बचाटे :** सभागृहाची दिशाभूल होत आहे.

**सौ.मुंडलिक विमलताई :** पावडर बाहेरुन टाकली जात नाही. प्रक्रिया सुरु केली होती. रस्ता मोकळाच आहे. आजही जाऊन बघता येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नारेगांव या ठिकाणी मा.मंत्री महोदया समक्ष संबंधित अधिकाऱ्यांनी व मा.आयुक्त महोदयांनी आश्वासन दिलेले होते. त्याच ठिकाणी आरोग्य वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. तरीही अधिकारी वर्ग टाळाटाळ करणे योग्य नसून अधिकारी वर्ग ऐकत नसल्यास संबंधितावर कार्यवाही करावी.

**श्री.राजकुमार बचाटे :** आश्वासन दिल्यानंतर काम झाले नाही.

**मा.सभापती :** नारेगांव येथील केरकचरा बाबत मा.आयुक्त यांनी दिलेल्या आश्वासन संदर्भात येत्या १५ दिवसांत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी कार्यवाही करावी व योग्य ती दखल घ्यावी.

**श्री.विखारोद्दीन :** माझ्या वार्डातील दवाखाना सुरु झाला. परंतू उद्‌घाटनापुर्वी पासून या ठिकाणी "एक्सरे" मशीन आलेली नाही. त्याचप्रमाणे येथील काही कामे संबंधित गुत्तेदाराने व्यवस्थीत केलेले नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** स.सदस्यांच्या सुचनेनुसार एक्स-रे मशिन यावयास उशिर होण्याचे कारण म्हणजे संबंधित एजन्सीजचे जकात माफी बाबत कळविले होते. जोपर्यंत या एक्स-रे मशिनवर जकात माफ होत नाही. तोपर्यंत सदरील मशीन येणार नाही. तसे संबंधित एजन्सीला याबाबत कळविण्यांत आलेले आहे.

**उप अभियंता (इ.) :** वैद्यकीय अधिकारी यांचे सुचनेवरुन काही दवाखान्याचे भागातील दुरुस्तीचे नवीन काम चालु होते व ते काम वाढीव होते. ते काम एक महिन्यांत पूर्ण होईल.

**श्री.वसंत देशमुख :** पावसाळा सुरु झालेला असून शहरातील नाला साफसफाई मोहीम धिम्या गतीने असून याबाबतची मोहीम मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. आमच्या वार्डामध्ये साफसफाई करणारे मंजूर कमी असून नाला सफाई झाली नाही. कचरा वाहून गेला हातगाड्या या तुटक्या-फुटक्या व चाके मोडके-तोडके झालेले आहेत. त्याची दुरुस्ती मागील वर्षीय केल्याचे समजते. तर काही हातगाड्या झोनमध्ये पडलेल्या आहेत. त्यामुळे हातगाड्या अपुऱ्या असल्याने नवीन हातगाड्या प्रत्येक झोनमध्ये असणे आवश्यक आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना काम करणे अवघड जात आहे. याबाबत प्रशासनाने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी. मागच्या वर्षी ज्या पध्दतीने काम करण्यांत येत होते, तसे काम केले जात नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** नवीन हातगाड्या खरेदी करणे बाबत मागणीनुसार आदेश दिलेले आहेत. गाड्या बनविण्याचे काम चालू आहे. ८-१५ दिवसांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** जुने गाड्या दुरुस्त करुन घ्यायचे कि नवीन गाड्या मागविण्यांत येत आहे. जुन्या गाड्यांचा हिशोब ठेवण्यांत यावा.

**श्री.वसंत देशमुख :** स्वेच्छा निधीमधून गाड्या खरेदी करण्यांत यावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेवर त्यांच्या विभागाच्या कामाचा व्याप जास्त प्रमाणेत आहे. तेव्हा त्यांचेकडील काही कामाचे वाटप करावे.

**सौ.तळेकर राधाबाई :** माझ्या वार्डात दररोजचा केरकचऱ्यांचा ढिग साचलेला असतो. साफसफाई व्यवस्थीत होत नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देवूनही योग्य ती दखल घेतल्या जात नाही.

**मा.सभापती :** संबंधित झोन अधिकाऱ्यांनी याबाबत विशेष लक्ष घालुन दक्षता घ्यावी.

**श्री.विखारोद्दीन :** झोन क्र.६ येथील ड्रेनेज व पाणी पुरवठा दुय्यम आवेक्षक हे झोन कार्यालयात हजर राहत नाहीत व तक्रारी ऐकून कार्यवाही करीत नाहीत. याबाबत संबंधित सब ओव्हर सिअर हे झोन अधिकारी यांचे अधिपत्याखाली काम करीत नाही काय? जर सूचना द्याव्यात. हे सब-ओव्हरसिअर झोन कार्यालयात येऊन हजेरी लावून बाहेर कुठेही निघुन जातात. जनतेच्या तक्रारी मात्र बऱ्याच प्रमाणात येतात त्या दूर केल्या जात नाहीत.

**श्री.राजकुमार बचाटे :** त्याचप्रमाणे जेटींग मशीन सुध्दा झोनमध्ये ठरलेल्या दिवशी येत नाही.

**कार्य.अभियंता (पा.पु./ज.नि.) :** सब ओव्हरसिअर हे झोन-६ च्या अधिपत्याखाली काम करत असतात. याबाबत झोनकडील तक्रारी त्यांनी दूर कराव्यात. तसेच बायजीपुरा या भागात जेंटींग मशीन गेल्या २-३ दिवसांपासून कार्यरत होती. त्या ठिकाणी जेटींगच्या मशीनने सफाईचे काम मोठ्या प्रमाणात चालू होते. त्यामुळे संबंधित झोनकडे जेंटींग मशिन आलेली नसेल.

**सौ.लता दलाल :** औरंगपुरा येथील जागेचा सिटीएस नं.१७८०४ या रेखांकन खुल्या जागेवर बांधकाम परवानगी कशी दिली. औरंगपुरा बसस्टॉप जवळ १०,००० चौ.मी.फुट रेखांकनाची खुली जागा आहे. त्या सोसायटीने आपल्याकडे पत्र दिले. कोर्टाने निर्णय दिला. महानगरपालिकेने उत्तर दिले नाही का? बांधकाम परवानगी कशी दिली?

**सहा.संचालक, नगररचना :** याबाबत लेखी माहिती २-३ दिवसांत कळविण्यांत येईल.

**विषय क्र.१९०/१ :**

दिनांक २२ जून, १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.६ मध्ये मागील सभेमध्ये साईनगर एन-६ सिडको बाबत दुकान केंद्र बांधणे बाबत तेथील लोकांना २४ हप्ते देणे बाबत सूचना केली होती त्याबाबत काय झाले?

**मा.सभापती :** ठिक आहे. ही बाब प्रशासनाच्या वतीने तपासून २४ हप्त्यात वसूल करण्याबाबत कार्यवाही करावी.

**श्री.विखारोद्दीन :** माझ्या वार्डातील कब्रस्तानच्या ठिकाणी काही व्यक्तींचे गैरकानूनी बांधकामे होत आहेत. याबाबत प्रशासकीय विभागाने अद्यापही कार्यवाही का केली नाही.

**प्रभारी प्रशासकीय अधिकारी :** या संदर्भात संबंधितांना नोटीसा जारी करण्यांत आलेल्या आहेत. दि.०३.०६.९९ ला नोटीसची मुदत संपलेली आहे. पोलिस संरक्षण मिळालेले नसल्याने काम थांबलेले आहे.

**श्री.विखारोद्दीन :** आपल्या कार्यालयासाठी शासनातर्फे अतिक्रमण विभागासाठी पोलिस कर्मचारी तैनात करुन संरक्षण घेतले जाते असे असतांना ऐनवेळी पोलिस कर्मचाऱ्यांना बाहेरील कार्यक्रमासाठी का पाठविले जाते. त्यामुळे मनपाचे अतोनात नुकसान होते. याकडे कोण लक्ष देणार याची माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** दि.२९.०६.९९ पासून पोलिस कर्मचाऱ्यांना मा.पोलिस आयुक्तांच्या सुचनेवरुन पोलिस मुख्यालयाकडे पाठविण्यांत आलेले आहे. यापुर्वी मा.आयुक्तांची परवानगी न घेता बोलावण्यांत आले होते. पोलिस पथक परत मागवून घेण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** दि.२२.०६.९९ ते २९.०६.९९ पर्यंत पोलिस कर्मचारी या कार्यालयात नाहीत. तेव्हा संबंधितांवर कार्यवाही का करीत नाहीत.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.विखारोद्दीन यांनी केलेल्या सुचनेवरुन प्रशासकीय अधिकारी यांनी कब्रस्तानवरील अनधिकृत बांधकामे होत असल्यास ती पोलिस मदतीने तातडीने काढून टाकण्याची कार्यवाही करावी.

**श्री.विखारोद्दीन :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र.९ मध्ये चर्चा केल्यानुसार पैठणगेट ते क्रांतीचौक पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्या संदर्भाने ५६ लाखांची मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार संबंधित व्यक्तींना चेक प्रशासनाने दिला आहे काय? आणखी किती दिवस लागणार आहेत. याची माहिती द्यावी.

**सहा.संचालक, नगररचना :** पैठणगेट ते क्रांतीचौक या रस्ता रुंदीकरणात भूसंपादनात गेलेल्या रस्त्यां संदर्भात चे मिळालेली नाही.

**श्री.विखारोद्दीन :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१७ व १८ विषय क्र.१३३/१० बाबतचा प्रस्ताव जो मंजूर केलेला आहे तो योग्य नसून त्या बाबत माझा स्पष्टपणे आक्षेप आहे. कारण या प्रस्तावातील पदनाम बदलावयाचे झाल्यास नियम ४५ (४) अन्वये सर्वसाधारण सभेला अधिकार आहेत. त्यानुसार कार्यवाही व्हावी व नंतरच शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

**श्री.वसंत देशमुख :** प्रशासनात अगोदर पद दिले जाते आणि नंतर त्या पदाचा फायदा दिला जातो. या सर्व बाबतीत विचार व चर्चा करुन सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठवावा.

**मुख्य लेखा परिक्षक :** प्रस्तावातील सद्यःस्थितीत पदनाम बदललेले असून त्याची मुळ वेतनश्रेणीत बदल केलेला नाही. आणि जर पदनाम बदल केल्यास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे नियम ५४ (१) नुसार स्थायी समितीला अधिकार आहेत. यामध्ये जे मुळ पदनाम आहे. १) वरीष्ठ लेखा परिक्षक हे लेखा परिक्षण विभागात लेखा परिक्षा अधिक्षक या पदनामात येईल, २) कनिष्ठ लेखा अधिक्षक या पदनाम वरीष्ठ लेखा परिक्षक या पदनामात येईल तर ३) कनिष्ठ/लेखा लिपीक हे पदनाम कनिष्ठ लेखा परिक्षक या पदनामात गणल्या जाईल. व या सर्वाच्या मुळ वेतनश्रेणीत कोणताही बदल झालेला नाही. फक्त लेखा परिक्षण हा विभाग स्वतंत्र झालेला असल्याने लेखा संबंधाने पदनाम करण्यांत आलेले आहे. यानंतरही जर स्थायी समितीला फेरविचार करावयाचा असल्यास प्रशासनाची काही हरकत नाही. परंतू सर्वसाधारण सभेला शिफारस करण्याचा प्रश्नच येत नाही.

**मा.सभापती :** सदरील प्रस्ताव मंजूर करुन सर्वसाधारण सभेला शिफारस करण्यांत येते.

**श्री.राजकुमार बचाटे :** पृष्ठ क्र.११ व १२ वर मोबाईल फोनवर जकात आकारणी करणे संदर्भात काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**जकात अधिक्षक :** (माहिती वाचून दाखविली) व शहरात किती मोबाईल फोन आहेत. याबाबत संबंधीत एजन्सीला दि.२५.०६.९९ रोजी माहिती घेणेसाठी नोटीस पाठविण्यांत आली.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र.१० मध्ये मनपाच्या अस्थापनेवर दि.१७.०६.९९ ते २१.०६.९९ या कालावधीत अनुरेखक, शिपाई, शिक्षक व लिपिक पदांच्या भरतीबाबत विचारणा केलेली होती. त्याबाबत काय माहिती आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** मा.सभापती यांना माहिती दिलेली आहे. उपरोक्त कालावधीत अस्थापना-१ यांचेकडून १५ व्यक्तींना दैनिक वेतनावर तीन महिनेसाठी तर काही यापैकीच सहा (६) महिनेसाठी नियुक्ती केलेली आहे. तर अनुरेखक - ६ व शिक्षकांच्या - ७ रिक्त पदावर नव्याने नियुक्ती केलेली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अनुरेखक व शिक्षक भरती तसेच दैनिक वेतनावरील लिपिक पदांची ऐनवेळी म्हणजे दि.१७.०६.९९ ते २१.०६.९९ या तीन दिवसांत प्रशासनाने

आपली कार्यवाही पूर्ण करणे म्हणजे ही संशयास्पद बाब आहे. याबाबत संपूर्णपणे चौकशी होणे आवश्यक आहे. कारण शनिवार व रविवार या दोन दिवसांत कार्यालयात बसून नियुक्तीचे आदेश काढण्यांत आलेले असून या नियुक्त्याच बेकायदेशीर झालेल्या आहेत. अनुरेखक/शिक्षक भरती करीत असतांना ज्या शासकीय यंत्रणेतील समाजकल्याण/सेवायोजन कार्यालयाचे विभाग आहेत. त्यांचेकडून नियमाप्रमाणे याद्या मागवून घेतल्या. परंतू असे निदर्शनास आले आहे की, जे उमेदवार आपल्याला पाहिजे आहेत. त्यांचे साठी पुन्हा याच कार्यालयाकडून दोनदा पुरवणी याद्या मागवून व त्यात संबंधित व्यक्तींचे नांव समाविष्ट करुन घेतले व त्यांची नियुक्ती केलेली आहे. ट्रेसर या पदासाठी दि.०७.०४.९९ रोजी जाणीवपूर्णक काही लोकांनी कोर्टात स्टे आणलेला होता व प्रशासनावर प्रेशर आणून या पदांसाठी १००% भ्रष्टाचार झालेला आहे. हे यामधूनच दिसून येते. तेव्हा याची उच्चस्तरीय चौकशी व्हावी. आणि जर प्रशासन याबाबत काही एक करीत नसेल तर नाईलाजाने आम्हाला न्यायालयात दाद मागावी लागणार आहे.

**मा.सभापती :** पुर्वी शिक्षक भरती चौकशी समिती सर्वसाधारण सभेच्या माध्यमातून झालेली आहे. चौकशी समिती स्थापन करण्यासाठी बाब मा.महापौर यांचे नजरेस आणून देण्यांत येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** या संदर्भात मा.महापौर यांनी मा.आयुक्त यांचेकडे दि.१७.०६.९९ ते २१.०६.९९ पर्यंतच्या कालावधीत झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणांची चौकशी व प्रकरणे प्रलंबित चौकशी व्हावी.

**मा.सभापती :** या संदर्भात दि.१७.०६.९९ ते २१.०६.९९ दरम्यानच्या काळात प्रशासनाने जी नवीन पदे भरली ज्यामध्ये दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्या सर्वांची मुद्देनिहाय माहिती या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना एक-एक प्रतीत द्यावी.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** पृष्ठ क्र.९ मध्ये नेहरु भवन बाबत गेल्या तीन वेळेस हर्रासी झालेली आहे. परंतू निर्णय काही झालेला नाही. आता किती कालावधी लागणार आहे.

**मालमत्ता अधिकारी :** नेहरुभवन बाबत पुनः हर्रासी करण्यासाठी नोटीस जारी करण्यांत आली तथापि त्या ठिकाणी कुणीही व्यक्ती बोली बोलण्यास आलेला नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मुळ किंमत जास्त असल्यामुळे या हर्रासी बाबत फेरविचार व्हावा.

**मा.सभापती :** दि.२२.०६.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत स्थगित ठेवण्यांत आलेला ठराव क्र.१२७/४ हा मंजूर करण्यांत येतो. तसेच नेहरुभवन च्या हर्रासी बाबत मा.आयुक्तांशी चर्चा करुन निर्णय घेण्यांत येईल. विषय क्रमांक १ दुरुस्तीसह मंजूर.

**ठराव :**

१) दि.२२.०६.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत स्थगित ठेवण्यांत आलेला ठराव क्र.१२७/४ मंजूर करण्यांत येतो. त्यानुसार सिल्क मिल कॉलनी येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.५५% कमी दराची श्री.मेराज अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) दिनांक २२.०६.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत ठराव क्र.१३३/१० अन्वये लेखा परिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे पदनाम खालीलप्रमाणे निश्चित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेले पदनाम/वेतनश्रेणी | मंजूर पदनाम |
|---|---|---|
| १. | वरीष्ठ लेखा परिक्षक (रु.१६४०-२९९९) | लेखा परिक्षा अधिक्षक |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक (रु.१४००-२३००) | वरीष्ठ लेखा परिक्षक |
| ३. | कनिष्ठ/लेखा लिपिक (रु.९५०-१५००) | कनिष्ठ लेखा परिक्षक |

वरील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या व इतर दुरुस्त्यांसह दिनांक २२.०६.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९१/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिन्सी येथील जलकुंभास गनायटिंग करणे आहे. त्यासाठी रक्कम रु.१२,७८,८००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन सर्वसाधारण सभेची मान्यता ठराव क्र.९८/४, दि.१९.०९.९८ अन्वये घेण्यांत आली. कार्यालयाची निविदा सूचना क्र.७७/९८ अन्वये दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण दहा (१०) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.जी.आर.घोडेले | - | ३२% कमी |
| २. | श्री.मो.अहमद सिद्दीकी | - | २५.८% कमी |
| ३. | श्री.एस.ए.देशमुख | - | २३.९% कमी |
| ४. | श्री.ए.व्ही.पिसोळकर | - | २२.००२% कमी |
| ५. | श्री.मुबारक पठाण | - | १८.७८६% कमी |
| ६. | श्री.मो.सोहेल सिद्दीकी | - | १५% कमी |
| ७. | श्री.ए.एम.फारुकी | - | १८% कमी |
| ८. | मे.शांतीरत्न कन्स्ट्रक्शन | - | २.६% जास्त |
| ९. | श्री.ए.सी.कोठारी | - | ५% जास्त |
| १०. | श्री.व्ही.आर.महाजन | - | ९.७८६% जास्त |

वरीलप्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा श्री.जी.आर.घोडेले याचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी असा दर दिलेला आहे. तरी सदर कामासाठी श्री.जी.आर.घोडेले यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी येथील जलकुंभास गनायटींग करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी दराची श्री.जी.आर.घोडेले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरु नगर हत्तेसिंगपुरा येथील वीस (२०) खाटी रुग्णालय जागेभोवती संरक्षित भिंत व तार कुंपण करणे करिता सा.बां.विभागाचे जिल्हा दरसुची सन १९९७-९८ नुसार रक्कम रु.३,११,८००/- चे तयार करण्यांत आले असून प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यांत आले असता मुख्य लेखाधिकारी यांनी सन १९९९-२००० या वर्षात विकास शाळा, दवाखाने या तरतूदी अंतर्गत निधी संपुष्टात आल्याबाबत अभिप्राय देण्यांत आलेला आहे. परंतू इमारतीचे संरक्षण करणे अत्यंत जरुरी आहे. नसता किमती वास्तुचे नुकसान व रुग्णांना त्रास होण्याची शक्यता आहे व इमारतीचे नुकसान होत आहे. करिता मा.स्थायी समिती सभेने विशेष मान्यता द्यावी म्हणून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर हत्तेसिंगपुरा येथील वीस खाटी रुग्णालय जागेभोवती संरक्षित भिंत व तारकुंपण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,११,८००/- च्या अंदाजपत्रकास इमारतीचे नुकसान होऊ नये म्हणून विशेष बाब म्हणून सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९३/४ :**

लेखा परिक्षक को-ऑपरेटीव्ह सोसायटी, हर्सुल येथे १००,१५०,२०० व २५० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.७,६७,७१७/- चे तयार करण्यांत आले असून सदर अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे. यासाठी होणारा खर्च पाणी पुरवठा भांडवली कामे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील तरतूदीमधून करण्यांत येत आहे. प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. विकास निधी १००% (८,४१,३२०/-) जमा केलेले आहे.

तरी लेखा परिक्षक को-ऑप सोसायटी हर्सुल येथे १००,१५०,२०० व २५० मी.मी.व्यासाची लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.७,६७,७१७/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेखा परिक्षक को-ऑपरेटीव्ह सोसायटी, हर्सुल येथे १००,१५०,२०० व २५० मी.मी.व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,६७,७१७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९४/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्रास लागणारी तुरटी खरेदी (१०० मे.टन) करावयाची आहे. त्यासाठी रक्कम रु.३,३६,५९३/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदरचा खर्च हा रसायन खरेदीच्या लेखा शिर्षकामधून करण्यांत येणार आहे. तरी तुरटी खरेदीसाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,३६,५९३/- चा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** जुन्या शहरात काही भागात नळाला पिवळे पाणी येते. हर्सुल फिल्टर यथे तुरटी कमी टाकली जाते.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जायकवाडी कडून शहराला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन फुटली होती. ४८ तास कामाला लागले. मुळात ६ तासांचे काम होते. या जलवाहिनीची देखभाल करण्यासाठी जो स्टाफ आपण घेतलेला आहे. त्यांचेकडून इतर कामे करुन घेण्यांत येते. ज्या कामासाठी कर्मचारी घेण्यांत आले त्यांना तेच काम देण्यांत यावे.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सर्व अधिकारी व मी तेथे होतो. दुरुस्तीसाठी करावे लागणारे खोदकामाच्या वेळी ३ पाईप कढावे लागले. त्यामुळे वेळ लागला.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** चैन कुप्पी दुसऱ्याकडून मागविण्यांत आली होती. त्यांनी घेवून गेला. अपणाकडे चैन कुप्पी नाही का?

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सिडकोला १४०० मी.मी.व्यासाचे जलवाहिनीवरुन अहोरात्र पुरवठा चालू आहे. ७०० मी.मी.व्यासाचे जलवाहिनीवरुन पाणी कमी मिळाले.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अधिकारी यांनी केलेला खुलासा बेरोबरही असेल. परंतू ज्या भागात पाणी पुरवठा खंडीत झाला, कशामुळे झाला या संदर्भात कुणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही करणार काय? तीन दिवस पाणी मिळाले नसून याचा परिणाम १.५० लाख लोकांवर झालेला आहे. नवीन अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री.जावळे यांनी आतापर्यंत किती कामे केलेली आहे व त्यांच्याबरोबर राहून आपल्या विभागातील किती कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सिडको एन-७ मध्ये एकूण २० लाखापर्यंतची दोन कामे संबंधित अधिकारी व त्यांच्या बरोबर आपल्या विभागातील कर्मचारी बरोबर असतांना केली आहेत.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** किती कर्मचारी यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी/कर्मचारी यांच्याबरोबर राहुन प्रशिक्षण घेतलेले आहे. माहिती द्यावी.

**मा.सभापती :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या समवेत आपल्या मनपातील पाणी पुरवठा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी बरोबर राहून योग्य ती माहिती व पुर्णतः प्रशिक्षण घ्यावे. प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्रास लागणारी तुरटी खरेदी करण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,३६,५९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९५/६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठ्याच्या देखभाल व दुरुस्तीच्या व नवीन कामासाठी लागणारे विविध व्यासाचे स्लुस व्हॉल्व खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,९७,०५०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकातून करण्यांत येणार आहे. तरी स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रु.९,९७,०५०/- चे मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

संवाद :-

**सौ.लता दलाल :** आतापर्यंत ४ ते ५ वेळा स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठीचे प्रस्ताव आलेले आहेत. वर्षाला एकूण किती स्लुस व्हॉल्व लागतात याची माहिती द्यावी.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** वर्षाला आवश्यकतेनुसार स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यांत येतात.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठ्याच्या देखभाल व दुरुस्तीच्या नवीन कामासाठी लागणारे विविध व्यासाचे स्लुस व्हॉल्व खरेदी करण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,९७,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९६/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्रात लागणारी ब्लिचिंग पावडर (२५०० बॅग्ज) खरेदी करावयाची आहे. त्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.९,७९,५००/- एवढ्याचे तयार करण्यांत आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली. सदर कामासाठी येणारा खर्च हा रसायन खरेदीच्या लेखा शिर्षकामधून करण्यांत येणार आहे.

तरी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रक्कम रु.९,७९,५००/- चे मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील जलशुध्दीकरण केंद्रात लागणारी ब्लिचिंग पावडर (२५०० बॅग्ज) खरेदी करण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,७९,५००/- अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९७/८ :**

(प्र.) कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र.३० मध्ये शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,३१,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.११.०६.९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,३१,३००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर बायजीपुरा स्लम वॉर्ड क्र.३० मध्ये शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,३१,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९८/९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, राजाबाजार कुंवारफल्ली येथे १००,१५० व २०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.६,०८,६९०/- ला ठराव क्र.१५१/१५ अन्वये सर्वसाधारण

सभेची मान्यता घेण्यांत आलेली आहे. कार्यालयाची निविदा सूचना क्र.९४/९८ जी की, दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. श्री.एम.एस.काथार - ३२% जास्त

२. श्री.मन्नान खाँन - १५% जास्त

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री.मन्नान खाँन यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्तीचा वाटत असल्यामुळे ठेकेदारास दराबाबत वाटाघाटीत बोलावण्यांत आले असता मा.आयुक्त यांनी राजाबाजार हा भाग गजबजलेला असून रात्री काम करावे लागणार असल्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त असा दर मान्य केलेला आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.मन्नान खाँन यांची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजाबाजार कुंवारफल्ली येथे १००,१५० व २०० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.मन्नान खाँन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१९९/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेने हाती घेतलेल्या विकासाच्या कामासाठी ५०,००० बॅग्ज ४३ ग्रेड सिमेंट खरेदी करण्यासाठी दिनांक २०.०५.९९ रोजी विषय क्र.९ अन्वये सर्वसाधारण सभेमध्ये अंदाजपत्रक रक्कम रु.६२,५०,०००/- ची मंजूरी मिळालेली आहे.

सदरील सिमेंट पुरवण्यासाठी कार्यालयाने निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/७/९९, दि.०४.०५.९९ अन्वये दैनिक लोकमत, दै.सकाळ, औरंगाबाद, दै.अजिंठा, दै.लोकधर्म, दै.औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन करुन निविदा मागविल्या असता एकूण ३ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी २ निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१. एल.ॲण्ड टी.लि.कंपनी - रुपये ११९.५० प्रति बॅग सर्व करांसह

२. ओरीयन्ट सिमेंट - रुपये १२८.२९ प्रति बॅग सर्व करांसह

उपरोक्त तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक एल.ॲण्ड टी.कंपनीचे आहे. करिता एल.ॲण्ड टी.लि.कंपनीचे दर कमी असल्याने त्यांची निविदा मंजूर करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :-</u>**

**शहर अभियंता :** एल.ॲण्ड टी.कंपनीकडून रुपये ११९.५० प्रति बॅग सर्व करांसह देणार आहे.

**मा.सभापती :** त्या एजन्सीचा प्रतिनिधी म्हणून श्री.पांडे ॲण्ड सन्स औरंगाबाद यांना नेमले आहे. ते वाहतुक व जकातीचे काम बघणार आहे. सदर सिमेंट ऑक्टोंबर महिन्यांत पुरवठा करणार, देयकांच्या वेळी वेगवेगळे देयक द्यावे, अशी त्यांची विनंती आहे. ११९.५० रु.प्रति बॅग सर्व करांसह ऑक्टोंबर पर्यंत पुरवठा आहे काय?

**शहर अभियंता :** रुपये ११९.५० प्रति बॅग सर्व करांसह ऑक्टोंबर पर्यंत सिमेंट पुरवठा करणार आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी नियमाप्रमाणे त्यांची विनंती मान्य करुन व काही सुट देता येत असेल तर तशी कार्यवाही करण्यांत यावी व मे.पांडे ॲण्ड संन्स यांचे नांवे जकात, वाहतुक, हमाली इत्यादीचे स्वतंत्र देयक द्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेने हाती घेतलेल्या विकासाच्या कामाकरिता ५० हजार बॅग्ज (गोणी) ४३ ग्रेड सिमेंट खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच प्रति गोणी (सर्व करांसह) रु.११९.५० (एकशे एकोणावीस रुपये पन्नास पैसे) या दराची मे.एल.अँण्ड टी.लि. कंपनीची निविदा स्विकारणेस तसेच मे.लाईन ॲण्ड टुब्रो लि.कंपनी, पुणे यांचे दिनांक २७.०६.९९ च्या पत्रानुसार पुरवठा करण्यांत आलेल्या सिमेंटचे देयक अदाई करतांना कंपनीचे औरंगाबाद येथील प्रतिनिधी म्हणून मे.पांडे सन्स, औरंगाबाद यांचे नांवे जकात, वाहतूक, हमाली, गोडावूनमध्ये थप्पी लावणे, इत्यादी करिता स्वतंत्र देयक (रु.११९.५० प्रति गोणी यापैकी) अदाई करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.२००/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भावसिंगपुरा व परिसरासाठी विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकणेचे रक्कम रु.५७,६४,०००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी दि.०४.०५.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२०/१८ दि.२०.०५.९९ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/३८६/९९, दि.३०.०५.९९ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १५ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.ए.सी.कटारिया | - | ५% जास्त |
| २. | श्री.सलीम पटेल | - | ०.१% जास्त |
| ३. | श्री.व्ही.आर.महाजन | - | ७.१३% कमी |
| ४. | मे.सत्यम कन्स्ट्रक्शन | - | २०.७८६% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.१३% कमी दराची निविदा श्री.व्ही.आर.महाजन यांची प्राप्त झाली आहे. त्यास मा.आयुक्तांनी दि.१५.०६.९९ ला मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा व परिसरासाठी विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.१३% कमी दराची श्री.व्ही.आर.महाजन यांची निविदा स्विकारणेस स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०१/१२ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.नक्षत्रवाडी गाव येथे पैठण रोड लगत असलेल्या दगडी गटारवर आर.सी.सी.स्लॅब टाकणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.३,९७,०००/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केली असून दि.१२.०५.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या विषय क्र.३२/२२ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.१२.०५.९९ पर्यंत एकूण ३४ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या तारखेस फक्त १५ (पंधरा) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदा दि.२८.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.राणा कंन्स्ट्रक्शन | - | २९.२९% कमी |
| २. | श्री.मजहर सिद्दीकी | - | २८.९९% कमी |
| ३. | श्री.अशोक जाधव | - | २७.७०% कमी |
| ४. | यु.के.पंडित | - | २६.२६% कमी |
| ५. | राहुल झांबड | - | २५.५२% कमी |
| ६. | हयात कंन्स्ट्रक्शन | - | २२.२६% कमी |
| ७. | सागर कंन्स्ट्रक्शन | - | २१.८६% कमी |
| ८. | आर.बी.साबळे | - | २१% कमी (ईएमडी नाही) |
| ९. | एस.एम.मंडोरे | - | २०.२०% कमी |
| १०. | मे.यांत्रिक कंन्स्ट्रक्शन | - | २०% कमी |
| ११. | मे.मेराजोद्दीन | - | २०% कमी |
| १२. | श्री.सुखबिर सिंग | - | १८.२८% कमी |
| १३. | मे.फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | - | १८.१०% कमी |
| १४. | सिंधु कंन्स्ट्रक्शन | - | १८% कमी |
| १५. | सचिन संचेती | - | ११.११% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.२९% कमी दराची निविदा मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता मंजूरीसाठी सादर करण्यांत आली असता मा.आयुक्तांनी त्यास मान्यता दिली आहे.

सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम व १० कोटी शासकीय अनुदानातून १९९९-२००० मधून खर्च करण्यांत येईल. करिता मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.२९% कमी दराची निविदा मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नक्षत्रवाडी गांव येथे पैठण राडे लगत असलेल्या दगडी गटारवर आर.सी.सी.स्लॅब टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.२९% कमी दराची मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेच्या सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०२/१३ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.शताब्दीनगर येथे शहाबाद फरशी बसविणे व सिमेंट कॉंक्रीट रोड तयार करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.७,६०,०००/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९६-९७ नुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असून सर्वसाधारण सभेत (दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत) मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.१९.०५.९९ पर्यंत एकूण १६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम दि.२७.०५.९९ रोजी फक्त ४ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या दि.२८.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.राजासिंग | - | २९.९६% कमी |
| २. | श्री.मोना कंन्स्ट्रक्शन | - | २७.८% कमी |
| ३. | श्री.एस.ए.देशमुख | - | १९.७७% कमी |
| ४. | श्री.औरंगाबाद कंन्स्ट्रक्शन | - | १% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९६% कमी दराची निविदा श्री.राजासिंग यांची निविदा आहे. करिता श्री.राजासिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९६% कमी दराची निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

सदर काम दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शताब्दीनगर शहाबाद फरशी बसविणे व सिमेंट कॉंक्रीट रोड तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९६% कमी दराची श्री.राजासिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०३/१४ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर मुकूंदवाडी रोहिदासनगर ते रामनगर नवीन दगडी गटार बांधणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.१३,४६,९१२/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले व त्यास मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली. तसेच दि.२०.०५.९९ रोजी संपन्न झालेली सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.१६/१४ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता विक्रीच्या अंतिम दि.१२.०५.९९ पर्यंत एकूण १८ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त ६ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्यास निविदा दि.२८.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.राजासिंग | - | ३८% कमी |
| २. | श्री.आर.बी.चव्हाण | - | ३३.२% कमी |

३.	श्री.मल्ल इंटरप्राईजेस	-	१९.१८% कमी
४.	श्री.बी.आर.घोडीले	-	१९.१९% कमी
५.	श्री.एम.ए.देशमुख	-	१८.३% कमी
६.	श्री.रमेश संडसमुद्र	-	१५% कमी

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८% कमी दराची निविदा श्री.राजासिंग यांची आहे. मा.आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर काम १८ खेडी विकास योजना अंतर्गत या लेखा शिर्षा अंतर्गत आणि १९९९-२००० सालच्या प्रशासकीय अनुदानातून खर्च करण्यांत येईल.

करिता श्री.राजासिंग यांची ३८% कमी दराची निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर, मुकूंदवाडी रोहिदासनगर ते रामनगर नवीन दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८% कमी दराची श्री.राजासिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०४/१५ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा स्लम भागात गल्लीमध्ये शहाबादी फरशी बसविणे व कॉंक्रीट रस्ते तयार करणे करिता अंदाजपत्रक रक्कम रु.७,७९,५६८/- चे सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९९-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दि.०४.०५.९९ रोजी प्रदान केली असून त्यास दि.१२.०५.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या विषय क्र.३४/२४ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.१२.०५.९९ पर्यंत एूकण २२ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेस फक्त ५ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या दि.२८.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

१.	श्री.राजासिंग	-	३५.५३% कमी
२.	एस.एस.पवार	-	३५.११% कमी
३.	हयात कंन्स्ट्रक्शन	-	१६.२५% कमी
४.	फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन -	२६.1% कमी
५.	असलम पटेल	-	२५.९९% कमी

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची श्री.राजासिंग यांची निविदा असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.५३% कमी दराची निविदा आहे. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. सदरकाम १८ खेडी विकास कार्यक्रम व १० कोटी शासकीय अनुदानातून खर्च करण्यांत येईल. करिता श्री.राजासिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.५३% कमी दराची निविदा मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा स्लम भागात गल्लीमध्ये शहाबादी फरशी बसविणे व कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.५३% कमी दराची श्री.राजासिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०५/१६ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा येथे दगडी गटार बांधणे (पुष्पक गार्डन ते कामगार कॉलनी, बौध्दवाडा मार्गे नदीपर्यंत) कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.२३,५७,७७०/- सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी दि.०४.०५.९९ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली असून दि.२०.०५.९९ रोजी संपन्न झालेली सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.१७/१५ अन्वये मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.१२.०५.९९ पर्यंत एकूण २३ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या तारखेस फक्त ७ (सात) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि.२८.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ३८.९६% कमी |
| २. | एस.पी.सरवदे | - | ३३.०२% कमी |
| ३. | शेख शरीफ | - | २८.०% कमी |
| ४. | सलीम पटेल | - | २१.७२% कमी |
| ५. | अब्दुल सलाम | - | १८.८६% कमी |
| ६. | सोहेल सिद्दीकी | - | २६.६९% कमी |
| ७. | जी.आर.घोडेले | - | १५.५१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.९६% कमी दराची निविदा मे.एस.एच.असोशिएटस यांची आहे. करिता मंजूरीसाठी सादर केली असता मा.आयुक्तांनी त्यास मंजूरी दिली आहे. करिता मंजूरीसाठी सादर केली असता मा.आयुक्तांनी त्यास मंजूरी दिली आहे. सदर काम मनपा १८ खेडी विकास योजना अंतर्गत ठेवण्यांत आलेली तरतूद व १० कोटी शासकीय अनुदानातून खर्च करण्यांत येईल. करिता मे.एस.एच.असोशिएटस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.९६% कमी दराची निविदा मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथे दगडी गटार बांधणे (पुष्पक गार्डन ते कामगार कॉलनी, बौध्दवाडा मार्ग नदीपर्यंत) च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३८.९६% कमी दराची मे.एस.एच.असोशिएटस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०६/१७ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विश्रांतीनगरसाठी खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.८,२५,३२३/- चे सा.बां.विभाग, औरंगाबाद यांची दरसुची १९९७-९८ अनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता व सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि.१९.०५.९९ पर्यंत एकूण ७ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी दोन मोहोरबंद निविदा प्राप्त

झाल्या. त्या निविदा दि.२७.०५.९९ रोजी उपस्थित ठेकेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.एस.एच.असोशिएटस | - | ०.१% कमी |
| २. | श्री.एस.एम.मंडोरे | - | २% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा मे.एच.एच.असोशिएटस यांची निविदा मंजूरीसाठी सादर करण्यांत आली असता मा.आयुक्तांनी त्यास मान्यता दिली आहे.

सदर काम दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यांत येईल. करिता मे.एस.एच.असोशिएटस यांची ०.१% कमी दराची निविदा मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विश्रांतीनगर साठी खडी रस्ते तयार करणेच्या कामा करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची मे.एस.एच.असोशिएट्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०७/१८ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या शाळेसाठी स्थायी समिती ठराव क्र.४०/३० दिनांक २७.०५.९९ अन्वये इमारती भाड्याने घेण्यांत आलेल्या आहेत. या इमारतीचे भाडे निश्चित भाडे समितीद्वारा करण्यांत आली आहे. यामध्ये क्र.३ वर कैसर कॉलनी येथील शालेय इमारतीचे मालक श्री.मोहसीन अहमद यांचे नांव दर्शविण्यांत आले आहे. प्रत्यक्षात सदर इमारतीचे मालक श्रीमत मकबुन्नीसा खानम बशीर अहेमद हे आहेत.

तरी ठराव क्र.४०/३० दि.२७.०५.९९ च्या ठरावात तशा आशयाची दुरुस्ती करणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या शाळेसाठी स्थायी समिती ठराव क्र.४०/३० दि.२७.०५.९९ अन्वये इमारती भाड्याने घेण्यांत आलेल्या आहेत. या ठरावातील अ.क्र.३ वरील कैसर कॉलनी येथील शालेय इमारतीचे मालक श्री.मोहसीन अहमद यांचे नांवाऐवजी "श्रीमती मकबुन्नीसा खानम बशीर अहेमद" यांचे नावांची दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०८/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यात असलेल्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात शिव छत्रपती कालीन प्राचीन नाणी संग्रहाचे दालन असावे यासाठी श्री.रमेश मोतीलाल रुणवाल, तिलक रोड, औरंगाबाद यांनी त्यांचेकडे असलेली शिवकालीन प्राचीन नाणी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात ठेवणेसाठी केलेल्या विनंतीनुसार खालीलप्रमाणे अटी व शर्ती प्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांनी त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या

१५११ नाणी २५ वर्षानी सुस्थितीत परत करण्याच्या बोलीवर देण्यांचे मान्य केले आहे.

२) करारनाम्याचा कालावधी प्रथमतः २५ वर्षाचा असेल. २५ वर्षानंतर सदरील करारनाम्याचा कालावधी वाढविणे किंवा न वाढविणे याचे अधिकार श्री.रमेश रुणवाल यांचे मर्जीवर किंवा त्यांचे कायदेशीर वारसदार यांचे मर्जीवर राहील.

३) श्री.रमेश रुणवाल यांच्या मालकीच्या १५११ नाणी २५ वर्षांनी सुस्थितीत परत करण्याची जबाबदारी लिहून देणार (मनपा) यांचेवर राहील.

४) नाणी आजच्या स्वरुपात फोटो कॉपीज व नंबरप्रमाणे परत दिल्या पाहिजेत. नाणी सुस्थितीत व सुरक्षित राहतील याबाबतची आवश्यक ती काळजी महानगरपालिका येईल तसेच नाणी फुटणार किंवा तुटणार नाही याची काळजी महानगरपालिका घेईल.

५) पुराणवस्तु संग्रहालयातील प्राचीन नाणी सुरक्षिततेचा विमा महानगरपालिका प्रतिवर्षी उतरवीन व विम्याचा खर्च महानगरपालिका करेल.

६) नाणी चोरीस गेल्यास, गहाळ झाल्यास नुकसान भरपाईची रक्कम महानगरपालिका लिहून घेणाऱ्यास लवकरात लवकर रोख स्वरुपात देईल.

७) श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु, संग्रहालयाचे सल्लागार सदस्य म्हणून श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांना नियुक्त करण्यांत येते. सदरील सल्लागार समितीच्या सदस्यांना जे अधिकार असतील तेच अधिकार श्री.रुणवाल यांना राहतील.

८) सल्लागार मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बैठक भत्ता, प्रवास भत्ता, महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे श्री.रुणवाल यांना देण्यांत येईल.

९) श्री.रुणवाल यांनी कोणत्याही स्वरुपात मानधन नको असल्याने व ज्यांच्या अथक परिश्रमाने दुर्मिळ नाणे प्राप्त झाले आहेत. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ म्हणजे पुज्य श्री.मोतीलालजी रुणवाल आणि माताजी मदनबाई रुणवाल यांच्या स्मृति प्रित्यर्थ संग्रहालयास प्रदान केले आहेत असे ब्रॉझ मध्ये ठळक अक्षरात नोंदविले जाईल.

१०) श्री.रुणवाल यांनी दिलेल्या नाणी दालन क्र.५ मध्ये उत्कृष्टपणे मांडण्यांत येतील. सदरील दालनास प्राप्त झालेल्या नाणी पुज्य श्री.रुणवाल माताजी मदनबाई रुणवाल यांच्या नावाने व संग्राहक रमेश रुणवाल यांच्या सौजन्याने प्राप्त झाले आहे, असे नमूद करण्यांत येईल.

११) सर्व नाणी नोंद करुन क्रमांक देवून प्रत्येक नाण्याच्या फोटोच्या दोन प्रती तयार करण्यांत येतील व एक प्रत महानगरपालिकेकडे राहील.

१२) विमा उतरविण्यासाठी प्रत्येक नाण्याचे अंदाजित मुल्य डॉ.मोरवंचीकर, निवृत्त इतिहास विभाग प्रमुख, डी.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेकडून निश्चीत करण्यांत येईल. व त्याप्रमाणे नाण्याचा विमा उतरविण्यांत येईल. एक्दा संग्रहालयात ठेवलेल्या वस्तु बाहेर कोणत्याही कारणास्तव हलविल्या जाणार नाही याची दक्षता महानगरपालिका घेईल.

१३) श्री.रमेश रुणवाल यांचे मृत्यूनंतर करारनाम्याच्या अटी शर्ती व अधिकार हे संपूर्णपणे त्यांचा मुलगा विक्रम रमेश रुणवाल यांना राहील तसेच नाणी परत मागण्याचा अधिकार, सदस्य म्हणून काम करण्याचा अधिकार रमेश रुणवाल यांचा मुलगा विक्रम रमेश रुणवाल यांना राहील.

१४) विहीत २५ वर्षाच्या मुदतीच्या आत हस्तांतरीत केलेली नाणी त्यांची जोपासना मांडणी अथवा चोरी जाण्याचे, गहाळ होण्याचे प्रकार वाढल्याचे समितीच्या

निदर्शनास आल्यास व त्यावरही महानगरपालिकेने योग्य ती काळजी घेतली नाही असे मत श्री.रमेश रुणवाल यांचे झाल्यास कराराची मुदत पूर्ण होण्याचे पुर्वी सुध्दा तीन महिन्याची नोटीस देऊन उपरोक्त नाणी परत घेण्याचा अधिकार श्री.रमेश रुणवाल यांना राहील.

१५) करारनाम्यातील वरील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत वाद निर्माण झाल्यास सक्षम न्यायालयात दावा दाखल करण्याचा अधिकार दोन्ही पक्षांना (पार्टींना) असेल.

करिता वरीलप्रमाणे दिलेल्या अटी व शर्तीवर विचार विनिमय होणेस्तव प्रस्ताव स्थायी समितीच्या सभेमध्ये मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

<u>**संवाद :-**</u>

**मा.सभापती :** सदर प्रस्तावातील क्र. १ते १५ अटी व्यतिरिक्त श्री.रुणवाल यांचे इच्छेप्रमाणे महानगरपालिका हद्दीत एका वर्षाला एक वेळा रु.२५,०००/- (पंचवीस हजार) पर्यंतच्या खर्चाची सार्वजनिक विकासाची कामे करता येतील. या अटींसह मंजूरी देण्यांत येते.

**श्री.विखारोद्दीन :** छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय चालू झाल्यास मनपाला लाखो रुपयांचा फायदा होईल. लवकरात लवकर उद्‌घाटन करुन सुरु करण्यांत यावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** बऱ्याच दिवसांपासून या संग्रहालयाचे काम चालू असून पुर्णतः काम होऊन नवनवीन प्रस्ताव पुन्हा मंजूरीसाठी सभागृहात येतात. महानगरपालिकेच्या यावर खूप खर्च झालेला असून लवकरात लवकर उद्‌घाटन करुन चालू केल्यास महानगरपालिकेच्या तिजोरीत भर पडेल.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यात असलेल्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात शिवछत्रपती कालीन प्राचीन नाणी संग्रहाचे दालन असावे. यासाठी श्री.रमेश मोतीलाल रुणवाल, तिलक रोड, औरंगाबाद यांचेकडे असलेली शिवकालीन प्राचीन नाणी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात ठेवण्यासाठी खालील अटी व शर्तीनुसार सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांनी त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या १५११ नाणी २५ वर्षानी सुस्थितीत परत करण्याच्या बोलीवर देण्यांचे मान्य केले आहे.

२) करारनाम्याचा कालावधी प्रथमतः २५ वर्षाचा असेल. २५ वर्षानंतर सदरील करारनाम्याचा कालावधी वाढविणे किंवा न वाढविणे याचे अधिकार श्री.रमेश रुणवाल यांचे मर्जीवर किंवा त्यांचे कायदेशीर वारसदार यांचे मर्जीवर राहील.

३) श्री.रमेश रुणवाल यांच्या मालकीच्या १५११ नाणी २५ वर्षांनी सुस्थितीत परत करण्याची जबाबदारी लिहून देणार (मनपा) यांचेवर राहील.

४) नाणी आजच्या स्वरुपात फोटो कॉपीज व नंबरप्रमाणे परत दिल्या पाहिजेत. नाणी सुस्थितीत व सुरक्षित राहतील याबाबतची आवश्यक ती काळजी महानगरपालिका

येईल तसेच नाणी फुटणार किंवा तुटणार नाही याची काळजी महानगरपालिका घेईल.

५) पुराणवस्तु संग्रहालयातील प्राचीन नाणी सुरक्षिततेचा विमा महानगरपालिका प्रतिवर्षी उतरवीन व विम्याचा खर्च महानगरपालिका करेल.

६) नाणी चोरीस गेल्यास, गहाळ झाल्यास नुकसान भरपाईची रक्कम महानगरपालिका लिहून घेणाऱ्यास लवकरात लवकर रोख स्वरुपात देईल.

७) श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु, संग्रहालयाचे सल्लागार सदस्य म्हणून श्री.रमेश मोतीलाल रुणवाल यांना नियुक्त करण्यांत येते. सदरील सल्लागार समितीच्या सदस्यांना जे अधिकार असतील तेच अधिकार श्री.रुणवाल यांना राहतील.

८) सल्लागार मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बैठक भत्ता, प्रवास भत्ता, महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे श्री.रुणवाल यांना देण्यांत येईल.

९) श्री.रुणवाल यांनी कोणत्याही स्वरुपात मानधन नको असल्याने व ज्यांच्या अथक परिश्रमाने दुर्मिळ नाणे प्राप्त झाले आहेत. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ म्हणजे पुज्य श्री.मोतीलालजी रुणवाल आणि माताजी मदनबाई रुणवाल यांच्या स्मृति प्रित्यर्थ संग्रहालयास प्रदान केले आहेत असे ब्रॉझ मध्ये ठळक अक्षरात नोंदविले जाईल.

१०) श्री.रुणवाल यांनी दिलेल्या नाणी दालन क्र.५ मध्ये उत्कृष्टपणे मांडण्यांत येतील. सदरील दालनास प्राप्त झालेल्या नाणी पुज्य श्री.रुणवाल माताजी मदनबाई रुणवाल यांच्या नावाने व संग्राहक रमेश रुणवाल यांच्या सौजन्याने प्राप्त झाले आहे, असे नमूद करण्यांत येईल.

११) सर्व नाणी नोंद करुन क्रमांक देवून प्रत्येक नाण्याच्या फोटोच्या दोन प्रती तयार करण्यांत येतील व एक प्रत महानगरपालिकेकडे राहील.

१२) विमा उतरविण्यासाठी प्रत्येक नाण्याचे अंदाजित मुल्य डॉ.मोरवंचीकर, निवृत्त इतिहास विभाग प्रमुख, डी.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेकडून निश्चीत करण्यांत येईल. व त्याप्रमाणे नाण्याचा विमा उतरविण्यांत येईल. एकदा संग्रहालयात ठेवलेल्या वस्तु बाहेर कोणत्याही कारणास्तव हलविल्या जाणार नाही याची दक्षता महानगरपालिका घेईल.

१३) श्री.रमेश रुणवाल यांचे मृत्यूनंतर करारनाम्याच्या अटी शर्ती व अधिकार हे संपूर्णपणे त्यांचा मुलगा विक्रम रमेश रुणवाल यांना राहील तसेच नाणी परत मागण्याचा अधिकार, सदस्य म्हणून काम करण्याचा अधिकार रमेश रुणवाल यांचा मुलगा विक्रम रमेश रुणवाल यांना राहील.

१४) विहीत २५ वर्षाच्या मुदतीच्या आत हस्तांतरीत केलेली नाणी त्यांची जोपासना मांडणी अथवा चोरी जाण्याचे, गहाळ होण्याचे प्रकार वाढल्याचे समितीच्या निदर्शनास आल्यास व त्यावरही महानगरपालिकेने योग्य ती काळजी घेतली नाही असे मत श्री.रमेश रुणवाल यांचे झाल्यास कराराची मुदत पूर्ण होण्याचे पुर्वी सुध्दा तीन महिन्याची नोटीस देऊन उपरोक्त नाणी परत घेण्याचा अधिकार श्री.रमेश रुणवाल यांना राहील.

१५) करारनाम्यातील वरील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास त्याबाबत वाद निर्माण झाल्यास सक्षम न्यायालयात दावा दाखल करण्याचा अधिकार दोन्ही पक्षांना (पार्टीना) असेल.

१६. श्री.रुणवाल यांचे इच्छेप्रमाणे महानगरपालिका हद्दीत एका वर्षाला एक वेळा रु.२५,०००/- (पंचवीस हजार) पर्यंतच्या खर्चाची सार्वजनिक विकासाची कामे करता येतील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०९/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जालाननगर येथे पथदिव्याकरिता विद्युतीकरण करणे बाबतच्या कामाचा पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,६०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "नवीन पोल बसविणे" या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,६०,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालाननगर येथे पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,६०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१०/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दुमीर हॉस्पीटल ते मनपा आरोग्य केंद्र या मुख्य रस्त्यावर (रेल्वेस्टेशन रोड) पथ दिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबत पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "नवीन पोल बसविणे" या लेखा शिर्षकामधून करण्यांत येईल.

तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.२,५०,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दुमीर हॉस्पीटल ते मनपा आरोग्य केंद्र या मुख्य रस्त्यावर (रेल्वेस्टेशन रोड) पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२११/२२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिसारवाडी येथील जनतेची पाण्याची व्यवस्था करण्यासाठी एकूण चार हातपंप बसविणे आहे. या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५७३/१३, दि.०६.०३.९९ नुसार मंजूर दराप्रमाणे मे.अनुराग बोअरवेल्स, औरंगाबाद यांनी विंधन विहीत खोदून त्यावर हातपंप बसविण्याचे काम करण्यास संमती दर्शविली आहे. तरी मिसारवाडी येथे हातपंप बसविण्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१,०९,०६०/- च्या खर्चास व मे.अनुराग बोअरवेल्स औरंगाबाद यांचेकडून हे काम करुन घेण्यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिसारवाडी येथील जनतेची पाण्याची व्यवस्था करण्यासाठी चार हातपंप विंधन विहीरी खोदून बसविण्याचे कामाकरिता येणाऱ्या एकूण रक्कम रु.१,०९,०६०/- च्या खर्चास तसेच सदरील काम मंजूर दरानुसार मे.अनुराग बोअरवेल्स, औरंगाबाद यांचेकडून करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१२/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वृक्ष संवर्धनाकरिता शहरातील नागरिक, स.नगरसेवक यांची प्रभागातील वृक्ष संवर्धाना करिता ट्री गार्डस्ची मागणी मोठ्या प्रमाणात आहे.

याकरिता स्थायी समितीने मंजूर केलेल्या दराने प्रति नग रु.३९७/- रुपये (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१५% कमी दराने) याप्रमाणे यापुर्वी पुरवठा केलेल्या पुरवठा धारकांकडून मे.वर्षा मेटल यांचेकडून १००० ट्री गार्ड खरेदी करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वृक्ष संवर्धना करिता शहरातील नागरिक तसेच सन्माननीय नगरसेवक यांची वाढती मागणी लक्षात घेता ट्री गार्ड खरेदीसाठी स्थायी समिती ने मंजूर केलेल्या दराने म्हणजेच प्रति नग रु.३९७/- (अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१५% कमी दराने) यापुर्वी पुरवठा केलेले पुरवठाधारक मे.वर्षा मेटल यांचेकडून १००० ट्री गार्डस खरेदी करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१३/२४ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.किराडपुरा स्लम वार्ड क्र.२५ मध्ये शहाबाद फरशी बसविणे व कॉंक्रीट रस्ते करणे व इतर कामासाठी सा.बां.खाते यांच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१०,४४,७०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत दि.२०.०५.९९ रोजी विषय क्र.१२/१० नुसार मंजूरी मिळाली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण (३१) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत (५) निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शाह कंन्स्ट्रक्शन | - | ३४.५०% कमी |
| २. | मेराज अली | - | ३३.५५% कमी |
| ३. | आर.बी.चव्हाण | - | ३२.५% कमी |
| ४. | मुबारक पठाण | - | ३०.१२% कमी |
| ५. | शेख समद | - | २७.९७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५०% कमी दराची असलेली श्री.शाह कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किराडपुरा स्लम वार्ड क्र.२५ मध्ये शहाबाद फरशी बसविणे व कॉंक्रीट रस्ते करणे व इतर कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५०% कमी दराची श्री.शाह कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१४/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता ट्युब लाईट (ट्युब फिक्चर) विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,४४,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाकरिता दरपत्रके मागविण्यांत आली असता एकूण तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तिनही दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | साहित्यांचे नांव | एजन्सीचे नांव व प्राप्त दर | | |
|---|---|---|---|---|
| | | फिलिप्स इ.लि. (प्र.नग) | क्रॉम्प्टन ग्रिव्हज (प्र.नग) | बजाज इले. (प्र.नग) |
| १. | ४० वॅट टयुब रॉड | ४५.०० | ४५.१० | ४६.४० |
| २. | ४० वॅट टयुब स्टॉर्टर | ८.२५ | ८.०८ | ८.०० |
| ३. | ४० वॅट चोक | १४५.०० | १४७.०० | १५२.०० |
| ४. | टयुब होल्डर | १२.५० | १२.०० | १२.४० |
| ५. | ४० वॅट बल्ब | १०.७५ | १०.५० | १०.०० |
| ६. | ६० वॅट बल्ब | ११.०० | १०.९० | १०.५० |
| ७. | स्लटींग होल्डर | २५.०० | २५.०० | २५.०० |

वरील प्राप्त दरामध्ये अ.क्र.१,३ साठी मे.फिलिप्स इं.लि, अ.क्र.४ साठी मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांनी दिलेले दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व वरील दर्शविल्याप्रमाणे आहेत व ॲटम क्र.७ साठी तिन्ही एजन्सीचे दर सारखेस प्राप्त झाले आहेत.

सदरील दर जास्त वाटत असल्याने मा.आयुक्त यांचे दालनात मे.फिलिप्स इं.लि.मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्या प्रतिनिधीस दराचे वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती खालीलप्रमाणे दर कमी करण्यांत आले.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दरपत्रकात नमूद केलेले दर (प्र.नग) | वाटाघाटी अंती कमी करण्यांत आलेले दर (प्र.नग) |
|---|---|---|---|
| अ) | मे.फिलिप्स इं.लि. | | |
| | १. ४० वॅट ट्युब रोड | ४५.०० | ४२.०० |
| | २. ४० वॅट चोक | १४५.०० | १४१.०० |
| ब) | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज | | |
| | १. ट्युब होल्डर | १२.०० | ११.५० |
| | २. स्लाटींग होल्डर बटन | २५.०० | १४.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | | |
| | १. ४० वॅट ट्युब स्टार्टर | ८.०० | ७.८५ |
| | २. ४० वॅट गॅस फिल्ड लॅम्प | १०.०० | ९.५० |
| | ३. ६० वॅट गॅस फिल्ड लॅम्प | १०.५० | १०.०० |

तरी वरील दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंती कमी केलेल्या दराने वरील दर्शविलेले विद्युत साहित्य मे.फिलिप्स इं.लि.मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व मे.बजाज इलेक्ट्रीकल्स या कंपन्यांकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या प्रस्तावाबाबत संबधितांनी माहिती द्यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** कंपनीने निविदा सादर करतांना मालाचा पुरवठा त्यांच्या अधिकृत विक्रेत्या मार्फत करण्यात येईल असे पत्राद्वारे कंपनीने नमूद केले आहे. तरी त्यास मान्यता देण्यास हरकत नाही.

**मा. सभापती :** वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात येते ही दुरुस्ती विद्युत साहित्य खरेदीच्या सर्व प्रस्तावामध्ये करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता ट्युब लाईट (ट्युब फिक्चर) विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार खालील दराने साहित्य खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

| **अ.क्र.** | **कंपनीचे नांव** | **साहित्याचे नांव** | **मंजूर दर (प्रति नग)** |
|---|---|---|---|
| अ) | मे.फिलिप्स इं.लि. | १. ४० वॅट ट्युब रोड | ४२.०० |
| | | २. ४० वॅट चोक | १४१.०० |
| ब) | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज | १. ट्युब होल्डर | ११.५० |
| | | २. स्लाटींग होल्डर बटन | १४.५० |
| क) | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | १. ४० वॅट ट्युब स्टार्टर | ७.८५ |
| | | २. ४० वॅट गॅस फिल्ड लॅम्प | ९.५० |
| | | ३. ६० वॅट गॅस फिल्ड लॅम्प | १०.०० |

तसेच कंपनीने निविदा सादर करतांना मालाचा पुरवठा त्यांच्या अधिकृत विक्रेत्यामार्फत करण्याबाबत कळविले असल्याने त्यांच्या विक्रेत्यामार्फत करण्याबाबत कळविले असल्याने मालाचा पुरवठा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांमार्फत करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१५/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता मर्क्युरी दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,६८,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाकरिता दरपत्रके मागविण्यांत आली असता एकूण तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तीनही दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | साहित्यांचे नांव | एजन्सीचे नांव व प्राप्त दर | | |
|---|---|---|---|---|
| | | फिलिप्स इं.लि. (प्र.नग) | क्रॉम्प्टन ग्रीव्हज (प्र.नग) | बजाज इले. (प्र.नग) |
| १. | १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १६२.०० | १६५.०० | १६५.०० |
| २. | २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ४३५.०० | ४३०.०० | ४४०.०० |
| ३. | १२५ वॅट मर्क्युरी चोक | ४३०.०० | ४४५.०० | ४४१.०० |
| ४. | २५० वॅट मर्क्युरी चोक | ६१०.०० | ६००.०० | ६०८.०० |
| ५. | १५० वॅट सोडीयम चोक | ७०६.०० | ६९९.०० | ७०४.०० |
| ६. | २५० वॅट सोडीयम चोक | ९२८.०० | ८८८.०० | ८८०.०० |

वरील प्राप्त दरामध्ये अ.क्र.१ व ३ साठी मे.फिलिप्स इंडिया लि. अ.क्र.२,४,५ साठी मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व अ.क्र.६ साठी मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांनी दिलेले दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व वरील दर्शविल्याप्रमाणे आहेत.

सदरील दर जास्त वाटत असल्याने मा.आयुक्त यांचे दालनात मे.फिलिप्स इं.लि.मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्या प्रतिनिधीस दराचे वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती खालीलप्रमाणे दर कमी करण्यांत आले.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दरपत्रकात नमूद केलेले दर (प्र.नग) | वाटाघाटी अंती कमी करण्यांत आलेले दर (प्र.नग) |
|---|---|---|---|
| अ) | मे.फिलिप्स इं.लि. | | |
| | १. १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १६२.०० | १६०.०० |
| | २. १२५ वॅट मर्क्युरी चोक | ४३०.० | ४१६.०० |
| ब) | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज | | |
| | १. २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ४३०.०० | ४१६.०० |
| | २. २५० वॅट मर्क्युरी चोक | ६००.०० | ५८५.०० |
| | ३. १५० वॅट सोडीयम चोक | ६९९.०० | ६६६.०० |
| क) | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | | |
| | १. २५० वॅट सोडीयम चोक | ८८०.०० | ८५०.०० |

तरी वरील दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटी अंती कमी केलेल्या दराने वरील दर्शविलेले विद्युत साहित्य मे.फिलिप्स इंडिया लि., मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज, व मे.बजाज इलेक्ट्रीकल्स या कंपन्यांकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता मर्क्युरी दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाच्या दराबाबत निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार खालील दराने साहित्य खरेदी करण्यास मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साहित्याचे नांव | मंजूर दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| अ) | मे.फिलिप्स इं.लि. | १. १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १६०.०० |
| | | २. १२५ वॅट मर्क्युरी चोक | ४१६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ब) | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज | १. २५० वॅट मर्क्युरी बल्ब | ४१६.०० |
| | | २. २५० वॅट मर्क्युरी चोक | ५८५.०० |
| | | ३. १५० वॅट सोडीयम चोक | ६६६.०० |
| क) | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | १. २५० वॅट सोडीयम चोक | ८५०.०० |

तसेच कंपनीने निविदा सादर करतांना मालाचा पुरवठात्यांच्या अधिकृत विक्रेत्यांमार्फत करण्याबाबत कळविले असल्याने मालाचा पुरवठा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांमार्फत करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१६/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.९,९७,७५०/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाकरिता दरपत्रके मागविण्यांत आली असता एकूण तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तीनही दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| **अ.क्र.** | **साहित्यांचे नांव** | **एजन्सीचे नांव व प्राप्त दर** | | |
|---|---|---|---|---|
| | | **फिलिप्स इं.लि. (प्र.नग)** | **क्रॉम्प्टन ग्रीव्हज (प्र.नग)** | **बजाज इले. (प्र.नग)** |
| १. | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ६३५.०० | ६३०.०० | ६३४.०० |
| २. | २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ७४०.०० | ७३१.०० | ७२०.०० |
| ३. | २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब (एसओएनटी) | ८००.०० | ८०८.०० | ८१५.०० |

वरील प्राप्त दरामध्ये अ.क्र.तीन साठी मे.फिलिप्स इं.लि.अ.क्र.एकसाठी मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व अ.क्र.दोनसाठी मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांनी दिलेले दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व वरील दर्शविल्याप्रमाणे आहेत.

सदरील दर जास्त वाटत असल्याने मा.आयुक्त यांचे दालनात मे.फिलिप्स इं.लि., मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व मे.बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्या प्रतिनिधीस दर वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटी अंती खालील प्रमाणे दर कमी करण्यांत आले.

| **अ. क्र.** | **साहित्याचे नांव** | **दरपत्रकात नमूद केलेले दर (प्र.नग)** | **वाटाघाटी अंती कमी करण्यांत आलेले दर (प्र.नग)** |
|---|---|---|---|
| अ) | मे.फिलिप्स इं.लि. | | |
| | १. २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब (एसओएनटी) | ८००.०० | ७७०.०० |
| ब) | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज | | |
| | १. १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ६३०.०० | ६०५.०० |
| क) | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | | |
| | १. २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ७२०.०० | ६९०.०० |

तरी वरील दर्शविल्याप्रमाणे वाटाघाटीअंती कमी केलेल्या दराने वरील दर्शविलेले विद्युत साहित्य मे फिलिप्स इंडिया लि., मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज व मे.बजाज इलेक्ट्रीकल्स या कंपन्यांकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरिता सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाच्या दराबाबत निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार खालील दराने साहित्य खरेदी करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साहित्यांचे नांव | मंजूर दर (प्रति नग) |
|---|---|---|---|
| अ. | मे.फिलिप्स इंडिया लि. | १. २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब (एसओएनटी) | ७७०.०० |
| ब. | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज | १. १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ६०५.०० |
| क. | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स | १. २५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ६९०.०० |

तसेच कंपनीने निविदा सादर करतांना मालाचा पुरवठा त्यांच्या अधिकृत विक्रेत्यांमार्फत करण्याबाबत कळविले असल्यने मालाचा पुरवठा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यामार्फत करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१७/२८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योतीनगर बॅडमिंटन हॉल येथे (अव्हाकोर्ट) फ्लेरींग करणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकास स्थायी समितीची सभा ठराव क्र.२५७/१२ अन्वये मान्यता देण्यांत आली होती. या अनुषंगाने सदर कामाकरिता प्रशासकीय मान्यतेन्वये कार्यालयीन निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविले असता कोरी निविदा विक्री दि.०७.०५.९९ पर्यंत सोळा निविदा विकल्या गेल्या व दर भरुन सिलबंद पाकीटात स्विकृतीची अंतिम दि.१५.०५.९९ पर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि.१७.०५.९९ रोजी मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयात उघडण्यांत आल्या असता प्राप्त दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मो.मिराजउद्दीन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी |
| २. | एस.एम.सज्जाद | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| ३. | संजय देशमुख | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी |
| ४. | विपुल कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी |

प्राप्त दरात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच गुत्तेदार श्री.मो.सिराजउद्दीन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी या दराचे दर होते. परंतू त्यांनी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता केली नसल्यामुळे कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उबां/९९/१२१/, दि.०४.०६.९९ अन्वये तीन दिवसांची मुदत देऊन पुर्तता करणे बाबत कळविले असता त्यांनी पुर्तता केली नाही. सबब प्राप्त निविदेमध्ये क्र.४ चे गुत्तेदार श्री.विपुल कंन्स्ट्रक्शन यांनी पुर्तता केली असले मुळे त्यांना इकडील पत्र क्र.९९/१४४, दि.२८.०६.९९ अन्वये विचारणा करण्यांत आली असता त्यांनी लेखी संम्मती दर्शविली आहे व त्यास प्रशासकीय मान्यता घेणेत आली आहे.

सबब सदर काम हे विपुल कंन्स्ट्रक्शन यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी या दराने करुन घेणेचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर बॅडमिंटन हॉल येथे (ऊव्हाकोट) फ्लोरिंग करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराचे निविदाधारक श्री.मो.मिराज उद्दीन यांनी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता केली नसल्यामुळे व अ.क्र.४ चे गुत्तेदार विपुल कंन्स्ट्रक्शन यांनी लेखी संम्मती दर्शविल्यानुसार सदरील काम मे.विपुल कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१८/२९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेतर्फे शिवाजी मैदान (आमखास) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र बांधण्यांत आलेले आहे. सदर संशोधन केंद्रामध्ये संशोधना करिता येणाऱ्या संशोधकांना राहण्याची व्यवस्था प्राप्त करुन देण्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे परिसरांमध्येच एक अतिथीगृह बांधण्याकरिता श्री.राजीव कुलकर्णी, वास्तु विशारद यांचेकडून नकाशे तयार करुन घेण्यांत आलेले आहेत.

सदरील कामासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यांत आलेला असून संपूर्ण प्रकल्पासाठी एकत्रित खर्च रु.१५,८१,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. परंतू सन १९९९-२००० मध्ये हया कामाच्या पहिल्या टप्प्यांमधील बांधकामास रु.७,६१,५००/- इतक्या खर्चास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे.

करिता संपूर्ण कामाचे प्रकल्प अहवाल व प्रथम टप्प्याचे अंदाजपत्रकास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे शिवाजी मैदान (आमखास) येथे बांधण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब संशोधन केंद्रामध्ये येणाऱ्या संशोधकांना राहण्याची व्यवस्था करण्याकरिता या केंद्राचे परिसरामध्ये एक अतिथीगृह बांधण्या करिता श्री.राजीव कुलकर्णी, वास्तु विशारद यांचेकडून तयार करण्यांत आलेल्या प्रकल्प अहवालास तसेच या प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यामधील बांधकाम करीताच्या रक्कम रु.७,६१,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१९/३० :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, शिक्षण विभागाअंतर्गत सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण विभागाअंतर्गत असलेल्या "सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना" या लेखाशिर्षकाखाली रु.५.०० लाखाची तरतूद करण्यांत आलेली आहे. सदर योजने अंतर्गत इ.१ ली ते ७ वी तील विद्यार्थीनीसाठी (मराठी/उर्दू) पाट्या, १०० पानी वह्या, २०० पानी वह्या आणि दफ्तर हे शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा दि.१८.०५.९९ ला वृत्तपत्रामधून प्रसिध्द करण्यांत आल्या व अखेरच्या तारखेपर्यंत एकुण १२ निविदा प्राप्त झाल्या व त्याच दिवशी मा.मुख्य लेखाधिकारी यांचेसमोर उघडण्यांत आल्या.

मागविलेल्या निविदेतून शैक्षणिक दृष्ट्या उत्तम असलेल्या साहित्याची निवड मा.उपआयुक्त (प्र.) यांच्या अध्यक्षतेखाली होऊन खालीलप्रमाणे साहित्यांचे दर निश्चित करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र | साहित्यांचे नांव | पुरवठाधारक | रु.दर पैसे |
|---|---|---|---|
| १. | १०० पानी वही (फुलसाईज) १९x१५ से.मी. म.न.पा.च्या बोधचिन्हासह | मे.मुरली स्टेशनर्स,औरंगाबाद | ४.७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | १९२ पानी वही (फुलसाईज) १९x१५ से.मी.म.न.पा.च्या बोधचिन्हासह | मे.श्री.व्यंकटेश बुक सेंटर औरंगाबाद | १०.०० |
| ३. | पाट्या हार्ड बोर्ड प्लास्टीक बॉर्डर ३०x२५ से.मी. | मे.सलवा इंटरप्रायजेस, औरंगाबाद | १५.०० |
| ४. | दफ्तर कापड जिन्स रंग डार्क ३०x४५ से.मी. | मे.इन्शा ट्रेडींग कं. | ६५.०० |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे "सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना" अंतर्गत इयत्ता १ ली ते ७ वी तील विद्यार्थीनीसाठी (मराठी/उर्दू) पाट्या, १०० पानी, २०० पानी वह्या, आणि दफ्तर हे शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी निवड केलेल्या साहित्याप्रमाणे १०० पानी वह्यांसाठी मे.मुरली स्टेशनर्स, औरंगाबाद यांचे रु.४.७५, १९२ पानी वहीसाठी मे.श्री.व्यंकटेश बुक सेंटर, औरंगाबाद यांचे रु.१०.०० (प्रति नग), हार्ड बोर्ड प्लॅस्टीक बॉर्डर पाट्यासाठी मे.सलवा इंटरप्राईजेस यांचे रु.१५.०० (प्रति नग) आणि दफ्तर करिता मे.इन्शा ट्रेडींग कंपनी यांचे रु.६५.०० (प्रति नग) या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** दरवर्षी महानगरपालिकेला शासनाकडून शाळांतील मुलांना मोफत पुस्तके वाटपासाठी नियमाने संपूर्णतः रक्कम मिळत असे. परंतू ती न देता केवळ ५ हजार रुपये दिलेले आहेत. महानगरपालिकेच्या बऱ्याच शाळेत गरीबांची मुले शिक्षण घेत आहेत. यासाठी असा प्रस्ताव मंजूरीसाठी घ्यावा की, स्वेच्छा निधीतून पुस्तके खरेदी करुन ती पुरविण्यांत यावी.

**मा.सभापती :** एकूण २५,०००/- च्या रक्कमेपर्यंत पुस्तके खरेदी करण्या बाबतची तरतूद संबंधित अधिकारी यांनी करावी.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी टपरी बाबतचा खुलासा करावा. १९९२ ला या संदर्भात स्थायी समितीने प्रस्ताव मंजूर केलेला आहे की, तिबेटी नागरिकांना मिलकॉर्नर ते बस स्टॅन्ड रस्त्या लगत जागेवर स्वेटर विक्री व इतर कपडे विक्रीसाठी दुकाने टाकण्या बाबतचा प्रस्ताव मंजूर करुन त्यानुसार कार्यवाही झालेली आहे.

**श्री.विखारोद्दीन :** तिबेटी लोकांना ज्याप्रमाणे ॲडव्हान्स रक्कम भरलेली आहे. तेवढीच रक्कम व त्यापेक्षाही जास्त रक्कम या शहरातील बेकार तरुण भरण्यास तयार आहे. ४० हजारापर्यंत रक्कम भरण्यास तयार आहे. त्यांना का टपरी देण्यांत येत नाही.

**सौ.लता दलाल :** ज्या वेळेस हा प्रस्ताव मंजूर झाला त्यावेळी मी ही सदस्य होते. मीही चर्चेत भाग घेतलेला होता. असा निर्णय झालेला होता की, थंडीच्या दिवसांत ४ महिने त्यांनी या जागेवरील दुकानाचा वापर करावा असे ठरले होते. या लोकांना २ वेळा तेथून उठविण्यांत आलेले आहे. ४ महिन्याच्या व्यवसायासाठी परवानगी दिलेली होती. आता त्यांनी तर कायमचेच दुकाने थाटण्याच्या मार्गावर आहेत. त्वरीत कार्यवाही व्हावी. १०० फुट, ८० फूट रुंद रस्त्यावर कुणाही व्यक्तीला शेड व दुकान बांधकामास परवानगी देऊ नये. रहदारीस अडथळा निर्माण होईल.

**मा.सभापती :** तिबेटी लोकांना परवानगी दिलेली असली तरी त्यांना थंडीच्या दिवसापुरते ४ महिने हिवाळा असे पर्यंत व हिवाळ्याच्या अगोदर १ महिना या कालावधीमध्ये त्यांनी त्यांचा व्यवसाय करावा. तशी कार्यवाही व्हावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सभागृहाने ४ महिन्याची परवानगी दिलेली असतांना त्यांना वर्ष-वर्षभर स्थानिक राहून व्यवसाय करत आहेत.

**मा.सभापती :** ५ महिन्याऐवजी ६ महिने परवानगी देण्यांत यावी. यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देऊ नये. याची संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**सौ.लता दलाल :** श्री.सुर्यवंशी, क.लिपिक, श्री.सिकंदर शरीफ, ड्रेसर, आरोग्य विभाग यांनी अपिल दाखल केले आहे. त्यांचे अपिलावर निर्णय घेण्यांत यावा.

**विषय क्र.२२०/३१ :**

श्री.व्ही.व्ही.सुर्यवंशी, कनिष्ठ लिपिक व श्री.सिकंदर शरीफ, ड्रेसर, आरोग्य विभाग यांचे निलंबन आदेश क्रमांक मनपा/अस्था-१/९९/२०१७, दि.१३.०५.९९ विरुध्दच्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**संवाद :-**

**मा.सभापती :** सदरील अपिल मान्य करण्यांत येते.

**ठराव :**

श्री.सिकंदर शरीफ, ड्रेसर व श्री.व्ही.व्ही.सुर्यवंशी, लिपिक, आरोग्य विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना त्यांच्या कामातील निष्काळजीपणावरुन निलंबित करण्यांत आले असून सदर प्रकरणी अपिल कर्त्यांच्या अर्जावर प्रशासनाचे मत घेण्यात आले. प्रशासनाने त्यांचेकडील पत्र क्रमांक/मनपा/अस्था-१/९९/२८६१, दि.०२.०७.९९ अन्वये अभिप्राय दिलेला आहे.

श्री.सिकंदर शरीफ यांनी त्यांची पुर्णवेळ ड्युटी केलेली आहे. त्यांनी ड्युटी संपल्यानंतर चार्ज देऊन जाणे आवश्यक होते. तथापि, त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते निघुन गेले. त्यांनी त्यांच्या सेवा वेळेत (वर्कींग अवर्स) कामात निष्काळजीपणा केलेला नाही आणि त्यांच्यावर प्रशासनाने कार्यवाही करण्यापुर्वी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित केली.

तसेच श्री.व्ही.व्ही.सुर्यवंशी, क.लिपीक यांची सकाळी ६.०० वाजेपासून ड्युटी असतांना ते ड्युटीवर का आले नाही. याची कारण मिमांसा न करता व त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करणे उचित वाटत नाही. त्यांनी त्यांचे वडील आजारी असल्याने त्यांना महात्मा गांधी मिशन हॉस्पीटल, एन-६ येथे सकाळी दाखल करावे लागल्यामुळे ते ड्युटीवर येवू शकले नाहीत.

वरील सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून अधिकारी/कर्मचारी यांना वेतन व भत्ते नागरिकांकडून जमा झालेल्या करातून देण्यांत येतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांना निलंबित ठेवून कामे करुन न घेता ५० टक्के, ७५ टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही. करिता त्यांचे निलंबन रद्द करुन त्यांना कामावर रुजू करुन घेणे बाबतचे अपिल मान्य करण्यांत येते. संबंधितांना कामावर रुजू करुन घेणे बाबतचे अपिल मान्य करण्यांत येते. संबंधितांना कामावर रुजू करुन घ्यावे. या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२१/३२ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षाकरिता महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली, २ री व ५ वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तकांचे संच उपलब्ध करुन देणेसाठी शासनाकडून फक्त रु.५०००/- चे अनुदान मंजूर करण्यांत आले आहे. यामध्ये नियमानुसार महानगरपालिकेचा हिस्सा रु. पाच हजार याप्रमाणे रु.१०,०००/- ची क्रमिक पुस्तके खरेदी करुन दिल्यास ती क्रमिक पुस्तके फारच कमी पडतात. महानगरपालिकेच्या एकूण ८१ शाळा आहेत. विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शासनाने दिलेल्या कमी अनुदाना व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या वतीने इयत्ता १ ली, २ री, ३ री, ४ थी उत्तीर्ण ५ वी मराठी/उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना रु.४,९०,०००/- (रुपये चार लाख नव्वद हजार फक्तचे) क्रमिक पुस्तके खरेदी करण्याबाबत मा.आयुक्तांनी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करुन विद्यार्थ्यांना वाटप करण्यांत येईल.

तरी याप्रमाणे रुपये पाच लाख खर्चाचा प्रस्ताव अंदाजपत्रकातील तरतूदीस अधीन राहून मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या एकूण ८१ शाळांमधील इयत्ता १ ली, २ री, ३ री, ४ थी आणि ५ वी मराठी/उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या वतीने क्रमिक पुस्तकांचे संच उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाकडून मिळालेले अनुदान रु.५०००/- त्यात मनपाचा नियमानुसार असणारा हिस्सा रु.५०००/- असे एकूण दहा हजार च्या अतिरिक्त रु.४,९०,०००/- असे एकूण रक्कम रु.५,००,०००/- (पाच लाख) च्या खर्चास तसेच सदरील पुस्तके महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करुन विद्यार्थ्यांना वाटप करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :-**

**मा.सभापती :** आजच्या बैठकीत सर्व विषयांना स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

याच बरोबर जन गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती (स्थायी समिती)
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १५.०९.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक १५ सप्टेंबर, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह मा.आयुक्त तसेच खालील स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. बचाटे राजकुमार | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. अजिज खाँ गणी खाँ | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| ११. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| १२. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १३. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| १४. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | - | स.सभासद |

(याच वेळी सभागृहात विषय पत्रिका वाटप करण्यांत येते वेळ ४.२० वाजता)

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** विषय क्र.एक वर चर्चा करावी.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** सभागृहात सर्वसाधारण चर्चा करु द्यावी नंतर विषय पत्रिकेवरील विषय मंजूर करावे. पाणी प्रश्न संबंधात स.सभासदांना चर्चा करावयाची आहे.

**मा.सभापती :** विकास कामे करण्याकरिता ही बैठक आयोजित करण्यांत आलेली असून सर्व विषय विकास कामाचे आहेत.

**श्री.अजिज खॉ गणी खाँ :** बाबर कॉलनी येथे ड्रेनेजची पाईप लाईन टाकण्याबाबत मंजूरी दिलेली असतांना अद्यापपर्यंत कार्यवाही झाली नाही. याबाबत आयुक्तांना विचारणा करण्यांत यावी.

**श्री.विखारोद्दीन :** सभागृहात विषयपत्रिका वाटप करण्यांत येत असून या विषयावर स.सभासदांनी अभ्यास केलेला नाही. ऐनवेळी असे प्रस्ताव देणे योग्य वाटत नाही.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.अजिज खाँ यांनी उपस्थित केलेल्या बाबर कॉलनी तील ड्रेनेज लाईन संबंधी प्रत्यक्ष त्या ठिकाणी पाहणी करुन नंतर मा.आयुक्तांबरोबर

चर्चा करुन विचार करण्यांत येईल. सभागृहात आपण फक्त दुरुस्ती केलेली आहे.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन, श्री.अजिज खाँ गणी खाँ :** सभागृहात चर्चा होऊ द्यावी नंतरच विषय मंजूर करावे.

**मा.सभापती :** सभागृहात चर्चा करता येणार नाही. सध्या आचारसंहिता लागू असून विकासात्मक कामा संदर्भात विषय पत्रिकेवरील विषय मंजूर करावयाचे आहे. सचिव यांनी विषय क्र.१ वाचून दाखवावा.

(याच वेळी स.स.श्री.स.अ.एकबालोद्दीन, श्री.अजिज खॉ गणी खाँ, निषेधाच्या घोषणा करत सभागृहाबाहेर निघून जातात वेळ ४.२५ वा.पुन्हा ४.३० वा सभागृहात प्रवेश करतात.)

**मा.नगरसचिव :** (विषय क्र.१ वाचून दाखवतात)

**श्री.कोकाटे काशिनाथ :** चर्चा करु द्यावी जे विषय पत्रिका सभागृहात वाटप करण्यांत आले त्यावर अभ्यास झालेला नाही.

**मा.सभापती :** इतर चर्चा करता येणार नाही. फक्त विषय पत्रिकेतील विषयावर जो विषय समजला नाही. त्यावर चर्चा करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** जवळ-जवळ एक ते दीड महिन्याच्या नंतर ही बैठक होत असून जनरल चर्चा करु द्यावी.

२) तसेच पत्रकार कक्षाला लॉक लावलेले आहे. त्यांना बसण्यास परवानगी नाही काय? शहराच्या विकासासाठी बैठक घेण्यांत येत असेल तर पत्रकारांना या ठिकाणी बसण्याची परवानगी द्यावयास पाहिजे होती. शहरात २-३ दिवसांपासून पाणी मिळाले नाही. जो नियमित पाणी पुरवठा होत होता तो ३ ते ४ दिवसांच्या नंतर पाणी पुरवठा होऊ लागला आहे. याबाबत १५ मिनीटे सभागृहात चर्चा होऊ द्यावी. चर्चा करावयाची नाही असे म्हणणे असेल तर गेल्या महिन्यात ७-८ दिवस पाणी मिळाले नाही. झोन-७ मध्ये पाणी मिळाले नाही. याबाबत संपर्क साधला असता अधिकारी/कर्मचारी हे जागेवर उपस्थित नसतात. वार्ड क्र.१६ मध्ये ३५ लाखांचे इस्टिमेंट पाणी पुरवठा संबंधी तयार केलेले आहे. परंतू कोणतीही कामे व्यवस्थीत पार पाडण्याचे नियोजन अधिकारी करत नाही. गेल्या पंधरा दिवसात व्यवस्थीत पाणी पुरवठा का देण्यांत आला नाही. याची संबंधित अधिकारी यांना विचारणा करावी.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता :** सिडकोला ७ ते ८ दिवस पाणी मिळाले नाही असे म्हणणे चुकीचे असून गेल्या ४ दिवसांत कमी प्रमाणात पाणी पुरवठा झाला असेल. याबाबत माझ्याकडे संपूर्ण रेकॉर्ड आहे. सतत ८ दिवस पाणी देण्यांत आले नाही असे झालेले नाही. एन-७ येथील टाकी भागात असे झालेले नाही, असे मला वाटते.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** संबंधित अधिकारी हे त्यांच्याकडील माहितीनुसार उत्तरे देतात. कार्यकारी अभियंता यांचे संपूर्ण शहराला पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी असून एन-७ च्या टाकीमध्ये असे झालेले नाही असे मोघम उत्तर देणे योग्य नाही. आम्ही तक्रारी केल्या फोन केले. संबंधित कार्यालयात फोन उचलावयास कुणी नव्हते. या करिता एक चौकशी समिती नेमावी. किंवा मा.सभापती यांनी स्वतः जाऊन पाहणी करावी. महानगरपालिकेच्या दप्तरी

जे रेकॉर्ड आहेत मे मागवून घ्यावे. अधिकारी यांना पदाधिकारी पाठिंबा देत असतील तर योग्य नाही. अधिकारी अशा तक्रारीकडे डोळेझाक करतात. त्यांना याबाबत योग्य त्या सूचना देण्यांत आल्या पाहिजे.

**श्री.देशमुख व्ही.व्ही., श्री.कोकाटे काशिनाथ :** जनतेच्या विकास कामासाठी सभा आयोजित केली जाते. चर्चा होऊ द्यावी. ऐनवेळी सभागृहात विषयपत्रिका देऊन त्यावर निर्णय घेणे योग्य नाही. सदरची विषयपत्रिका १ दिवस अगोदर द्यावयास पाहिजे होती.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** अधिकारी यांनी आचारसंहितेचा भंग केलेला आहे. शहरात नागरिकांना वेळेवर पाणी पुरवठा होत नसून, फोन केला तरी घेतला जात नाही. फोन घेऊन बाजूला ठेवला जातो. सभागृहात मुद्दा उपस्थित केला असता योग्य उत्तर मिळत नाही.

**मा.सभापती :** आचार संहितेच्या नावाखाली शहरातील पाणी पुरवठा खंडीत करता येण्ार नाही. मा.आयुक्त यांना सूचना करु इच्छितो की, आचारसंहितेच्या निमित्त दर्शवून अधिकारी यांनी पाणी पुरवठ्या बाबत कार्यवाही केली नसेल तर तसे संबंधित अधिकारी यांना सूचना द्याव्यात. यापुढे असे होणार नाही याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. तसेच कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी मागील आठवड्यात पाणी वेळेवर, व योग्य प्रमाणात न देण्यांचे कारणे लेखी उत्तरांसह स.सदस्यांना कळवावे.

**श्री.देशमुख व्ही.व्ही :** पाणी प्रश्नांवर चर्चा होऊ द्यावी नंतर विषय पत्रिकेतील विषय मंजूर करावे.

**मा.सभापती :** विषय पत्रिकेतील विषय मंजूर झाल्यानंतर जनरल चर्चा करता येईल.

**विषय क्र.२२२/१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्द पाणी निर्जंतूक करणासाठी वार्षिक क्लोरीन गॅस पुरवठा करणेचे अंदाजपत्रक रक्कम रु.१६,२१,२००/- चे तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजूरी देऊन दर (डी.फॉर्म दरपत्रके) मागविण्यांस मंजूरी दिली. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना क्र.३९५/००, दि.०५.०६.९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ (तीन) निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ (तीन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राजदिप एंटरप्रायजेस (बांद्रा पुर्व) | - | रु.१३,३९७/- प्र.मे.टन मुंबई |
| २. | पुष्पतारा सर्व्हीसेस, विलेपार्ले, मुंबई | - | रु.१३,८७९/- प्र.मे.टन मुंबई |
| ३. | स्कॅन इंडिया, गोरेगांव (पुर्व), मुंबई | - | रु.१४,२०३/- प्र.मे.टन मुंबई |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी राजदिप इंटरप्राईजेस यांचा रु.१३,३९७/- दर रुपये प्रति मे.टन प्रमाणे निविदा आहे. दि.२०.०७.९९ रोजी सदर गुत्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता मा.आयुक्त यांनी १३,३९७/- रु. प्रति टन ऐवजी रु.१२,९००/- प्रति टन या दरास मंजूरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने राजदिप इंटरप्रायजेस यांची रु.१२,९००/- प्रति मे.टन या दराची निविदा स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दी पाणी निर्जंतूकीकरणासाठी वार्षिक क्लोरीन गॅस पुरवठा करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार मे.राजदिप एंटरप्रायजेस, बांद्रा (पुर्व) मुंबई यांची रक्कम रु.१२,९००/- प्रति मे.टन या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>**संवाद :-**</u>

**मा.सभापती :** विषय क्र.२ सचिव यांनी वाचून दाखववावा.
(नगरसचिव विषय क्र.२ वाचून दाखवतात.)

**विषय क्र.२२३/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फोराळा (जुने) पंपगृहातील ४७५ अ.श.मोटरीची रिवायंडींग करणेच्या कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. प्राप्त निविदांचे तुलनात्मक विवरणपत्र तयार केले ते खालीलप्रमाणे -

अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,११,५९०/-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | रु.२,०६,८९३/- (२.२२% कमी) |
| २. | मे.एस.जे.ॲण्ड कंपनी | - | रु.१,९०,६४३/- (९.९% कमी) |
| ३. | मे.रेणुका इलेक्ट्रीकल कं. | - | रु.२,०६,५१२/- (क.४% कमी) |

वरील दराची तुलना केली असता सर्वात कमी दर मे.एस.जे.ॲण्ड कंपनी लातूर यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे त्यांचेकडून काम करुन घेण्यांस मा.आयुक्त यांनी रु.१,९०,६४३/- एवढ्या किंमतीस मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा (जुने) पंपगृहातील ४७५ अश्वशक्ती मोटारीची रिवायंडींग करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच रु.१,९०,६४३/- एवढ्या रकमेची मे.एस.जे.ॲण्ड कंपनी, लातूर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२४/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, बीड बायपास ते रेल्वेस्टेशन दरम्यान अस्तित्वातील १४०० मी.मी.व्यासाची पी.एस.सी.पाईपच्या बदलावाचा व त्या जागी १४२२ मी.मी.व्यासाच्या पोलादी पाईपलाईन (१०२० मीटर) टाकण्याचा प्रस्ताव (अंदाजपत्रक रक्कम रु.१६५.९७ लाख) सादर केला होता. पी.एस.सी.पाईपाच्या होणाऱ्या वारवांर गळतीमुळे तसेच उड्डाण पुलाच्या कामामध्ये मुख्य पाईप लाईन घेत असल्याने कामाची गरज दर्शविली होती. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.१४.०१.९९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावास सर्वसाधारण सभेत विषय क्र.२०५/६ अन्वये मान्यता मिळाली आहे.

मान्यतेनंतर वैधानिक कार्यवाही करुन सदर कामाच्या निविदा काढून प्रसिध्द करण्यांत आल्या. एकूण दहा निविदा विक्री झाल्या व अंतिम दिनाकांस प्रत्यक्षात चार ठेकेदारांनी निविदा भरुन दिल्या. त्या खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.स्नेह शिल्पा, पुणे | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त |
| २. | मे.आर.एस.धाडीवाल | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७७% जास्त |
| ३. | मे.सलीम पटेल | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% जास्त |
| ४. | मे.व्ही.आर.महाजन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त |

यापैकी मे.व्ही.आर.महाजन यांची निविदा स्पर्धेमध्ये (८% जास्त) दराची मिळाली. त्यानंतर सदर ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलावण्यांत आले व मा.आयुक्त यांनी दि.२८.०७.९९ रोजी सदर कामास ४% जास्त दराने कामास मंजूरी दिली आहे.

तरी प्रस्ताव मंजूरीस्तव व योग्य त्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड बायपास ते रेल्वेस्टेशन दरम्यान अस्तित्वात असलेली १४०० मी.मी.व्यासाची पी.एस.पी.पाईपाच्या बदला वाचा व त्या जागी १४२२ मी.मी.व्यासाच्या पोलादी पाईप लाईन (१०२० मीटर) टाकण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.व्ही.आर.महाजन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२५/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-७ येथे २०.०० लाख लिटर्स संप/पंपगृहासाठी इनलेट/आऊटलेट पाईप व्यवस्था करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७,७७,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.१७.०६.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.स्थायी समितीने विषय क्र.१४०/७ दि.२२.०६.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ९ (नऊ) निविदा विक्री झाल्या. व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ (तीन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.व्ही.आर.महाजन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% जास्त |
| २. | श्री.सुरेश बी.साधवानी | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त |
| ३. | मे.जयमातादी कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% जास्त दराची श्री.व्ही.आर.महाजन यांची निविदा प्राप्त झालेली होती. दिनांक ०२.०९.९९ रोजी गुत्तेदारासमक्ष वाटाघाटी केल्या असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली.

तरी श्री.व्ही.आर.महाजन यांची ११% जास्त दराऐवजी ३% जास्त दराची निविदा स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ सिडको येथे २०.०० लाख लिटर्स संप/पंपगृहासाठी इनलेट/आऊटलेट पाईप व्यवस्था करण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.व्ही.आर.महाजन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२६/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रविवार आठवडी बाजार जाफरगेट येथील ओट्यावर टीन शेड टाकण्यासाठी सा.बां.विभाग सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.९,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.३१.०५.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव स्थायी समिती समोर मांडण्यांत आला असता स्थायी समितीने विषय क्र.८८/८ अन्वये दिनांक ०९.०६.९९ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/१७/९९, दि.१५.०६.९९ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.०२.०७.९९ रोजी उपस्थीत गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे-

१. मोना कंन्स्ट्रक्शन - ५% जास्त दराने

२. राजेंद्र वर्दे - १०% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा मोना कंन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झाली. परंतू सदरील निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी ५% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मोना कंन्स्ट्रक्शन यांची ५% जास्त दराऐवजी ३% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रविवार आठवडी बाजार जाफरगेट येथील ओट्यावर टीन शेड टाकण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.मोना कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२७/६ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर, मुकूंदवाडी येथील दक्षिण भागात ड्रेनेज लार्ठन टाकणे बाबतचे कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खाते यांचे दरसुची १९९८-९९ प्रमाणे रक्कम रु.३७,३८,४५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत दि.२५.०५.९९ रोजी विषय क्र.१६ नुसार मंजूरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण २७ निविदा विकल्या गेल्या. व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ११ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या.

१. सोहेल सिद्दीकी - ४१.५०% कमी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | डी.अजितसिंग | - | ३७.८०% कमी |
| ३. | शेख शरीफ | - | २५.१२% कमी |
| ४. | मन्नान खॉन | - | २७.७८९% कमी |
| ५. | साई कंन्स्ट्रक्शन | - | २१% कमी |
| ६. | निकरंग कंन्स्ट्रक्शन | - | २०.०५% कमी |
| ७. | जी.आर.घोडेले | - | १८.९०% कमी |
| ८. | अ.रज्जाक | - | ३२.२२% कमी |
| ९. | विपुल कंन्स्ट्रक्शन | - | २०.२०% कमी |
| १०. | आर.बी.चव्हाण | - | ४०.२% कमी |
| ११. | सलीम पटेल | - | दर दिलेले नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४१.५०% कमी दराची असलेली श्री.सोहेल सिद्दीकी यांची निविदेस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर, मुकूंदवाडी येथील दक्षिण भागात ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४१.५०% कमी दराची श्री.सोहेल सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२८/७ :**

प्र.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर स्लम वॉर्ड क्र.२३ मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणे, रस्ता, क्रॉसिंग जाळ्या टाकणे व ढापे टाकणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खाते यांच्या दरसुचीनुसार रक्कम रु.७,६९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि.२७.०५.९९ ला मंजूरी मिळालेली आहे. सदरील काम "खुली गटार बांधणे" या शिर्षकातून करण्यांत येईल. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मन्नान खॉन | - | ३६.०५% कमी |
| २. | श्री.एस.ए.देशमुख | - | २७.८९% कमी |
| ३. | श्री.नंदकुमार घोडेले | - | २२% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.०५% कमी दराची असलेली श्री.मन्नान खाँन यांची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.इंदिरानगर स्लम वार्ड क्र.२३ मध्ये अर्धगोलाकार गटार बांधणे, रस्ता क्रॉसिंग जाळ्या टाकणे व ढापे टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.०५% कमी दराची श्री.मन्नान खॉन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२९/८ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे संरक्षित भिंत बांधणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३१,९४,१८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम शासकीय अनुदान या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत दि.२०.०५.९९ रोजी विषय क्र.१३/११ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण २० निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

१. श्री.सलीम पटेल - अंदाजपत्रकीय दर
२. श्री.एस.एम.मंडोरे - ४% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री.सलीम पटेल यांची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.भिमनगर, भावसिंगपुरा स्लम येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३०/९ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.चिकलठाणा कामगार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु.३,०७,८३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.९४/१४ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३२ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

१. श्री.सोहेल सिद्दिकी - २७.७२% कमी
२. आनंद बिल्डर्स - २६.३% कमी
३. काझी महंमद रजियोद्दिन- २१ % कमी
४. श्री. राजेंद्र वर्दे - २३.०१% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७२% कमी दराची असलेली श्री.सोहेल सिद्दिकी यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.चिकलठाणा कामगार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७२% कमी दराची श्री.सोहेल सिद्दिकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३१/१० :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. आंबेडकर येथे मुख्य रस्त्यासाठी दगडी गटार बांधणे व अर्धगोलाकार गटार दुरुस्त करणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष ९८-९९ च्या दरसुची नुसार र. रु.६३,७५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "देखभाल दुरुस्ती" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती दि. ०९-०६-९९ रोजी विषय क्र. ९३/१३ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस. पी. सरवदे | - | ३९% कमी |
| २. | आनंद बिल्डर्स | - | २६.३% कमी |
| ३. | फाईवस्टार कन्स्ट्रक्शन | - | ३२.१०% कमी |
| ४. | सिंधू कन्स्ट्रक्शन | - | ३१% कमी |
| ५. | एस. ए. देशमुख | - | २८.५५% कमी |
| ६. | सुंदर कन्स्ट्रक्शन | - | २६.१७% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं प.दरापेक्षा ३९% कमी दराची असलेली श्री.एस. पी. सरवदे यांची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.आंबेडकर येथे मुख्य रस्त्यासाठी दगडी गटार बांधणे व अर्धगोलाकार गटार दुरुस्त करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९% कमी दराची श्री.एस. पी. सरवदे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३२/११ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.किराडपुरा स्लम वार्ड क्र.२६ मध्ये काँक्रीट रस्ते तयार करणे व शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु.९,८४,३९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि.०९.०६.९९ ला मंजूरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण २० निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सय्यद सईदुल्ला हुसेनी | - | अंदाजपत्रकीय दर |
| २. | श्री.शुजात हाश्मी | - | २% जास्त |
| ३. | श्री.शेख समद | - | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री.सय्यद सईदुल्ला हुसेनी यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किराडपुरा स्लम वार्ड क्र.२६ मध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.सय्यद सईदुल्ला हुसेनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(याचवेळी स.सदस्य श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.वसंत देशमुख, श्री.अजिज खॉ गणी खॉं, श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन, श्री.स.अ.इकबालोद्दीन निषेधाच्या घोषणा देत सभागृहाबाहेर निघुन जातात.) (वेळ ४.४५ वा.)

**विषय क्र.२३३/१२ :**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, खिंवसरा पार्क ते (गारखेडा रोड) सुतगिरणी या रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबत या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,९१,७४६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २४ (चोवीस) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत फक्त ११ (अकरा) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. निविदापत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.सत्यम वायर्स | - | १९.०२% कमी |
| २. | लुना इलेक्ट्रीकल्स | - | २५.००% कमी |
| ३. | मे.दानिस सेलस कॉर्पो | - | १९.३२% कमी |
| ४. | मे.ओमशांती इले. | - | २४.१०% कमी |
| ५. | मे.के.आर.इले. | - | २३.०५% कमी |
| ६. | मे.पावरलाईन इंजि.कॉर्पो | - | १९.१९% कमी |
| ७. | मे.आदित्या इलेक्ट्रीकल्स | - | २३.००% कमी |
| ८. | मे.निखिल इलेक्ट्रीकल्स | - | २२.५०% कमी |
| ९. | मे.गजानन इलेक्ट्रीकल | - | २७.०६% कमी |
| १०. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल | - | २२.०१% कमी |
| ११. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल | - | ११.११% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल च्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०६% कमी दराने काम करण्यास तयार आहेत.

तरी मे.गजानन इलेक्ट्रीकल यांच्याकडून सदरील अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०६% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.विकास जैन :** विषय क्र.१२ ते १८ हे विद्युत साहित्य खरेदी करण्या संदर्भात असून सदर साहित्य चांगल्या प्रतीचे आहे किंवा कसे यासाठी सॅम्पल मागवून घेऊन टेक्नीकल विभागाकडून त्यांची तपासणी करुन नंतरच पुढील बैठकीत या प्रस्तावास मंजूरी द्यावी.

**मा.सभापती :** विषय क्र.१२ ते १८ विद्युत विभागाच्या निविदा आहेत. यात पहिले तीन लोएस्ट दर ज्यांनी दिलेले आहेत, त्या बाबतचे सॅम्पल येणाऱ्या बैठकीपर्यंत मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली मागवून घ्यावे. टेक्नीकल तपासणी करुन जे सॅम्पल योग्य असेल त्या कॉन्ट्रॅक्टरच्या संदर्भात पुढील बैठकीत तशी माहिती द्यावी. नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल. तसेच विषय क्र.१ ते ११ स्विकृतीसह मंजूर करण्यांत येत आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खिंवसरा पार्क ते सुतगिरणी (गारखेडा रोड) या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन सर्वात कमी दराच्या निविदाधारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्‌नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र.२३४/१३ :**

अति.शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, देवानगरी ते प्रतापनगर रोडवर विद्युतीकरण करणे बाबत (पथदिवे) या रस्त्याचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण एकवीस (२१) कोरी निविदापत्रके विकल्या गेली. व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ८ (आठ) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.सत्यम वायर्स | - | १९.०१% कमी |
| २. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ११.०१% कमी |
| ३. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | २३.००% कमी |
| ४. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल | - | २३.८८% कमी |
| ५. | मे.गजानन इलेक्ट्रीकल | - | २८.०२% कमी |
| ६. | मे.दानिस सेल्स कॉर्पो | - | १९.०१% कमी |
| ७. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | २२.००% कमी |
| ८. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल | - | २२.०१% कमी |

वरील प्राप्त निविदापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल च्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.०२% कमी या दराने काम करण्यास तयार आहेत.

तरी मे.गजानन इलेक्ट्रीकल यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.०२% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी ते प्रतापनगर रोडवर विद्युतीकरण करणे बाबत (पथदिवे) च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन सर्वात कमी दराच्या निविदाधारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्‌नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र.२३५/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, अहिंसानगर ते स्मशानभूमी (कैलासनगर) रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबत कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची दि.०६.०५.९९ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण बावीस (२२) कोरी निविदा विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा (६) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल | - | २३.२% कमी |
| २. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल | - | ५% कमी |
| ३. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल | - | २२% कमी |
| ४. | मे.गजानन इलेक्ट्रीकल | - | २७.२% कमी |
| ५. | मे.लुना इलेक्ट्रीकल | - | १८% कमी |
| ६. | मे.गुरुदत्त इलेक्ट्रीकल | - | १७.१% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल्सच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२% कमी आहेत. व ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२% कमी दराने काम करण्यांस तयार आहेत.

तरी मे.गजानन इले. यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.२% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अहिंसानगर ते स्मशानभूमी (कैलासनगर) रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन सर्वात कमी दराच्या निविदाधारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखालील तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्नंतर या विषयांवर निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र.२३६/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, संत एकनाथ रंग मंदिर ते गुरु तेग बहादूर हायस्कुल या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,९९,३७७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २५ (पंचवीस) कोरी निविदापत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दहा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.धनंजय इलेक्ट्रीकल्स | - | ०८.००% कमी |
| २. | मे.गजानन इलेक्ट्रीकल्स | - | २५.०२% कमी |
| ३. | मे.परवेज इलेक्ट्रीकल्स | - | १९.०१% कमी |
| ४. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल्स | - | २३.०६% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | मे.के.आर. इलेक्ट्रीकल्स | - | २२.००% कमी |
| ६. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | १८.००% कमी |
| ७. | मे.निखील इलेक्ट्रीकल्स | - | १२.०१% कमी |
| ८. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | १२.०१% कमी |
| ९. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | २४.००% कमी |
| १०. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स | - | २२.९९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या वरील प्राप्त निविदापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल्स च्या निविदापत्रकाचे दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.०२% कमी दराचे आहेत व या दराने काम करण्यास तयार आहेत.

तरी मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.०२% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर ते गुरु तेग बहादूर हायस्कुल या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन सर्वात कमी दराच्या निविदाधारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र.२३७/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, देवानगरी ते बीड बायपास रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण १८ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ११ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.शांती इलेक्ट्रीकल्स | - | २७.०९% कमी |
| २. | मे.के.आर. इलेक्ट्रीकल्स | - | २५.००% कमी |
| ३. | मे.गजानन इलेक्ट्रीकल्स | - | ३०.०४% कमी |
| ४. | मे.बिटा इलेक्ट्रीकल्स | - | २१.६६% कमी |
| ५. | मे.दानिस सेल्स कॉर्पो. | - | १९.०१% कमी |
| ६. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स | - | २३.९९% कमी |
| ७. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | २२.००% कमी |
| ८. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | २४.२२% कमी |
| ९. | मे.इगल इलेक्ट्रीकल्स | - | १७.०९% कमी |
| १०. | मे.सत्यम वायर्स | - | १९.०३% कमी |
| ११. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | १९.०१% कमी |

वरील प्राप्त निविदापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल्सच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०४% कमी आहेत. या दराने काम करण्यास ते तयार आहेत.

तरी मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०४% कमी या दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवानगरी ते बीड बायपास रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन सर्वात कमी दराच्या निविदाधारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र.२३८/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महानुभाव आश्रम (श्रीकृष्ण मंदिर) ते बीड बायपास रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रकाचे विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २२ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ११ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि.२६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली. असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.शांती इलेक्ट्रीकल्स | - | २६.५५% कमी |
| २. | मे.इगल इलेक्ट्रीकल्स | - | १८.०५% कमी |
| ३. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | २५.००% कमी |
| ४. | मे.दानिस सेल्स कॉर्पो | - | १९.००% कमी |
| ५. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स | - | २४.११% कमी |
| ६. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल्स | - | २२.०१% कमी |
| ७. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | २३.००% कमी |
| ८. | मे.गजानन इलेक्ट्रीकल्स | - | २७.०२% कमी |
| ९. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | १३.५५% कमी |
| १०. | मे.बिटा इलेक्ट्रीकल्स | - | २१.६६% कमी |
| ११. | मे.सत्यम वायर्स | - | १९.०२% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल च्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०२% कमी आहेत. तरी मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०२% कमी या दराने करुन घेण्यांबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानुभाव आश्रम (श्रीकृष्ण मंदिर) ते बीड बायपास रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन

सर्वात कमी दराच्या निविदाधारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल.

**विषय क्र.२३९/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, तोतला हॉस्पीटल ते व्यंकटेशनगर या रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २४ निविदापत्रके विकल्या गेली व अंतिम तारखेपर्यंत फक्त १० निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक २६.०५.९९ रोजी उघडण्यांत आली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.लाईटवेल इलेक्ट्रीकल्स | - | २३.०३% कमी |
| २. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल्स | - | २१.०९% कमी |
| ३. | मे.गजानन इलेक्ट्रीकल्स | - | २२.००% कमी |
| ४. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल्स | - | ११.११% कमी |
| ५. | मे.बिटा इलेक्ट्रीकल्स | - | २३.६६% कमी |
| ६. | मे.दानिस सेल्स कॉर्पोरेशन | - | १९.२५% कमी |
| ७. | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | - | २३.२३% कमी |
| ८. | मे.निखील इलेक्ट्रीकल्स | - | २०.९९% कमी |
| ९. | मे.धनंजय इलेक्ट्रीकल्स | - | ८.००% कमी |
| १०. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स | - | २२.००% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.बिटा इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.६६% कमी आहेत. या कमी दराने काम करण्यास तयार आहे. तरी मे.बिटा इलेक्ट्रीकल्स यांच्या कडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.६६% कमी या दराने करुन घेण्या बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तोतला हॉस्पीटल ते व्यंकटेशनगर या रोडवर पथदिव्यांकरित विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी पहिल्या तीन सर्वात कमी दराच्या निविदा धारकांकडून सॅम्पल मागवून मा.अतिरिक्त शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपासणी करुन योग्य सॅम्पल बाबत आगामी बैठकीत माहिती द्यावी. तद्नंतर या विषयावर निर्णय घेण्यांत येईल.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.सभापती (स्थायी समिती) |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०५.१०.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक ०५ ऑक्टोंबर, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली.**

**सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. बचाटे राजकुमार | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| ११. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १२. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| १३. | स.स.सौ. विमल नंदकुमार मुंडलिक | - | स.सभासद |
| १४. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | - | स.सभासद |

**<u>संवाद :-</u>**

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** माझ्या वार्डामध्ये रस्त्यावर ठिकठिकाणी टेलिफोन विभागाने तसेच महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने खड्डे करुन ठेवलेले आहे. काही ठिकाणी पॅचवर्क केलेले नाही. तसेच नेहरुभवन येथील दुकान केंद्र बाबत हर्रासी होणार होती. त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही. नेहरुभवनची संरक्षित भिंत व्यवस्थीत बांधलेली नाही. त्याचप्रमाणे नेहरुभवन येथील हॉलमध्ये पडदे व्यवस्थीत झाली नाही. तसेच कब्रस्तान दुरुस्ती करण्याबाबतही कार्यवाही झाली नाही. या सर्व प्रश्नांचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता (रस्ते) :** काही ठिकाणचे रस्तेवरील खड्डे दुरुस्त केलेले आहेत.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** अद्याप कोणत्याही रस्त्यातील खड्डे दुरुस्त केलेले नाही. टेलिफोन विभागाने सदरकामे करतांना कोणतीही परवानगी न घेता रस्त्यावर खोदकामे केलेली आहे. पैसे भरण्यास त्या विभागाला कळविण्यांत आले होते. परंतू पैसे न भरता विना परवानगीने कामे केलेली आहे.

**उपअभियंता (ई.) :** टेलिफोन विभागाला या संदर्भात कळविण्यांत आलेले आहे. आठ दिवसांत रस्त्यावरील खड्डे दुरुस्त करुन देण्यांत येईल.

**मा.सभापती :** पडदे बाबत संबंधित अधिकारी यांना खुलासा करावा.

**उपअभियता (ई.) :** पडदे लावण्याबाबत दोन एजन्सीजकडून कोटेशन मागवलेले आहेत. एका एजन्सीजने ६ प्रकारच्या ॲटमचे दर दिले तर दुसऱ्या एजन्सीजचे १६ ॲटमच्या प्रकारचे दर दिले त्यास मंजूरी मिळाल्यावर तात्काळ कार्यवाही करता येईल.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** नेहरुभवनाचे पर्देही फाटलेल्या अवस्थेत दिसतात. सध्या पावसाचे पाणी गळत आहे. टेंडर २ महिन्यापुर्वी काढण्यांत आले त्या ठेकेदारांकडून डिपॉजीट घेण्यांत आलेले आहे काय? खुलासा करावा कार्यवाही कधी होणार याचा अवधी द्यावा.

**उपअभियंता (ई) :** संबंधित ठेकेदारांला अद्याप कोणत्याही प्रकारचे पेंमेट केलेले नाही. काम पूर्ण केल्यावरच पेमेंट देण्यांत येणार असून रिटेरिंगवाल साठी बजेट शिल्लक नाही.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** अधिकारी हे मुद्दामहून मुस्लीम एरीयामध्ये विकास कामे करत नाही या ठिकाणी फक्त मुस्लीम व दलित लोकांचे लग्न होतात. जे शादीखाने बांधण्यांत आले ते गरीब लोकांची घरे तोडून बांधलेले आहे. हिंदुच्या एरीयात किती शादीखाने झाले, याची माहिति द्यावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** स.सदस्यांनी सुचवलेल्या प्रश्न सोडवण्यास अधिकारी यांना वेळ द्यावा त्यावेळात ती कामे पूर्ण होईल, याची खबरदारी घेण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.स.अ.एकबालोद्दीन यांनी सुचवलेल्या प्रश्नाबाबत संबंधित अधिकारी यांनी नेहरुभवन येथील हॉलमध्ये पडदे व इतर देखभाल दुरुस्तीचे काम १ (एक) महिन्याच्या आत पूर्ण करण्यांत यावे.

**श्री.राजकुमार बचाटे :** नेहमीच येतो पावसाळा आणि पाणी साचते. याबाबत काय कार्यवाही होते. आदित्यनगर येथे श्री.काळविट, श्री.देशपांडे, यांच्या घरामध्ये व समोर दोन-तीन दिवसापूर्वी झालेल्या पावसामुळे कमरेपर्यंत पाणी साचलेले होते. त्यामुळे नागरिकांना जाण्यायेण्यास कोंडी होऊन नागरिकांचे हाल होत आहे. याबाबत सिटीलिंकच्या बातम्यामध्ये प्रसारित करण्यांत आलेले होते. याबाबतचा मार्ग किती दिवसांत निघणार आज मा.अति.शहर अभियंता तसेच उपअभियंता यांची भेट झाली त्यानुसार काहीतरी मार्ग काढण्यांत येईल असे सांगितले याबद्दल धन्यवाद. यापुर्वीही उपमहापौर डॉ.कराड हे भेट देऊन गेले. त्याचप्रमाणे आवश्यक वेळी ड्रेनेजच्या कामासाठी जेटींग मशीनच्या गाडीची मागणी संबंधित विभागाकडे केली असता योग्य उत्तर मिळत नाही. झोनच्या नावावर गाडी कुठे जाते. काही समजू शकत नाही. त्यासाठी गाडी कोणत्या झोनमध्ये कोणत्या वार्डात नेमके कुठे, कोणत्या दिवशी कामे होतात. यांचा संपूर्ण तपशिल झोन ऑफिसला असावयास पाहिजे त्यामुळे गाडी कुठे आहे हे समजू शकेल.

**अति.शहर अभियंता :** आदित्यनगर भागात मी प्रत्यक्ष पाहणी केली, नाला उथळ असल्याने व खोली वाढू शकत नसल्याने जास्त पाऊस पडल्यानंतर पाणी रस्त्यावरुन वाहते पाणी थांबण्याचे कारण म्हणजे बऱ्याच लोकांनी इमारतीचे बांधकाम केलेले असून रस्त्यावर जास्त प्रमाणात बांधकाम साहित्य पडलेले आहे. त्या ठिकाणी उतार देवून पाणी काढण्याची कार्यवाही करण्यांत येईल. यास एक-दोन महिन्याचा अवधी लागेल.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** दोन वर्षापुर्वीची प्रलंबित विकास कामे करण्यांत यावी. याकामासाठी बजेट शिल्लक आहे काय?

**मा.सभापती :** बऱ्याच वेळेस नवीन कामे उद्‌भवतात त्यासाठी बजेट शिल्लक नसते. दुसऱ्या महापालिकेत ज्या त्या कामाबाबतच्या नावानिशी बजेट ठेवलेले असते. त्यामुळे लवकरात लवकर कामे होतात. यापुढे होणाऱ्या अर्थसंकल्पात ज्या त्या कामासाठी नावानिशी नोंद व्हावी. असे ठेवले तर अडचण निर्माण होणार नाही.

**श्री.बचाटे राजकुमार :** सदरचे काम अत्यावश्यक विशेष बाब म्हणून करण्यांत यावे.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** आमचे कामाच्या संचिका जातात परंतू बजेट आहे का नाही ते आम्हाला कळत नाही.

**सौ.तळेकर राधाबाई :** वार्ड क्र.७४ कसबेकर तेल भांडार, सेव्हल हिल नाला, ब्रम्हकुमारी आश्रम येथे पाणी साचते सेवनहिल पासून पाणी येते. गुरुवार शुक्रवारच्या रात्री पावसाचे श्री.कसबेकर, श्री.पटेल यांच्या घरात ४ ते ५ फुट घरात पाणी होते. त्यांची मुले पोटमाळ्यावर टाकावी लागली. करडीचे पोते पाण्यावर तरंगत होते. त्याचे ४० ते ५० हजारांचे नुकसान झाले. ब्रम्हकुमारी सिंधी आश्रम जवळ बांधकामे केले. मटेरियल रस्त्यावर पडलेले असल्याने जोराचा पाऊस आल्यास पाणी वाहून नेणारी नाली लहान पडते त्यामुळे पाणी घरात जाते. तरी जी २ ते अडीच फुटाची नाली आहे ती ५ ते ६ फुट बांधावी आता जे नुकसान झाले ते ४०,००० ते ५०,०००/- हजार रुपयाचे झाले आहे. यावेळी फक्त लोकमतचे पत्रकार होते. इतर मात्र दिसले नाही. आता पावसाळ्याचे नक्षत्र भयानक आहे मी संबंधित विभागाला तशा प्रकारचे पत्र दिले तरी त्वरीत कार्यवाही व्हावी.

**सौ.लता दलाल :** शहरात एक ही रस्ता असा नाही की ज्या रस्त्यावर खड्डे नाही. अधिकारी सांगतात २ महिने काम करण्यास लागतील. आचारसंहित असतांना कोर्टाच्या परवानगीने बैठक होऊन अत्यंत तातडीच्या कामे व्हावीत म्हणून निर्णय झालेत. डांबरीकरणाची कामे उन्हाळ्यात करण्यांत येतात. त्यानुसार डांबरीकरणाचे दुरुस्तीचे ठराव स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी अद्याप झालेले नाही. तसेच नगरसेवकांच्या स्वेच्छानिधितून कामे व्हावीत तेही प्रस्ताव मंजूरीला नाहीत. संचिका कुठे असतात काही कळत नाही. माझ्या वार्डातील एक विकास कामाबाबतची संचिका ६ महिन्यापासून एका विभागातून दुसऱ्या विभागात जाते कोठे संचिका थांबली ते कळावे त्याचे कारण कळावे. मंजूरी होऊन ही का कार्यवाही करण्यांत येत नाही का संचिका थांबविण्यांत येते. खुलासा करावा नंतरच बैठकीतील पुढील चर्चा व्हावी. ४-६ महिन्यांत जनतेसमोर जायचे, वर्तमान पत्राने नगरसेवकांची भूमिका देखील मांडायला पाहिजे.

**श्री.विकास जैन :** ज्या रस्ते विकास कामाबाबतच्या संचिका आहेत. ज्याचे अंदाजपत्रक तयार असेल अशा संचिकास येत्या बैठकीत मंजूरीसाठी आणाव्या तसे आदेश देण्यांत यावे व मंजूरी दिल्यास येत्या नोव्हेंबर-डिसेंबर पर्यंत सर्व रस्त्याची कामे व्हावीत.

**सौ.लता दलाल :** सभागृहात स.सदस्य हे लोकप्रतिनिधी म्हणून बोलतात. अधिकारी हे बरोबर उत्तरे देतात पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करत नाही. एका कानाने ऐकायचे व दुसऱ्या कानाने सोडायचे, निराला बाजार येथील

अतिक्रमणाबाबत मी बऱ्याच वेळा बैठकीत चर्चा केली ते अतिक्रमण अद्याप काढलेले नाही. शेवटी संबंधितांनी न्यायालयाचा स्टे आणलेला आहे. आता तो व्हॅकेट झाला आहे. असे समजते. याबाबत अधिकारी यांना विचारणा करण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्या सौ.दलाल यांनी उपस्थित केलेल्य प्रश्नाच्या अनुषंगाने अति.शहर अभियंता यांना सूचना देऊ इच्छितो की, जे प्रस्ताव मंजूर झालेले असून त्यानुसार बजेट आहे, जे प्रस्ताव मंजूर असून टेंडरला आहेत असे प्रस्ताव स्थायी समितीची मंजूरी घेतलेली नसेल तर येत्या स्थायी समिती सभेत तसे प्रस्ताव मंजूरीसाठी आणावेत तसे न झाल्यास नियमाने अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी लागेल. तसेच निराला बाजार येथील अतिक्रमणाच्या बाबतीत स्टे व्हॅकेट झालेला आहे काय संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** विधी सल्लागार यांच्याशी संपर्क साधला असता स्टे व्हॅकेट झालेला आहे. असे कळले त्यांच्या प्रमाणीत प्रती घेऊन पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण काढावे लागेल.

**मा.सभापती :** या ठिकाणी इमारत निरिक्षकांना पायऱ्या चढू देत नव्हते. लवकरात लवकर कार्यवाही करावी.

**श्री.विखारोद्दीन :** दीड वर्षापासून हमालवाड्याजवळ आपल्या मालकीच्या जमिनीवर स्मशानभूमी न होण्याकरिता एक खाजगी व्यक्ती करु नका म्हणतो वसाहतीत अंत्यसंस्कार होतात स्मशानभूमी जागेवर रोड असतांना एक व्यक्ती अडथळा निर्माण करतो तशी योग्य ती कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**शहर अभियंता :** हमालवाडाच्या पुर्वेस जुनी स्मशानभूमी असून तेथे कुंपन भिंत केलेली असून त्या ठिकाणी सध्या अंत्यसंस्कार होतात. कुणाची ही तक्रार नाही. ज्या ठिकाणी बंदी घातलेली आहे. तेथील लोकांनी न्यायालयाचा स्टे आणलेला आहे. त्यामुळे शेडचे काम पण अर्धवट असून सध्या कार्यवाही करता येणार नाही.

**श्री.विखारोद्दीन :** १९८५ ला स्टे आणलेला होता. सध्या हे अस्तित्वात आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे सदर काम करण्याबाबत पुन्हा ७ लाखाचा मंजूरी दिलेली आहे व चाऊस नावाचे ठेकेदाराला निविदा दिलेल्या आहेत.

**शहर अभियंता :** सिल्कमिल कॉलनीत जुनी स्मशानभूमी असून आजही काही लोक तेथे राहतात. वसाहत झालेली आहे.

**श्री.विखारोद्दीन :** सर्वे नं.१७ त १८ ची जमीन त्यावेळी खुलीच होती. कुठेही अंत्यंसंस्कार करण्यांत येत होते. संबंधित जमीनीचे मालक आजही आहेत. परंतू स्मशानभूमी म्हणून रेकॉर्ड महानगरपालिकाकडे आहे काय अधिकारी दिशाभूल करतात. याबाबत पोलिस विभागाला कळवून ज्या ठिकाणी स्मशानभूमी आहे. त्यास ठिकाणी अंत्यसंस्कार होण्याची कार्यवाही करावी नसता त्या प्रभागात अनुचित प्रकार होण्याची शक्यता टाळता येत नाही. काल आम्ही तेथे नसतो तर दंगल झाली असती.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी सदरील स्टे कधीपासून आहे. १४ वर्षापासून स्टे व्हॅकेट झालेला आहे किंवा काय ते पाहावे.

**श्री.विखारोद्दीन :** कब्रस्तानच्या जागेवर घराचे अनाधिकृपणे बांधकाम करण्यांत आले. या संदर्भात सभागृहातही चर्चा होऊन अधिकारी यांना सूचना केली आहे. एकदा

काढण्यांत आले होते. परंतू पुन्हा बांधकाम झाले आहे. संबंधिताने न्यायालयाचा स्टे आणलेला होता. अधिकारीच तसे मार्गदर्शन करतात. अशी माझी शंका आहे. यावर कार्यवाही व्हावी.

**प्रशासकीय अधिकारी :** आता स्थगिती ही उठवलेली आहे. सध्या ते बांधकाम तोडता येणार नाही. संबंधितांनी कोर्टाचा स्टे आणलेला आहे. स्टे उठल्यावर कार्यवाही करता येईल. सदरचे बांधकाम हे बाहेर आहे की, मध्ये येते याची पाहणी करुन कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** सर्वे नं.४०, ४१ हे कब्रस्तानचे आहे. राहुलनगर, सादातनगर ची जागा खुली आहे. त्याठिकाणी सध्या अतिक्रमणे होऊ/लागली आहे. याकडे लक्ष देणे हे महानगरपालिकेची नैतिक जबाबदारी आहे. कब्रस्तान म्हणून वक्फ बोर्डाचे रेकॉर्ड असून त्याबाबतची एन.ओ.सी.पण आहे. जागा अतिक्रमीत होत असेल तर कोणी थांबवावे.

**मा.सभापती :** संबंधित कब्रस्तान झालेल्या बांधकामाबाबत स्टे आलेला असेल, तर स्टे व्हॅकेट करुन पुढील कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे स.सदस्य श्री.बचाटे यांनी उपस्थित केलेला जेटींग मशीन (वाहन) संदर्भात झोनवाईज वार ठरवावे. कोणत्या भागात काम करण्यांत येते याची माहिती झोन वाईज ठेवावी. त्यामुळे वाहन कोणत्या भागात गेले त्याची माहिती राहील. त्याचप्रमाणे आदित्यनगर येथील पावसामुळे पाणी थांबून असते याबाबत संबंधित अधिकारी यांनी दोन महिन्याच्या आंत कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** सकाळी झोन कार्यालयातून आलेल्या तक्रारी घेवून निघतात या संदर्भात परिपत्रक काढून सर्व विभागीय अधिकारी यांना कळवतो.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** अभिनय टॉकीज ते किराणा चावडी रस्ता रुदीकरणाबाबत १ १/२ ते दोन वर्षापासून कार्यवाही चालू आहे. या रस्त्या अंतर्गत येणाऱ्या किराणा चावडी पोलिस चौकी काढण्या बाबत पर्यायी जागा देऊन महानगरपालिकाने बांधून देण्याचा स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा होऊन निर्णयही झालेला होता. गणेश उत्सवात अरुंद रस्ता असल्याने खूपच गर्दी होते. त्यामुळे नागरिकांना जाण्यायेण्यास त्रास होतो. चेंगरा चेंगरी झाली. तरी पोलिस चौकी तात्काळ पर्यायी जागेवर बांधून रस्ता रुंदी करण करण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**उपसंचालक, नगररचना :** पोलिस चौकी काढण्या संदर्भात संबंधित विभागाला कळविण्यांत आले आहे. पर्यायी जागा दाखवण्यांत आली असून ती पोलिस विभागाने मान्य केली आहे. परंतू चौकीचे बांधकाम हे महापालिकेने करुन द्यावे. याबाबत बी ॲण्ड सी ला कळविण्यांत आले आहे. बांधकामाची किंमत कमी आहे. आपण बांधून द्यावे व त्यांचेकडून वसूल करावे.

**मा.सभापती :** मागील बैठकीत पोलिस चौकी बांधून देण्या बाबतचा निर्णय घेतलेला असेल तर पोलिस चौकीचे बांधकाम करण्यास हरकत नाही.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** जुने स्ट्रक्चर आहे. किंमत कमी ठरविल्या गेली तर पुन्हा सुधारित प्रस्ताव संबंधित अधिकारी यांनी मंजूरीसाठी का आणला नाही. त्याची ही जबाबदारी नव्हे काय?

**मा.सभापती :** सिडको प्रशासन विभाग पोलिस चौकी बांधून देऊ शकते तर महानगरपालिकाने पोलिस चौकी हलवली तर बांधून द्यावयास पाहिजे.

**श्रीमती पुष्पाताई गंगवाल :** या संदर्भात पत्र देवून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** या बाबतचा निर्णय आजच्या आज घेण्यांत यावा.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** दोन-तीन दिवसांपूर्वी माझ्या वार्डामध्ये स्मशानभूमी हनुमान मंदिर लगत नाला संरक्षित भिंत अतिवृष्टीमुळे पडून एक महिला रहिवाशी श्री.शेख पाशा यांच्या पत्नी जखमी झाल्या आहेत. त्या सध्या एम.जी.एम.हॉस्पीटलमध्ये उपचार घेत असून आतापर्यंत ७०,२००/- रुपये खर्च झालेला आहे. सदर भिंत आहे. त्यात अवस्थेत राहिली तर आणखी पडत राहील. जेणे करुन पुन्हा जखमी होऊन प्राण हाणी होणार नाही. त्यासाठी तात्काळ कलम ६७ (सी)-३ प्रमाणे कार्यवाही करुन पुढील कार्यवाही करावी. तातडीने बांधले नाही तर लगतची घरे पडतील.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी स्मशानभूमी मारोतीच्या बाजूला नाला संरक्षित भिंत पडलेली असून पुन्हा नुकसान होऊ नये या करिता तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** पावसामुळे सदरील भिंत पडली, केव्हा बांधकाम झाले होते. माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** ५ वर्षापुर्वी भिंतीचे काम केलेले होते. ३० फुट पडली अनधिकृत बाथरुम बांधकाम केलेले होते. त्यामुळे जास्तीचा बोजा पडून ही भिंत कोसळली असावी.

**श्री.विकास जैन :** नवीन अंदाजपत्रक तयार करुन संरक्षित भिंतीचे काम करण्यांस उशीर लागेल दुसऱ्या कोठेही काम चालू असेल त्यातून हे काम करुन घेण्याचे अधिकारी यांना आदेश द्यावेत.

**सौ.लता दलाल :** शहरात अशा मोडकळीस आलेले किती घरे व संरक्षित भिंती आहेत व अनाधिकृतपणे येणाऱ्या बांधकाम मालकास अशा किती लोकांना प्रशासनाने नोटीसा दिलेल्या आहेत. याची माहिती पुढच्या बैठकीत अधिकारी यांनी द्यावी व मोडकळीस येणारे घरे तात्काळ पाडावे. अनेक वार्डात रिटरनिंग वालचे काम निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे अर्धवट राहिलेली आहे. शहरातील नाल्यालगत असलेली घरे भिंती पडल्या निधी उपलब्ध करुन घ्यावा. वेगळ्या लेखाशिर्षामधून घ्यावे असे अंदाजपत्रक मंजूर करुन घेण्यांस अडचण येत असेल तर लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** यासाठी जो निधी ठेवलेला होतो तो संपूर्णतः संपलेला असून बिले मधून सेव्हींगमध्ये घेऊन एम.ॲण्ड आर नुसार कार्यवाही करता येईल.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** सभागृहात आम्ही बोलतो कामे होतात किंवा नाही याबाबत आपण आमचे १००% समाधान करता आमची अशी अपेक्षा आहे की, प्रशासनास आपण विचारले पाहिजे व त्यावर काय उपाय योजना आहेत ते प्रशासनाकडे सांगितले पाहिजे. व दिलेल्या सुचनाचे पालन अधिकारी यांनी केले पाहिजे.

**मुख्य लेखाधिकारी :** तातडीच्या आकस्मीक कामासाठी सेव्हींग मधून करता येतील. घेवून १०-१५ लाखाची बचत होईल. परंतू त्यासाठी प्रत्येक वेळी नवीन अंदाजपत्रक तयार करावे लागेल.

**मा.सभापती :** मुख्य लेखाधिकारी यांनी सुचवलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करुन मा.प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री.रविंद्र इंगळे :** सिडको हडको भागात नगरसेवकांच्या निधीतून नागरी सुविधा म्हणून नगरसेवक निधी देऊ इच्छितात. या अगोदर बऱ्याच सुविधा स्वेच्छानिधीतून दिलेल्या असून छोट्या छोट्या सुविधा उदा.रिक्षा स्टॅण्ड, बसस्टॉप, यासाठी

पुन्हा पुन्हा सभागृहात चर्चा करुन मंजूरी घ्यावी लागते. हे योग्य नाही. या बाबत सर्वसाधारण सभेने एकदा निर्णय घेतलेला आहे. स्वेच्छा निधीतून पत्र दिल्यावर कामे व्हावयास पाहिजे.

**मुख्यलेखाधिकारी :** सिडको हडको हस्तांतरणाच्या संदर्भात मुंबई येथे उच्चस्तरीय बैठक झ ाली त्यात असे ठरले की, सिडको प्रशासनाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रभागात पाणी पुरवठ्याची सुविधा वगळता इतर नागरी सुविधा हया सिडको प्रशासनाने करुन द्याव्या. सोसायटीसह सेल्फ डेव्हलपमेंटची कामे करण्याबाबत करार झालेला आहे. म्हणून अंतर्गत विकास सोसायटीने करावा. शासन सिडको अंतर्गत विकास करण्यांकरिता मनपाला पैसा देणार नाही. अशी कामे महानगरपालिका तर्फे होऊ नये असे सुचविलेले आहे. जलवाहिनी बाबतची जी कामे आहे ती करण्यांत यावी असे या बैठकीत निर्णय झालेला आहे अशा प्रकारची कामे महानगरपालिकेने करावयाची किंवा काय याबाबत पुन्हा आचारसंहिता संपल्यावर बैठक होणार आहे.

**श्री.रविंद्र इंगळे, सौ.मुंडलिक विमलाबाई :** अत्यावश्यक विकास कामे विशेष बाब म्हणून सिडको भागातील करण्यांत यावी तशी सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे.

**मुख्यलेखाधिकारी :** मुंबई येथील उच्च स्तरीय बैठकीत झालेल्या निर्णयाबाबतचे इतिवृत्त मिळालेले असून त्यांची अंमलबजावणी करणे भाग आहे. त्यामुळे पाणी पुरवठा या व्यतिरिक्त कोणतीही विकास कामे सिडको हडको भागात करता येणार नाही.

**सौ.विमलबाई मुंडलिक :** एन-११ के व एफ सेक्टर मधील नागरिकांना सन १९८५ ते ९० या वर्षात महानगरपालिका तर्फे पाणी पुरवठा करण्यांत आलेला नाही. या काळात तेथील नागरिकांना पाणी न मिळता महानगरपालिकेतर्फे त्यांना पाणीपट्टी आकारण्यांत आली आहे. जर पाणी पुरवठा झालेला नाही तर बिल आकारणे सर्वस्वी चुकीचे आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना योग्य न्याय मिळेल. त्या दृष्टीकोनातून सन १९८५ ते १९९० पर्यंत त्यांना आकारण्यांत आलेले पाणी पट्टी पुर्णतः माफ करण्यांत यावे. व सन १९९१ पासून बिल देण्यांत यावे.

**कार्यकारी अभियंता :** येत्या सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवण्यांत येणार आहे.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** शहागंज येथील मुत्री तोडून सुशिक्षीत बेरोजगारांना नियमाप्रमाणे जागा देण्याबाबत दि.०५.१२.९८ च्या स्थायी समितीमध्ये निर्णय झालेला होता.

**मा.सभापती :** मागील बैठकीत सुशिक्षीत बेरोजगार यांना शहागंज येथील मुत्री तोडून संबंधित व्यक्ती स्वतः खर्चाने दुकान बांधून घेऊन नियमाने महानगरपालिकेला भाडे देणार होते. त्यानुसार तसा प्रस्ताव नावासहीत आलेला होता त्याची प्रत उपआयुक्त (म.) यांना देण्यांत येईल. त्यानुसार त्यांनी कार्यवाही करावी.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** शहरातील ओपन स्पेस (खुल्या जागा) किती आहे. याबाबतची माहिती ७ ते ८ महिण्यापुर्वी विचारलेली होती. अद्याप उत्तर मिळाले नाही. त्यातील क्षेत्रफळ किती, ओपन स्पेस किती, संरक्षित भिंत घातलेली आहे. काय यासारखे प्रश्न स.सदस्यांनी विचारल्या नंतर प्रतिनिधी या नात्याने तरी त्याचे उत्तर मिळावयास पाहिजे. त्यास अधिकारी यांनीही सहकार्य केले

पाहिजे. शहरातील नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने प्रतिनिधी म्हणून आम्हाला प्रश्न उपस्थित करणे भाग आहे. नमुना नंबर १३ प्रमाणे काही बदल झालेला आहे काय.

**मा.सभापती :** शहरातील नवीन, जुने ओपन स्पेस किती आहेत. याची अधिकारी यांनी स.सदस्यांना माहिती द्यावयास पाहिजे.

**उपसंचालक, नगररचना :** महानगरपालिकेच्या झोन १ ते ६ ची माहिती काढलेली आहे. ले-आऊट किती आहे याची यादी देण्यांत येईल. परंतू माहिती अद्यावत केलेली नाही.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** अधिकारी यांनी सभागृहात स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यास ताबडतोब माहिती असावयास पाहिजे. शहरात बऱ्याच महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले असून याकडे अधिकारी यांचे लक्ष नसते. त्याबाबतची माहिती जनतेसमोर अधिकारी यांना ठेवता येत नाही. तर सभागृहात तरी ठेवावी, येत्या बैठकीपर्यंत संपूर्ण माहिती द्यावी. सहाय्यक संचालक, नगररचना चे उपसंचालक, नगररचना झाले. दोन्ही पदातील वेतनात बदल झाला. मागच्या बैठकीत विषयपत्रिका फाडून टाकली निघून गेलो. त्याची नोंद व्हावयास पाहिजे होती.

**मा.सभापती :** ओपन स्पेस (खुली जागा) संदर्भात पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी माहिती द्यावी.

**सौ.लता दलाल :** ओपन स्पेस मध्ये जागा सोडतांना १५% ऐवजी १०% करण्यांत आली. कोणत्या नियमाने केली. बांधकाम करतांना काही लोकांनी ५% ओपनस्पेस सोडलेले आढळून येईल. अशा किती लोकांनी ५% (टक्केच) ओपनस्पेस सोडलेले आहेत. याची संपूर्णतः लेखी स्वरुपात स.सदस्यांना माहिती द्यावी.

**मा.सभापती :** नियमाने ओपनस्पेसची जागा सोडलेली आहेत काय? याबाबत स.सदस्यांना पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी लेखी उत्तरासह माहिती द्यावी.

**विषय क्र.२४०/१ :**

दिनांक १५ सप्टेंबर, १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**मा.सभापती :** दिनांक १५.०९.९९ च्या इतिवृत्तातील विषय क्र.२३३/१२ ते २३९/१८ संदर्भात मागच्या बैठकीत सदर प्रस्तावानुसार सॅम्पल (नमुने) मागविण्यांस सांगितले होते. तशी कार्यवाही झालेली आहे. त्यामुळे या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

१) ठराव क्र.२३३/१२ च्या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

खिंवसरा पार्क ते सुत गिरणी (गारखेडा रोड) या रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०६% कमी दराची मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) ठराव क्र.२३४/१३ च्या संदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

देवानगरी ते प्रतापनगर रोडवर विद्युतीकरण (पथदिवे) करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.०२% कमी दराची मे.गजानन इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

३) ठराव क्र.२३५/१४ च्या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

अहिंसानगर ते स्मशानभूमी (कैलासनगर) रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०२% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

४) ठराव क्र.२३६/१५ च्या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

संत एकनाथ रंग मंदिर ते गुरु तेग बहादूर हायस्कुल या रस्त्यावर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.०२% कमी दराची मे.गजानन इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

५) ठराव क्र.२३७/१६ च्या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

देवानगरी ते बीड बायपास रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०४% कमी दराची मे.गजानन इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

६) ठराव क्र.२३८/१७ च्या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

महानुभाव आश्रम (श्रीकृष्ण मंदिर) ते बीड बायपास रोडवर पथदिव्यांकरित विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.०२% कमी दराची मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

७) ठराव क्र.२३९/१८ च्या संदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत येतो.

तोतला हॉस्पीटल ते व्यंकटेशनगर या रोडवर पथदिव्यांकरिता विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.६६% कमी दराची मे.बिटा इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या व इतर दुरुस्त्यांसह दिनांक १५.०९.९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४१/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको येथील म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी दि.२०.०५.९९ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१०/८ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.१६,४३,८००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१६/९९, दि.०३.०६.९९ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस

एकूण १४ (चौदा) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.ए.सी.कोठारी | - | ०.१% कमी |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ०३% जास्त |
| ३. | श्री.एस.ए.पालेजा | - | ०४% जास्त |
| ४. | श्री.डी.अजितसिंग | - | ०५% जास्त |
| ५. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ०७% जास्त |
| ६. | श्री.एम.ए.सिद्दीकी | - | ०७% जास्त |
| ७. | श्री.चांदराम आशन्ना | - | ०८% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको येथील म्हाडा कॉलनी मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मुजीब कॉलनी, रोशनगेट ते कटकट गेट रस्ता डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.२७.०५.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.६२/२ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.६,४४,४००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१६/९९, दि.०३.०६.९९ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण १४ (चौदा) निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेस नियोजित तारखेस एकूण ६ (सहा) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ०३% जास्त |
| ३. | श्री.डी.अजितसिंग | - | ०५% जास्त |
| ४. | श्री.एच.अे.पालेजा | - | ०६% जास्त |
| ५. | श्री.एम.ए.सिद्दीकी | - | ०७% जास्त |
| ६. | श्री.ए.सी.कोठारी | - | दर निरंक |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुजीब कॉलनी रोशनगेट ते कटकट गेट रस्ता डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिटी चौक ते किलेअर्क रोडवर खांबासह सोडीयम दिवे बसविणे करिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,१९,५००/- सदर कामाकरिता जा.क्र./लेखा/नि/०८/९९, दि.०४.०५.९९ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता दि.२६.०५.९९ रोजी प्राप्त दहा एजन्सीजच्या निविदा मा.मुख्यलेखाधिकारी यांचे दालनात उघडण्यांत आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.आदित्य इलेक्ट्रीकल | - | २७% कमी |
| २. | मे.प्रगत इलेक्ट्रीकल | - | ११.११% कमी |
| ३. | मे.पावरलाईन इंजि.कॉर्पो | - | २१.२१% कमी |
| ४. | मे.निखील इलेक्ट्रीकल | - | १५.५०% कमी |
| ५. | मे.के.आर. इलेक्ट्रीकल | - | २३% कमी |
| ६. | मे.गुरुदत्त इले.इंजि.वर्क्स | - | १९.२% कमी |
| ७. | मे.ओमशांती इलेक्ट्रीकल | - | १४.८% कमी |
| ८. | मे.सत्यम वायर्स | - | १८.९९% कमी |
| ९. | मे.गजानन इलेक्ट्रीकल | - | २८.२०% कमी |
| १०. | मे.लुना इलेक्ट्रीकल | - | १७.२% कमी |

प्राप्त एजन्सीच्या निविदापैकी मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांचे निविदा दर सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.२०% कमी दर्शविलेले आहे. तरी मे.गजानन इलेक्ट्रीकल यांची सर्वात कमी दराची निविदा मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिटीचौक ते किलेअर्क रोडवर खांबासह सोडीयम दिवे बसविणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.२०% कमी दराची मे.गजानन इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहर स्वच्छतेच्या कामासाठी २ नग टाटा टिप्पर्स खरेदी करणे जरुरीचे आहे. टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटार्स प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडून गव्हर्नमेंट प्राईज लिस्टप्रमाणे दरपत्रक दि.०१.७.९९ चे आले असून टाटा-१६१३ मॉडेलचे व ६ क्युबिक मिटर कॅपॅसिटीची बॉडी असलेले टिप्पर्स एस.क्र.१६१३/३६ बॉक्स टाईप सिंगल जॅकसह ची किंमत रुपये ७,४४,००३.०० आहे. २ नग टिप्पर्स खरेदी करण्यासाठी रुपये १४,८८,००६.०० खर्च येणार आहे. सदरील दर जकात कर सोडून आहेत. व जकात अधिक्षक त्यांना जकात करातून सुट देण्यांबाबत पत्र द्यावे लागेल. कंपनीच्या दरामध्ये कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे डिलीव्हरी घेतांना दर द्यावे लागतील. पूर्ण रकमेची अदाई केल्यानंतरच ऑर्डर बुक होईल अशी कंपनीची अट आहे.

तरी २ टिप्पर्स खरेदी बाबत स्थायी समितीच्या निर्णयास्तव व मंजूरीस्तव सादर. सदरील खर्च वाहन खरेदीसाठी ठेवण्यांत आलेल्या रक्कम रुपये १५ लाखाच्या तरतूदीतून करण्यांत येईल.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.विकास जैन :** दोन टिप्पर्स जुने की नवीन दराने खरेदी करणार याबाबत माहिती द्यावी. शासनाचे दर आता वाढलेले आहेत.

**उपअभियंता (यां.) :** प्रस्तावातील दर हे सातव्या महिन्यांचे आहेत. कंपनीचे दर आहेत.

**मा.सभापती :** गव्हर्नमेंट रेट प्रमाणे खरेदीची कार्यवाही करावी. प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर स्वच्छतेच्या कामासाठी टाटा कंपनीचे २ नग टाटा टिप्पस खरेदी करण्याकरिता कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सतीश मोटार्स प्रा.लि., औरंगाबाद यांनी दिलेल्या प्रति नग रु.७,४४,००३/- या दरास व या कामाकरिता येणाऱ्या एकूण खर्च रक्कम रु.१४,८८,००६/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४५/६ :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सिध्दार्थ उद्यान येथे ग्रीन हाऊस (हरीतगृह) तयार करणेच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र./मनपा/लेखा/नि/८/९९, दि.०४.०५.९९ ला वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यांत आल्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ९ (नऊ) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या तारखेपर्यंत एकूण २ (दोन) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.२८.०५.९९ ला ठेकेदारासमक्ष उघडण्यांत आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बी.आर.आनंद | - | ९.५०% जास्त दराने |
| २. | श्री.आर.व्ही.वैद्य | - | १०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५०% जास्त दराची श्री.बी.आर.आनंद यांची निविदा आहे. ठेकेदारांने निविदेत दर जास्त दिल्याने मा.आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता संबंधित ठेकेदारांने त्या निविदेत दिलेल्या ९.५०% जास्त दर ऐवजी वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांस लेखी संम्मती दिली आहे.

करिता अंदाजपत्रकीय दराने श्री.बी.आर.आनंद यांच्याकडून काम करुन घेण्याबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** प्रस्तावात किंमत दर्शविलेली नाही. यापुढे दक्षता घेण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** ग्रीन हाऊस म्हणजे काय? खुलासा करावा.

**उद्यान अधिक्षक :** आपण नर्सरी करतो. रोपट्यांचे संरक्षणासाठी ३४'X३२' आकाराचे जी.आय.पाईपमध्ये शेड तयार करतो हे फक्त संरक्षणासाठीच करतो. रु.४,४०,०००/- चे अंदाजपत्रक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे ग्रीन हाऊस (हरीतगृह) तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराच्या निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीत ठरल्यानुसार सदरील काम श्री.बी.आर.आनंद यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४६/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे गारखेडा औरंगाबाद मनपा क्षेत्रातील सि.स.नं.१५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणे बाबतच्या अंदाजपत्रकास विषय क्र.३९/२९, दि.१२.०५.९९ चे स्थायी समितीचे मान्यतेअन्वये कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र./मनपा/लेखा/नि/१६/९९, दि.०३.०६.९९ अन्वये प्रसिध्द करून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्री दि.११.०६.९९ पर्यंत २१ निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीची अंतिम दि.१९.०६.९९ पर्यंत ७ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि.२१.०६.९९ रोजी मुख्य लेखाधिकारी यांचे कार्यालयात उघडण्यांत आल्या. निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मोहंमद इस्माईल | - | १९.२५% कमी |
| २. | श्री.एजाज अहमद | - | १८.१०% कमी |
| ३. | श्री.मन्नान खॉन | - | १६.१७% कमी |
| ४. | श्री.एस.एस.सज्जाद | - | १६.३% कमी |
| ५. | श्री.सुरेश बी. साधवानी | - | १५.६२% कमी |
| ६. | श्री.आर.बी.साळवे | - | १२% कमी |
| ७. | श्री.नंदकुमार घोडेले | - | ११.५% कमी |

प्राप्त दरात तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे श्री.मोहमंद इस्माईल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२५% कमी दराची निविदा आहे. तरी सदर निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा औरंगाबाद मनपा क्षेत्रातील सि.स.नं.१५३१० मध्ये व्यायाम शाळा बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.२५% कमी दराची श्री.मोहमंद इस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४७/८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.किराडपुरा येथील श्री.हाजी लाल खाँ यांच्या घरामागे जुनी १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या रक्कम रु.१,८६,०२१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.१२.०५.९९ विषय क्र.२८/१८ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सदरील कामाची निविदा जा.क्र./मनपा/लेखा/नि.१६/९९, दि.०३.०६.९९ अन्वये मागविल्या असता एकूण २४ (चोवीस) निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ८ (आठ) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.अब्दुल सईद | - | ३४.१०% कमी |
| २. | श्री.पुनमचंद सलामपुरे | - | ३१.९०% कमी |
| ३. | श्री.सुदाम राठोड | - | ३१.५०% कमी |
| ४. | मे.फाईवस्टार कंन्स्ट्रक्शन | - | ३०.०१% कमी |
| ५. | श्री.स.रफिकोद्दीन | - | २८% कमी |
| ६. | मे.सिंधु कंन्स्ट्रक्शन | - | २७% कमी |

७.	श्री.राजु कोलते	-	२३% कमी
८.	श्री.सुदर्शन छापोले	-	१०% कमी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.०१% कमी दराची श्री.अब्दुल सईद यांची निविदा आहे. तरी निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा येथील श्री.हाजी लाल खाँ यांच्या घरामागे जुनी १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आरा.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.१०% कमी दराची श्री.अब्दुल सईद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४८/९ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.संजयनगर बायजीपुरा स्लम वार्ड क्र.३१ मधील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,२५,६०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "पुर्नडांबरीकरण" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि.२७.०५.९९ रोजी मंजूरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

१.	ए.सी.कोठारी	-	५% जास्त
२.	एम.ए.सिद्दीकी	-	९% जास्त
३.	मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन	-	१२% जास्त
४.	ए.एस.कंन्स्ट्रक्शन	-	१५% जास्त

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा श्री.ए.सी.कोठारी यांचे निविदेस मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दराने करण्यांस मंजूरी दिली व ठेकेदारानेही सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास लेखी संमती दिली आहे. करिता अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री.ए.सी.कोठारी यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर बायजीपुरा (स्लम) वार्ड क्र.३१ मधील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराच्या निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री.ए.सी.कोठारी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४९/१० :**

प्र.कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.घाटी जयभिमनगर स्लम येथे खांडकी पेव्हींगवर कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबतचे कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,६९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत

आले आहे. सदरील काम "खडी रस्ते आणि कलव्हर्ट" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि.०९.०६.९९ ला मंजूरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.राज अली | - | २७.८७% कमी |
| २. | आर.बी.साळवे | - | २५.०५% कमी |
| ३. | अब्दुल सलाम | - | २३.३३% कमी |
| ४. | फाईव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | - | १६.१०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८७% कमी दराची असलेली श्री.मेराज अली यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.घाटी जयभीमनगर स्लम येथे खांडकी पेव्हींगवर कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८७% कमी दराची श्री.मेराज अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.२५०/११ :**

उपसंचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.१०६०९ काचीवाडा ही मिळकत ४० फुट रुंद रस्ता चेलीपुरा ते काचीवाडा या विकास योजना रस्त्याचे बाधित आहे. अतिरिक्त शहर अभियंता यांचे मार्फत सदर जागेतून ८ ते १० वर्षापुर्वी रस्ता तयार केलेला असून सध्या सदर रस्त्याचे डांबरीकरणही करण्यांत आले आहे. त्यामुळे संबंधित मिळकतधारक श्री.राधाकिसन चिरंजीवीलाल वर्मा यांनी रस्त्याने बाधित जागेचा मोबदला मागितलेला आहे. सदर मिळकतीतून रस्त्यासाठी एकूण ४७५.०० चौ.मी. क्षेत्र वापरलेले आहे. त्याचा खाजगी वाटाघाटीत एकूण मोबदला रक्कम रु.५,६४,३००/- (पाच लाख चौसष्ट हजार तीनशे) एवढा निश्चित केला आहे. यावर खरेदी खतासाठी सुमारे ५१,०००/- रुपये एवढा खर्च लागणार आहे. सदर खर्च मिळकतधारक व महानगरपालिका निम्मा निम्मा करणार आहे. करिता खर्चाची निम्मी रक्कम रु.२५,५००/- ही मोबदला रक्कमेतून वळती करुन घेण्यांस मिळकत धारकांने संमती दिली आहे. त्यानुसार खर्चाची निम्मी रक्कम वळती करुन घेतल्यास उर्वरित मोबदला रक्कम रु.५,३८,८००/- मिळकत धारकास देय आहे. सदर रक्कम मिळकत धारकास अदा करण्यांस आणि नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्यांसाठी अग्रीम म्हणून रक्कम रु.५१,०००/- श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना देण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिका ज्यावेळी जागा घेतात त्याबद्दल संबंधितांना मोबदला देण्यांत येतो. जागेबद्दल किंमत (मोबदला) दिल्यावरही एफ.एस.आय.वाढवून देण्यांत येतो. असे असेल तर मनपाचे यात नुकसान आहे. असे प्रकरण आहे का?

**उपसंचालक, नगररचना :** एफ.एस.आय.देतो तेव्हा जागा फुकट घेण्यांत येते. दोन्ही देण्यांत येत नाही. बांधकामाच्या वेळी जागा ताब्यात घेण्यांत येते व वाढीव चटईक्षेत्र निर्देशांत (एफ.एस.आय.) देण्यांत येतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** बांधकाम वेळी जागा ताब्यात घेतली असली तरी काही दिवसानंतर संबंधितांची मोबदल्याची मागणी होते. ज्यावेळी इमारत बांधकामास परवानगी देता त्यावेळी अंडरग्राऊंड हे पार्कींगसाठी सोडलेले असते. अशी नोंद असतांना कित्येक बिल्डरने अंडरग्राऊंड मजले विकलेले आहे. अशी नोंद संबंधित अधिकाऱ्यांकडे झालेली आहे काय? पार्कींगची व्यवस्था राहात नाही. बिल्डरांना किंवा सोसायटी धारकांना रेखांकनास मंजूरी देतांना त्यांच्याकडून रस्ते,पाईप लाईन, ड्रेनेज लाईन, उद्यान इ.विकसीत करण्यासाठी तशी जागा सोडावी असे स्टॅम्प पेपर लिहून घेण्यांत येते. परंतू प्रत्यक्षात तशी कार्यवाही होत नाही. भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते. सोसायटी धारकांना एफ.एस.आय.फुकट वापरास मिळतो. किती इमारतीमध्ये पार्कींगच्या जागेवर दुकाने, फ्लॅट झालेली आहेत. याकडे अधिकारी यांनी लक्ष देऊन कार्यवाही केली पाहिजे. यात मनपाचे नुकसान होत आहे. शहरात असे किती ठिकाणी प्रकार झालेले आहे. याबाबतची संपूर्ण माहिती पुढच्या बैठकीत देण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** सि.स.नं.२०५९२ प्लॉट नं.४० ते ४६ मध्ये बांधकाम परवानगी दिलेली असून नाल्याची जागा एफ.एस.आय.वापरले. नाल्याची जागा कोणत्या नियमाच्या आधारे देण्यांत आली, माहिती द्यावी. सदरील जागेचा संबंधितांना मोबदला दिलेला असून त्यांनी त्या ठिकाणी पुलाचे बांधकाम केलेले आहे. मोबदला दिला व एफ.एस.आय.दिले. पार्कींगची व्यवस्था नाही. भोगवटा प्रमाणपत्र देवू नये.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार शहरातील ज्या भागात सेल्फ डेव्हलपमेंट पध्दतीने परवानगी दिल्या आहेत. काम योग्य पध्दतीने व्हावयास पाहिजे. त्या लेकांनी नॉर्मस् न पाळता विकले. ज्या ठिकाणी विकास खर्च घेत नाही. त्यांना स्वत:विकास कामे करण्याची परवानगी देण्यांत येते. त्यांनी व्यवस्थीत काम केले किंवा नाही, हे बघण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. प्रशासनाची आहे. ज्या ठिकाणी पार्कींग दाखविली आहे. नंतर वापर बंद करुन विकण्यांत येते. अशा सर्व इमारतीची चौकशी झाली पाहिजे. नगररचना विभागाने अशा प्रकरणांची चौकशी करुन अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** संबंधित विभागाने अशा प्रकारच्या किती लोकांना परवानगी दिली आहे. भागशः भोगवटा प्रमाणपत्रही एक पळवाट आहे. किती लोकांना देण्यांत आले, की जे बिल्डर ठरल्याप्रमाणे लोकांना नागरी सुविधा देऊ शकले नाही. ज्यांनी सुविधा उपलब्ध करुन दिल्या नाही. अशा बिल्डरवर नगररचना विभागाकडून आतापर्यंत किती लोकांवर कार्यवाही केली याची माहिती पुढच्या बैठकीत देण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** इमारतीमध्ये खाली पार्कींग, गोडावून साठी कम्पेशन दिल्या जाते. याबाबत चौकशी केली असता याबाबतची कार्यवाही प्रशासकीय विभाग करेल असे सांगितले जाते. याबाबतची कार्यवाही कोणत्या विभागाने करावी खुलासा करावा.

**मा.सभापती :** गंभीर बाब आहे. सभागृहात उपस्थित केलेल्या स.सदस्यांचे प्रश्नाबाबतची संपूर्ण योग्य ती माहिती नगर रचना विभागाने द्यावी. शहरात सेल्फ डेव्हलपमेंटसाठी किती लोकांना परवानगी दिली आहे व त्यांनी किती सुविधा पुरविल्या याबाबतची सर्व्हे नंबर सहीत माहिती द्यावी. तसेच त्याची एक प्रत स.सदस्यांना देण्यांत यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर भूमापन क्रमांक १०६०९ मोहल्ला काचीवाडा ते चेलीपुरा ते काचीवाडा या विकास योजना रस्त्यात बाधित जमीनीचे मिळकतधारक श्री.राधाकिसन चिरंजीवीलाल वर्मा यांनी रस्त्यासाठी बाधीत जमीन क्षेत्र ४७५.०० चौ.मी.क्षेत्राकरिता खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार निश्चित करण्यांत आलेला मोबदला रक्कम रु.५,६४,३००/- (पाच लाख चौसष्ट हजार तीनशे) या मोबदला रकमेतून खरेदी खताकरिता लागणारा एकूण खर्च रक्कम रु.५१,०००/- च्या निम्मी रक्कम रु.२५,५००/- वळती करुन उर्वरित रक्कम रु.५,३८,८००/- संबंधितास अदा करण्यांस तसेच नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्याकरिता रक्कम रु.५१,०००/- अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५१/१२ :**

उपसंचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.१९०८० ही मिळकत औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ३० मी. रुंद रस्ता रेल्वेस्टेशन या रस्त्याने भागशः बाधित आहे. सदर मिळकती रस्त्याने बाधित भाग महानगरपालिकेने ताब्यात घेऊन रस्ता विकसीत केला आहे. सदर मिळकतीतून रस्त्यासाठी २३९.७० चौ.मी.जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली आहे. सदर जागेचा मोबदला सेक्रेटरी, मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांनी मागितलेला आहे. खाजगी वाटाघाटीत सदर जागेचा मोबदला रक्कम रु.३,४५,१६८.०० (तीन लाख पंचेचाळीस हजार एकशे अडुसष्ट रुपये फक्त) निश्चित केला आहे.

सदर बाधित जागेचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घ्यावे लागेल. त्यासाठी सुमारे ३१,१५०/- एवढा खर्च लागेल. सदर खर्च मनपा व मिळकतधारक निम्मा निम्मा करणार आहेत. करिता निम्मा खर्च रु.१५,५७५/- हा मोबदला रकमेतून वळती करुन घेण्यांस संबंधितांने मान्यता दिली आहे.

करिता उर्वरित मोबदला रक्कम रु.३,२९,५९३.०० (तीन लाख एकोणतीस हजार पाचशे त्र्याण्णव) मिळकत धारकास अदा करणेस आणि नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्यासाठी अग्रीम म्हणून रक्कम रु.३१,१५०/- श्री.डी.डी.कालेले, शा.अ.यांना देणेसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार ३० मीटर रुंद रस्ता रेल्वेस्टेशन या रस्त्याने बाधित मिळकत नगरभूमापन क्रमांक १९०८० चे बाधित क्षेत्र २३९.७० चौ.मी.जागेचा खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार मोबदला रक्कम रु.३,४५,१६८.०० (तीन लाख पंचेचाळीस हजार एकशे अडुसष्ट रु.फक्त) मधून खरेदी खताकरिता लागणाऱ्या एकूण रक्कम रु.३१,१५०/- च्या निम्मी रक्कम रु.१५,५७५/- वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रुपये ३,२९,५९३/- (तीन लाख एकोणतीस हजार पाचशे त्र्याण्णव) मिळकतधारक सेक्रेटरी, मराठवाडा वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना अदा करण्यांस तसेच नोंदणीकृत खरेदी

खत करुन घेण्याकरिता अग्रीम म्हणून रक्कम रु.३१,१५०/- श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५२/१३ :**

उपसंचालक, नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.नेहरुनगर, कटकट गेट, किराडपुरा भागासाठी मनपाची स्वतःचे जागेवर शाळा नाही. शरीफ कॉलनी, कटकट गेट येथील शाळा मनपा भाड्याने जागा घेऊन चालविते करिता संबंधित विभागाचे स.नगरसेविका श्रीमती आबेदा बेगम यांनी या भागात एक जागा सुचविलेली आहे. सदर जागा नेहरुनगरकडे जातांना कटकट गेटच्या उजव्या बाजूस आहे. खाजगी जमीन मालक त्यांच्या जागेच्या बदल्यात मनपाची जागा घेण्यांस तयार आहे. श्री.महेमूद पिता महेबुब बेग हे नगर भूमापन क्र.११६०३//१ या जागेतून मनपास ७९६.७४ चौ.मी.क्षेत्र देण्यांस तयार आहे. त्यांना या बदल्यात मनपाच्या मालकीची जागा न.भु.क्र.११६०२/२/२२ क्षेत्र ४३४.५० चौ.मी. देणे आहे. सदर जागा मनपाने आ.क्र.२०८ दुकान केंद्रासाठी संपादन केलेली आहे. परंतू सदर जागेभोवती अनाधिकृत वस्ती असल्याने अतिक्रमणे होण्याची शक्यता आहे. वरीलप्रमाणे जागा अदलाबदल मिळकतधारकाने मान्यता दिलेली आहे. तरी जागा अदला बदलाचे नोंदणीकृत हक्क सोड आधारे हस्तांतरण करुन घेण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर कटकट गेट/शरीफ कॉलनी, कटकट गेट येथे मनपाच्या मालकीच्या जागेवर शाळा नसल्यामुळे स्वतःच्या मालकीच्या जागेत शाळा व्हावी. याकरिता श्री.महेमूद पिता महेबूब बेग यांचे मालकीची न.भु.क्र.११६०३/१ या जागेतून मनपास ७९६.७४ चौ.मी. क्षेत्र एवढी जागा घेऊन त्या बदल्यात मनपाचे मालकीची जागा न.भु.क्र.११६०२/२/२२ मधील ४३४.५० चौ.मी.क्षेत्राची जागा संबंधितास देऊन अदला बदलाचे नोंदणीकृत हक्क सोड आधारे हस्तांतरण करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५३/१४ :**

पशुधन विकास अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबादयांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयात सन १९९९-२००० सा एका वित्तीय वर्षा करिता पशुपक्षी खाद्य आणि किराणा पदार्थ यांच्या निविदा मागविण्यांत आल्या. प्राप्त झालेल्या निविदाधारकांचे नांव व त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

अ) <u>किराणा पदार्थ :</u> या करिता स्थायी समिती ठराव क्र.६८/८ दिनांक २७.०५.९९ अन्वये किराणा पदार्थाचे दर मंजूर करण्यांत आले होते. परंतू संबंधितांने पुरवठा करणेस नकार दिल्याने फेर निविदा मागविण्यांत आल्या. असता दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदार्थाचे नांव | आदर्श महिला औद्योगिक संस्था, औरंगाबाद प्रति किलो | बालाजी ट्रेडींग कं.औरंगाबाद प्रति किलो |
|---|---|---|---|
| | | रु.पै. | रु.पै. |
| १. | हरभरे | १६.९० | १६.०० |
| २. | गहू | ९.५० | ९.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | तांदुळ | १२.५० | १२.०० |
| ४. | शेंगदाणे | २७.०० | २६.०० |
| ५. | गुळ | १६.५० | १६.०० |

तुलनात्मकदृष्टीने बालाजी ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असल्याने प्रस्ताव मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

ब) पशुपक्षी खाद्य : या करिता यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र.६८/८ दि.२७.०५.९९ अन्वये रु.९००/- प्रति टन अमृत पशुखाद्य चे दर मान्य झाले होते. परंतू त्यांनी पुरवठा न केल्यामुळे फेरनिविदा मागविण्यांत आल्या असता दोन कोऱ्या निविदांची व्रिकी झाली असून दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | मालाचे नांव | अरिहंत ट्रेडींग कं. प्रति क्विंटल | शांती एजन्सी, मिलकॉर्नर प्रति क्विंटल |
|---|---|---|---|
| १. | पशुखाद्य (गोदरेज) | १०९५.०० | १२३०.०० |
| २. | पक्षीखाद्य (गोदरेज) | १४५५.०० | १५००.०० |

तुलनात्मकदृष्टीने अहिरंत ट्रेडींग कंपनी औरंगाबाद यांचे दर कमी आहेत. तथापि मा.आयुक्त यांनी अरिहंत ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांना चर्चेस बोलावून खालीलप्रमाणे दर निश्चित केले.

| | | |
|---|---|---|
| १. | पशुखाद्य | रु.१०२५/- प्रति क्विंटल |
| २. | पक्षीखाद्य | रु.१४५५/- प्रति क्विंटल |

वरीलप्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्रहालयात सन १९९९-२००० या वित्तीय वर्षाकरिता पशुपक्षी खाद्य आणि किराणा पदार्थ यांच्यासाठी मागविण्यांत आलेल्या निविदापैकी किराणा मालासाठी कमी दराची असलेली खालील दर्शविलेल्या दराची मे.बालाजी ट्रेडींग कं.औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १. | हरभरे | रु.१६.०० प्रति किलो |
| २. | गहु | रु.९.०० प्रति किलो |
| ३. | तांदुळ | रु.१२.०० प्रति किलो |
| ४. | शेंगदाणे | रु.२६.०० प्रति किलो |
| ५. | गुळ | रु.१६.०० प्रति किलो |

त्याचप्रमाणे पशुपक्षी खाद्याकरिता कमी दराचे निविदाधारक मे.अरिहंत ट्रेडींग कंपनी यांचेशी झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार खालील दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १. | पशुखाद्य | रु.१०२५/- प्रति क्विंटल |
| २. | पक्षीखाद्य | रु.१४५५/- प्रति क्विंटल |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५४/१५ :**

अग्निशमन विभागासाठी नियम तयार करणे, आकृतीबंध तयार करणे, मनपाचे उत्पन्नाचे साधन सुचविणे इत्यादीसाठी श्री.डी.जे.कुलकर्णी, सेवानिवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई यांना औरंगाबाद मनपा अग्निशमन दलाचे सल्लागार म्हणून सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यांत आलेली होती. ही ६ महिन्यांची मुदत संपली असून मा.आयुक्त यांच्या दि.१६.०८.९९ च्या मंजूरीनुसार दि.०२.०८.९९ पासून तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. हा तीन महिन्याचा कालावधी "कंत्राटी कालावधी" म्हणून गणला जाईल व या कालावधीमध्येच त्यांनी दिलेली कामे/कर्तव्ये पूर्ण करावीत. यासाठी त्यांना एकत्रित रक्कम रु.१५,०००/- देय राहील. करिता प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती समोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नवीन नियम तयार करण्यासाठी अग्निशमन अधिकारी हे विभाग प्रमुख असतांना नवीन अधिकाऱ्यांची एकत्रित वेतनावर नेमणूक करणे योग्य नाही.

**मा.सभापती :** नवीन सुधारित नियम करण्याकरिता त्यांची नेमणूक करण्यांत येत आहे. मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागासाठी नियम तयार करणे, आकृतीबंध तयार करणे, मनपाचे उत्पन्नाचे साधन सुचविणे इ.कामाकरिता श्र.डी.जे.कुलकर्णी, सेवानिवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई यांची औरंगाबाद मनपा अग्निशमन दलाचे सल्लागार म्हणून दि.०२.०८.९९ पासून तीन महिन्याच्या कालावधीकरिता एकत्रित वेतन रक्कम रु.१५,०००/- वर मुदतवाढ करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. तसेच तीन महिन्याचा कालावधी हा "कंत्राटी कालावधी" म्हणून समजण्यांत यावा. दिलेली कामे/कर्तव्ये त्यांनी उपरोक्त कालावधीतच पूर्ण करावीत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५५/१६ :**

मा.आयुक्त यांची मान्यता दि.१५.०८.९९ नुसार मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी अग्निशमन विभागासाठी प्रस्ताव सादर केला आहे की, महत्वाच्या व्यक्तींचा दौरा असतांना बंदोबस्त म्हणून अग्शिमन दलाचे फायर टेन्डर पाठवावे लागते. परंतू कन्व्हाय मध्ये अग्निशमन दलाचे फायर टेंन्डर हे हेवी ड्युटीचे असल्यामुळे सर्व कन्व्हाय पुढे निघून जातो व त्यांचा पाठलाग करणे शक्य होत नाही. व बऱ्याच वेळा मोठे अपघात झालेले आहेत. करिता टाटा-२०७ मोबाईल पीकअप व्हॅन खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे खर्च येणार आहे.

१) टाटा-२०७ मोबाईल पीकअप व्हॅन/रिव्हॉल्वींग लाईट चार्जेस/सायरन चार्जेस/इन्शुरन्स/आर.टी.ओ. टॅक्स एकूण खर्च रक्कम रु.४,३०,७३२.०० (अक्षरी रुपये चार लक्ष तीन हजार सातशे बत्तीस फक्त)

करिता टाटा-२०७ मोबाईल पीकअप व्हॅन खरेदीसाठी सन १९९९-२००० ची आर्थिक तरतूद रु.२० लाख मधून रु.४,३०,७३२/- खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

**संवाद :**

**सौ. लता दलाल :** कोणत्या बजेटमधून हे काम करण्यांत येईल. १५ लाखातून घेण्यांत येणार आहे का? खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** यासाठी अग्निशमन दल विभागास स्वतंत्र तरतूद आहे.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन विभागासाठी टाटा-२०७ मोबाईल पीकअप व्हॅन खरेदीसाठी तसेच सदरील कामाकरिता लागणाऱ्या रक्कम रु.४,३०,७३२/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५६/१७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.विभाग) मनपा यांनी जय विश्वभारती कॉलनी व परिसरासाठी सुधारित वितरण व्यवस्था टाकणेच्या कामांतर्गत वितरण व्यवस्था स्वंयपूर्ण व अद्ययावत होणेसाठी अतिरिक्त कामाबाबत प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावाच्या कामाची अंदाजित किंमत रु.६,१०,५४०/- असून काम महत्वाचे व गरजेचे आहे.

उपरोक्त कामाच्या वितरण व्यवस्थेत ३५० मी.मी.डी.आय.पाईप ११८० मीटर, ३०० मी.मी.डी.आय.पाईप २३० मीटर व २०० मी.मी.डी.आय.पाईप २५० मीटर अंतर्भूत होते. पूर्ण पाईप अंथरल्यावर देखील उल्कानगरी समभाव चौक, भरत नगर परिसराच्या जोडणीसाठी पाईप कमी पडले. तांत्रिकदृष्ट्या व्यासाच्या उतरत्या क्रमाने पाईप टाकल्यास परिमाण व दाब नियमित राहतो. त्यामुळे अतिरिक्त बाबींमध्ये २५० मी.मी.व्यासाच्या बिडाच्या पाईपाच्या समावेश केला असून तो योग्य आहे.

अतिरिक्त बाब जरी रु.६,१०,५४०/- ची असली तरी निविदा १५% कमी दराची असल्याने मुळ अंदाजपत्रक मंजूरीच्या वर खर्च होत नाही. तांत्रिकदृष्ट्या आवश्यक व नागरिकांना योग्य दाबाचे पाणी मिळणेसाठी प्रस्ताव मंजूर करावा. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयविश्वभारती कॉलनी व परिसरासाठी सुधारित वितरण व्यवस्था टाकणेच्या कामांतर्गत वितरण व्यवस्था स्वंयपूर्ण व अद्यावत होणेसाठी अतिरिक्त बाबींच्या २५० मी.मी.व्यासाच्या बिडाच्या पाईप करिता येणाऱ्या खर्च रक्कम रु.६,१०,५४०/- च्या खर्चास तसेच तांत्रिकदृष्ट्या आवश्यक व नागरिकांना योग्य दाबाने पाणी मिळावे यांकरिता सदरील कामांतर्गत अतिरिक्त बाबीस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५७/१८ :**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, श्री.नरेश गिते हे महानगरपालिकेत उपआयुक्त या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने दि.१७.०४.९८ रोजी रुजू झालेले होते.

तथापि ते रुजू झाले त्या तारखेस महानगरपलिकेचे वर्ग-१ साठी असलेले निवासस्थान रिक्त नसल्यामुळे त्यांनी खाजगी निवासस्थान भाड्याने घेतलेले होते. ज्याचे मासिक भाडे रु.३०२५/- असून दरमहा दि.०१.०५.९८ पासून त्यांनी ते स्वतः अदा केलेले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, निलंबन व बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ३९ (३) नुसार स्वीयेत्तर सेवेतील अधिकाऱ्यांस विनामूल्य अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांस योग्य वाटते तितक्या योग्य प्रमाणात/मोबदल्यत निवासस्थान उपलब्ध करुन देण्यांची तरतूद आहे.

त्यानुसार उपआयुक्त सध्या रहात असलेल्या इमारतीचे भाडे शहर अभियंता यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यांत आले. ज्यानुसार ते महापालिका टॅक्स वगळून रु.३०२५/- इतके ठरविण्यांत आले आहे.

उपआयुक्त यांना महानगरपालिकेने निवासस्थान उपलब्ध करुन दिले असते तर त्यांना नियमाप्रमाणे मिळणारा घडभाडे भत्ता रु.६००/- व घरभाडे रु.२३०/- असे एकूण ८३०/- देय राहिले नसते. करिता म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा) नियम १९८१ चे नियम ३९ (३) नुसार घरभाडे रु.३०२५/- मधून रु.८३०/- वजा जाता रु.२१९५/- प्रतिमहा प्रमाणे इमारत ताब्यांत घेतल्यापासूनच्या तारखेपासून श्री.नरेश गिते यांना घरभाडे मंजूरी करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.विखारोद्दीन :** नियमाने किती घरभाडे देऊ शकतो. याची माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी :** शासनाकडून प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकाऱ्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध नसेल तर त्या अधिकाऱ्यांना त्यांनी उपलब्ध करुन घेतलेल्या निवासस्थान देय होते. त्यांना मिळणारे घरभाडे भत्ता व इतर अनुज्ञेय कपात करुन घरभाडे देय होते.

**मालमत्ता अधिकारी :** त्यांना १ मे १९९८ ते ३० नोव्हेंबर ९८ पर्यंतच्या कालावधीची फरकाची रक्कम प्रस्तावित केलेली आहे.

**मा.सभापती :** मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेत प्रतिनियुक्ती वर आलेले उपआयुक्त श्री.नरेश गिते हे रुजू झाले त्यावेळी महानगरपालिकेचे वर्ग-१ साठी असलेले निवासस्थान रिक्त नसल्यामुळे त्यांनी खाजगी निवासस्थान प्रतिमहा रु.३०२५/- या भाड्याने घेतल्यामुळे व महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा) नियम १९८१ चे नियम ३९ (३) नुसार घरभाडे रु.३०२५/- मधून अनुज्ञेय घरभाडे भत्ता व घरभाडे असे एकूण रक्कम रु.८३०/- वजा जाता उर्वरित रक्कम रु.२१९५/- प्रतिमहा प्रमाणे इमारत ताब्यात घेतल्यापासून श्री.नरेश गिते, उपआयुक्त (प्रतिनियुक्तीवरील) यांना घरभाडे देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५८/१९ :**

सिडको एन-९ जाधववाडी मार्केटींग कमेटी येथे स.नगरसेवक स्वेच्छा निधीतून १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.१,२८,६२५/- चे महा.जीवन प्राधिकरण यांच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले असून त्यास प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे. सदरील कामावर होणारा खर्च स.नगरसेवक स्वेच्छा निधितून करण्यांत येणार आहे. तरी एन-९ जाधववाडी मार्केटींग कमिटी येथे जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,२८,६२५/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-९ जाधववाडी, मार्केटींग कमिटी येथे नगरसेवक स्वेच्छानिधीतून १०० मी.मी.व्यासाची ओ.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,२८,६२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. सदरील काम पाणी पुरवठ्याचे महत्वाचे व तातडीचे असल्यामुळे या कामाकरिता शॉट टेंडर नोटीस काढण्यांत यावी व काम तातडीने हाती घ्यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचबरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती (स्थायी समिती)
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८.१०.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १८ ऑक्टोंबर, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग मा.आयुक्त यांच्या खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. बचाटे राजकुमार | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. किशोर तुळशीबागवाले | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ४. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ५. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. अजीज खाँ गणी खाँ | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | - | स.सभासद |
| १०. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| ११. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| १२. | स.स.सौ. विमल नंदकुमार मुंडलिक | - | स.सभासद |
| १३. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| १४. | स.स.श्रीमती गंगवाल पुष्पाताई सुरेशचंद | - | स.सभासद |

**<u>संवाद :-</u>**

**सौ.लता दलाल :** सन्यस्त अन्याहत काम करणारे निगर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जेष्ठ वयोवृध्द कार्यकर्ते स्व.प्रल्हादजी अभ्यंकर तसेच शिवसेनेचे पहिले आमदार व प्रथम खासदार म्हणून मान प्राप्त करणारे वयोवृध्द शिवसेना नेते वामनराव महाडीक त्याचप्रमाणे सहकार क्षेत्रातील थोर अग्रगण्य नेता व सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रातील कृतीशील व्यक्तीमत्व पदमश्री शामराव कदम या सर्वांचे दुःखद निधनाबद्दल या सभागृहात त्यांना ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी. तसा लेखी प्रस्तावही देण्यांत आलेला आहे.

**श्री.राजकुमार बचाटे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठिक आहे. स.सदस्यांनी सुचवल्यानुसार स्व.श्री.प्रल्हादजी अभ्यंकर स्व.शामराव कदम त्याप्रमाणे स्व.वामनराव महाडीक यांना ०२ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत येते.

याचवेळी सन्यस्त अव्याहत काम करणारे निर्गर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ वयोवृध्द कार्यकर्ते स्व.प्रल्हादजी अभ्यंकर तसेच शिवसेनेचे पहिले आमदार व प्रथम खासदार म्हणून मान प्राप्त करणारे वयोवृध्द शिवसेना नेते स्व.वामनराव महाडीक तसेच सहकार क्षेत्रातील थोर अग्रगण्य नेता व पद्मश्री स्व.शामराव कदम या सर्वांना दुःखद निधनाबद्दल सभागृहातर्फे ०२ मिनीटे सर्वजण स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**विषय क्र.२५९ :**

नवनिर्वाचित विधानसभा, लोकसभा सदस्य, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, भारताचे पंतप्रधान यांचे अभिनंदन करणे संबंधी.

**सुचक :** तुळशीबागवाले किशोर,
**अनुमोदक :** सौ.लता दलाल, श्री.काशिनाथ कोकाटे

<u>**संवाद :-**</u>

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** मराठवाड्याचे सुपूत्र मा.श्री.विलासरावजी देशमुख यांची महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पदासाठी नियुक्ती झाल्याबद्दल सभागृहातर्फे त्यांना अभिनंदन करण्यांत यावे त्याबाबतचा ठराव संम्मत करण्यांत यावा.

**सौ.लता दलाल :** स.सभासद श्री.तुळशीबागवाले यांच्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** स.स.श्री.तुळशीबागवाले यांनी विद्यमान मुख्यमंत्री म्हणून मा.श्री.विलासराव देशमुख यांची नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडला त्यास अनुमोदन ही मिळाले त्याच बरोबर भारताचे पंतप्रधान पदी आपल्या सर्वांचे मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी, या जिल्ह्याचे खासदार पदी मा.श्री.चंद्रकांतजी खैरे तसेच या शहराचे आमदार पदी मा.श्री.राजेंद्र दर्डा यांची जनतेने नियुक्ती केली त्याबद्दल या सर्वांचा अभिनंदनाचा ठराव या ठिकाणी सर्वानुमते पारीत करण्यांत यावा.

**सौ.लता दलाल :** स.सदस्य श्री.कोकाटे यांनी अभिनंदनाच्या ठराव बद्दल मांडलेल्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** ठिक आहे. स.सदस्यांनी अभिनंदनाच्या ठरावा बाबत मांडलेली सुचनेनुसार भारताचे पंतप्रधान मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी, महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री, मा.श्री.विलासरावजी देशमुख, या जिल्ह्याचे खासदार मा.श्री.चंद्रकांतजी खैरे व या शहराचे आमदार मा.श्री.राजेंद्र बाबू दर्डा यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे भारताचे पंतप्रधान श्री.मा.ना.अटलबिहारी वाजपेयी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख, जिल्ह्याचे खासदार म्हणून मा.श्री.चंद्रकांतजी भाऊराव खैरे व आमदार म्हणून मा.श्री.राजेंद्र बाबु दर्डा यांची निवड झालेली असल्याने या सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यांत येते. ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

<u>**संवाद :-**</u>

**श्री.कोकाटे काशिनाथ :** औरंगाबाद महानगरपालिका ही मराठवाड्यातील सर्वात मोठी महानगरपालिका असून दैनंदिन कारभार मोठ्या प्रमाणात चालतो या शहराच्या विकास कामावर खूप पैसा खर्च होतो. त्यासाठी शासनाकडून आपण नेहमी अनुदानाची मागणी करतोच याच दृष्टीकोनातून मा.श्री.विलासराव देशमुख यांची मुख्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल या महानगरपालिकेतर्फे त्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करावा. निमित्त सत्कार समारंभाचे होईल, परंतू या शहराचा विकासासाठी शासन

किती अनुदान देतील व तशी मागणी आपणाला या निमित्ताने करता येईल तरी त्यांचा वेळ घेऊन या सत्कार समारंभाचा कार्यक्रम करण्याची मंजूरी देण्यांत यावी व तसे आदेश प्रशासनाला द्यावे.

**मा.सभापती :** विद्यमान मुख्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल श्री.विलासराव देशमुख यांचा या महानगरपालिकेतर्फे सत्कार समारंभ आयोजित करता येईल. परंतू सध्या महानगरपालिकेमध्ये महापौर, उपमहापौर ही पदे न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे रिक्त असल्यामुळे यावर विचार करता येणार नाही. नवीन महापौर व उपमहापौर यांची नियुक्ती झाल्यानंतर निर्णय घेण्यांत येईल.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** मा.मुख्यमंत्री यांचा सत्कार करणे किंवा न करणे बंधनकारक राहणार नाही. परंतू मराठवाड्याचे सुपूत्र म्हणून मुख्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करावा यास सर्वांची मान्यता राहील. ते वेगळ्या पक्षाचे आहे. अशा प्रकारची भावना ठेऊ नये.

**मा.सभापती :** सभागृहात आपण सर्व एकत्र, व एकच आहोत यात वेगळ्या पक्षाचे मुख्यमंत्री आहेत व त्यांचा सत्कार करण्यास नाकारत आहे हा प्रश्न उपस्थित होत नाही. महापौर, उपमहापौर सध्या पदे रिक्त असल्याने निर्णय घेता येणार नाही. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

**श्री.विखारोद्दीन :** क्रांतीचौक रस्ता रुंदीकरण होण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकातील संबंधित विभागाचे काही कर्मचारी अतिक्रमण हटविण्यास गेले होते. परंतू कुणी एका तरी नगरसेविका यांच्या म्हणण्यानुसार संबंधित रोडच्या बाजूचे अतिक्रमण न हटवता कर्मचारी परत आले या बाबत प्रशासनावर दबाव आलेला आहे हे सत्य की असत्य याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

**मा.सभापती :** काही नागरिकांच्या तक्रारी नुसार पालकमंत्री यांनी बैठक घेऊन सदर रस्ता रुंदीकरणाचे काम थांबलेले होते. त्यामुळे तशी कार्यवाही करावी लागली.

**श्री.विखारोद्दीन :** अतिक्रमण हटवितांना मी प्रत्यक्ष पाहत होतो. त्याठिकाणी एक नगरसेवक येऊन त्यांनी संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना आरेखावीची भाषा बोलून पथकातील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली अतिक्रमण न हटवता परत पाठवले या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असतांना तशी कार्यवाही न करता उलट प्रशासनावर दबाव आणण्यांत आलेला आहे. ही योग्य बाब नाही. कोण नगरसेवक होते माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** अतिक्रमण हटाव पथक त्या ठिकाणी गेलेले होते. परंतू शिवीगाळ वगैरे असे काही प्रकार घडलेला नाही.

**श्री.विखारोद्दीन :** अधिकारी दिशाभूल करता हेत मी त्याच ठिकाणी होतो. लोकांच्या भावना लक्षात घेता सदर रस्ता रुंदीकरण करणे योग्य आहे. लोकप्रतिनिधी तेथे येऊन प्रशासकीय कामात अडथळा करु इच्छितात. सर्वोच्च न्यायालयाची तसे आदेश असतांना का अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही केलेली नाही. मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

**सौ.लता दलाल :** न्यायालयाचे आदेश का पाळत नाही. समोरचे स्ट्रक्चर का पाडत नाही तशी अधिकारी यांना विचारणा करावी. रस्ता एक बाजूने रुंदीकरण करणार की दोन्ही बाजूने याबाबत खुलासा व्हावा. रस्त्याच्या एका बाजूने एक ही इंच अतिक्रमण म्हणून काढण्यांत आलेले दिसत नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** सदर प्रकरण हे नगररचना विभागशी संबंधित असल्याने नेमके खुलासा करता येणार नाही.

**उपअभियंता :** मला नेमक माहीत नाही याबाबत सभा संपल्यानंतर रेकॉर्ड बघून माहिती देता येईल.

**मा.सभापती :** मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन त्यात मा.जिल्हाधिकारी, मा.आयुक्त उपस्थित होते. बैठकीतील निर्णयानुसार ते काम थांबविण्यांत आले.

**श्री.विखारोद्दीन :** नगररचना विभागाला तसे आदेश प्राप्त झालेले असून पुढील कार्यवाहीसाठी सदर विभागातून प्रशासकीय विभागाला अतिक्रमण हटवण्याबाबत आदेश देण्यांत आले. त्यानुसार प्रशासकीय विभागाचे सर्व कर्मचारी त्या ठिकाणी अतिक्रमण हटवण्यासाठी कार्यवाही करण्यास आले होते. हे सर्व टी.पी.सेक्शनला माहिती असतांना अधिकारी उत्तरे देण्यास टाळाटाळ करत आहे.

**सौ.लता दलाल :** मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश कसे आहेत. त्याची माहिती द्यावी. माझ्या माहितीप्रमाणे न्यायालयाचे आदेश असे आहे की, रस्त्यांच्या दोन्ही बाजूने तोडण्यांत येत आहे. दुसऱ्या बाजूने का नाही कोणी थांबवले कोणत्या नगरसेवकांच्या म्हणण्यानुसार काम बंद केले व आणखी कुणाचा राजकीय दवाबामुळे कार्यवाही करण्यांत आलेली नाही याचा सविस्तर खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा.

**मा.आयुक्त :** क्रांतीचौक रस्ता रुंदीकरणा संदर्भात सभागृहात स.सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले. त्यातील स.सदस्या सौ.दलाल यांनी सुचना मांडली की, सदर रस्ता कोणत्या बाजूने काढण्यांत येणार की दोन्ही बाजूने काढणार आहे या बाबत सांगावयाचे झाल्यास महानगरपालिकेच्या संबंधित नगररचना विभागाने ज्यावेळेस न्यायालयात केस चालू होती. त्यावेळेस त्या रस्ता संदर्भात नकाशा न्यायालयात दाखल केलेला आहे. व त्या नकाशानुसार ज्या दिशा, जो भाग दाखवलेला आहे. त्यानुसार न्यायालयाने सुध्दा मान्य केलेला आहे. त्या संदर्भात जे नकाशा न्यायालयाने मान्य केलेला आहे. त्यानुसारच प्रशासन कार्यवाही करेल. दुसरा मुद्दा स.सदस्य श्री.विखारोद्दीन यांनी उपस्थित केला की, संबंधित रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यांस गेलेले अतिक्रमण विभागाचे पथक कार्यवाही न करताच परत आले. ज्यावेळेस अतिक्रमण पथक त्या ठिकाणी गेले होते. त्यावेळेस नुकतीच आचारसंहित लागलेली होती. व जो बंदोबस्त प्रशासनाला देण्यांत आलेला होता तो पुरेसा नव्हता. त्यामुळे कार्यवाही झालेली नाही.

**मा.उपआयुक्त (प्र.) :** सदर रस्त्याच्या निवाड्याची रक्कम जिल्हाधिकारी यांनी नियुक्त झालेल्या विशेष भूसंपादन अधिकारी कडे जमा करण्यांत आली आहे. जोपर्यंत बाधित जागेचा ताबा हस्तांतर होत नाही. तोपर्यंत महानगरपालिका पाडु शकत नाही.

**श्री.विखारोद्दीन :** गोलमाल स्वरुपाचा खुलासा करण्यांत येत आहे. तर उपआयुक्त (प्र.) म्हणतात. रस्त्याचा निवाडा घोषित झाला. भूसंपादन अधिकारी यांनी ताबा मनपाकडे दिलेला नाही. म्हणून कार्यवाही थांबविली. जे आदेश प्राप्त झाले ते कशा पध्दतीचे दिलेले आहे. याबाबतचा खुलासा करावा. त्या ठिकाणी कर्मचारी जातात. कुणाच्या अधिकारात कर्मचारी पाठवले होते. त्या

कर्मचाऱ्यांना नागरिकांचे बोलणे ऐकावे लागते. याचा विचार प्रशासन करते काय?

**उपआयुक्त (प्र.) :** मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधित भूसंपादन अधिकारी यांचे मनपा प्रशासनाकडे पत्र आलेले होते. संबंधित रस्त्याचे रुंदीकरणाची जागा ताब्यात देण्यांत येणार आहे असे पत्र आले होते. त्यानुसार प्रशासन कार्यवाही झाली होती. परंतू नंतर लगेचच गणेश उत्सव व आचार संहिता लागल्यानंतर बंदोबस्त साठी पुरेसे पोलिस संरक्षण नसल्याने कार्यवाही थांबवावी लागली.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** मा.जिल्हाधिकारी यांनी सदर कार्यवाहीचे आदेश दिले असतांना कार्यवाही चालू करण्याच्या प्रयत्नात असतांना पुन्हा भूसंपादन अधिकारी यांचे पत्र येण्याचे कारण काय? तसे पत्र आले असेल तर सभागृहात मागवून वाचून दाखवावे.

**श्री.विखारोद्दीन :** अधिकारी आचार संहितेचे निमित्त करतात. आचारसंहिता शिथील झाल्यापासून आजची बैठक ही तिसऱ्यांदा होत आहे. या काळात मध्ये का अतिक्रमण हटवण्या बाबत कार्यवाही झाली नाही.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.कोकाटे तसेच श्री.विखारोद्दीन यांनी मांडलेल्या सुचनेनुसार क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता रुंदीकरणाबाबत संबंधित भूसंपादन अधिकारी यांनी कशा स्वरुपाचे पत्र मनपा प्रशासनाकडे पाठवले याची पुढच्या बैठकीत सविस्तर माहिती द्यावी. तसेच या संदर्भात ज्या ज्या प्रश्नाबाबत स.स.मुद्दा उपस्थित केला. या बाबतची सविस्तर माहिती प्रशासनाने पुढील बैठकीत द्यावी.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** स.सदस्यांनी मांडलेल्या सुचनाचा खुलासा सभागृहात ज्या त्या वेळीच मिळावयास पाहिजे. चर्चा करावयाची नसेल तर किंवा करु द्यावयाची नाही असे असेल तर माहिती लपविली जाते. असा त्यांचा अर्थ होतो ही वस्तुस्थिती आहे. वारंवार पुढच्या बैठकीत माहिती देण्यांत येईल असे बोलण्यांत येते. योग्य नाही. ज्या त्याच बैठकीत माहिती द्यावयास पाहिजे.

**मा.सभापती :** ज्या त्या बैठकीस स.स.माहिती विचारल्यास त्याबाबतची मला माहिती मिळालेली आहे.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** आम्हास वृत्तपत्रांच्या माध्यमातून उत्तरे देण्यांत येते. प्रशासनाला ४ ओळीचे पत्र पाठवता येत नाही. १५-१६ वे पत्र आहे. आम्ही सभापती म्हणून आपला मान राखतो. परंतू आम्हाला वृत्तपत्राच्या माध्यमातून उत्तरे देण्यांत येते.

**मा.सभापती :** यापुढे स.सदस्यांनी सभागृहात मुद्दा उपस्थित केल्यानंतर लेखी स्वरुपात माहिती देण्यांचे आदेश सभागृहात देण्यांत आल्यास संबंधित अधिकारी यांनी सर्व स्थायी समिती स.सदस्यांना त्या त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून एक एक प्रत देण्यांत यावी. व स.सदस्यांनी वैयक्तिक पत्र देऊन माहिती मागवल्यात ती तात्काळ दिली पाहिजे.

**श्री.अजिज खाँ गणी खाँ :** किराणा चावडी येथील मुत्री तोडण्याबाबत २ ते ३ बैठकीत मी बोलतो आहे. अद्याप पर्यंत मुत्री तोडण्याची कार्यवाही झाली नाही. मस्जीद लागू मुत्री येते. नागरिकांना त्रास होतो. प्रशासनामार्फत कार्यवाही होत नसेल तर वैयक्तिक नागरिकांना लावून कार्यवाही करतो तसे आदेश द्यावे.

**मा.सभापती :** सभा संपल्यानंतर आपण प्रत्यक्ष पाहणी करुन काय कार्यवाही करावयाची ते ठरवू.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** नगररचना विभागाकडून मागील बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दयांवर १०% व १५% खुली जागा ठेवणेच्या संदर्भात माहिती मागविली होती. ती अद्याप मिळालेली नाही.

**मा.सभापती :** अशा प्रकारची माहिती संकलन करण्यास वेळ लागतो. त्यासाठी एक बैठक सोडून दुसऱ्या बैठकीस स.सदस्यांना संबंधित अधिकारी यांनी यापुढे माहिती दिली पाहिजे. येणाऱ्या बैठकीपर्यंत संबंधित नगररचना विभागाने स.सदस्यांना मागील बैठकीत ओपन स्पेज १०%, १५% सोडवण्या संदर्भात विचारलेली माहिती येणाऱ्या बैठकीपर्यंत द्यावी.

**सौ.लता दलाल :** निराला बाजार येथील अतिक्रमण उठविण्याबाबत मी मागील बैठकीत चर्चा केली होती. त्यावेळेस उपआयुक्त (प्र.) उपस्थित नव्हते. न्यायालयाचा स्टे व्हॅकेट झालेला आहे काय? झाला असल्यास पुढील कार्यवाही कधी करणार खुलासा करावा.

**प्र.प्रशासकीय अधिकारी :** आजच विधी सल्लागार यांचे तशा प्रकारचे आदेश प्राप्त झाला परवानगी व्यतिरिक्त जे बांधकाम झाले आहेत ते पाडण्यांत यावे असे आदेशात म्हटले आहे व तशी कार्यवाही लवकरच होईल.

**उपआयुक्त (प्र.) :** जिल्हा न्यायालयात सुनावणी होऊन त्या निर्णयानुसार त्यांची स्वतःची जागा जरी असेल तरी ही अशा प्रकारची कार्यवाही करण्यास नियमाने नोटीस देऊन पुढील कार्यवाही करावी लागते तसे पत्र संबंधितांना दिलेले आहेत. त्यानंतर कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** प्रशासकीय विभागात विधी सल्लागार यांच्या मार्फत संबंधितास नोटीस देऊन त्यानुसार आजपासूनच कार्यवाही करण्यांस सुरुवात करावी. जेणे करुन निराला बाजार येथील अतिक्रमण तात्काळ काढण्यांत आले पाहिजे.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिका मार्फत सुवर्ण जयंती योजना राबविण्यांत येत होती. जे प्रकरण बँकेकडे गेलेले आहेत. त्यात जवळ-जवळ ६०% प्रकरणे मंजूर झालेले दिसून येत नाही. त्याचा खुलासा व्हावा. बँकेकडे प्रकरण गेल्यानंतर काही प्रकरणात मंजूरी मिळाली संबंधित कर्ज वितरक धारक यांना ज्या संदर्भात कर्ज वाटप करण्यांत येत. त्या बाबतचे प्रशिक्षण नव्हते. त्यामुळे काहींना कर्ज मिळालेले नाही. शासनाकडून पैसा येतो. याबाबत ही खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना संदर्भातील कर्ज प्रकरणे सर्व वार्डातील समान प्रकरणे पाठवावयाचे प्रयत्न या विभागाने आहेत. कर्ज व सबसिडी कशा पध्दतीने व किती मंजूर करावयाचे हे सर्व अधिकार बँकेला आहेत. एकूण नऊ हजार प्रकरणे आहे. त्यापैकी १८०० प्रकरणे मंजूर झालेली आहे. प्रशिक्षण करीता ३ ते ८ दिवसांचा कालावधी साठी प्रशिक्षण द्यावे असे शासनाचे आदेश होते. त्यानुसार शासनाकडून अद्याप रक्कम प्राप्त तशी चौकशी मी केली आहे.

**सौ.लता दलाल :** १९९६ पासून या योजनेला मान्यता मिळून आतापर्यंत मनपाने १९९६ ते १९९९ पर्यंत एकूण प्रकरणे पैकी फक्त १८०० प्रकरणे मंजूर झाली या बाबत खुलासा करावा.

**श्री.प्रकल्प संचालक :** ही योजना १९९८ ला सुरु झाली. मार्च १९९८ ला शासनाकडून एकत्रित रक्कम प्राप्त झाली. बँकेकडे ठेवली आहे. बँकांनी उद्दीष्टपूर्ण केले नाही. ९६० चे उद्दीष्ट व ११४ प्रकरणे मंजूर केले आहे. या बाबतची सबसिडी शासन देणार असून या संदर्भात पुढील बैठकीत मंजूरी बाबतचा निर्णय होणार आहे.

**श्री.विखारोद्दीन :** ही योजना दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी आहे का? जे राजकारणी लिडरशीप करतात तसेच ज्यांच्याकडे पैसा व त्यांना राहण्यासाठी घरे आहेत. अशांना या सुवर्ण जयंती योजनेचा लाभ मिळतो. गरीबांना मिळालेला नाही.

**प्रकल्प संचालक :** मार्चमध्ये बरीच प्रकरणे बँकेकडे पाठवली असून त्यापैकी बरीच प्रकरणे आणखी प्रलंबित आहेत. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे शिफारस करण्यापुर्वी प्रथम त्यांच्या घरी भेट देवून तपासणी केली जावी व नंतर देण्यांत यावे.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार व मागच्या प्रकरणात स.नगरसेवकांचा आक्षेप असेल तर अशांची नोंद करुन चुकीने प्रकरणे बँकेकडे पाठवली असेल तर त्याबाबत संबंधित अधिकारी यांनी योग्य ती सर्व्हे करुन पाहणी करावी. व नंतरचे अशा बँक कर्ज धारकांना कर्ज देण्यांची कार्यवाही व्हावी.

**श्री.विखारोद्दीन :** मागील आठवड्यात संघटनेमार्फत ५ व्या वेतन आयोग लागू करणेच्या कर्मचाऱ्यांच्या मागणी साठी उपोषण करण्यांत आले. त्यावेळी प्रशासनाने जी भूमिका घेतली ती योग्य वाटत नाही. शहरामध्ये या उपोषण कालावधीत खूप कचरा साठलेला होता. रस्त्यावर कचरा दिसून येत आहे. शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले काही ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्थीत झाला नाही. कर्मचाऱ्यांच्या मागण्या संदर्भात प्रशासनाने अशी भूमिका घ्यावी की, पुन्हा त्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना उपोषण करण्याची वेळ येऊ नये.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** ज्या संघटनेमार्फत उपोषण करण्यांत आले. त्यांच्या समवेत प्रशासनाने लवकरात लवकर चर्चा करुन मागण्या बाबत कार्यवाही केलेली नाही. तसेच दि.१६.१०.९९ रोजी काही कर्मचारी सामुहीक रजेवर होते. तर काही गैरहजर होते. याबाबत प्रशासनाने काय निर्णय घेतला त्याचे वेतन कपात करणार काय? की त्यांच्या सामुहीक रजा मंजूर करणार? गैरहजर कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करणार.

**मा.सभापती :** प्रशासनाने संघटने बरोबर चर्चा करुन त्यांच्या मागण्या बाबत आश्वासन दिलेले आहे. ते पूर्ण होण्याची कार्यवाही प्रशासन करत आहेत. संघटनेच्या मागणीचा तसा निर्णय सर्वसाधारण सभेने ही घेतलेला आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या सामुहीक रजे बाबत व गैरहजर कर्मचाऱ्यांबाबत प्रशासकीय बाब असल्याने सामुहीक रजा कायदेशीर आहे की गैरकायदेशीर आहे हे प्रशासन बघेल. ही बाब सर्वसाधारण सभेपुढे न्यावी लागणार आहे.

**श्री.देशमुख :** मालमत्ता, जकात उद्दीष्टानुसार वसूली झालेली आहे काय? भविष्यात राहिलेली वसूली होईल काय? त्यादृष्टीने प्रशासन काय कार्यवाही करते आहे. या बाबत खुलासा करावा.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी केलेली सूचना योग्य आहेत त्यासाठी योग्य वसुली व्हावी. म्हणून सर्व झोनचे अधिकारी यांना तशा सूचना देण्यासाठी सभेला बोलावले नाही. मा.आयुक्त यांच्या माध्यमातून सूचना देऊ इच्छितो की, त्यांनी नेमून

दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे त्यांनी वसूली करावी. याबाबत सूचना द्यावी. व वसूली समाधानकारक होण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावे.

**सौ.लता दलाल :** मालमत्ता कर वसूली संदर्भात बरीच प्रकरणे प्रलंबित आहे. शहरातील काही घरे जमीन दोस्त झालीत तरी टॅक्स आकारला जातो. तर काही घरे अस्तित्वात असून वसुली होत नाही. काही मालमत्ता संदर्भात वाद निर्माण असल्याने वसूली होत नाही. जी मालमत्ता कर वसूली बाबतची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे वसुली कमी होते आहे. ज्या ठिकाणी वाद निर्माण होण्याची शक्यता आहेत. त्याठिकाणी तडजोड करण्यांत आली पाहिजे. नसता लोक न्यायालयात जातात अशी प्रकरणे खूप काळ चालू असतात व त्यांचा परिणाम मालमत्ता कर वसूलीवर होतो. वसूली कशी वाढेल या दृष्टीने जे वादग्रस्त प्रकरणे आहेत. ती निकाली काढावी.

**श्री.विकास जैन :** मालमत्ता कर, पाणीपट्टी, वसूली संदर्भात झोन वाईज ज्यांच्या तक्रारी आहेत. त्यानुसार झोन वाईज बैठका घेवून प्रकरणे निकाली काढावे. याबाबत वृत्तपत्रात बातमी देऊन झोनला बैठका घ्यावे. २०-३० कोटी रुपये वसूली कमी आलेली आहे. लवकर निर्णय घ्यावा.

**मा.सभापती :** मालमत्ता कर, पाणीपट्टी वसूली संदर्भात ज्या ज्या नागरिकांच्या तक्रारी आहेत त्या सोडविण्यासाठी उपआयुक्त (म.) यांना प्रत्येक झोनला आठवड्यातील एक-एक दिवस ठरवून संबधित तक्रार धारकांनी चर्चा करावी जेणे करुन तक्रारीचे निवारण होईल व टारगेट प्रमाणे वसूली व्हावयास पाहिजे. यासाठी झोन अधिकारी यांनीही प्रयत्नशील राहावे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** मालमत्ता, पाणीपट्टी वसूली होण्याबाबत प्रशासनाने कोणती यंत्रणा हाती घेतली स.सदस्यांनी सुचवल्याप्रमाणे जी प्रकरणी या संदर्भात प्रलंबित आहे ती निकाली काढण्यांत यावी. प्रमाणकानुसार जो टॅक्स लावण्यांत येतो. तो पूर्णत: वसूल होत नाही. कुणाकडे किती वसूली बाकी आहेत. याचा अद्याप सर्व्हे केलेला नाही. अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार किती टॅक्स वसूल व्हावयास पाहिजे याचा ताळमेळ प्रशासनाने ठेवावयास पाहिजे. मागे ३ ते ४ महिने काही अधिकाऱ्यांकडे दोन दोन विभागाचे कामकाज सोपवण्यांत आले होते. त्यामुळेही वसूली होण्यास मदत झालेली नाही.

२) झोन क्र.७ मध्ये पाणीपट्टी वसूली योग्य प्रमाणात होते असे असतांना ज्यांना मागील काळात पाणी मिळाले नाही. त्या लोकांनी २$^{१/२}$ ते ३ वर्षात ५२ लाख रुपयाची प्रकरणे प्रलंबित आहे. प्रत्येक वेळेस झोन अधिकारी बदलून येतात. ते त्यांच्या परीने वसूली करतात. विचारणा केली असता या झोन ७ मध्ये १९९७-९८ ची पाणीपट्टी वसूली ९०% ते ९५% झालेली आहे. असे असतांना आज त्या प्रमाणात पाणी कमी येते. यावरुन असे दिसून येते की, वसूली बाबतची यंत्रणा जी प्रशासन राबवत आहे. ती योग्य नसून ज्यांना पाणी मिळत नाही. त्यांना बिले देतात ज्या ठिकाणी वसूली होते तेथे पाणी कमी प्रमाणात मिळते हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. पाणी नसतांना दिलेली बिले माफ करण्याबाबत सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन ती माफ होतील असे महापौर यांनी सांगितले. अद्याप त्या बाबतचा प्रस्ताव मंजूरी साठी सर्वसाधारण सभेसाठी मंजूरीला आलेला नाही. ५२ लाखाचा प्रश्न कधी निकाली काढणार सौ.मुंडलिक ताईने हा प्रश्न उपस्थित केला होता.

३) मागील वर्षी नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून काही विकास कामे करण्यांत आली. यावर्षी कामे करण्यास बंद केले. नागरिक लोकप्रतिनिधी निवडून येतात. त्या लोक प्रतिनिधीने सूचना देऊन प्रश्न मांडल्यावर त्यानुसार कामे व्हावयास पाहिजे. सिडको हडको मध्ये स्वेच्छानिधी वापरुन कामे होत नाही. महानगरपालिकेच्या हद्दी बाहेर कामे करण्याचा बहुमताने निर्णय होतात. योग्य प्रकारे वागणूक मिळत नाही.

**मा.सभापती :** १) स.सदस्या सौ.मुंडलिक यांनी मागच्या बैठकीत सिडको एन-७ येथील चुकीने देण्यांत आलेली बिले माफ करण्या बाबत प्रश्न मांडला होता. त्यानुसार कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये तसा प्रस्ताव ठेवावा असे ठरले आहे.

२) तसेच सिडको -हडको मधील नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून स.सदस्यांनी सुचवल्यानुसार विकास कामासाठी मागील वर्षी निधी वापरण्यांत आलेल्या व तसा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतलेला आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांनी प्रशासनाच्या दृष्टीने नियमाने सिडको हडको येथील विकास कामे करण्यांबाबत कार्यवाही करावी.

**श्री.एकबालोद्दीन :** शहरातील बारुदगर नाल्यालगत गादीया बिल्डरने मान्य क्षेत्रापेक्षा महानगरपालिकेच्या जास्तीच्या जागेवर बांधकाम केलेले आहेत. गरीब लोकांना जाण्यायेण्याचा रस्ता बंद केलेला आहे. त्यांना किती क्षेत्र देण्यांत आले माहिती द्यावी.

**मा.सभापती :** गादीया बिल्डरने या अगोदर ही शहरातील बांधकामे योग्य त्या परवानगीनुसार केलेली नाही. तशा तक्रारी आहेत. यापुर्वी त्यांना सेल्फ डेव्हलपमेंटची परवानगी दिली त्यांनी सर्व विकास कामे पूर्ण केले नाही. संबंधित अधिकारी यांनी गादिया बिल्डरने बारुदगर नाल्यावर किती क्षेत्र विकसीत केले याची माहिती घेऊन तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** ज्या बिल्डरांना जागा विकसीत करण्यासाठी दिल्या किती जागा दिल्या, कुणाला दिल्या, किती जागेवर बांधकामे झालीत. पार्कींग व्यवस्था आहेत काय? किती टक्के साईड ने जागा सोडली याची नोदं अधिकारी यांचेकडे असावयास पाहिजे. गरीब नागरिकांने रस्त्यावर टपरी टाकल्यास आपण तात्काळ काढून आणण्याची कार्यवाही होते. तर मोठमोठ्या बिल्डरानवर तात्काळ कार्यवाही का होत नाही. त्यांना का म्हणून सवलत दिली जाते. संबंधित विभागाकडे गादीया बिल्डरने केलेल्या कामाची मंजूर नकाशाप्रमाणे तपासणी करुन त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** नगररचना विभागाने परवानगी दिल्यानंतर त्या संबंधित प्रत प्रशासकीय विभागाला जाते. त्यानुसार ज्या त्या प्रभागात इमारत निरिक्षक यांची नेमणूक केलेली असते. त्यांनी अशा बिल्डरने अनाधिकृपतपणे केलेले कामाचा रिपोर्ट संबंधित अधिकारी यांचेकडे द्यावयास पाहिजे. स.सदस्य श्री.स.अ.एकबालोद्दीन यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार सर्व स.सदस्यांना लेखी स्वरुपात तशी माहिती नगररचना अधिकारी यांनी द्यावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** सर्व्हे नं.१५६ मध्ये शाळेसाठी आरक्षित जागेवर सर्रासपणे २०'X३०' चे प्लॉट पाडून विक्री होत आहे. संबंधित विक्री करणाऱ्यावर अधिकारी यांनी आतापर्यंत काय कार्यवाही केली. शहराच्या रेल्वेस्टेशन, जटवाडा, जाधववाडी, पुंडलिकनगर, हनुमाननगर, सुरेवाडी भागात २०'X३०' चे प्लॉट

पाडून जमीन मालक विक्री करत आहे. जी जबाबदारी अधिकारी यांचेकडे दिली त्या त्या संदर्भात संबंधित प्रभागात जाऊन पाहणी करण्याचे काम त्या अधिकाऱ्यांचे नाही काय? यास कोण जबाबदार आहे. अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले तर ऐकत नाही. कोणाच्या आर्शिवादने चालू आहे.

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** नेहरु भवन येथील संरक्षित भिंत बाबत कार्यवाही केली नाही. तसेच कबाडीपुरा येथे ३ मजली इमारतीच्या कॉलमचे काम चालू असून काम वेळेवर होण्याची शक्यता कमी वाटते. लवकरात लवकर होईल तशी कार्यवाही करावी. ३-३ १/२ वर्ष झाले. कार्याआदेश देवून ६ महिने झाले. १५-२० दिवसांत फक्त ३ कॉलम, याकामावर स्थगिती मिळविण्यासाठी वेळ देण्यांत येत आहे.

**शहर अभियंता :** कबाडीपुरा येथील एकूण १८ कॉलमचे खोदकाम होत आहेत. ३ कॉलमचे बांधकाम पूर्णत: वर आणलेले आहेत. उर्वरित काम लवकरच होणार खोदकामाच्या ठिकाणी पाणी येते. दोन इंजिन लावून पाणी काढण्यांत येत आहे.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** सदर काम ५५-५६ लाखाचे असून लवकरात लवकर व्हावे.

**मा.सभापती :** इमारतीचे काम जास्तीचे असल्याने शहर अभियंता यांनी काम लवकरात लवकर होण्याबाबत कार्यवाही करावी तसेच नेहरुभवन येथील संरक्षित भिंत बाबतही कार्यवाही व्हावी.

**सौ.लता दलाल :** डांबरीकरणा संदर्भातील जे प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहेत. अशा प्रस्तावाबाबत लवकर मंजूरी घेऊन कार्यवाही व्हावी. असे आदेश दिले होते. आचार संहितेमुळे जे प्रस्ताव थांबुन होते व आहेत अशा सर्व प्रस्तावाबाबत जे ५,३ लाखापर्यंतचे आहेत. त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी घेऊन ७ दिवसांची शॉर्ट टेंडर नोटीस काढून कार्यवाही करण्यांत यावी.

२) औरंगपुरा नाथ मंदिर समोर एक मुत्री असून ती तोडण्या बाबत सभागृहात मी बऱ्याच वेळा चर्चा केली अद्याप कार्यवाही झाली नाही. दोन दिवसांत पाडली नाही. तर आम्ही महिला जाऊ व बांधून दाखवू किती दिवस थांबायचे मार्केट एरीया आहे. कॉलेज आहे. त्या रस्त्याने मुली तसेच महिला जातात. सरस्वती भुवन संस्थेने तक्रार घेतली आहे. आपले सार्वजनिक शौचालय आहे ते पाडावे व बांधावे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी नाथ मंदिर औरंगपुरा समोरील मुत्री तोडण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** वृत्तपत्रात नेहमी बातमी छापून येते. व लिहण्यांत येते. मुस्लीम नगरसेवक आहे. सर सय्यद हॉलचे काय झाले. त्यासाठी काही भाग आरक्षीत केलेला आहे का दलितासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, दलितांसाठी हॉस्टेल, सरसय्यद हॉलसाठी देखील थोडी जागा सोडायला हवी. याबाबत सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहेत. आतापर्यंत काय कार्यवाही झाली. पक्षपातीपणाने कामे होत आहे असा त्याचा अर्थ होतो.

**मा.सभापती :** पक्षपातीने कोणतीच विकास कामे अद्याप झालेली नसून सर्वांच्या सहमतीने आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राची उभारणी करीत आहोत.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** स्मशानभूमी जवळ मारोती मंदिराच्या पाठी मागील व समोरील नाल्या लगतच्या दोन संरक्षित भिंती पडलेल्या आहेत. यासाठी वाढीव भिंतीचे बांधकाम तातडीने करण्यांत येणार आहे का? किंवा जाणीव पूर्वक दुर्लक्ष होते का गेल्या ६ महिन्यापासून आमचे प्रश्न सोडावण्याचा प्रयत्न केला नाही. कामे कधी करणार हे काम तातडीने झाले पाहिजे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी नियमाने व ज्या पध्दतीने संरक्षित भिंत बांधता येईल तसे इस्टिमेंट तयार करुन कार्यवाही करावी. मुख्य लेखाधिकारी यांनी याबाबत माहिती दिली आहे. यापुढे झोन अधिकारी यांनी बैठकीला येण्याची आवश्यकता नाही. त्यांना कळविल्यानंतर यावे.

**शहर अभियंता :** एका संरक्षित भिंत बांधण्या बाबतचे इस्टिमेंट तयार करुन मंजूरीसाठी आहेत. मंदिराच्या समोरील भिंतीचे पडल्याची तेथे पाहणी करुन पुढील कार्यवाही करता येईल.

**विषय क्र.२५९/अ-१ :**

दिनांक ५ ऑक्टोंबर, १९९९ च्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.२१ वर ठराव क्रमांक २५२/१३ नुसार न.भुमापन क्र.११६०३/१ या जागेतून महापालिकेस ०७.९६.९४ चौ.मी.जागा देण्यास संबंधित मालक तयार आहे. न.भूमापन क्र.११६०२/२/२२ मधील ४३४.५० चौ.मी.जागा महानगरपालिकेच्या मालकीची संबंधितास देणार या दोन्ही जागेची किंमत (व्हॅल्यु) सारखीच आहेत. काय जी बदल्यात जागा मिळणार आहेत ती रोडवर येणार आहेत काय? क्षेत्र, लोकेशन व भावातील तफावत बाबत खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा किती फुट रुंद रस्त्यावर आहे. व आरक्षण आहे का?

**उपअभियंता (नगररचना) :** महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतून ४३४.५० चौ.मी. जागा संबंधितास द्यावयाची असून १०० फुट रस्त्यावर आहे. संबंधितांकडून घेण्यांत येणारी जागा ही रस्त्याच्या ५० फुट आत मध्ये येते. १०० फुट रुंद रस्त्यावर महानगरपालिकाने दुकान केंद्रासाठी संपादित केलेली होती. आता आपण दुप्पट जागा घेतो. सदरील लोकेशन शाळेसाठी उपयुक्त असल्याचे तत्कालीन आयुक्तांना पाहणी केली होती.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** प्रस्तावित जागा दुकान केंद्रासाठी आरक्षित केलेली होती. जागेच्या आरक्षणात बदल करण्यांत येत आहे का? या अगोदर तसा ठराव मंजूरीसाठी आणलेला होता काय? माहिती द्यावी.

**उपअभियंता (नगररचना) :** आपण कमी जागा देतो व जास्त जागा घेतो.

**सौ.लता दलाल :** १) जागवेरील आरक्षणाचा उद्देश बदलतो. दुकान केंद्राची जागा देतो.

२) जी २५० फुट रस्त्याच्या आतील जागा घेतो व जी १०० फुट रस्त्यावरील जागा संबंधितास देतो या दोन्ही जागेचा मुल्यांकनातील फरक काय तशी या प्रस्तावात दुरुस्ती केलेली दिसत नाही. १०० फुट रस्त्यावर आतील जागा दुकान केंद्रासाठीची होती भविष्यात दुकान केंद्रे झाली तर

महानगरपालिकेच्या उत्पन्नावर भर पडेल असे प्रस्ताव मंजूरीसाठी आणण्या मागे मुख्य उद्देश काय?

**श्री.कोकाटे काशिनाथ :** १०० फुटावरील महानगरपालिकेची मालकीची जागा वाणिज्य वापरासाठीची असतांना मंजूरीसाठी सर्वसाधारण सभेसमोर तसा प्रस्ताव आलेला नाही. मा.आयुक्त यांची जागेला भेट झाली म्हणता त्या बाबतचे रिपोर्ट सभागृहात दाखवावे.

**मा.सभापती :** मा.आयुक्त श्री.वैद्य साहेब यांनी भेट दिले आहे. असे अधिकारी यांचे म्हणणे असेल तरी विद्यमान आयुक्त यांचा वेळ घेऊन मी व आयुक्त या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यांत येईल. नंतर निर्णय घेण्यांत येईल. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येत आहे.

**श्री.विखारोद्दीन :** पृष्ठ क्र.५ वर हमालवाड्याजवळ स्मशानभूमी न होण्या बाबत १९८५ ला स्टे आलेला होता तो व्हॅकेट झालेला आहे काय माहिती द्यावी स्टे व्हॅकेट होण्यास इतका कालावधी का लागलेला आहे.

**शहर अभियंता :** या संदर्भात विधी सल्लागार यांच्याकडून माहिती घेतलेली आहे. सध्या स्टे अस्तित्वात नाही. यानंतर तात्काळ पुढील कार्यवाही करण्यांत येईल. ठेकेदारांला पत्र दिले आहे.

**श्री.देशमुख व्ही.व्ही. :** पान क्र.७ वर रु.७०,२०० खर्च असा आहे. ते १७,२००/- लिहिण्यांत यावे तशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**ठराव :**

दिनांक ५ ऑक्टोंबर १९९९ च्या इतिवृत्तातील ठराव क्र.२५२/१३ अन्वये मंजूरी देण्यांत आलेला ठराव स्थगित ठेवण्यांत येतो. सभागृहातील चर्चेनुसार प्रस्तावित जागेची मा.आयुक्त यांचे समवेत मा.सभापती यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी. त्यानंतर या प्रकरणी सभागृहात निर्णय घेण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

वरील दुरुस्तीसह दिनांक ५ ऑक्टोंबर १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.२६०/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, फुलेनगर येथे बहुउद्देशीय हॉल बांधण्याकरिता सा.बां.विभागाचे सन १९९६-९७ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.७,०१,५७५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.०८.०७.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त कामाचा खर्च हा सन १९९९-२००० आर्थिक वर्षा अंतर्गत ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७,०१,५७५/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फुलेनगर येथे बहुउद्देशीय हॉल बांधण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,०१,५७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६१/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हनुमान टेकडीजवळ संभाजीनगर येथे खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.२,१८,०१८/- चे सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर कामाचा खर्च विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षातून करण्यांत येणार आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांनी दि.२४.०७.९९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हनुमान टेकडीजवळ, संभाजी नगर येथील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,१८,०१८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६२/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयभवानी सह गृह.निर्माण संस्था म.गारखेडा येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,८३,३५०/- इतकी असून सदर कामावर होणारा खर्च विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आला आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांची दि.२१.०७.९९ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयभवानी सह.गृह निर्माण संस्था म.गारखेडा येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८३,३५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६३/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथील पुर्वेकडील हौदाला चोहो बाजूनी एम.एस.पाईपमध्ये कास्ट आयर्न ग्रिल बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,४८,४००/- चे सन १९९६-९७ च्या सा.बां.विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर कामाचा खर्च डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या लेखाशिर्षातून करण्यांत येणार आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांनी दि.२४.०७.९९ रोजी मान्यता दिलेली आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथील पुर्वेकडील हौदाला चोहो बाजूंनी एम.एस. पाईपमध्ये कास्ट आयर्न ग्रील बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४८,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६४/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील शहानुरमियाँ दर्गा जवळील कब्रस्तानास संरक्षित भिंत व तारकुंपण करणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,३१,८५६/- चे सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर कामाचा खर्च "स्मशानभूमी विकास" या लेखाशिर्षातून करण्यांत येणार आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांनी दि.२६.०७.९९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील शहानूरमियाँ दर्गा जवळील कब्रस्तानास संरक्षित भिंत व तारकुंपण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,३१,८५६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६५/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उल्कानगरी येथील श्री.भालेराव यांच्या घरासमोरील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,४२,०००/- इतकी असून सदर कामास मा.आयुक्त यांनी दि.२४.०८.९९ रोजी मान्यता दिली आहे. कामावर होणारा खर्च "विकास योजने अंतर्गत खुल्या जागेचे संरक्षण" या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आला आहे.

करिता प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उल्कानगरी येथील श्री.भालेराव यांच्या घरासमोरील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६६/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र पुर्वेकडील भिंत बांधणे व भिंतीची उंची वाढविणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसुची अन्वये तयार करण्यांत आले असून सदरकामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,३४,०००/- इतकी असून सदर कामावर होणारा खर्च "डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र" या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आला आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी दि.१३.०८.९९ अन्वये मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथील पुर्वेकडील भिंत बांधणे व भिंतीची उंची वाढविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,३४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६७/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुकूंदवाडी येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणे, बर्निंग शेड व ओटा बांधणे तसेच स्वच्छता गृह बांधणे इ.कामे करण्याकरिता सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाच्या दरसुची नुसार रक्कम रु.३,०४,६७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून सदर कामाचा खर्च "स्मशानभूमी विकास" हया लेखा शिर्षातून करण्यांत येणार आहे. सदर कामास मा.आयुक्त यांची दि.२८.०७.९९ रोजी मान्यता मिळालेली आहे.

करिता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणे, बर्निंग शेड व ओटा बांधणे तसेच स्वच्छता गृह बांधणे इ.कामे करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,०४,६७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६८/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नवाबपुरा येथील काली मस्जीद कब्रस्तानला विकसीत करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुची अन्वये तयार करण्यांत आले असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,६७,४००/- इतकी असून सदर कामावर होणारा खर्च स्मशानभूमी विकास या तरतूदी अंतर्गत प्रस्तावित करण्यांत आला आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांची दि.१७.०७.९९ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नवाबपुरा येथील काली मस्जीद कब्रस्तानला विकसीत करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,६७,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६९/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु उस्मानपुरा (हॉटेल डार्लिंग मागील भाग) येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.७,८२,४२५/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु उस्मानपुरा (हॉटेल डार्लिंग मागील भाग) येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,८२,४२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७०/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलालनगर या भागातील विविध वसाहतींच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.५,०४,७८८/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पुनर्डाबरीकरण या लेखाशिर्षकातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर या भागातील विविध वसाहतीच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,०४,७८८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७१/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दशमेश नगर येथील ५० फुट विकास रस्त्यावरील डॉ.पानसे हॉस्पीटल जवळील नाल्याचे व्हेंट वाढविणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १,८६,२२०/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या रस्ते दुरुस्ती (पॅचवर्क) या लेखा शिर्षकातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दशमेशनगर येथील ५० फुट विकास रस्त्यावरील डॉ.पानसे हॉस्पीटल जवळील नाल्याचे व्हेंट वाढविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८६,२२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७२/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, धनगरवाडा (सिल्कमिल कॉलनी) येथे रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,८२,१९२/- चे तयार करण्यांत आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षकातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धनगरवाडा (सिल्कमिल कॉलनी) येथे रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,८२,१९२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७३/१५:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.शिवशक्ती कॉलनी रघुवीर नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१२,३१५/- चे तयार करण्यांत

आले असून सदरचा खर्च "नवीन डांबरीकरण" या लेखा शिर्ष अंतर्गत सन १९९९-२००० सालासाठी ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवशक्ती कॉलनी, रघुवीर नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,१२,३१५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७४/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, श्रीनिकेतन को-ऑप हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,८५,६८०/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालात ठेवण्यांत आलेल्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनिकेतन को-ऑप हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,८५,६८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७५/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, बारापुल्ला परिसरात रफ शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१,५६,६६९/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालासाठी ठेवण्यांत आलेल्या नवीन खांडकी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारापुल्ला परिसरात रफ शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,५६,६६९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७६/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.देशमुख नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.४,९०,४६८/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च नवीन डांबरीकरण या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.देशमुख नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,९०,४६८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७७/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, सेव्हन हिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,६४,७०५/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाठी ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,६४,७०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७८/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मोमीनपुरा लोटाकारंजा येथील गल्ल्यामध्ये शहाबाद फरशी बसविण्याचे कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१,००,९८०/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च नवीन खांडकी रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोमीनपुरा लोटाकारंजा येथील गल्ल्यांमध्ये शहाबाद फरशी बसविण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,००,९८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येत.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७९/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सद्यःस्थितीत पैठणगेट येथील वाहतूक बेटामध्ये मा.लोकमान्य टिळक यांचा अर्धाकृती पुतळा असून सदरील ठिकाणी अर्धाकृती पुतळ्याचे रुपांतर पूर्णाकृती पुतळ्यांत करण्यांत यावे यासाठी सन १९९९-२००० च्या अर्थसंकल्पामध्ये वैशिष्ट्ये मध्ये अ.क्र.५ वर घेण्यांत आलेल्या आहे. सदरील ठिकाणचे वाहतूक बेट सौंदर्यीकरणाचे काम या उप विभागामार्फत हाती घेण्यांत आले आहे.

तरी सदरील ठिकाणी लोकमान्य टिळक यांचा पुर्णाकृती ब्रांझ धातूचा ६ ते ७ फुट उंचीचा पुतळा बसविण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. मंजूरी झाल्यानंतर शिल्पकाराकडून संकल्पना चित्रासह दरपत्रक मागविण्यांत येतील.

सदरील ठिकाणी पुतळा बसविणेच्या कामासाठीच्या ओट्यासह वाहतूक बेटा अंतर्गत लॅड स्केप विकसीत करण्याकरिता वास्तुविशारद कडून संकल्पना चित्रासह दरपत्रक मागविणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट येथील वाहतूक बेटामध्ये असलेल्या मा.लोकमान्य टिळक यांच्या अर्धाकृती पुतळ्याऐवजी पुर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामास तसेच सदरील कामाकरिता पुतळा बसविणेसाठीच्या ओट्यासह संकल्पना चित्रासह वास्तु विशारदाकडून दरपत्रक मागविण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८०/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, सन १९९९-२००० या वर्षाकरिता वाहतूक संकेतांकाची देखभाल दुरुस्ती करणे बाबतच्या कामाकरिता मागील वर्षाच्या वार्षिक दरानुसार चालू वर्षाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,४०,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च विद्युत देखभाल दुरुस्ती शिर्षकामधून खर्चाची तरतूद करण्यांस मा.आयुक्तांची मंजूरी मिळाली आहे. तरी रक्कम रु.२,४०,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वर्षाकरीता वाहतूक संकेतांकाची देखभाल व दुरुस्ती करणे बाबतच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,४०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८१/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मा.खासदार कार्यालय ते नेहरु कॉलेज (नारळी बाग) रस्त्यावरील विद्युतीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,९६,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च जी.आय.पोल. या आर्थिक तरतूदीमधून करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रु.१,९६,२५०/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.खासदार कार्यालय ते नेहरु कॉलेज (नारळीबाग) रस्त्यावरील विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,९६,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८२/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सेव्हनहिल येथील अग्निशमन कुपकेंद्रांत विजपुरवठा केबलचे काम करणे बाबतच्या कामाकरिता सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाची आर्थिक तरतूद व्यापारी संकुल व उर्वरित इमारती यामधून करण्यांत येईल. तरी उपरोक्त कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८०,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल येथील अग्निशमन उपकेंद्रात विज पुरवठा केबलचे काम करणे करिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८३/२५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, खोकडपुरा चुना भट्टी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,०४,८५८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खोकडपुरा चुना भट्टी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,०४,८५८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८४/२६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोरेश्वर सोसायटी जवळील भगतसिंग नगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,००,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोरेश्वर सोसायटी जवळील भगतसिंग नगर येथे १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,००,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८५/२७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथील जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे व वॉचमन रुम बांधणेच्या कामाकरिता सा.बां.विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु.२,८२,७९१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा देखभाल व दुरुस्ती पाणी पुरवठा हया लेखा शिर्षकामधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे व वॉचमन रुम बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,८२,७९१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८६/२८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शिवाजी नगर जलकुंभापासून ते इंदिरानगर झोपडपट्टी पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुची

नुसार रक्कम रु.५,९६,०७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाचा तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजीनगर जलकुंभापासून ते इंदिरानगर झोपडपट्टी पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,९६,०७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८७/२९ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वाहेद कॉलनी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,४४,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वाहेद कॉलनी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,४४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८८/३० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, लक्कड मंडी मोंढा येथे १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,८९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकामधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्कडमंडी मोंढा येथे १५० मी.मी.व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,८९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८९/३१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, भोईवाडा येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,२५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा

पाणी पुरवठा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भोईवाडा येथे १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९०/३२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इंदिरानगर बायजीपुरा स.नं.२५ येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,२०,४६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स.नं.२५ येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,२०,४६५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९१/३३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा दैनिक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे सी.आय.स्पेशल खरेदी करण्याचे कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,६७,९७१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदरचा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकातून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा दैनिक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे सी.आय.स्पेशल खरेदी करण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,६७,९७१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९२/३४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजयनगर बायजीपुरा प्रभाग क्र.३० मध्ये १००,२०० व २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,५२,८१०/- च्या अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षकाच्या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर बायजीपुरा प्रभाग क्र.३० मध्ये १००, २०० व २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,५२,८१०/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९३/३५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, करीम कॉलनी, मकसुद कॉलनी, रोशनगेट भागातील पाणी पुरवठा वितरणासाठी शहागंज जलकुंभावरुन २५० मी.मी.व्यासाची मुख्य ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,४६,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतूदीमधून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे करीम कॉलनी, मकसुद कॉलनी, रोशनगेट भागातील पाणी पुरवठा वितरणासाठी शहागंज जलकुंभावरुन २५० मी.मी.व्यासाची मुख्य ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,४६,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९४/३६ :**

सिडको एन-७ येथील जलकुंभाच्या पश्चिम बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत सम्प (जी.एस.आर.) बांधण्याचे काम पूर्ण झाले. जलकुंभाच्या आणि सम्पच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या भिंतीची उंची वाढविण्यासाठीच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,९१,५००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या १९९८-९९ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले असून सदरील कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती सन १९९९-२००० या आर्थिक तरतूदीमधून करण्यांत येणार आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-७ येथील जलकुंभाच्या पश्चिम बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत बांधण्यांत आलेल्या सम्पच्या आणि जलकुंभाच्या संरक्षणाकरिता अस्तित्वात असलेल्या भिंतीची उंची वाढविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,९१,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९५/३७ :**

चिकलठाणा येथील अहिल्याबाई होळकर चौक, कामगार कॉलनी या भागात पाणी पुरवठ्यात सुधारणा करणेसाठी सपोर्ट लाईन टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,०९,३२०/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी मिळाली असून या कामावर होणारा खर्च

पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती सन १९९९-२००० या तरतूदीमधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील अहिल्याबाई होळकर चौक, कामगार कॉलनी या भागात पाणी पुरवठ्यांत सुधारणा करणेसाठी सपोर्ट लाईन टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,०९,३२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९६/३८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गणेश कॉलनी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,१२,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली आहे. सदर कामाचा खर्च भांडवली कामाच्या तरतूदी मधून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी येथे १०० व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,१२,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९७/३९ :**

हर्सुल येथील श्री.अण्णासाहेब पांडुरंग जगदाळे यांचे स.नं.१७९/पी येथील मंजूर रेखांकनात १०० मी.मी. व २०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,४०,३२४/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सन १९९८-९९ चे दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे. सदर रेखांकनाचे मालक श्री.अण्णासाहेब जगदाळे यांनी या रेखांकनाचे १००% विकास निधी रक्कम रु.१,०९,२७०/- मनपामध्ये जमा केलेले आहेत. सदर कामासाठी प्रशासकीय मंजूरी मिळाली असून या कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षकातून करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील श्री.अण्णासाहेब पांडुरंग जगदाळे यांचे स.नं.१७९/पी येथील मंजूर रेखांकनात १०० व २०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४०,३२४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९८/४० :**

एन-११ बी सेक्टर, सिडको येथे ८०, १०० व १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी रक्कम रु.२,३१,२२०/- चे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या १९९७-९८ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले असून सदरील कामावर होणारा खर्च

पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षकातून करण्यांत येणार आहे. सदर कामाला प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-११ बी सेक्टर, सिडको येथे ८०, १०० व १५० मी.मी.कामाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,३१,२२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२९९/४१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे च्या कामासाठी सन १९९८-९९ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीप्रमाणे रक्कम रु.१,७४,००६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क मिल कॉलनी येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,७४,००६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३००/४२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.ब्राम्हण गल्ली, बेगमपुरा येथे ४५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,९७,२८५/- चे सा.बां.खात्याच्या व एम.जी.पी.या विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील काम लेखाशिर्षक "शहरी भागात गटारी बांधणे" सन १९९९-२००० यातून प्रस्तावित केलेले असून या कामास मा.आयुक्तांनी दि.३१.०७.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ब्राम्हणगल्ली, बेगमपुरा येथे ४५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,९७,२८५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०१/४३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.संजयनगर बायजीपुरा गादीयापार्क येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,६६,०००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिक्रण खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील काम लेखाशिर्षक देखभाल व दुरुस्ती १९९९-२००० यातून प्रस्तावित केलेले आहे. मा.आयुक्तांनी दि.०६.०७.९९ रोजी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.संजयनगर बायजीपुरा गादीया पार्क येथे २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,६६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृती सह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०२/४४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्षनगर, बौध्दविहार जवळील अस्तित्वात असलेली १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी बां.विभागाच्या सन १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,२९,९७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम लेखाशिर्षक देखभाल व दुरुस्ती यातून प्रस्तावित केलले असून मा.आयुक्तांनी त्यास दि.०५.०८.९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्षनगर, बौध्दविहार जवळील अस्तित्वात असलेली १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,२९,९७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०३/४५ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.मोगलपूरा स्लम येथे सिमेंट कॉंक्रीटच्या रस्ता तयार करणे बाबत सा.बां.खात्याच्या वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,८८,४२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खडी रस्ते आणि कॉंक्रीट" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.०९.०७.९९ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मोगलपुरा स्लम येथे सिमेंट कॉंक्रीटच्या रस्ता तयार करणे करिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८८,४२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०४/४६ :**

कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.बनेवाडी गांव स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सा.बां.खाते यांचे वर्ष १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,४२,१३३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "डांबरी रस्ते" या शिर्षकातून करण्यांत येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.२८.०७.९९ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बनेवाडी गांव स्लम येथै डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,४२,१३३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०५/४७ :**

उपसंचालक नगररचना प्रस्ताव सादर करीत आहे की, परमपूज्य संत श्री.आसारामजी आश्रम "हरिद्वार" बेगमपूरा औरंगाबाद या संस्थेने मो.बेगमपुरा येथील स्मशानभूमी व त्या लगतची उद्यानाने आरक्षित जागा विकसीत करण्यासाठी द्यावी म्हणून विनंती केली आहे. त्यास खालील अटींवर मान्यता देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

१. स्मशानभूमीचे वापरात कसलाही बदल न करता स्मशानभूमी चे मुळ अस्तित्व आहे तसेच ठेवावे.
२. स्मशानभूमी मध्ये इतर वापराचे कोणतेही बांधकाम देय होणार नाही.
३. वर नमूद सर्व विकास कामे स्वखर्चाने करुन भविष्यांत त्याची विना मोबदला नियमित दुरुस्ती देखभाल करावी.
४. स्मशानभूमी व त्यामध्ये करावयाची कामे व जागेवर नियंत्रण करण्यासाठी जागा प्रदान करावयाचे धोरणानुसार इतर सर्व अटी व शर्तीची पुर्तता करुन घेवून जागा ताब्यात देण्याची कार्यवाही मालमत्ता विभागातर्फे करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे परमपूज्य संत श्री.आसारामजी आश्रम "हरिद्वार" बेगमपुरा, औरंगाबाद या संस्थेने बेगमपूरा येथील स्मशानभूमी व त्या लगतची उद्यानाने आरक्षित जागा विकसीत करण्याकरिता मागणी केल्यावरुन प्रस्तावातील भ.क्र.१ ते ४ च्या अटी शर्तीच्या अधिन राहून जागा विकसीत करण्याकरिता देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०६/४८ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टाऊन हॉल येथील पोस्ट ऑफिस मागील कब्रस्तान विकसीत करणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.७,४२,८००/- चे सन १९९७-९८ च्या सा.बां.विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून सदर कामाचा खर्च "स्मशानभूमी" या लेखाशिर्षकातून करण्यात येणार आहे. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल येथील पोस्ट ऑफिस मागील कब्रस्तान विकसीत करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,४२,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०७/४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.व्यंकटेशनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,४०,७१७/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च "नवीन डांबरीकरण" या लेखा शिर्षकातून सन १९९९-२००० या सालाकरिता ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्यंकटेशनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,४०,७१७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०८/५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रीनगर, आदित्यनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां.खात्याच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.७,६०,०३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० च्या "नवीन डांबरीरस्ते" या लेखाशिर्षकातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनगर, आदित्यनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.७,६०,०३२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३०९/५१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, फारोळा जुने पंपगृह येथील १५०० के.व्ही. ए-३३ के.व्ही./०.४३३ के.व्ही. क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरचे ओव्हरहॉलींग करण्यासाठी ट्रान्सफॉर्मरचे उत्पादन करणाऱ्या कंपनीकडून प्राप्त दरानुसार रक्कम रु.१,२०,३९२/- एवढ्या किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास मा.आयुक्तांनी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतूदीमधून केला जाईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा येथील जुने पंपगृहातील १५०० के.व्ही.ए.३३ के.व्ही./०.४३३ के.व्ही.क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरचे ओव्हरहॉलींग करण्याकरिता तयार केलेल्या रक्कम रु.१,२०,३९२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१०/५२ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.मसनतपूर स्लम येथे अशोक नगर भागात दगडी गटारीवर स्लॅब टाकून रस्ता रुंदीकरण करणे बाबतच्या कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१७,५९,२२७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरील अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत

दि.२०.०५.९९ रोजी मंजूरी मिळालेली आहे. सदरील काम १८ खेडी विकास योजना आणि सन १९९९-२००० सालाच्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १३ (तेरा) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ (चार) निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.सोहेल सिद्दीकी | - | २१% कमी |
| २. | अे.आर.कंन्स्ट्रक्शन | - | २०% कमी |
| ३. | अब्दुल सलाम | - | १३.३% कमी |
| ४. | यात्रिब कंन्स्ट्रक्शन | - | ९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची असलेली श्री.सोहेल सिद्दीकी यांच्या निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.मसनतपूर स्लम येथे अशोकनगर भागात दगडी गटारीवर स्लॅब टाकून रस्ता रुंदीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची श्री.सोहेल सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३११/५३ :**

उपसंचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ४० फुट (प्रस्तावित ३२ फुट) रुंद रस्ता "मध्यवर्ती बस स्थानक" ते गरमपाणी या रस्त्याने एस.टी.महामंडळाची न.भु.क्र.२०७२६ ही मिळकत बाधित होते. रस्त्याने बाधित क्षेत्र २३८.०० चौ.मी.महानगरपालिकेने सन १९९४ मध्ये ताब्यात घेऊन रस्ता विकसीत केलेला आहे. सदर रस्त्याने बाधित भागाचे मूल्यांकन सहाय्यक संचालक, नगररचना, औरंगाबाद यांनी केलेले असून जानेवारी १९९४ रोजीचे मूल्यांकन रक्कम रु.१,७८,५००/- (एक लाख अठ्ठ्याहत्तर हजार पाचशे मात्र) निश्चित केलेले आहे.

करिता सदर रक्कम रु.१,७८,५००/- विभाग नियंत्रक, राज्य परिवहन औरंगाबाद यांना अदा करणेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.काशिनाथ कोकाटे :** जे प्रस्ताव ५ लाखाच्या आतील अंदाजपत्रक आहेत. अशा प्रस्तावास आजच मंजूरी देऊन लघुनिविदा काढून कार्यवाही करण्याची अंमलबजावणी व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ४० फुट (प्रस्तावित ३२ फुट) रुंद रस्ता मध्यवर्ती बस स्थानक ते गरमपाणी या रस्त्याने एस.टी.महामंडळाची बाधित मिळकत न.भु.क्र.२०७२६ चे एकूण क्षेत्र २३८.०० चौ.मी.चा मोबदला रक्कम रु.१,७८,५००/- चे एकूण क्षेत्र २३८.०० चौ.मी.चा मोबदला रक्कम

रु.१,७८,५००/- (एक लाख अठठ्याहत्तर हजार पाचशे मात्र) विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना अदा करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१२/५४ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पांढरा शर्ट, खाकी हाफ पॅन्ट, निळा स्कर्ट व पांढरा ब्लाऊज व निळी सलवार व पांढरा पंजाबी असे गणवेश खरेदीसाठी जाहिर निविदा स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन मागविण्यांत आल्या होत्या. एकूण अकरा निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी चार निविदा सर्व अटींची पुर्तता करणाऱ्या होत्या. १) महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळ, २) वासवानी ट्रेडर्स पुणे, ३) क्रिस्टल ॲपरान्स, ४) महिला आर्थिक विकास मंडळ निविदाधारकांनी दाखल केलेल्या नमुन्यांची पाहणीसाठी व निवडीसाठी मा.महापौर, सर्व पदाधिकारी तसेच मा.आयुक्त यांनी एकत्रिक रित्या नमुना पाहणी केली. प्राप्त दर व गणवेश नमुना यावर सर्वानुमते नमुना पाहणी केली. प्राप्त दर व गणवेश नमुना यावर सर्वानुमते वासवानी ट्रेडर्स पुणे यांचे गणवेश निवड करण्यांत आले. त्यानुसार निविदाधारकांच्या दराबाबत प्रत्यक्ष पुरवठाधारकांबरोबर चर्चा करुन वाटाघाटी अंती अंतिम केलेले नमुन्या नुसारचे दर खालीलप्रमाणे (सोबत तक्ता जोडण्यांत आलेला आहे.)

**<u>डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजना मध्ये झालेल्या वाटाघाटीचा सविस्तर तक्ता</u>**

| अ. क्र. | तपशिल/वय गट अ) मुलांसाठी खाकी | निविदा दर नमुना नं.११३५ | वाटाघाटी अंती दर | | रु.प्रती नग |
|---|---|---|---|---|---|
| १. | वय ५-६ प्रकल्प बालवाडी | ३१ | ३०.५०X२२१० | = | ६७४०५.०० |
| | | ३१ | ३०.५०X४२९ | = | १३०८४.५० |
| २. | ६-७ | ३३ | ३२.४५X२४१० | = | ७८२०४.५० |
| ३. | ७-८ | ३५ | ३४.४५X२६७५ | = | ९२१५३.७५ |
| ४. | ८-९ | ३७ | ३६.४०X२५७० | = | ९३५४८.०० |
| ५. | ९-१० | ३९ | ३८.३५X२५१० | = | ९६२५८.५० |
| ६. | १०-११ | ४५ | ४४.२५X१६५० | = | ७३०१२.५० |
| ७. | ११-१२ | ५१ | ५०.१५X१४५० | = | ७३७२०.५० |
| ८. | ११-१२ | ५१ | ५०.१५X११५० | = | ५७६७२.५० |

**ब) <u>मुलांसाठी पांढरा नमुना क्र.११४० हाफशर्ट</u>**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रकल्प बालवाडी | ३२ | ३४.१५X४२९ | = | १४९५०.०० |
| १. | ५-६ | ३६ | ३४.८५X२२१० | = | ७७०१८५.०० |
| २. | ६-७ | ४० | ३८.७५X२४१० | = | ९३३८७.५० |
| ३. | ७-८ | ४४ | ४२.६०X२६७५ | = | ११३९५५.०० |
| ४. | ८-९ | ४८ | ४६.५०X२५७० | = | ११९५०५.०० |
| ५. | ९-१० | ५२ | ५०.३५X२५१० | = | १२६३७८.५० |
| ६. | १०-११ | ६० | ५८.१०X१६५० | = | ९५८६५.०० |
| ७. | ११-१२ | ६८ | ६५.८५X१४७० | = | ९६७९९.७० |
| ८. | ११-१२ | ६८ | ६५.८५X११५० | = | ७५७२७.५० |

**क) मुलींसाठी निळा स्कर्ट नमुना क्र.११६२**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०-५ | ७० | ६७.००X२०३० | = | १३६०१०.०० |
| | प्रकल्प बालवाडी | ७० | ६७.००X४८० | = | ३२१६०.०० |
| २. | ५-६ | ७५ | ७१.५X२४८५ | = | १७८२९८.७५ |
| ३. | ६-७ | ८० | ७७.०X२५५५ | = | १९७७५७.०० |
| ४. | ७-८ | ८५ | ८१.५X२५७६ | = | २०९९५७.६० |
| ५. | ८-९ | ९० | ८६.५X१६८५ | = | १४५१६२.७५ |

**ड) मुलींसाठी पांढरे ब्लाऊज नमुना क्र.११२१**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०-५ | २६ | २५.०X२०३० | = | ५०९५३.०० |
| | प्रकल्प बालवाडी | २६ | २५.०X४८० | = | १२०४८.०० |
| २. | ५-६ | २८ | २६.८०X२४८५ | = | ६६८४६.५० |
| ३. | ६-७ | ३० | २८.८५X२५५५ | = | ७३७११.७५ |
| ४. | ७-८ | ३२ | ३०.७५X२५७६ | = | ७९२१२.०० |
| ५. | ८-९ | ३४ | ३२.७०X१६८५ | = | ५५०९९.५० |

**इ) मुलींसाठी निळा सलवार नमुना क्र.११४७**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९-१० | ६० | ५९.००X४१३ | = | २४३६७.०० |
| २. | १०-११ | ६५ | ६३.९० | = | |
| ३. | ११-१३ | ७० | ६८.५० | = | |

**ई) मुलींसाठी पंजाबी शर्ट नमुना क्र.११४१**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९-१० | ६० | ५०.००X६०० | = | ३५४००.०० |
| २. | १०-११ | ६५ | ६३.९०X१६०० | = | १०२२४०.०० |
| ३. | ११-१३ | ७० | ६८.८५X१५४० | = | १०६०२९.०० |
| ४. | ११-१३ | ७० | ६८.८५X१२२५ | = | ८४३४.२५ |

निविदेमध्ये नमूद केल्यानुसार कामधेनू योजने अंतर्गत (शा.नि.क्र.जी.इ.एन. १०९५/१६२/३४५ दिनांक १३.०७.९५) नगर विकास विभाग मंत्रालय निर्गमित आदेशानुसार ५०% काम पंजीकृत महिला उद्योजक तथा मंडळ यांना देणे आवश्यक आहे. त्यानुसार प्राप्त निविदेतील अटीची पुर्तता करणाऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळ यांना पत्र देऊन निवडलेले नमूने व वाटाघाटी अंती अंतिम करण्यांत आलेले दर यास अधिन राहून पुरवठा करण्या संदर्भात विचारणा केली होती. त्यानुसार त्यांनी सदरील काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.

वरीलप्रमाणे गणवेश खरेदीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजने अंतर्गत बालवाडी ते इयत्ता ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविण्यासाठी सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात रु.४० लाख तरतूद करण्यांत आली आहे.

गतवर्षी खरेदी करण्यांत आलेल्या शिल्लक निळ्या रंगाच्या कापडातून सर्वसाधारणपणे ४६३७ एवढे सलवार नग शिवून तयार होऊ शकतात त्यानुसार मुळ मागणी

तील तयार सलवार गणवेश खरेदीतून हे नग वगळून उर्वरित ४१३ नग तयार सलवार नगांचे आदेश देणेत येतील. गतवर्षीच्या महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे सलवार शिलाईचे मान्य दरानुसार ज्या एजन्सी मार्फत गणवेश शिलाई करणेत आली त्यांचेकडून रु.७.७० प्र.नग प्रमाणे उपरोक्त सलवार नग शिवून घेतले जातील व कापड उपयोगात आणल्या जाईल. एकूण तयार गणवेश खरेदीचे ५०% पुरवठा आदेश मे.वासवानी ट्रेडर्स पुणे व ५०% गणवेश पुरवठ्याचे आदेश महिला आर्थिक विकास मंडळास देणेत येतील.

उपरोक्त नुसार स.नं.१९९९-२००० या वर्षातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजने अंतर्गत खरेदीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यांची शिफारस मा.आयुक्तांनी केली आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त तयार गणवेश खरेदीसाठी रु.३३,२७,२२९.९०/- (प्रकल्प विभाग बालवाडी सहीत) व शिलाईसाठी रु.३५,७०५/- (सलवार) असा एकूण रक्कम रु.३३,६२,९३५/- अर्थात ३३,६३,०००/- रुपये खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :-</u>

**सौ.लता दलाल :** शालेय विद्यार्थ्यांना कपडे वाटपाची कार्यवाही लवकरात लवकर व्हावयास पाहिजे होती. आतापर्यंत मुलांना कपडे शिलाई करुन देण्यांत येत होते. प्रस्तावात रेडीमेड कपडे घेऊन वाटप करण्याची कार्यवाही होत आहे. हा बदल करण्यांस सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतलेली आहे काय? मागचा कपडा शिल्लक आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** १९९९-२००० चे आर्थिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांना रेडीमेड कपडे मागवून घेऊन कार्यवाही करण्या बाबत बैठक होऊन त्यात निर्णय झालेला आहे. कपडा घेऊन शिलाई बरोबर होत नसे त्यामुळे जिल्हा परिषदेच्या धर्तीवर यावेळेस रेडीमेड कपडे खरेदी करण्या बाबत कार्यवाही केलेली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकेत लोकनियुक्त बॉडी असतांना प्रशासकीय पातळीवर असे निर्णय घेणे योग्य वाटत नाही. सभागृहाने असे निर्णय घ्यावयास पाहिजे. त्यानंतर प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. सभागृहाची पध्दत ही प्रशासन मोडीत काढत आहे काय? सन १९९८-९९ साठी कपडा खरेदी करुन कार्यवाही झाली होती. शिल्लक असलेला ४,५०० मीटर कपडा कोठे पडून आहे. यांचा या प्रस्तावात उल्लेख नाही. शिल्लक असलेला एक वर्षापासून धुळ खात पडून आहे. तो पडून न ठेवता गरीब मुलांना साठी ही योजना आपण राबवतो असे असतांना कपडा पडून राहिलेला आहे. स.सदस्य श्री.इकबालोद्दीन यांनी दोन-तीन वेळेस नेहरुभवन येथील हॉलमध्ये पडदे लावण्याबाबत चर्चा केली. परंतू अद्याप पडदे लावण्याची कार्यवाही झाली नाही. आणि शालेय गरीब विद्यार्थ्यांना कपडे वाटपातील शिल्लक असलेला कपडा १ वर्षापासून तसाच पडून आहे. याचा विचार प्रशासन करत नाही काय? अधिकारी यांच्या निष्काळजीपणाने तो कपडा पडून राहिलेला आहे. गरीब होतकरु मुलांना त्या कपड्यातून कपडे वाटप व्हावयास पाहिजे होते. अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** दरवर्षी १५ ऑगस्ट पुर्वी शालेय मुलांना कपडे वाटप व्हावयास पाहिजे. परंतू तसा प्रस्ताव या वेळेस मंजूरीसाठी आलेला नाही. मुलांच्या कपड्याचा प्रश्न आहे. मुलांना कपडे वेळेवर वाटप व्हावे. ही संपूर्ण सभागृहाची इच्छा आहे.

या अगोदर कपडा घेऊन तो शिलाई करुन मुलांना कपडे वाटप होत होते. यावेळेस उशीर झालेला असून एक धोरणात्मक बाब म्हणून प्रशासनाने रेडीमेट कपडे खरेदी करुन कार्यवाही करण्याची निर्णय घेतला असेल. परंतू मागील वर्षीच्या ४,५०० मी.कपड्याचे काय करणार त्याचा कोठेही उल्लेख आलेला नाही. निविदा निघाल्यानंतर मी मा.आयुक्त मुख्य लेखाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले याची देखील नोंद नाही. तत्कालीन शिक्षण अधिकारी यांचा प्रस्ताव आहे. धोरणाची बाब आहे. मुलांना लवकर कपडे मिळावे यासाठी येत्या आठ दिवसांत तयार कपडे न घेता कपडा मागविण्याची कार्यवाही करावी. संचिकेत काही गडबड दिसते. शिल्लक कपड्याबाबतचा संबंधित अधिकारी यांनी कोठेही उल्लेख केलेला नाही. तो का केला नाही. शिक्षण अधिकारी यांची मा.आयुक्तांनी चौकशी करावी व तसे त्यांच्या विभागाला कळवावे. इतिवृत्तांची वाट न बघता निविदा काढण्यांत यावे. लवकरात लवकर कसे करता येईल ते पहावे तयार कपडे घेण्याचा प्रस्ताव असून कपडा खरेदी करण्याबाबत सर्वानुमते ठरलेले आहे.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरते की, शालेय विद्यार्थ्यांना रेडीमेड कपडे खरेदी करुन गणवेश वाटप करण्याचा प्रस्ताव रद्द करुन दरवर्षीप्रमाणे गणवेशासाठी आवश्यक असल्याने प्रशासनाने कपडा खरेदीबाबत निविदा मागवावी आणि लवकरात लवकर विद्यार्थ्यांना गणवेश वाटप होईल अशी व्यवस्था करावी. ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.३१३/५५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.४,२४,१२३/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालातील पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षकातून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,२४,१२३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१४/५६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.संत एकनाथ रंग को-ऑप.हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.४,४६,२६१/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च नवीन डांबरी रस्ते या लेखा शिर्षकातून सन १९९९-२००० या सालातील अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ को-ऑप हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,४६,२६१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१५/५७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बेगमपूरा येथे खाम नदीजवळील घरांच्या जवळ नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,१३,७००/- चे कामास स्थायी समितीने दि.२२.०६.९९ रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार जा.क्र./मनपा/निविदा/लेखा/२१/९९, दि.०२.०७.९९ अन्वये कोरी निविदापत्रके मागविली असता एकूण आठ (८) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी दोन (२) निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.स.फैजूल हक्क | - | ०.५% कमी दराने |
| २. | फाईव्ह स्टार कंन्स्ट्रक्शन | - | दोन दर दिल्याने व सही न केल्याने दर रद्दबातल असलेली ठरविले |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा श्री.फैजूलहक्क यांची आहे. वाटाघाटी नंतर सदरील निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने मा.आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. तरी सदरील निविदा विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपूरा येथे खाम नदीजवळील घरांच्या जवळ नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री.फैजुल हक्क यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१६/५८ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.हर्षनगर बौध्द विहाराजवळील अस्तित्वात असलेली १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यु.जी.लाईन काढून २५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाच्या सन १९९७-९८ वर्षाच्या दरसुचीनुसार रक्कम रु.२,२९,९७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

सदरील काम लेखाशिर्षक "देखभाल व दुरुस्ती" यातून प्रस्तावित केलेले आहे. मा.आयुक्तांनी सदरील प्रस्तावास दि.०५.०८.९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव विषय पत्रिकेतील अ.क्र.४४ वर आलेला असून मंजूर झाल्याने वगळण्यांत यावा.

**विषय क्र.३१७/५९ :**

उपसंचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मंजूर विकास योजने नुसार आरक्षण क्र.७८ प्रारुप विकास योनजे नुसार आरक्षण क्र.८० न.भु.क्र.१३४६० पैकी मध्ये असलेल्या अतिक्रमणाची मोजणी वजा करुन उर्वरीत आरक्षणातील खुले क्षेत्र ८०४.०० चौ.मी.व आरक्षणातील अस्तित्वातील रस्त्याचे क्षेत्र ६४८.०० चौ.मी. असे एकूण १४५२.०० चौ.मी.क्षेत्र मिळकतधारक दरगाह हजरत खाजा मोईनउल्ला शाह साहेब सजादा श्री.गुलाम अली पिता अब्दुल हमीद खाँन यांचेकडून खाजगी वाटाघाटीने घेण्याचे ठरले असून मोबदला रक्कम रु.१३,३२,३३५/- (तेरा लाख बत्तीस हजार तीनशे पस्तीस केवळ) एवढा निश्चित केला आहे. यावर खरेदीखत करुन घेण्यासाठी सुमारे १,२०,०००/- एवढा खर्च लागेल. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारक निम्मा निम्मा करणार आहेत. खर्चाची निम्मी रक्कम ही मोबदला रकमेतून वळती करुन घेण्यास मिळकतधारकाने संमती दिलेली आहे. म्हणजेच रक्कम रु.६०,०००/- वळते करुन घेतल्यास रक्कम रु.१२,७२,३३५/- (बारा लाख बहात्तर हजार तिनशे पत्तीस) हे मिळकतधारकास अदा करण्यांस व खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.१,२०,०००/- (एक लाख वीस हजार फक्त) अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देण्यांस प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

तसेच वरील ठरवलेली मोबदला रक्कम ही मिळकत धारकास तीन समान हप्त्यात देण्यांत येईल. त्यातील पहिला हप्ता मार्च-२००० पर्यंत अंदाजपत्रकीय तरतूद असल्यास अदा करण्यांत येईल. व उर्वरित दोन हप्ते जून व डिसेंबर २००० पर्यंत अदा करण्यांत येईल. जमीनीचा ताबा हा पहिला हप्ता देते. वेळेस महानगरपालिकेस सुपूर्द करावा. जर मावेजा देण्याच्या वेळी जमीनीवर अतिक्रमण झाले तर त्या क्षेत्राची किंमत मालकास दिल्या जाणार नाही. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद :-**

**मा.सभापती :** या अगोदर संबंधित कुणी जमीन मालकाला एकत्रित मोबदला देण्यांत आलेला आहे. प्रस्तावात तीन टप्प्यात मोबदला देण्या बाबत सुचविण्यांत आलेले आहे. माहिती द्यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** माझ्या मते जमीनी संदर्भात ज्या संचिका आहेत. त्या सर्वच संचिका मा.आयुक्तांकडे मंजूरीसाठी जात नाही अशी शंका येते. दुसरी बाब अशी की, सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्या होतात. परंतू संबंधित नगररचना विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्या बदल्या होत नाहीत. झाल्या तरी जाण्यास त्यांचा नकार असतो. अशी प्रशासनाची परिस्थिती झालेली आहे. पुढील बैठकीत शहरातील जेवढ्याही प्रायव्हेट बिल्डरला जमीनी दिलेल्या आहेत. त्याबाबतच्या सर्व माहिती सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावी व स.सदस्यांनी मागविलेल्या माहितीची लेखी स्वरुपात या विभागातून कार्यवाही झाली पाहिजे.

**मा.सभापती :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधितांस तीन वेळेस मोबदला न देता एकदम रक्कम अदा करावी व स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत ज्या त्या अधिकारी यांनी माहिती उपलब्ध ठेवली पाहिजे. तशी कार्यवाही करावी. आजच्या बैठकीत जे प्रस्ताव ५ लाखाच्या आतील रक्कमेचे आहेत. विकासाची कामे करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकारी यांनी ७ दिवसांची शॉर्ट टेंडर नोटीस काढून मंजूर केलेल्या प्रस्तावाबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र.७८ व प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र.८० न.भु.क्र.१३४६० पैकी आरक्षणातील खुले क्षेत्र ८०४.०० चौ.मी.व आरक्षणातील रस्त्याचे क्षेत्र ६४८.०० चौ.मी.असे एकूण १४५२.०० चौ.मी.जागा संपादन करण्याकरिता खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार मोबदल्याची एकूण रक्कम रु.१३,३२,३३५/- मधून खरेदी खताकरिता लागणाऱ्या एकूण रक्कम रु.१,२०,०००/- च्या निम्मी रक्कम रु.६०,०००/- वळती करुन मोबदल्याची उर्वरित रक्कम रु.१२,७२,३३५/- (बारा लाख बहाहत्तर हजार तीनशे पस्तीस) मिळकतधारक श्री.गुलाम अली शाह यांना अदा करण्यांस तसेच नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्याकरिता अग्रीम रक्कम रु.१,२०,०००/- श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

तसेच सदरील संचिकेत भूसंपादनासाठी सन १९९९-२००० च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतील दर्शविलेला शिल्लक रक्कम रु.३० लक्ष मधून मोबदल्याची संपूर्ण रक्कम रु.१२,७२,३३५/- एकाच वेळी डिसेंबर १९९९ पर्यंत कार्यालयीन कार्यवाही पूर्ण करुन अदा करण्यांस स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१८/६० :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.गौरीशंकर कॉलनी येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.४,५७,८२०/- चे सा.बां.खात्याच्या सन १९९७-९८ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामास दि.०६.०३.९९ विषय क्र.५५४/८ अन्वये स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. त्या नुसार सदरील कामाची निविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविली असता खालीलप्रमाणे तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.राणा कंन्स्ट्रक्शन | - | ०.१% कमी दराने |
| २. | श्री.कुलवंतसिंग | - | १०% जास्त दराने |
| ३. | श्री.बी.एम.काल्डा | - | ५% जास्त दराने |

प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा असून निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गौरीशंकर कॉलनी येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची मे.राणा कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३१९/६१ :**

(प्र.)कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.इंदिरानगर स्लम वॉर्ड क्र.२३ येथे विविध गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेच्या वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,९०,६५२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीत दि.१२.०५.९९ रोजी मंजूरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आले असता अंतिम

तारखेपर्यंत २८ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (७) निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ए.एम.फारुकी | - | ३४.५% कमी |
| २. | मन्नान खॉन | - | ३३.१०% कमी |
| ३. | आर.बी.चव्हाण | - | ३१.५०% कमी |
| ४. | फाइव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | - | ३०.१% कमी |
| ५. | नंदकुमार घोडेले | - | २४.२४% कमी |
| ६. | एस.ए.नवाब | - | २३.२३% कमी |
| ७. | एस.ए.सिद्दीकी | - | २१% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५% कमी दराची असलेली श्री.ए.एम.फारुकी यांची निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.इंदिरानगर स्लम वार्ड क्र.२३ येथे विविध गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** सभागृहातील उपस्थित असलेल्या अधिकारी, कर्मचारी सन्माननीय सभासद, पत्रकार बंधू या सर्वांना दसरा सणानिमित्त हार्दिक शुभेच्छा माझ्या व सभागृहाच्या वतीने देण्यांत येत आहेत.

याचबरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती (स्थायी समिती)
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०६.११.१९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शनिवार दिनांक ०६ जून, १९९९ रोजी मा.सभापती, श्री.नरसिंग मुरलीधर ढगे, यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | - | स.सभासद |
| २. | स.स.श्री. बचाटे राजकुमार (मामा) | - | स.सभासद |
| ३. | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर | - | स.सभासद |
| ४. | स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन | - | स.सभासद |
| ५. | स.स.सौ. राधाबाई तळेकर | - | स.सभासद |
| ६. | स.स.श्री. विखारोद्दीन पिता खुदबोद्दीन | - | स.सभासद |
| ७. | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | - | स.सभासद |
| ८. | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | - | स.सभासद |
| ९. | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | - | स.सभासद |
| १०. | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | - | स.सभासद |
| ११. | स.स.सौ. विमल नंदकुमार मुंडलिक | - | स.सभासद |

**संवाद :-**

**मा.सभापती :** महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी अर्धा तासाच्या वेळ देण्यांत येत आहे. सामाजिक बांधिलकी जोपसणारे स.सभासद श्री.राजकुमार बचाटे यांचे ४० व्या वाढ दिवसानिमित्त अभिनंदन करण्यां बाबत स. सभासद श्री. रविंद्र इंगळे यांनी मांडलेल्या सुचनेस स. सदस्या सौ. लता दलाल यांनी अनुमोदन दिले. सभागृहातर्फे श्री. बचाटे यांचे ४० व्या वाढदिवसानिमित्त एकमताने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

**सौ.लता दलाल :** अधिकारी मा.पदाधिकारी तसेच या सभागृहातील सर्व उपस्थितांना प्रथमतः दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा

**मा.सभापती :** स.सदस्या सौ.लता दलाल यांनी आताच दिपावलीच्या शुभेच्छा दिलेल्या आहे. त्याचप्रमाणे आजची बैठक दिपावलीच्या अगोदर एक दिवस म्हणजे पाहिल्या दिवशी होत असून सर्व सभागृहातील उपस्थितांना शुभेच्छा देऊन ही दिपावली सर्वांना सुखसमृध्दीची व आनंददायी जावोत.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिका अस्थापनेवर ६ महिन्यापुर्वी कनिष्ठ लिपिक पदे भरण्यासाठी लेखी, टंकलेखन, तसेच तोंडी मुलाखती घेण्यांत आलेल्या होत्या. मध्येच आचारसंहिता जारी झाल्याने अंतिम यादी लावण्यांस वेळ झ ाालेला आहे. मागील आठवड्यात सदर मुलाखती घेतलेल्या पैकी २२ उमेदवारांना रुजू करुन घेतलेले आहे. ही पदे भरती करतांना ज्यांना टंकलेखन येत नाही. त्यांना घेण्यांत आले. त्या २२ नियुक्ती केलेल्या उमेदवारांना पुन्हा लेखी, टंकलेखन व तोंडी मुलाखती दिवाळीनंतर लगेच ४-८ दिवसांनी घेण्यांत याव्यात. ज्या जी समिती गठन करण्यांत आलेली

आहे. यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. वरील सुचनेनुसार लगेचच कार्यवाही व्हावी. याबाबत चौकशी नको, मागे झोनल कमिशनरचे (श्री.जावरे साहेब) चौकशी बाबतचा अहवाल सभागृहाने मागविलेला होता अद्याप चौकशी होऊन अहवाल सभागृहाला प्राप्त झालेला नाही तसा प्रकार या प्रकरणामध्ये होऊ नये. पुन्हा लिपिक पदावर नियुक्त झालेल्याच्या मा.आयुक्त तसेच काही पदाधिकाऱ्यांच्या समक्ष मुलाखती घेवून चाचणी घेण्यांत यावी. याबाबत निर्णय लवकरच व्हावा. अशी कार्यवाही झाल्यास आम्ही खरे बोलतो की, खोटे हे सर्वांच्या निदर्शनास येईल.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** लिपिक भरतीमध्ये काही उमेदवार मुलाखत न घेताच घेण्यांत आलेले आहे.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** कनिष्ठ लिपिक पदावर ज्या उमेदवारांचे अंतिम यादीत नावे आलेली आहेत. ती सर्व अधिकारी यांच्या ओळखीचे जवळचे लोक लागलेले आहेत. चौकशी व्हावी.

**मा.सभापती :** लिपिक भरतीमध्ये ज्या उमेदवारांची नांवे आहेत. अशा उमेदवारांची पुन्हा मा.आयुक्त, पदाधिकारी, अधिकारी यांच्या समक्ष पुर्वीप्रमाणे मुलाखती घेण्यांत याव्यात असे. स.सदस्यांनी सुचविले आहे. परंतू तसे करता येणार नाही. याबाबत मा.आयुक्त यांनी सखोल चौकशी करुन नियमाने कार्यवाही करावी.

**सौ.लता दलाल :** चौकश्या अनेक होतात झोन आयुक्त (श्री.जावरे साहेब) यांच्या चौकशी बाबतचा अहवाल अद्याप पर्यंत झालेला नाही. मा.आयुक्त, काही पदाधिकारी व समितीतील सर्व अधिकारी यांना समक्ष बसवून त्यांच्या समक्ष २२ उमेदवारांच्या पुन्हा मुलाखती घेण्यांत याव्या.

**मा.सभापती :** या संदर्भात मा.आयुक्त यांच्याकडे काही स.सदस्यांचे आक्षेप आलेले आहेत. खरोखरच असा प्रकार झाला असेल तर गांभीर्याने घेण्यांत यावे. मा.आयुक्त यांनी कमिटीतील जे अधिकारी आहेत. त्यांची पुन्हा चौकशी करावी.

**श्री.विखारोद्दीन :** झोनल कमिशनरच्या चौकशी बाबत मा.आयुक्तांनी अद्यापपर्यंत चौकशी अहवाल दिलेला नाही.

**सौ.लता दलाल :** २२ लोकांची पुन्हा परिक्षा, चाचणी, मुलाखती घेण्यांत यावे. ६ महिनेनंतर चौकशी केली तर तो पर्यंत निवड झालेल्या उमेदवार टंकलेखन शिकून घेतो. जी मागणी स.सदस्यांनी केलेली आहेत ती लगेचच दिवाळीनंतर २-३ दिवसांनी या सर्वच्या सर्व २२ उमेदवारांच्या लेखी टंकलेखन व तोंडी मुलाखती व्हाव्यात. अशी पुन्हा मागणी आहे.

**श्री.इकबालोद्दीन स.अ. :** या प्रकरणामध्ये नगरसेवकांची बदनामी होत आहे. स.सदस्या सौ.लता दलाल यांनी सुचविल्यानुसार तशा प्रकारची कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** पुन्हा मुलाखती घेण्याबाबत दिरंगाई होऊ नये, दिवाळी झाल्यानंतर ११ तारखेच्या नंतर २ ते ३ दिवसांत पुन्हा मुलाखती घेण्याबाबत कार्यवाही प्रशासनाला करण्यांस आदेश द्यावेत. संबंधितांना रुजू होण्याबाबतचे आदेश पारित केलेले आहेत. उशिरा कार्यवाही झाल्यास लिपिक पदासाठी निवड केलेले उमेदवार न्यायालयात जाऊन स्थगिती आदेश आणू शकतील.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** स.सदस्या सौ.लता दलाल यांनी सूचना केल्यानुसार कार्यवाही व्हावी. यात चौकशी अहवाल द्यावा. निवड समिती सक्षम आहे किंवा नाही तसेच पुन्हा परिक्षा घ्यावी किंवा नाही याबद्दल निर्णय व्हावा.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचना केल्यानुसार मा.आयुक्त यांना सूचना देऊ इच्छितो की, लिपीक भरती प्रकरणात चौकशी रिपोर्ट येत्या २० तारखेपर्यंत सादर करण्यांत यावा. नियुक्ती केलेल्यांना टंकलेखन येत नाही तशी नोंद घेण्यांत येत आहे.

**सौ.लता दलाल :** चौकशी करण्याबाबतचे प्रशासनाने मत सादर करु नये. निवड झालेल्याच्या पुन्हा टंकलेखन लेखी, मौखिक मुलाखती कशा पध्दतीने घेता येईल व येत्या २० तारखेच्या आसपास कधी घेता येईल. याबाबतचा अहवाल सादर करावा. तत्कालीन आयुक्त श्री.वैद्य साहेब यांच्या अध्यक्षतेखाली जी प्रशासकीय समिती नेमलेली होती. त्यात आम्हाला गडबड वाटते. त्यासाठी विद्यमान आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली त्यात काही लोकप्रतिनधी, अधिकारी, एक ते दोन पदाधिकारी यांचा तसेच मा.सभापती यांचाही सदस्य म्हणून समावेश करुन पुन्हा परिक्षा घेण्यांत याव्या. संबंधित निवड झालेले उमेदवार न्यायालयात जाणार नाही. इतपत यासाठी वेळ लागू नये अशी विनंती आहे.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी येत्या २० तारखेपर्यंत तसा रिपोर्ट सादर करुन व त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** सर्वांना दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यांत आलेल्या आहे. त्यामुळे मी पुनरावृत्ती करित नाही. मागील आठवड्यात बोगस लिपिक भरती संदर्भात तसेच त्यात झालेल्या भ्रष्टाचार संबंधी स.सदस्यांनी आताच सभागृहात आपआपल्या परीने सूचना मांडलेल्या आहेत. गेल्या ४ ते ५ महिन्यापुर्वी वैद्य साहेब आयुक्त असतांना तसेच त्यावेळीही आपणच सभापती पदावर स्थानापन्न होता. मा.आयुक्त श्री.वैद्य साहेब हे कार्यरत असतांना त्यांनी जुनच्या १७ ते २१ तारखेच्या दरम्यान सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काही शिक्षक, अनुरेखक तसेच दै.वेतनावरील लिपिक पदाचे आदेश पारित केलेले होते. त्या संदर्भात सभागृहात मुद्दा उपस्थित केला. सखोल चौकशी करुन त्याचा अहवाल सभागृहात सादर करण्यांत येईल, असे आदेशित केलेले असतांना अद्याप अहवाल सादर झालेला नाही.

२) याच महिन्यांत गेल्या ४ ते ५ दिवसापूर्वी झोन क्र.३ मधील एक कर्मचारी आत्मदहन करणार अशी बातमी दै.सामना, दै.लोकमतला छापून येते. सदर कर्मचारी खरोखरच आत्मदहन करणार काय? ते का करणार काही पैशाचा अपहार झालेला आहे काय? अशी बातमी कळाली की, सदर झोनमध्ये काही रक्कमेचा अपहार झालेला आहे. त्यात कायमस्वरुपी २ कर्मचारी असून त्यांनी एका दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांवर वसुली रक्कमेची जबाबदारी सोपवलेली होती. भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले. त्यानुसार कुणावर प्रशासकीय कार्यवाही करावयाची म्हणून एका दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी केले. तोच कर्मचारी आत्मदहन करण्याच्या तयारित आहे. यात जबाबदारी म्हणून कायम स्वरुपी कर्मचारी यांना सोडून देऊन दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही प्रशासनाच्या माध्यमातून करणे योग्य आहे काय? याचा अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** झोन अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन खुलासा करता येईल. पुढील बैठकीत माहिती देण्यांत येईल.

**श्री.रविंद्र इंगळे :** झोनल कमिशनर कशासाठी नेमलेले आहे. झोनमध्ये काय प्रकार होतात, यांची माहिती झोन कमीशनरला नसते हे योग्य नाही त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** संबंधित झोन अधिकारी सांगतात माहिती देण्यांत येईल. ४ नोव्हेंबर च्या वृत्तपत्रात ही बातमी छापून आलेली असून आज दोन ते तीन दिवस झ ाालेले असून वृत्तपत्रात महानगरपालिकेच्या संदर्भात जी निवेदने ज्या बातम्या छापून येतात. त्यांचे कात्रण करुन त्याबाबतची माहिती ही मा.आयुक्त, उपआयुक्त किंवा मा.आयुक्त यांनी नेमून दिलेल्या अधिकारी यांच्याकडे त्याबातमी संदर्भात खुलासा करणे. जनसंपर्क अधिकारी यांचे काम असते तर वरील बातमी ही संबंधित अधिकारी यांनी मा.आयुक्त, उपआयुक्त यांच्या निदर्शनास का आणून दिली नाही. ज्या विभागाच्या संबंधात बातमी झाल्यास ती विभागप्रमुखाच्या निदर्शनास आणून देण्यांचे काम पी.आर.ओ.चे असून तेवढीच जबाबदारी त्या विभाग प्रमुखाची असून तशी काळजी त्या विभाग प्रमुखांनी घ्यावयास पाहिजे. "मला माहिती नाही, मी.माहिती घेऊन खुलासा करेन असे उत्तर अधिकारी यांनी देणे संयुक्तीक वाटत नाही."

**मा.सभापती :** जनसंपर्क अधिकारी यांनी ४ नोव्हेंबरची महानगरपालिका संबंधित बातमी मा.आयुक्तांना पुरविलेली आहे काय खुलासा करावा.

**जनसंपर्क अधिकारी :** महानगरपालिकेच्या संबंधित वृत्तपत्रात ज्याही बातम्या छापून येतात त्याबाबत प्रशासनाकडे माहिती पुरविल्या जाते. त्या बातमी संबंधी माहिती देण्यांत आलेली आहे.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** पी.आर.ओ.यांनी बातमी दिल्यानंतर झोनल कमिशनरला याबाबत माहिती असावयास पाहिजे. त्यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** झोनल कमिशनरकडे फक्त साफसफाई बाबतचे अधिकार देण्यांत आलेले आहे. प्रशासकीय बाबी बाबतचे व्यवहार हे उपआयुक्त व विभागीय अधिकारी यांच्याकडे आहेत. याबाबत योग्य खुलासा झोनल कमिशनर करु शकत नाही.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी याचा गैरसमज होतो. संबंध येत नाही तर अगोदर याबाबत मला माहिती नाही असे उत्तर देणे योग्य ठरले असते. परंतू पुढील बैठकीत माहिती देतो. असे सांगून सभागृहाची दिशाभूल करणे असा त्याचा अर्थ होतो. चांगले वाईट कामासाठी झोनल अधिकारी जबाबदार असतात. विभाग आयुक्त सुरत पॅटर्नची आहे. त्यांचे काय कार्यक्षेत्र आहे. या संदर्भात उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म.) :** स.सदस्यांनी सूचना केल्यानुसार वृत्तपत्रातील जी बातमी छापून आलेली आहे. त्या संदर्भात प्रशासनाने संवेदनशिलतेने दखल घेतलेली असून संबंधित झोनचे अधिकारी यांना संबंधातील कर्मचारी यांचेसह तात्काळ संपर्क साधून विचारणा करण्यासाठी मी माझ्या दालनामध्ये आज बोलावले आहे. नेमका काय प्रकार घडला याबाबत सविस्तर माहिती घेऊन कार्यवाही करता येईल. झोन अधिकारी मुंबईला गेलेले आहे असे समजले.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** ज्या कर्मचाऱ्यांला कामावरुन कमी करण्यांत आले हे योग्य आहे काय? वरीष्ठ कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झालेली नसून त्यांचे अधिकार, काय कार्यक्षमता काय बाबत उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** ज्या कर्मचाऱ्यांनी आत्मदहन करण्याबाबत वृत्तपत्रातून प्रसिध्द केले त्या संदर्भात मी ही चौकशी केलेली आहे. उपआयुक्त यांनी खुलासा न करता कायम स्वरुपी कर्मचारी, अधिकारी यांनी एका दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व्यवहाराचे काम कोणी दिले, पावती बुक कुणी दिले त्यात अपहार झालेला आहे काय, तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी रोजंदारी कर्मचाऱ्यांना अधिकारी कुणी द्यावयाचे सांगितले, मा.आयुक्त यांचे आदेश होते काय या सर्व बाबींचा सविस्तर अहवाल पुढील बैठकीत सभागृहात सादर करावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** झोन क्र.३ च्या संबंधित वार्डातील काही स.सदस्यांनी अधिकृत माहिती घेतलेली आहे. घेतलेल्या माहिती मध्ये व उपआयुक्त (म.) यांनी दिलेल्या प्रशासकीय माहिती मध्ये खूप फक्त तफावत दिसून येते. योग्य खुलासा अधिकारी यांनी पुन्हा करावा.

**सौ.लता दलाल :** आर्थिक बाबींच्या संदर्भात ज्या ठिकाणी भ्रष्टाचार व अपहार होतो. अशा वेळी चौकशी समिती नेमण्यांत येते काय? याही प्रकरणात चौकशी समिती नेमलेली आहे काय?

२) समिती नेमलेली असेल तर त्या समितीने तसा रिपोर्ट दिलेला आहे काय?

३) असे प्रकरण उघडकीस आले त्यावेळी पावती बुक कुणाकडे होते व कुणी आणून दिले ज्या चौकशी अधिकाऱ्यांनी नियुक्ती केली त्याचा रिपोर्ट उपआयुक्त (म.) यांच्याकडे आलेला आहे काय? बाब गंभीर असून याबाबत निश्चितपणे संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** आतापर्यंत बऱ्याच वेळा भ्रष्टाचार, रक्कमेचे अपहार झालेले महानगरपालिकेच्या विभागामध्ये आढळून आलेले आहे. त्यात पावती बुक, पाणीपट्टी, मालमत्ता कर इ.विभागाच्या समावेश येतो. कर्मचाऱ्यांवर अद्याप प्रशासनाने कोणतीही अंतिम कार्यवाही केलेली नाही. कर्मचाऱ्यांना कामावरुन काढण्यांत येते. पुन्हा कामावर घेण्यांत येते. सर्व अधिकारी यांना सांगू इच्छितो की, भ्रष्टाचारा संबंधी पुन्हा महानगरपालिका अधिकारी, व प्रशासनाची व लोकप्रतिनिधी यांची बदनामी होते. त्यासाठी अधिकारी यांनीच योग्य कार्यक्षमतेने प्रशासनातील जबाबदारीची कामे हातळली पाहिजे. जे रक्कमेच्या अपहाराचे प्रकार घडतात त्यात अधिकारी यांचे रोजच्या रोज कलेक्शन केलेले दिसून येत नाही. किती पैसे झाले किती जमा केले याचा हिशोब झोन अधिकारी रोजच्या रोज ठेवला पाहिजे. व जातीने लक्ष द्यावे. दैनिक वेतनावरील कर्मचारी यांच्याकडे कामे देणे योग्य आहे काय? काही अनुचित प्रकार घडल्यास त्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करता काय? या सर्व बाबींचा विचार प्रशासनाने करावयास पाहिजे. यापुढे प्रत्येक झोन अधिकारी यांनी रोजच्या रोज झालेली वसुली मुख्य इमारतीतील संबंधित कार्यालयात कशी जमा करता येईल. तशी दक्षता घ्यावी यापुढे असे प्रकार घडल्यास संबंधित झोन अधिकारी यांच्यावर प्रथम कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी सुचवल्यानंतर संबंधित झोनमध्ये जे कर्मचारी वसुलीसाठी होते. कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही न होता दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांवर का कार्यवाही झालेली आहे. यातील दोषी कोण याबाबत चौकशी करावी दोषी व्यक्तींवर कार्यवाही व्हावी. उपआयुक्त (म.) यांनी सविस्तर माहिती पुढच्या बैठकीपर्यंतच द्यावी.

**श्री.विखारोद्दीन :** शहरातील स्मशानभूमी, कब्रस्तानच्या जमीन संरक्षणासाठी चौकीदार नेमण्या बाबतचा निर्णय घेतलेला होता. अद्याप कब्रस्तान मध्ये चौकीदार नेमलेले नसून शहरातील एकूण कब्रस्तान, व स्मशानभूमी किती आहेत यांची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** सहाय्यक आयुक्त-२ यांनी माहिती द्यावी.

**सहाय्यक आयुक्त-२ :** चौकीदारांची पदे भरण्याबाबत सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली असून लवकरच कब्रस्तान मध्ये चौकीदाराच्या नेमणूका करण्यांत येणार आहे.

**मा.सभापती :** शहरातील काही स्मशानभूमी मध्ये चौकीदाराची पदे भरलेली आहे. १ महिन्याच्या आत चौकीदार देण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** दिनांक १८.१०.९९ च्या बैठकी अगोदर जी बैठक झाली. त्या बैठकीत शहरातील खाजगी बिल्डरांना ज्या ज्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिलेल्या आहेत. त्या कोणकोणत्या प्रभागात देण्यांत आलेल्या आहेत. किती देण्यांत आलेल्या आहे. याबाबत सविस्तर माहिती स.सदस्यांना संबंधित अधिकारी यांनी एक बैठक सोडून दुसऱ्या बैठकीत देण्यांत यावी. असे मा.सभापती यांनी आदेशित केले होते. अद्याप माहिती पुरविलेली नाही. गेल्या ८ दिवसापासून दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात प्रत्येक दिवशी जयहिंद कॉलनीतील जागे बाबत क्रमशः ६-७ भाग छापून झाले आहे. याजमीनी बाबतचाही खुलासा केला नाही. दैनिकाच्या माध्यमातून हे उघडकीस येत आहे. १५ दिवसांपूर्वी माहिती दिली असती तर खरी बाब वेळीच समजली असती. नेमकी काय बाब आहे. याचा संपूर्ण कागदपत्रांसह खुलासा करावा. अधिकाऱ्यांच्या आर्शिवादानेच शहरात मागील बैठकीत क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता रुंदीकरणासाठी अतिक्रमण संदर्भात चर्चा झालेली होती. अधिकारी यांच्याकडून योग्य उत्तर मिळत नसल्याने सगळेच या विभागा संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यांत कंटाळलेले आहेत. सभापतींनी सभागृहात आदेश देऊन ज्या त्या विभागातील अधिकारी त्यांचे काटेकोरपणे पालन करत नाही. ही नेहमीचीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. अधिकारी पालन करत नसतील तर त्या संबंधात वेगळ्या प्रकारची कार्यवाही करण्यांचे निर्णय या सभागृहाला घ्यावे लागतील याची नोंद घ्यावी.

**मा.सभापती :** यापुर्वीच्या एक बैठकी अगोदर नगररचना विभागाकडून खुलासा मागितला होता. स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केल्यानुसार शहरातील किती बिल्डरांना जमीन विकासीत करण्यासाठी दिलेल्या आहे. त्यांनी प्रशासनाच्या नियमाचे पालन केलेले आहे काय? नियमाने जागा सोडलेल्या आहेत काय? योग्य सुविधा दिलेल्या आहेत किंवा कसे, विकास कामाचा दर्जा कसा आहे? याबाबत सविस्तर माहिती सर्व्हे नंबर सहीत स.सभासदांनी मागविलेली होती. त्यानुसार संबंधित विभागाचे अधिकारी यांना एक बैठक सोडून दुसरी येणारी बैठकीमध्ये त्या संदर्भात माहिती द्यावी असे आदेश दिलेले असतांना

अद्याप माहिती मला दिलेली नाही व स.सदस्यांनाही दिलेली नाही. तसेच क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता रुंदीकरणाच्या बाबतीतही चर्चा होऊन योग्य माहिती मागविली असता माहिती दिलेली नाही. तसेच क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता रुंदीकरणाच्या बाबतीतही चर्चा होऊन योग्य माहिती मागविली असता माहिती दिलेली नाही. खुल्या जागा १५% च्या १०% केल्या अशा किती खुल्या जागा आहेत. याची माहिती देण्यांत यावी.

**उपसंचालक, नगररचना :** स.सभासद श्री.देशमुख यांनी पत्र देऊन माहिती मागविलेली होती. त्यानुसार त्यांच्या पत्राच्या उत्तरी दि.०२.११.१९९९ च्या पत्राने विभागातर्फे माहिती दिलेली आहे. व त्याची एक प्रत नगरसचिव यांच्याकडे दिलेली आहे. शहरात तीन डेव्हलपमेंट प्लॅन झालेले आहेत. नेमकी कोणत्या प्लॅन बाबत माहिती पाहिजे याचा बोध होत नसल्याने उशीर झालेला आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहे. स.सदस्य श्री.व्ही.व्ही.देशमुख यांनी त्यांचे वैयक्तिक माहिती अधिकारी यांच्याकडे मागविल्यानुसार त्याचे उत्तर दिलेले आहे. परंतू बैठकीत असे ठरले होते की, शहरातील ज्या मनपाच्या व खाजगी मालकीच्या जागा खाजगी बिल्डरांना विकसीत करण्यासाठी दिलेल्या आहे. त्या किती दिल्या, कोठे दिल्या त्यांचे योग्य नियमाने पालन होते काय? ओपनस्पेस किती टक्के सोडलेले आहेत याबाबतची संपूर्ण शहरातील सर्व्हे नंबर सहीत माहिती देण्यांचे आदेश सभापतींनी दिलेले होते. त्यानुसार माहिती दिलेली नाही.

**सौ.लता दलाल :** नगरपरिषदेच्या काळात ३०% खुली जागा सोडून उर्वरित जागा विकसीत करण्यास मान्यता होती. त्यानंतर नगरपालिकेच्या काळात ५% वर झाली. सन १९९० नंतर १५% वरुन १०% झाली. नगरपरिषदेच्या काळ सोडला तरसन १९८२ ते नवीन शासनाचे आदेश निघेपर्यंत काहींनी नियमाने १५% जागा सोडण्याबाबत हस्तक्षेप करायचा नव्हता. काही बिल्डरांचा फायदा आलेला आहे. ५% चा फायदा नगररचना विभागातून देण्यांत आला. या संबंधित सविस्तर माहिती स.सभासदांना देण्यांत यावी.

**उपसंचालक, नगररचना :** याबाबत सर्व माहिती तयार आहे. नेमकी कोणती माहिती पाहिजे याची कल्पना नसल्याने ती देऊ शकलो नाही.

**श्री.व्ही.व्ही.देशमुख :** नगररचना विभागाकडून मी दिलेल्या पत्रानुसार माहिती देण्यांत आली ती सविस्तर नाही. शहरातील जागा विकसीत करतांना १०%, १५% प्रमाणे ओपन स्पेस किती आहे. अशा किती लोकांना फायदे दिल्या गेले. यांची माहिती विचारलेली होती. जी माहिती संबंधित अधिकारी यांनी दिली ती फक्त १४ जागेच्या प्रकरणा बाबतीत दिलेली आहे.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी मागील बैठकीत उपस्थित नव्हते. परंतू एक बैठक सोडून म्हणजे आजच्या बैठकीत विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती अधिकारी यांनी द्यावयास पाहिजे होती. पुढील बैठकीपासून असे होता कामा नये. स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अधिकारी यांनी केली पाहिजे नसता या सभेच्या निर्णयाला काहीच किंमत नाही असा त्याचा अर्थ होतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सभागृहात एखाद्या विषयावर चर्चा झाल्यानंतर इतिवृत्तात नोंद होऊन पुढील बैठकीपर्यंत इतिवृत्त तयार करुन संबंधित विभागाकडे पाठविण्यांत येते. त्यावेळी त्या त्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभाग संबंधात काय नोंद झालेली आहे हे पाहणी करण्याचे काम आहे. स.सभासदांना

नेमके काय उत्तर पाहिजे हे माहिती नव्हते असे उत्तर अधिकाऱ्यांनी देणे योग्य वाटत नाही. जयहिंद हाऊसिंग सोसायटीच्या संदर्भात ४ ते ५ दिवस वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. त्या संदर्भात अधिकारी यांनी खुलासा करावा. विनंती की, नगररचना विभागा संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यासाठी एक विशेष बैठक आयोजित करण्यात यावी त्यानुसार अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**श्री.रविंद्र इंगळे :** एक विशेष बैठक नगररचना विभागाच्या संबंधात प्रश्न विचारण्यासाठी बोलवण्यांत यावी.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या मागणीनुसार नगररचना विभागाच्या संबंधित प्रश्न उपस्थित करण्यासाठी एक विशेष सभेचे आयोजन करण्यांत येईल.

**सौ.लता दलाल :** विधी सल्लागार बैठकीत उपस्थित नाही. उपआयुक्त यांनी मागील बैठकीत सांगितले होते की, मी उपस्थिती नसल्यास दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे त्याबाबतचा चार्ज दिला जाईल. परंतू आज उपआयुक्त (प्र.) ही उपस्थित नाही. स.सदस्यांना त्या विभागा संदर्भात प्रश्न उपस्थित करावयाचा झाल्यास कोण उत्तर देणारा अधिकारी खुर्चीसाठी भांडतात. परंतू सभागृहात उपस्थित राहण्यात टाळाटाळ करतात हे योग्य नाही जे अधिकारी विना परवानगीने अनुपस्थित असतील त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** जे अधिकारी आजच्या बैठकीत परवानगी न घेता अनुपस्थित असतील व त्यांनी त्यांच्या कामाचे स्वरुप न दाखवता गैरहजर राहणे योग्य नाही. प्रशासनाच्या माध्यमातून अनुपस्थित अधिकाऱ्यांना नोटीस देऊन कार्यवाही करावी. स.सदस्यांनी मुद्दा उपस्थित केल्यानंतर ज्या ज्या बाबतीत माहिती मागवली ती वेळेवर द्यावयास पाहिजे जसे नगररचना विभागाकडून मागील बैठकीत मागवलेली माहिती अद्याप दिलेली नाही. असे होत असेल तर यासाठी स्थायी समिती सभागृहाला प्रशासनामार्फत अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची वेळ येऊ देऊ नये. तसे केल्यास अधिकाऱ्यांना स्थायी समितीचा निर्णय कटू लागेल, वाईटही वाटेल याबाबत अधिकारी यांनी दक्ष रहावे. मी आदेशित केल्यानंतर ती माहिती ज्या त्याच बैठकीत मिळावयास पाहिजे नाही तर अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्या संदर्भात सभागृह जो निर्णय घेईल तो आपणांस मान्य करावा लागेल. आताच काही स.सदस्यांनी नगररचना विभागाचा प्रश्न उपस्थित केला. यासाठी स्पेशल बैठक घेण्याचे ठरवले असून या बैठकीत प्रशासकीय विभागाचाही समावेश राहील. ही बैठक दिवाळीनंतर दोन दिवसांनी घेण्याचा निर्णय घेऊ. वृत्तपत्राच्या जाहिराती संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा केली. दररोज महापालिकेच्या बदनामी कारक बातम्या छापल्या जातात. ज्या बातम्या येतात त्याबद्दल जनसंपर्क अधिकारी हे माननीय आयुक्तांना खुलासा का करत नाही. ज्या काही बातम्या आलेल्या आहेत. त्या पुराव्यासहीत आलेल्या आहेत. बातमी बाबत मनपा कार्यालयाचे काम खुलासा करण्याचे आहे. गेल्या ७ दिवसांच्या बातम्यांचा खुलासा केलेला नाही. आजच्या स्थितीला माझ्या समोर संबंधित विषयाची माहिती जरी नसेल तरी प्रशासनाच्या माध्यमातून या वृत्तपत्रातील बातम्याची दखल घेतलेली नाही. त्यामुळे मी नाराजी व्यक्त करतो. श्री.पाडळकर यांच्या संबंधित बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. त्यांचे होत असलेले बांधकामास प्रशासनातर्फे स्थगिती देण्यांत यावी तशी त्यांना नोटीस

देऊन कार्यवाही करावी व ज्या प्रश्ना संबंधित माहिती अद्याप दिलेली नाही ती मा.आयुक्त यांनी पुढील बैठकीत सादर करावी. पत्रकारांनी चुकीची बातमी छापल्यानंतर त्यांच्यावरही प्रशासनातर्फे कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**श्री.तुळशीबागवाले :** दिनांक १८.१०.९९ च्या सभेत न.भु.क्र.१३४६० पैकी जागा संपादन करण्याचा ठराव मंजूर झालेला आहे. १०.०१२.८१ रोजी ही जमीन संपादन केल्याची माहिती मिळाली आहे.

**मा.सभापती :** प्रशासनातर्फे हा प्रस्ताव मंजूरीसाठी आलेला होता. तो सभागृहात पारित ही केला परंतू काही स.सभासदांनी तसेच स.सदस्य श्री.लाहोट तसे आपणही या प्रस्तावा संबंधातील वेगळ्या प्रकारे माहिती दिली. त्यानुसार प्रस्ताव मंजूर झाल्याची प्रत संबंधितांना देण्यांत येणार नाही. संबंधित अधिकारी श्री.चौथाई यांना मी सांगितलेले आहे या प्रस्तावा संबंधित खरा काय प्रकार आहे तसे पत्र मला द्यावे. नगररचना विभागाचा योग्य खुलासा झाल्यानंतरच या प्रस्तावानुसार पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** झोनमध्ये (अंतर्गत) ड्रेनेज लाईनची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी फक्त ३ कर्मचारी देण्यांत आलेले असून सदर कर्मचाऱ्यांना वेळोवेळी काम हाताळणे शक्य होत नाही.

**मा.सभापती :** ड्रेनेज, पाणीपुरवठा लाईन च्या बाबतीत महापालिका कर्मचाऱ्यांकडूनच काम करुन घ्यावयाचे किंवा कसे याबाबत मा.आयुक्त यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** अशी माहिती मिळाली की, ७०० ते ८०० रेटलिस्ट तयार होऊन पडली आहे हा काय प्रकार आहे.

**सौ.लता दलाल :** महानगरपालिका वाचनालयात दै.वेतनावर काही कर्मचारी १६ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांना दै.वेतनावर एकूण महिन्यासाठी रु.१५००/- वेतन मिळत असे. परंतू त्यांनी दैनिक वेतनावरुन ठराविक वेतन रुपये ७०० वर आणलेले आहेत. रु.१५००/- चे रु.७००/- करण्यांत आलेले असल्यामुळे त्या कर्मचाऱ्यांनी अद्याप या महिन्याचे वेतन घेतलेले नाही. त्या संदर्भाची संचिका आपल्याकडे आलेली आहे. दैनिक वेतनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे याही कर्मचाऱ्यांकडून कामे करुन घेतली जाते. दिवसेंदिवस वाचनालयाच्या नवीन शाखा उघडण्यांत येत आहे. मध्येच अशा प्रकारचे अचानक निर्णय घेण्याचे कारण काय? याचा खुलासा करावा.

**प्र.शिक्षणाधिकारी :** सदर कर्मचाऱ्यांना दै.वेतनावरुन ठराविक वेतन रु.७०० वर घेणे हा प्रशासनाचा निर्णय योग्य नाही असा निर्णय घेणे चुकीचे वाटते. या संदर्भात कर्मचाऱ्यांनी दैनिक वेतनावर घेण्याबाबत मागणी केलेली आहे. त्याबाबतचा योग्य खुलासा मा.आयुक्तांकडे पाठविण्यांत आलेला आहे. मा.आयुक्त तसेच उपआयुक्त (म.) यांची चर्चा झालेली आहे. लवकरच निर्णय घेऊन तशी कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** दै.वेतनावरुन ठराविक वेतन रु.७०० वर घेणे योग्य नाही. त्यांना पुन्हा दैनिक वेतनावर घेण्याबाबत कार्यवाही करावी. त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** अस्थापनामधून वर्ग-३ च्या दैनिक / ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देत असतांना संबंधित अस्थापनामधील क्लार्क/टायपीस्ट मनमानी पणाने ठराविकचे दैनिक व दैनिकचे ठराविक

वेतनावर ओळखीने आदेश काढण्याची कार्यवाही करतात. त्यामुळे वरील अधिकाऱ्यांकडे संचिका गेल्यानुसार तशी मंजूरी मिळते व तसे आदेश पारित होतात. असे समजते. मागील महिन्यात वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार संदर्भ दाखवून दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांना ७५/- रुपये दैनिक वेतन देण्याबाबत प्रशासनातर्फे आदेश पारित करण्यांत आलेले आहे. परंतू जे वर्ग-३ मधील ठराविक वेतनावरील कर्मचारी आहेत. त्यांचा सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार विचार झालेला नाही. त्यांना दैनिक वेतनावरील शिपायापेक्षाही कमी वेतन मिळते. काही कर्मचाऱ्यांनी ओळखीने त्यांचे आदेश दैनिक वेतनावर काढून घेतलेले आहेत. ही प्रशासनाची पध्दत योग्य वाटत नाही. लिपिक संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर द्यावे व वर्ग-३ मध्ये काही कर्मचारी वेगवेगळ्या महत्वाच्या पदावर कामे करतात. त्यांच्या कामाचा दर्जा त्या पदाचे महत्व, त्यांना त्या त्या पदाचा तुलनेत देण्यांत येणाऱ्या वेतनाचा विचार करुन त्यांना दैनिक/ठराविक वेतन देण्याबाबतची कार्यवाही व्हावयास पाहिजे.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.कोकाटे यांनी मांडलेल्या वरील सूचनाची मा.प्रशासनाने दखल द्यावी व तशी नियमाने कार्यवाही करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** बायजीपुरा येथील जागा संपादित केली जमीन मालकाचे निधन झाले. त्यांच्या मुलांचे नाहकरत पत्र घेऊन त्यांच्या पत्नीच्या नांवे मोबदला अदा करावा.

**मा.सभापती :** मा.न्यायालयाकडून त्यांना वारस पत्र आणावे लागेल.

**विषय क्र.३२०/१ :**

दिनांक १८ ऑक्टोंबर, १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**श्री.विखारोद्दीन :** पृष्ठ क्र.३ वर क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता रुंदीकरण करण्या बाबत महानगरपालिकेचे काही कर्मचारी अतिक्रमण काढण्यासाठी गेलेले होते. कार्यवाही न होताच पुन्हा पथक मागे आले, का कार्यवाही झाली नाही याचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** आपण केलेला प्रश्न नगररचना विभागा संबंधित असून याबाबत आपण एक विशेष (स्पेशल) बैठक घेण्याबाबत निर्णय घेतलेला असून त्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करावा.

**श्री.विखारोद्दीन :** पृष्ठ क्र.१४ वर स्मशानभूमी न होण्याबाबत १९८५ ला स्टे आलेला होता. परंतू तो अस्तित्वात नाही असे सांगण्यांत आले होते. अद्याप पुढील कामाबाबत कार्यवाही केलेली नाही. खुलासा करावा.

**मा.सभापती :** मागील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे तसे आदेश संबंधित ठेकेदाराला देण्यांत आलेले आहे.

**श्री.कोकाटे काशिनाथ :** मागील बैठकीत सर्व विषयांना स्विकृतीसह मंजूरी देऊन तात्काळ निविदा काढून कार्यवाही करण्याचे आदेश देण्यांत आलेले आहे. आतापर्यंत किती प्रस्तावा संदर्भात निविदा काढलेल्या आहेत.

**श्री.विखारोद्दीन :** कब्रस्तानच्या जागेवर अतिक्रमण करुन एक रुम (खोली) बांधण्यांत आली असून सभागृहात याबाबत चर्चा होऊन कार्यवाही केलेली नाही. खुलासा करावा.

**मा.सभापती :** या विषयाबाबत आपण स्पेशल बैठकीमध्ये मुद्दा उपस्थित केल्यास योग्य खुलासा घेण्यांत येईल.

**श्री.विखारोद्दीन :** पृष्ठ क्र.७ वर ज्या लोकांकडे चांगल्याप्रकारे विटाची, सिमेंटची पक्के घर आहेत. अशा लोकांना सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा फायदा मिळत असून अशाच लोकांच्या संचिका ओळखीने बँकाकडे पाठवल्या असे समजते. १५ ते २० लोकांनी दबावाखाली संचिका मंजूर केल्या आहे. ज्यांच्या फाईली बँककडे गेलेल्या आहेत. त्या सर्व कर्ज मंजूरीसाठी विभागामार्फत कार्यवाही होते काय? प्रत्येक व्यक्तींला कर्ज स्वरुपात किती रक्कम मिळणार आहे.

**प्रकल्प संचालक :** गृह भेटीनंतरच अनुदान वितरीत पत्र देण्यांत येईल. संचिका बँकेकडे पाठविण्याचे काम आपले असून कर्ज मंजूर करण्याचे सर्व अधिकार बँकाना दिलेले आहे, त्यानुसार कार्यवाही होईल. संचिका फेब्रुवारी मध्ये गेल्या होत्या. स.सदस्यांना चुकीची माहिती मिळालेली आहे. कुणाचाही दबाव या प्रकरणाच्या बाबतीत आलेला नाही.

**मा.सभापती :** ज्या स.सदस्यांनी त्यांच्या वार्डात या योजने बाबत योग्य प्रकारे कार्यवाही न झाल्याची तक्रार केलेली असल्यास त्यानुसार त्या त्या वार्डात स.सदस्यांनी सुचवलेल्या नावाची प्रत्यक्ष त्या प्रभागात पाहणी करुन खरोखरच ज्याचे घर चांगल्या प्रकारचे असून त्यांनाही या योजनेचा लाभ होत असेल तर ते योग्य नसून त्याची चौकशी करण्यांत यावी.

**सौ.लता दलाल :** आतापर्यंत बँकेकडे संचिका कशा पध्दतीने पाठविण्यांत आल्या आहेत. उर्वरित संचिका पुन्हा बँकेकडे मंजूरीसाठी दबावाखाली येऊन पाठवलेल्या आहेत असा आमचा आरोप आहे.

**प्रकल्प संचालक :** या प्रकरणा संबंधी कुणाच्या दबावाखाली कामे केलेली नाहीत. ज्या १३५ संचिका बँकेकडून कर्ज मंजूरी होऊन झालेल्या आहेत. त्याबाबतचे तसे रेकॉर्ड बँकेने आपल्या विभागाकडे दिलेले आहेत.

**श्री.विखारोद्दीन :** कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग प्रत्यक्ष कधी लागू करणार. याबाबत काही कर्मचारी, लोकप्रतिनिधीकडे मागणी करतात खुलासा करावा. त्याचप्रमाणे दिवाळीनिमित्त कर्मचाऱ्यांना बोनस वाटप करणार किंवा काय खुलासा करावा.

**मा.सभापती :** ५ व्या वेतन आयोग लागू करण्या बाबतची संचिका मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे आहे. महापालिकेचे पदाधिकारी, संबंधित अधिकारी तसेच जेष्ठ स.लोकप्रतिनिधी मा.आयुक्त लवकरच त्या संदर्भात चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री महोदय यांचेकडे जाणार असून त्यानंतर लगेचच निर्णय घेण्यात येईल. कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत मान्यता मिळालेली आहे. आज कर्मचाऱ्यांना नियमाने बोनस वाटप करण्यांत येणार आहे.

**श्री.एकबालोद्दीन स.अ.:** पृष्ठ क्र.१० वर बारुदगर नाल्यालगत गादीया बिल्डरने जास्तीच्या क्षेत्रात बांधकाम केल्याबाबत मागील बैठकीत चर्चा होऊन कार्यवाही करण्याचे आदेश देण्यांत आलेले होते. संबंधित अधिकारी यांनी अद्याप पर्यंत कार्यवाही केलेली नाही. संबंधितांनी परवाच्या रोजीच आणखी मनपाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे.

**मा.सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी योग्य चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करावी. याच बरोबर विषय क्र.१ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दि.१८ ऑक्टोंबर, १९९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३२१/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.तक्षशिलानगर येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून नवीन २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रु.१,४१,७००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील काम लेखाशिर्षक देखभाल व दुरुस्ती १९९९-२००० यातून प्रस्तावित केलेले आहे. मा.आयुक्तांनी दिनांक २१.१०.९९ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तक्षशिलनगर येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन काढून नवीन २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,४१,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२२/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी फारोळा व क्रांतीचौक येथील मोटारींना लागणाऱ्या कार्बन ब्रेशसचा पुरवठा करण्यासाठी बाजारातील दराप्रमाणे रक्कम रु.१,३०,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा खर्च हा देखभाल व दुरुस्ती पाणी पुरवठा योजना या आर्थिक तरतूदीतून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रु.१,३०,०००/- च्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी फारोळा व क्रांतीचौक येथील मोटारींना लागणाऱ्या कार्बन ब्रशेसचा पुरवठा करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,३०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२३/४ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी जुने पंप हाऊस येथील ४०० अ.श.मोटारची रिवायंडींग व दुरुस्ती करण्यासाठी बाजारातील दराप्रमाणे रक्कम रु.१,९४,७५०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदर कामाचा खर्च देखभाल दुरुस्ती पाणी पुरवठा

योजना या आर्थिक तरतूदीतून करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,९४,७५०/- च्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी जुने पंप हाउुस येथील ४०० अ.श.मोटारची रिवायंडींग व दुरुस्ती करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,९४,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२४/५ :**

सिडको हडको पाणी पुरवठा जलवाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी ८०, १००,१५०,२००,२५०,३००,३५०,४००,४५०,५०० मी.मी.व्यासाचे स्लुस वॉल्व मागविण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.६,३८,२७४/- चे तयार करण्यांत आलेले आहे. सदर अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन १९९८-९९ चे दरसुचीनुसार तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामावर होणारा खर्च हा पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षातील १९९९-२००० या वर्षातील तरतूदीमधून करण्यांत येत आहे. प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. तरी स्लुस वॉल्व खरेदी करण्याकरिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,३८,२७४/- चे मंजूरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजूरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको-हडको पाणी पुरवठा जलवाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी ८०,१००,१५०,२००,२५०,३००,३५०,४००,४५०,५०० मी.मी.व्यासाचे स्लुस वॉल्व खरेदी करण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.६,३८,२७४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२५/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आंबेडकरनगर येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रु.३,०२,६००/- चे सा.बां.विभाग चे सन १९९७-९८ चे दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असून त्यास मा.आयुक्तांची दि.२२.१०.९९ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

करिता अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,०२,६००/- चे मंजूरीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर येथील स्मशानभूमीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,०२,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२६/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, जाफरगेट कब्रस्तान येथे रेस्टींग शेड बांधणे व संरक्षित भिंत बांधणेच्या अंदाजपत्रक रक्कम रु.४,२०,२००/- ला स्थायी समिती सभा दि.२२.०६.९९ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/२१/९९, दि.०२.०७.९९ अन्वये लेखा विभागाने निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेला एकूण १९ निविदा विक्री झाल्या. पैकी पाच निविदा प्राप्त

झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दि.१६.०९.९९ रोजी उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इंडियन कंन्स्ट्रक्शन | - | ३०.८७% कमी |
| २. | श्री.एस.ए.नवाब | - | २७.५१% कमी |
| ३. | श्री.अजिमोद्दीन सिद्दीकी | - | २३.७८६% कमी |
| ४. | श्री.एस.एम.सज्जाद | - | ११.७८६% कमी |
| ५. | श्री.शेख मसूद | - | दर दिलेले नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८७% कमी दराची इंडियन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. त्यास मा.आयुक्तांनी दि.१८.१०.९९ नुसार मान्यता दिलेली आहे. करिता इंडियन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८७% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट कब्रस्तान येथे रेस्टींग शेड बांधणे व संरक्षित भिंत बांधणे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.८७% कमी दराची इंडियन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२७/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योतीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,८८,५००/- यास विषय क्र.८७/७ दि.०९.०६.९९ अन्वये स्थायी समिती सभेमध्ये मान्यता प्राप्त झालेली आहे. उक्त मान्यतेन्वये कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१९/९९, दि.२९.०६.९९ अन्वये निविदा विक्रीचा अंतिम दि.०७.०७.९९ पर्यंत एकूण २३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीचा दि.१७.०७.९९ रोजी एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष दिनांक १५.०९.९९ रोजी मुख्य लेखाधिकारी यांच्या दालनात उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इंडियन कंन्स्ट्रक्शन | - | ३०.०१% कमी |
| २. | श्री.सुरेश साधवानी | - | २८.८% कमी |
| ३. | श्री.यु.के.पंडीत | - | २४.२५% कमी |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | २५.५३% कमी |
| ५. | श्री.सुखबीरसिंग | - | २२.०५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची इंडियन कंन्स्ट्रक्शन यांचे दर प्राप्त आहे. करिता इंडियन कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराने काम करुन घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीचे मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०५% कमी दराची इंडियन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२८/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, दलालवाडी परिसरात रफ शहाबाद फशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,९८,४४३/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च नवीन खांडकी रस्ते या लेखा शिर्षाखाली ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलालवाडी परिसरात रफ शहाबाद फरशी बसविणे व जुनी खांडकी दुरुस्त करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,९८,४४३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३२९/१० :**

मालमत्ता अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे कॅन्टीन चालविण्यासाठी श्री.गणेश शेट्टी यांना स्थायी समिती ठराव क्र.५४८/१३, दि.०८.०३.९९ अन्वये तीन वर्षासाठी करारावर देण्यांत आली होती. सदर मुदत संपल्यानंतर अर्जदार श्री.गणेश शेट्टी मागणी केल्यानुसार खालील अटी शर्तीनुसार कॅन्टीन भाड्याने देण्यासाठी विचारार्थ सादर.

१) सदर कॅन्टीन पाच वर्षासाठी चालविण्यासाठी करारावर देण्यांत येईल. संपूर्ण वर्षाचे भाडे हे दोन हप्त्यात राहील. तसेच अनामत रक्कम रु.५०००/- भरणा करावे लागेल. अनामत रक्कमेवर व्याज मिळणार नाही. कार्यालयाने खालीलप्रमाणे प्रत्येक वर्षी १०% मुळ भाड्यात वाढ करण्यांत येऊन खालीलप्रमाणे आकारण्यांत येईल.

| **अ.क्र.** | **वर्ष** | **भाडे** | **१०% वाढ** | **१०% वाढीसह दरमहा भाडे** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | १९९८-१९९९ | ४४०० | | चालू भाडे |
| २. | १९९९-२००० | ४४०० | ४४० | ४८४०/- प्रति महा |
| ३. | २०००-२००१ | ४८४० | ४८४ | ५३२४/- प्रति महा |
| ४. | २००१-२००२ | ५३५४ | ५३२ | ५८५६/- प्रति महा |
| ५. | २००२-२००३ | ५८५६ | ५८६ | ६४४२/- प्रति महा |
| ६. | २००३-२००४ | ६८४२ | ६४४ | ७४८६/- प्रति महा |

२) संत एकनाथ रंग मंदिर येथे ज्यावेळी कार्यक्रम असेल त्याच दिवशी कार्यक्रमाच्या एक तास अगोदर पासून कॅन्टीन चालविता येईल.

३) करार काळात कोणासही कॅन्टीन चालविण्याचा अधिकार हस्तांतरीत करता येणार नाही. त्यांचे कार्यक्षेत्र हे फक्त कॅन्टीन पुरते मर्यादित राहील.

४) कॅन्टीन इमारतीचे जागेचे व इतर संबंधित स्थावर मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्यासाठी संबंधितास जबाबदार धरण्यांत येईल. व नुकसान भरपाई वसुल करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

५) कॅन्टीनमध्ये फक्त शाकाहारी अल्पोपहार, चहा, कॉफी, थंडपेये, आईसक्रीम इ.पदार्थ ठेवणे बंधनकारक राहील. मांसाहारी पदार्थ व मद्य ठेवता येणार नाही. व खानावळ चालविता येणार नाही.

६) कॅन्टीनची साफसफाई, स्वच्छता राखणे हे अर्जदारास बंधनकारक राहील.

७) कॅन्टीनचे लाईटबील अर्जदारास कॅन्टीन भाडे सोडून स्वखर्चाने भरावे लागेल.

तरी वरील अटी-शर्ती नुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** प्रस्तावातील अटी शर्तीनुसार देण्यांस हरकत नाही. परंतू मुळ भाड्यात १०% वाढ करण्याचे दर्शविलेले असून दरवर्षी १०% ऐवजी ३ ते ४% नी वाढ करण्याबाबतचा निर्णय घ्यावा. फक्त कार्यक्रमाच्या वेळीच कॅन्टीन चालू असते. सलग चालू नसते.

**श्री.स.अ.इकबालोद्दीन :** या मताशी मी सहमत आहे.

**मा.सभापती :** श्री.गणेश शेट्टी यांना संत एकनाथ रंग मंदिर येथील कॅन्टीन करार पध्दती अटी व शर्ती टाकून देण्यांत आली आहे. कार्यक्रमाच्या वेळी काही आयोजक बाहेरुन चहा मागवतात. आपण ४५००-५००० भाडे घेतो. पदार्थाचे दर जास्त घेत असेल तर कसे कळवावे. रंग मंदिरमध्ये बाहेरचे खाद्य पदार्थ जलपेय इ.येवू नये व तसे आणण्यास बंदी करण्यांत यावी. असा निर्णय घेण्यांत येतो. फक्त या वर्षासाठीच १०% वाढ ऐवजी ४% वाढ करावी असाही निर्णय घेण्यांत येतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** ज्यावेळी संत एकनाथ रंगमंदिर भाड्याने देण्याबाबत बुकींग होते. त्यावेळीच देण्यांत येणाऱ्या पावतीवर एक प्रकारची टीप द्यावी की, खाद्य पदार्थ हे याच कॅन्टींनमधून घ्यावे लागतील. त्यामुळे संबंधितास त्याचा फायदा होईल व देण्यात येणारे पदार्थ चांगल्या प्रकारचे, स्वादीष्ट असावेत. जेणेकरुन कुणाचीही तक्रार येणार नाही. आल्यास प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाही व्हावी व संबंधितास मुळ भाड्यात १०% ऐवजी ४% प्रमाणे भाडेवाढ वसुल करण्याबाबतचा जो निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. तो फक्त याच ठरावापुरता मर्यादित राहील. मनपाच्या इतर मालमत्तेच्या भाडेवाढीसाठी निर्णय राहणार नाही. यापुढे कुणी व्यक्ती न्यायालयात जाऊन या निर्णयानुसार कार्यवाही करणार नाही, असे ठरावात नमूद करण्यांत यावे.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.कोकाटे यांनी सुचविलेली सूचना योग्य असून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यांत यावी. या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर येथील महानगरपालिकेची कॅन्टीन चालविण्याकरिता श्री.गणेश शेट्टी यांना भाड्याने देण्यांत आलेली असून प्रस्तावात दर्शविलेल्या अ.क्र.१ ते ७ च्या अटीनुसार यापुढे ही कॅन्टीन त्यांना भाड्याने चालविण्यांस देण्याकरिता सर्वानुमते स्विकृती देण्यांत येते. परंतू सदरील कॅन्टीनचा व्यवसाय फक्त कार्यक्रमाचे वेळीच चालू असल्याने फक्त या एका वर्षाकरिता १०% ऐवजी ०४% (चार टक्के) भाडेवाढ करण्यात यावी. तसेच सदरील ठरावानुसार १०% ऐवजी ४% भाडेवाढीचा निर्णय फक्त याच ठरावापुरता मर्यादित राहील. यापुढे कुणाही व्यक्तीस न्यायालयात जाऊन या निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत मागणी करता येणार नाही. सदर ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.३३०/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मकईगेट, गौतमनगर भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.२,२५,३८१/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालासाठी ठेवण्यांत आलेल्या "नवीन खांडकी रस्ते" या लेखाशिर्षाखाली करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी, मकईगेट, गौतमनगर भागात शहाबाद फरशी बसविणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,२५,३८१/- चे अंदाजपत्रकास सवानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३१/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.सुराणानगर अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणे च्या कामासाठी सन १९९७-९८ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,५३,८०१/- चे तयार करण्यांत आलेले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या वित्तीय वर्षातील "नवीन डांबरीकरण" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.सुराणानगर अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,५३,८०१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३२/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.महेशनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.१,८६,२९१/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.महेशनगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,८६,२९१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३३/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.अहिंसानगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.४,९४,२०१/- तयार करण्यांत आले असून सदरचा

खर्च सन १९९९-२००० या वित्तीय वर्षात "नवीन डांबरीकरण" या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.अहिंसानगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,९४,२०१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३४/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, यशोधरा कॉलनी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.३,४५,०००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यांत आलेल्या तरतूदीतून करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे यशोधरा कॉलनी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३५/१६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कैलासनगर येथे पाणपोई बांधावयाची आहे. त्यासाठी सा.बां.विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१,०३,१५०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली. सदर काम हे स.सदस्या सौ.यशोदा वाडेकर, (प्र.क्र.३८) यांच्या स्वेच्छानिधीतून करावयाचे आहे. करिता अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथे पाणपोई बांधण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.१,०३,१५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३६/१७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,

१) एन-७ येथील नवीन बांधण्यांत आलेल्या जी.एस.आर.जवळ ११ के.व्ही.क्षमतेचे विद्युत जनित्र, सब स्टेशन, त्यातील सर्व उपांगासहीत उभे करणे, किंमत रुपये ३,३६,६४४/-.

२) एन-७ जी.एस.आर.करिता हा भाग (SESMIC ZONE) असल्याने अतिरिक्त लोखंड, काँक्रीट करणे तसेच दगडी बांधकाम करणे, गंज विरोधी प्रक्रिया करणे, रक्कम रु.३,६१,८१२/-

वरील दोन्हीही कामास मा.आयुक्तांनी अनुक्रमे दि.०३.०६.९९ व २९.१०.९९ रोजी मान्यता दिलेली आहे.

वरील प्रस्ताव बांधकाम सुरु असतांना कामे सुरु करावे लागले. करिता सदरील प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीस्तव स्थायी समितीसमोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ येथील नवीन बांधण्यांत आलेल्या जी.एस.आर.जवळ ११ के.व्ही.क्षमतेचे विद्युत जनित्र सब स्टेशन त्यातील सर्व उपांगासहीत उभे करणेच्या कामाकरिता रक्कम रु.३,३६,६४४/- आणि अतिरिक्त लोखंड, काँक्रीट करणे तसेच दगडी बांधकाम करणे, गंज विरोधी प्रक्रिया करणे या कामासाठी रक्कम रु.३,६१,८१२/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास व सदरील बांधकाम सुरु असतांना वरील कामे सुरु करण्यांत आल्याने त्यास कार्योत्तर मंजूरी सर्वानुमते स्विकृतीसह देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३७/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रा लगत संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सन १९९६-९७ च्या सा.बां.विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रु.२,४१,०००/- चे तयार करण्यांत येऊन सदर कामावर होणारा खर्च हा "उद्यान दुरुस्ती" या तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत येऊन त्यास मा.आयुक्तांची दि.२६.१०.९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. करिता अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

**श्री.विखारोद्दीन :** विषय क्र.८ व ९ च्या (१८ व १९) संदर्भाने बोलू इच्छितो की, बजेट शिल्लक असतांनाही माझ्या वार्डातील दवाखान्यासाठी संरक्षित भिंत बांधण्याबाबत सूचना देऊनही अद्याप तसा प्रस्ताव मंजूरीसाठी आलेला नाही. दुसऱ्या वार्डातील संरक्षित भिंत करण्याबाबतचे प्रस्ताव मंजूरीसाठी येतात. माझ्या वार्डातील का येत नाहीत?

**श्री.स.अ.एकबालोद्दीन :** संबंधित अधिकारी हे मुस्लीम नगरसेवकांच्या वार्डातील प्रस्ताव मद्दामहून आणत नाहीत. हिंदुच्या वार्डातीलच प्रस्ताव मंजूर होऊन कामे होत आहेत.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**उपअभियंता (इ) :** सिल्क मिल कॉलनी येथील दवाखान्यासाठी संरक्षित भिंत बांधण्याबाबतची संचिकेची संपूर्ण कार्यवाही झालेली असून लेखा विभागातून एक वेळा परत आली आहे. संचिका पाहून सांगतो.

**मा.सभापती :** या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रालगत संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,४१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३८/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीच्या तळमजल्यासाठी पी.व्ही.सी.मार्बलेक्स फ्लोअरींग करणेच्या कामाकरिता बाजार

भावाप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून रक्कम रु.३,०९,२५०/- चे आहे. त्यावर होणारा खर्च डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या लेखा शिर्षातून प्रस्तावित करण्यांत आला असून त्यास मा.आयुक्तांनी दि.२७.१०.९९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इमारतीच्या तळमजल्यासाठी पी.व्ही.सी.मार्बलेक्स फ्लोअरींग करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.३,०९,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३३९/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटाकारंजा येथील शिया कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.४,३३,२००/- ला स्थायी समिती सभा दि.०९.०६.९९ रोजी विषय क्र.८९/९ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली असून त्यानुसार निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१९/९९, दि.२९.०६.९९ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला एकूण २२ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शुजात हाशमी | - | १.७८६% कमी (१% अनामत भरलेली नाही.) |
| २. | श्री.मजहर सिद्दीकी | - | ०.०५% कमी |
| ३. | श्री.ए.ए.आबेदी | - | २०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व नियमानुसार पुर्तता करणाऱ्या श्री.मजहर सिद्दीकी यांना वाटाघाटीस बोलावण्यांत येऊन त्यांचे समवेत वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७८६% कमी दराने काम करण्यास लेखी संमती दिली आहे व त्यास मा.आयुक्तांनी दि.२५.१०.९९ नुसार मान्यता दिलेली आहे.

करिता श्री.मजहर सिद्दीकी यांचे वाटाघाटीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७८६% कमी दराची निविदा मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा येथील शिया कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व नियमानुसार पुर्तता करणाऱ्या श्री.मजहर सिद्दीकी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.७८६% कमी दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४०/२१ :**

(प्र.) कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.शाहशोक्ता कॉलनी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां.खातेचे वर्ष १९९७-९८ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६,६८,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम डांबरी रस्ते या शिर्षकातून करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास स्थायी समितीने दि.०९.०६.९९ रोजी मंजूरी दिलेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण (१४) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेस एकूण (४) निविदा प्राप्त झाल्या व त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मो.अहमद सिद्दीकी | - | अंदाजपत्रकीय दर |
| २. | श्री.ए.सी.कोठारी | - | ५% जास्त |
| ३. | श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन | - | ७% जास्त |
| ४. | मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री.मो.अहमद सिद्दीकी यांचे निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शाहशोक्ता कॉलनी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.मो.अहमद सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीस मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४१/२२ :**

उपसंचालक, नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्दी) नुसार आरक्षण क्र.१० ते १३ साठी अनुक्रमे शॉपिंग सेंटर, बहुउद्देशीय हॉल, प्राथमिक शाळा, खेळाचे मैदान, आरक्षित आहे. ही सर्व आरक्षणे सरकारी जमीन न.भु.क्र.७७३ मध्ये आहेत.

महानगरपालिकेस हर्सुल येथे शाळा बांधावयाची आहे. त्यासाठी वरील न.भु.क्र.७७३ ची सरकारी जमीन एकूण क्षेत्र १८०४०.८० ची मागणी महानगरपालिकेने मा.जिल्हाधिकारी यांचेकडे रितसर सरकारी जमीन हस्तांतर प्रस्तावान्वये पत्र क्र.जा.क्र./मनपा/नरवि/१९९४/९८, दि.१५.०७.९८ अन्वये केली. त्यावर वरील जमीनीची मान्यता मुल्यांकनानुसार शासनाकडून आल्यावर जागा देता येईल असे मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे कार्यालयात चौकशी केली असता समजले. परंतू मनपाने सदर ठिकाणी शाळा बांधणेची निविदा मंजूर केली होती. त्यामुळे मा.आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे मा.आयुक्त, म.न.पा.यांचे बरोबर बैठक घेऊन त्वरीत ताबा मिळणेसाठी तुर्त शाळेसाठी लागणारी २६००.०० चौ.मी. जागा ताब्यात घेणेचे ठरले. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी जा.क्र./९८/म.शा.का.-२/जमीन-२/प्र.क्र.-३१, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद दि.२०.०४.९९ अन्वये मा.तहसिलदार, औरंगाबाद यांना पत्र देऊन त्याची एकप्रत महानगरपालिकेस दिली आहे. त्यात २६००.०० चौ.मी.जागेचे मुल्य रुपये २,८६,०००/- भरुन घेऊन जागा मनपाकडे ताबा द्यावा असे ठरले आहे. व महानगरपालिकेने सदर रक्कम रु.२,८६,०००/- त्यांचे कार्यालयात जमा करावी असे ठरले आहे. करिता रक्कम रु.२,८६,०००/- शासकीय कोषागारात जमा करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथे महानगरपालिकेची शाळा बांधावयाची असल्यामुळे सरकारी जमीन न.भु.क्र.७७३ च्या एकूण क्षेत्र १८०४०.८० पैकी तुर्त शाळेसाठी लागणारी २६००.०० चौ.मी.जागा ताब्यात घेण्याचे दृष्टीने सदरील जागेचे मूल्य रक्कम

रु.८६,०००/- शासकीय कोषागारात जमा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४२/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सरस्वती भुवन कॉलनी येथील सुपर मार्केटच्या दक्षिणेकडील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२,२२,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.०९.०६.९९ रोजीच्या सभेमध्ये विषय क्र.८५/५ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली असून त्यानुसार निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१९/९९, दि.२९.०६.९९ अन्वये निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेला एकूण १५ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता गुत्तेदारांनी दिलेले दर पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | २१.५३% कमी |
| २. | इंडियन कंन्स्ट्रक्शन | - | २०.०५% कमी |
| ३. | फाइव्हस्टार कंन्स्ट्रक्शन | - | १२.३०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५३% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. करिता श्री.एस.ए.नवाब यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५५% कमी दराची निविदा स्थायी समितीपुढे मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सरस्वतीभुवन कॉलनी येथील सुपर मार्केटच्या दक्षिणेकडील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५३% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४३/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथील धनगर स्मशानभूमी मध्ये बर्नींग शेड व संरक्षित भिंत बांधणे आहे. त्यासाठी रक्कम रु.३,१०,०६०/- (तीन लक्ष दहा हजार साठ मात्र) एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. व त्यास स्थायी समितीची सभा दि.०९.०६.९९ विषय क्र.१००/१ च्या मान्यतेनुसार निविदा मागविण्यांत आल्या असता कोरे निविदा विक्री दि.१३.०७.९९ पर्यंत एकूण (१६) सोळा निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण ७ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याखालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.ए.नवाब | - | २७.५१% कमी |
| २. | श्री.ए.एम.फारुकी | - | २७.५% कमी |
| ३. | श्री.सय्यद रफिकोद्दीन | - | २२.१५% कमी |
| ४. | श्री.अब्दुल सलाम | - | २०.१०% कमी |
| ५. | श्री.अजिमोद्दीन सिद्दीकी | - | १७.८६% कमी |
| ६. | श्री.एस.एम.मंडोरे | - | १८.८६% कमी (सोबत १% अनामत रक्कम प्राप्त नाही.) |
| ७. | श्री.शेख मसूद | - | १३% कमी दराने |

या अनुषंगाने प्राप्त दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५१% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा असून मा.आयुक्तांनी दि.०६.१०.९९ रोजी त्यास मान्यता दिली आहे. करिता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल येथील धनगर स्मशानभूमी मध्ये बर्नींग रोड व संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.५१% कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४४/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, भवानी नगर, दत्तनगर, अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.५,७६,५००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालासाठी पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भवानीनगर, दत्तनगर अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,७६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४५/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नवाबपुरा चौरस्ता ते शहाबाजार रस्ता, बनेमियाँ दर्गा समोरुन पहेलवान यांचे घरापर्यंत डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक २२.०६.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.१७४/४१ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.३,१८,०००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/२१/९९, दि.०२.०७.९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१८) अठरा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (५) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३६.८६% कमी दराने |
| २. | मे.व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. | - | २६.७१% कमी |
| ३. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | - | २०.८३% कमी |
| ४. | मे.रे.कन्स्ट्रक्शन कं. | - | २०.९९% कमी |
| ५. | श्री.एच.ए.पालेजा | - | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नवाबपुरा चौरस्ता ते शहाबाजार रस्ता बनेमियाँ दर्गापासून पहेलवान यांचे घरापर्यंत डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४६/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.५६ मधील उदय कॉलनी, नेहरु पॅलेस, भोईवाडा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.०९.०६.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.९७/१७ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.४,७९,३९६/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१९/९९, दि.२९.०६.९९ चे निविदा प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१९) एकोणावीस निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (८) आठ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३६.८६% कमी |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ३५.२१% कमी |
| ३. | श्री.डी.अजितसिंग | - | ३३.३२% कमी |
| ४. | मे.व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३१.९१% कमी |
| ५. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | - | २१.२२% कमी |
| ६. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २०% कमी |
| ७. | मे.पाटील कंन्स्ट्रक्शन कं. | - | १५.१५% कमी |
| ८. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | - | १०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.५६ मधील उदय कॉलनी, नेहरु पॅलेस, भोईवाडा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४७/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रोशनगेट वार्डातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक २२.०६.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.१७३/४० अन्वये रक्कम रु.९,८४,३१८/- ला मान्यता मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/२१/९९, दि.०२.०७.९९ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१८) निविदा विक्री झाल्या, त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेला एकूण (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ३६.८६% कमी |
| २. | मे.व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३५.०१% कमी |
| ३. | श्री.डी.अजितसिंग | - | ३१.३२% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | श्री.एच.ए.पालेजा | - | ०५% कमी |
| ५. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | - | २१.८९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट वार्डातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४८/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, पेठेनगर, भावसिंगपुरा येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.०९.०६.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.९८/१८ अन्वये अंदाजपत्रकीय रक्कम रु.७,५५,५६०/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१९/९९, दि.२९.०६.९९ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१९) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (९) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३६.८६% कमी |
| २. | श्री.डी.अजितसिंग | - | ३६.२% कमी |
| ३. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ३५.२१% कमी |
| ४. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | - | २०% कमी |
| ५. | मे.रे.कन्स्ट्रक्शन कं. | - | ३३.१६% कमी |
| ६. | मे.व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३४.९१% कमी |
| ७. | मे.पाटील कंन्स्ट्रक्शन | - | २५.२५% कमी |
| ८. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | - | २३.५% कमी |
| ९. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पेठेनगर, भावसिंगपुरा येथील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३४९/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.बारापुल्ला परिसरातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.२२.०६.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये

विषय क्र.१६५/३२ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.३,९५,१७०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र./मनपा/लेखा/नि/२१/९९, दि.०२.०७.९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१८) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण (७) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३६.८६% कमी |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ३५.५१% कमी |
| ३. | मे.व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन | - | ३५.०१% कमी |
| ४. | श्री.डी.अजितसिंग | - | ३१.३२% कमी |
| ५. | श्री.एच.ए.पालेजा | - | १२% कमी |
| ६. | मे.रे.कन्स्ट्रक्शन | - | २१.१% कमी |
| ७. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्श कं. | - | २०.१९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारापुल्ला परिसरातील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५०/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जहाँगिरदार कॉलनी व मगरबी ले-आऊट मधील रस्त्यांना पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.४,६२,५५५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यांत आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (४) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यांत आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन | - | ३७.८६% कमी |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | - | ३६.९१% कमी |
| ३. | मे.डी.अजितसिंग | - | २७.९१% कमी |
| ४. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन | - | १९.०१% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं.यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.८६% कमी दराचे आहेत. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जहाँगिरदार कॉलनी व मगरबी ले-आऊट मधील रस्त्यांना पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्र कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.३५१/३२ :**

उपसंचालक, नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर प्रारुप विकास योजनेनुसार १८ मी. (६० फुट) रुंद रस्ता टी.बी.हॉस्पीटल पासून (आमखास मैदान) ते खामनदी (हिमायत बाग) हा रस्ता टी.बी.हॉस्पीटल पासून ते शहर भिंत फसिल पर्यंत विकसीत झालेला आहे. यापासून पुढे सदर रस्त्याने स.नं.१/२, १, ३ व ३३ हे भागशः बाधित आहेत. पैकी स.नं.१ व ३ हया शासकीय जमीनी आहेत. त्यातून सदर रस्त्यासाठी लागणारी जमीन हस्तांतरण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेला आहे.

स.नं.३३ चे मिळकतधारक श्री.सालम बीन खमीस अय्युबखॉन हाजीखॉन यांचे मालकीचे सदर रस्त्याने बाधित क्षेत्र १५२८.३१ चौ.मी.महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने संपादन करावयाचे ठरविले असून खाजगी वाटाघाटीत सदर बाधित जमीनीचा मोबदला रक्कम रु.३,६७,८२३/- (तीन लाख सदुसष्ट हजार आठशे तेवीस) एवढा निश्चित केलेला आहे. सदर जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी सुमारे रक्कम रु.३६,७९०/- एवढा खर्च लागणार आहे. सदर खर्च लागणार आहे. सदर खर्च महानगरपालिका व मिळकतधारक निम्मा-निम्मा करणार आहेत. त्यानुसार खर्चाची निम्मी रक्कम रु.१८.४४५/- हे मोबदला रक्कमेतून वळते करुन घेण्यांस संबंधित मिळकत धारकाने संमती दिलेली आहे. करिता उर्वरित मोबदला रक्कम रु.३,४९,३७८/- (तीन लाख एकोणपन्नास हजार तीनशे अठ्ठ्याहत्तर) मिळकतधारकास अदा करण्यास व खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.३६,७९०/- (छत्तीस हजार सातशे नव्वद) अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले (शा.अ.) यांना देणेसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर. तसेच ३१ मार्च २००० पर्यंत अंदाजपत्रकीय तरतूदीला अधीन राहून मोबदल्याची रक्कम अदा करण्यांत येईल. अन्यथा जुन २००० पर्यंत रक्कम अदा करण्यांत येईल. करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर प्रारुप विकास योजनेनुसार १८ मी.रुंद टी.बी.हॉस्पीटल ते खामनदी (हिमायत बाग) हा रस्ता टी.बी.हॉस्पीटल ते शहर भिंतीच्या (फसील) पुढे या रस्त्याने बाधित जमिनीपैकी स.नं.३३ चे बाधित क्षेत्र १५२८.३१ चौ.मी.खाजगी वाटाघाटीने संपादित करण्याकरिता सदर जमीनीचे मिळकतधारक श्री.सालम बीन खमीस अय्युब खॉन हाजी खॉन यांना जमिनीचा मोबदला रक्कम रु.३,६७,८२३/- मधून खरेदीखतासाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रु.३६,७९०/- पैकी निम्मी रक्कम रु.१८,४४५/- वळती करुन उर्वरित मोबदला रक्कम रु.३,४९,३७८/- संबंधितास अदा करण्यास तसेच खरेदी खताकरिता लागणारी रक्कम रु.३६,७९०/- शाखा अभियंता श्री.डी.डी.कालेले यांचे नांवे अग्रीम म्हणून देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५२/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथे स्थायी समिती सभागृहामध्ये असलेल्या टेबल सारखा टेबल व खुर्च्या तयार करणेच्या कामासाठी प्राप्त कोटेशन आधारे अंदाजपत्रक रक्कम रु.२,५९,५००/- चे तयार करण्यांत आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० या सालाकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र या लेखाशिर्षाखाली करण्यांत येईल.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर येथे स्थायी समिती सभागृहामध्ये असलेल्या टेबल सारखा टेबल व खुर्च्या तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.२,५९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५३/३४ :**

प्र.कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.गांधीनगर (स्लम) येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे करिता रक्कम रु.९,९२,१०३/- सा.बां.दरसुची सन १९९८-९९ नुसार तयार करण्यांत आले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१९.०६.९९ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून स्थायी समिती विषय क्र.१०, दि.२२.०६.९९ अन्वये मंजूरी प्रदान केली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १६ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या तारखेपर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ए.एम.फारुकी | - | ५.११% जास्त |
| २. | शेख समद | - | १०% जास्त |
| ३. | साबा कंन्स्ट्रक्शन | - | १५.००% जास्त |
| ४. | सय्यद शफी | - | दर भरलेले नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.११% जास्त दराने असल्याने एजन्सीज वाटाघाटीस बोलावले असता वाटाघाटी अंती एजन्सीने अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. करिता श्री.ए.एफ.फारुकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गांधीनगर (स्लम) येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.ए.एम.फारुकी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५४/३५ :**

उपसंचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, न.भु.क्र.१९०५२ ही मिळकत १०० फुट रुंद रस्ता रेल्वेस्टेशन ते पैठणरोड या विकास योजनेत बाधित आहे. या रस्त्यावर उड्डान पुलाचे काम चालू असून यासाठी सदर मिळकती शेजारील न.भु.क्र.१९०५३ व १९०५४ या मिळकती खाजगी वाटाघाटीने संपादन करुन मोबदला देण्यांत आला आहे. तसेच न.भु.क्र.१९०५२ ही खुली जागा होती. त्यामुळे रस्त्यासाठी एकूण क्षेत्र २८१.७० चौ.मी.पैकी ११८.१२ चौ.मी.क्षेत्र वापरले आहे. करिता संबंधित मिळकतधारक श्री.गुरुनामसिंग कापरासिंग यांनी जागेचा मोबदला मागितलेला आहे. सदर रस्त्याने वापरलेले क्षेत्र ११८.१२ चौ.मी.साठी खाजगी वाटाघाटीत मोबदला रक्कम रु.१,७०,०९२/- (एक लाख सत्तर हजार ब्याण्णव रुपये) निश्चित करण्यांत आला आहे.

यावर खरेदी खतासाठी रक्कम रु.१५,३५०/- एवढा खर्च लागणार आहे. सदर खर्च मिळकतधारक व महानगरपालिका निम्मा निम्मा करणार आहे. करिता खरेदी खताची निम्मी रक्कम रु.७६७५/- हे मोबदला रक्कमेतून वळती करुन घेऊन रुपये १,६२,२१७/- (एक लाख बासष्ट हजार दोनशे सतरा रुपये) मिळकत धारकास देय आहे. करिता मोबदला रक्कम रु.१,६२,२१७/- मिळकतधारकास अदा करणेस्तव व खरेदीखतासाठी लागणारी रक्कम रु.१५,३५०/- (पंधरा हजार तीनशे पन्नास) श्री.डी.डी.कोलेले, शा.अ.यांना अग्रीम म्हणून देण्यांसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १०० फुट रुंद रस्ता रेल्वेस्टेशन ते पैठणगेट या विकास योजनेत बाधित मिळकत न.भु.क्र.१९०५२ च्या एकूण क्षेत्र २८१.७० चौ.मी.पैकी रस्त्यासाठी वापरण्यांत आलेले क्षेत्र ११८.१२ चौ.मी.क्षेत्राचा खाजगी वाटाघाटीत ठरल्यानुसार मिळकतधारक श्री.गुरुनामसिंग कापरासिंग यांना मोबदला रक्कम रु.१,७०,०९२/- (एक लाख सत्तर हजार ब्याण्णव रुपये) मधून खरेदीखतासाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रु.१५,३५०/- च्या निम्मी रक्कम रु.७,६७५/- वळती करुन उर्वरित रक्कम रु.१,६२,२१७/- (एक लाख बासष्ट हजार दोनशे सतरा रुपये) संबंधित मिळकतधारकास अदा करण्यास तसेच खरेदी खतासाठी लागणारी रक्कम रु.१५,३५०/- श्री.डी.डी.कालेले, शा.अ. यांना अग्रीम म्हणून देण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५५/३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, नागेश्वरवाडी व स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी दि.०९.०६.९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.९९/१९, अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.७,०३,७३६/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/१९/९९, दि.२९.०६.९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१९) एकोणवीस निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेस नियोजित तारखेस एकूण (७) सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३६.८६% कमी |
| २. | मे.व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन कं. | - | ३४.९१% कमी |
| ३. | श्री.डी.अजितसिंग | - | ३३.३२% कमी |
| ४. | मे.पाटील कंन्स्ट्रक्शन कं. | - | २५.२५% कमी |
| ५. | मे.आदिनाथ कंन्स्ट्रक्शन कं. | - | २१.८९% कमी |
| ६. | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | - | २०% कमी |
| ७. | मे.जग्गी कंन्स्ट्रक्शन कं. | - | १०% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा असून प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी व स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी

व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.८६% कमी दराची मे.मॉस्कॉट कंन्स्ट्रक्शन कं.यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५६/३७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, रोहिदासपुरा, भवानी नगर, भागा अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक रक्कम रु.८,५८,८००/-चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च सन १९९९-२००० साला करिता "पुर्नडांबरीकरण" या लेखाशिर्षातून करण्यांत येईल.करिता प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोहिदासपुरा, भवानी नगर, भागा अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.८,५८,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५७/३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉटेल अजंटा अंबेसेटर चौक, जालना रोड येथे वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरिता राज्य वाहतुक शाखेच्या दरसुचीनुसार रक्कम रु.५,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च सन १९९९-२००० या वर्षाकरिता पोलिस डिपार्टमेंटकडून वाहतूक सुविधा अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.५,२३,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अजंठा अंबेसेडर चौक, जालना रोड येथे वाहतूक संकेतांक बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.५,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरीस्तव देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३५८/३९ :**

उपसंचालक, नगररचना यांनी सादर केलेला व मा.स्थायी समितीने मंजूर केलेला दि.२७.०५.९९ रोजी मंजूर ठराव क्र.६७/७ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव आहे.

"वरील प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करतांना अनावधानाने सरेंडर डीड ऐवजी खरेदीखत करुन घेणे याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला."

मंजूर प्रस्तावानुसार खरेदीखत करण्यासाठी महानगरपालिका व मिळकतधारक हयांना खरेदी खताचा खर्च निम्मा करावा लागणार आहे. मात्र मा.आयुक्तांचे मान्यतेनुसार सरेंडर डिडचा खर्च मिळकत धारकांना करावा लागणार आहे. त्यानुसार मिळकत धारकास मोबदला रक्कम रु.१,६४,८७४/- देणेचे व महानगरपालिकेस स्वखर्चाने सरेंडर डिड करुन मिळकत धारकाने जागेचा ताबा देणे बाबतचा दुरुस्त प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २७.०५.९९ च्या स्थायी समिती सभेतील ठराव क्र.३७/७ मध्ये खरेदीखत ऐवजी "सरेंडर डीड" अशी दुरुस्ती करण्यास व त्यानुसार मिळकतधारकास मोबदला रक्कम रु.१,६४,८७४/- देण्यास व सरेंडर डीड करुन घेऊन

जागेचा ताबा घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. वरीलप्रमाणे दुरुस्ती प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :-**

**सौ.लता दलाल :** महापालिका अस्थापनेवर दैनिक वेनावर काही वाहन चालक कार्यरत असून शासनाच्या वेळावेळी पारित होणाऱ्या दैनिक वेतनाचा दराच्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेच्या दैनिक वेतनावरील सर्व वाहन चालकांना तो दैनिक वेतन लागू करण्याबाबतचा ठराव स्थायी समितीमध्ये स.श्री.प्रदिप जैस्वाल सभापती असतांना १९९५ ला पारित झालेला आहे. सध्या त्यांना शासन निर्णयाप्रमाणे दैनिक वेतन मिळत नाही. दि.०१.०७.९८ ला शासनाने मंजूर केलेल्या दैनिक वेतनाप्रमाणे आतापर्यंत फरक देण्यांत येऊन यापुढे जो दैनिक वेतनाप्रमाणे आतापर्यंत फरक देण्यांत येऊन यापुढे जो दैनिक वेतन आहे. त्याप्रमाणे वेतन द्यावे. तशा प्रकारची निवेदने संबंधित कर्मचाऱ्यांनी मा.आयुक्तांकडे दिलेली आहेत. याबाबत विचार होऊन त्यांना न्याय देण्यांत यावा.

**मा.सभापती :** स.सदस्य सौ.लता दलाल यांनी केलेल्या सुचनेची नियमाने अंमलबजावणी करुन तशी कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. त्याचप्रमाणे या सभेत जे प्रस्ताव अंदाजपत्रकाचे मंजूर करण्यांत आलेले आहेत व विकास कामाचे प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. डांबरीकरणाचे किंवा इतर विकास कामाबाबतचे बरेचशे प्रस्ताव कमी दराने काम करुन देण्याबाबत मंजूरीसाठी येतात. यामुळे अशा प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर व प्रत्यक्ष कामास सुरुवात होऊन काम पूर्ण झाल्यावरही संबंधित ठेकेदाराकडून एक वर्षाच्या गॅरंटीच्या अटीवर संबंधित ठेकेदाराचे मुळ अंदाजपत्रकातील रक्कमेच्या १०% प्रमाणे जी रक्कम होईल ती एक वर्षापर्यंत महानगरपालिकेकडे अनामत रक्कम म्हणून राहील. काम खराब झाले तर वर्षभरात करुन द्यावे. निविदा पत्रकामध्ये याची नोंद घेण्यांत यावी. वृत्तपत्रात द्यावे. सर्व कामासाठी हे लागू राहील. एक वर्षानंतर केलेल्या कामास कोणतीही बाधा आलेली नाही. असे आढळून आल्यासच संबंधित ठेकेदाराला ठेवलेली रक्कम अदा करण्यांत येईल. असा निर्णय स्थायी समितीच्या सभेमध्ये घेण्यांत येतो.

याचबरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | मा.सभापती (स्थायी समिती) |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |